मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

ISSN 0973-8452

मराठी अर्थशास्त्र परिषद

नियतकालिक

(त्रैमासिक)

# अर्थसंवाद

मनुष्याणाम् वृत्तिरर्थः।

भारतीय सौर वैशाख – आषाढ १९४२

एप्रिल–जून २०२० / खंड ४४, अंक १

# ‘अर्थसंवाद’च्या लेखकांसाठी महत्त्वाच्या सूचना

१. लेखकांनी आपले शोधनिबंध Shree Lipi (२३३५) किंवा Kruti Dev किंवा Unicode यापैकी कोणत्याही Font मध्ये Pagemaker किंवा Ms Word मध्ये टाईप करून पाठवावा. या व्यतिरिक्त कोणताही Font वापरू नये.

२ **संशोधनपर लेखाची प्रत अथवा सीडी पोस्टाद्वारे पाठवू नये.** काही अडचण असल्यास संपादकांशी संपर्क साधावा.

३. **संशोधनपर लेखाची एक सॉफ्ट कॉपी (एक मूळ फाईल व त्याचीच PDF केलेली फाईल अशा दोन फाईलस्) ई-मेल द्वारे प्रमुख संपादकांकडे rahulmhopare@rediffmail.com या ई-मेल ॲड्रेसवर पाठवावी.** लेखासोबत संपादकांना लेख पाठवल्याची स्वाक्षरी केलेली कव्हर नोट स्कॅन करून पाठवावी. तसेच ई-मेल केल्यानंतर संपादकांशी भ्रमणध्वनीवर (९९२३८७९०२०) संपर्क साधून आपला ई-मेल व्यवस्थित पोचल्याची खात्री करून घ्यावी.

४. संशोधनपर लेख पूर्वमुद्रित नसावा. त्यामध्ये कॉपीराईटचा भंग न करता संदर्भाचा उल्लेख करावा. आजीव सभासद क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल लिहिणे आवश्यक आहे.

५. लेखाच्या शीर्षकाखाली लेखकांनी स्वत:चे संपूर्ण नाव देवनागरीतूनच लिहावे.

६. संशोधनपर लेख खास अर्थसंवादसाठीच लिहिलेला असावा. माहिती व आकडेवारी अद्ययावत असावी. लेखात गरजेनुरूप सांख्यिकीय तक्ते व आलेखांचा वापर केल्यास उत्तम. लेखांची गुणवत्ता पाहून तज्ज्ञ परिक्षकांनी केलेल्या सर्व सूचनांची पूर्तता केल्यानंतरच त्याची प्रसिद्धीसाठी निवड केली जाईल.

७. भाषा संचालनालयाने प्रकाशित केलेल्या अर्थशास्त्र परिभाषा कोश यातील परिभाषेचा उपयोग करावा. संपादकांना पाठवलेल्या कव्हर नोटसह लेखनाची एक प्रत स्वत जयळ अवश्य ठेवावी.

८. लेखकांनी कृपया संशोधनपर लेख टाईप केल्यानंतर सर्व सांख्यिकी माहिती, शुद्धलेखन आणि व्याकरण अचूक तपासून नंतरच अंतिम प्रत पाठवावी.

९. संदर्भ सूची देताना पूढील पद्धतीने देणे आवश्यक आहे : उदा. पाटील, ज.फा., सुवर्ण महोत्सवी महाराष्ट्राची बदलती अर्थव्यवस्था, सकाळ पेपर्स लिमिटेड, पुणे, २०१०, (पृष्ठ क्रमांक असेल तर द्यावा.)

मनुष्याणाम् वृत्तिरर्थ:।
www.marthpari.org
(स्थापना वर्ष - १९७७)

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे त्रैमासिक

लोककल्याणमूलस्य अर्थशास्त्रस्य सिध्दये।
शोधचर्चाविवादार्थ संवादोऽयं प्रवर्तित:।।

# अर्थसंवाद

(तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक)

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

एप्रिल - मे- जून २०२०/ खंड ४४ / अंक १

**प्रमुख संपादक**
राहुल शं. म्होपरे
(देवचंद कॉलेज, अर्जुननगर)

**सहाय्यक संपादक**
चंद्रकांत जाधव
(य.च.वारणा महाविद्यालय,वारणा नगर)

**सल्लागार मंडळ**
**(२०१८-२१)**
जनार्दन काकडे
राजू शिंदे
अजय दरेकर
मोहन सदामते

**संपादकीय पत्रव्यवहार**
राहुल शं. म्होपरे
विद्यापीठ क्वार्टर नं. डी-३४,
सायबरसमोर,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
ता. करवीर, जि. कोल्हापूर
पिन : ४१६ ००४
भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०

**लेखातील मते लेखकांचीच**

## अ नु क्र म णि का

१. भरतकुमार सोलापुरे
कोविड-१९ची आर्थिक मंदी ........ ३

२. प्रमोद पांडुरंगराव लोणारकर
भारतातील स्थलांतराचे मापन: विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य ........ २६

३. एम. एन. शिंदे
१४ व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे अर्धशतक
आणि सद्यस्थिती ........ ३६

४. प्रशांत एन. देशमुख, आर. एस. सोळुंके
विदर्भ आणि मराठवाड्यातील कुपोषण
निर्मूलन कार्यक्रमाचा मागोवा ........ ४६

५. सतीश श्रीवास्तव
आरोग्यसेवेचे स्वरूप आणि उत्पादन ........ ५७

६. विकास विनायकराव सुकाळे
केंद्र सरकारचे कोरोना पॅकेज : काही अनुत्तरित प्रश्न ........ ६३

७. राहुल शं. म्होपरे
आर्थिक पाहणी अहवाल २०१९-२० : चिकित्सक आढावा ........ ६८

८. मंजुषा मुसमाडे : पुस्तक परिचय
चौकटीपल्याडचा नागरी सेवक ........ ७४

९. सुभाष कोंबडे : पुस्तक परिचय
आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ ........ ७७

१०. शि. ना. माने : अर्थ शब्दांची वाट पाहे...
महाराष्ट्राचा रोटी रिपब्लिक अर्थसंकल्प : भाष्य ........ ८०

११. जे. एफ. पाटील : अर्थ शब्दांची वाट पाहे...
कोविड - १९ : नवीन शब्द संग्रह ........ ८४

१२. मंजुषा मुसमाडे : शोधनिबंध विषय रूपरेषा
नोबेल पारितोषिकप्राप्त अभिजित बॅनर्जी यांचे योगदान ........ ८६

१३. विनोद म. गावंडे : शोधनिबंध विषय रुपरेषा
भारतातील वर्तमान दशकातील आर्थिक स्थित्यंतरे - एक टिप्पण .. ९१

१४. मारोती तेगमपुरे : शोधनिबंध विषय रुपरेषा
अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक विचार ........ ९६

# मराठी अर्थशास्त्र परिषद

## कार्यकारी मंडळ २०१९-२०

- **अध्यक्ष**

  **अनिल बा. सूर्यवंशी (सोलापूर)**

- **कार्याध्यक्ष**

  **कैलास के. पाटील (परभणी)**

- **कार्यवाह खजिनदार**

  **मारोती वि. तेगमपुरे (अंबड)**

- **प्रमुख संपादक-अर्थसंवाद**

  **राहुल शंकरराव म्होपरे (कोल्हापूर)**

- **विश्वस्त**

  **आप्पासाहेब पुजारी (मंगळवेढा)**
  **रामकृष्ण टाले (नागपूर)**
  **अजय दरेकर (बारामती)**

- **सदस्य**

  **विजय भोपाळे (नांदेड)**
  **स्नेहा देशपांडे (नागपुर)**
  **बळवंत कोरे (कराड)**
  **गणेश मांगडे (दापोली)**
  **माधव शिंदे (अहमदनगर)**
  **सुरेश ढाके (भुसावळ)**
  **शिवाजी काकडे (बीड)**
  **अरुण पिसे (धुळे)**
  **राजाराम पाटील (सोलापूर)**
  **दयाळू राठोड (अकोला)**
  **मनीषकुमार कायरकर (बल्लारपूर)**

- **स्वीकृत सदस्य**

  **जयवंत इंगळे (विटा)**
  **गोरक्षनाथ सानप (संगमनेर)**

- **स्थानिक कार्यवाह**

  **संजय जगदेव कोठारी (नांदगाव)**



**कार्यालयीन पत्रव्यवहार:**

(आजीव सदस्य नोंदणी, जाहिरात पाठविणे)
मुद्रक-प्रकाशक : **मारोती वि. तेगमपुरे**
कार्यवाह खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद,
'संगाई', घर नं. २२, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड, जि. जालना.
पिन - ४३१ २०४ भ्रमणध्वनी: ९४२३९९३१३७

**अर्थसंवाद वर्गणी :**

- **परिषदेचे सदस्य :**

| | |
|---|---|
| आजीव सदस्य | : रु.३०००/- (एकरकमी) |
| इमारत निधी | : रु.२०००/- |
| सदस्य सूची | : रु. १००/- |
| एकूण | : रु. ५१००/- |

- **संस्था सदस्य व अर्थसंवाद वर्गणीदार:**

  शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संस्था, ग्रंथालये } रु.२०००/-(त्रैवार्षिक) रु.३०००/-(पंचवार्षिक)

- **वर्षगणना :** १ एप्रिल ते ३१ मार्च
- संस्थांना आजीव सभासद होता येत नाही.
- कृपया आजीव सदस्य वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्टद्वारेच कार्यवाहांकडे पाठवावी.
- अर्थसंवादची वर्गणी **मराठी अर्थशास्त्र परिषद** या नावाने डिमांड ड्राफ्ट किंवा NEFT (BOI खाते क्र. 094720110000368, IFSC - BKID0000947, राजारामपुरी, कोल्हापूर) द्वारे प्रमुख संपादकाकडे पाठवावी.
- मनीऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.

**अर्थसंवादसाठी अनुदानाबद्दल आभार:**

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.

टिप: म. रा. सा. सं. मंडळाने अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ आणि राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

हे त्रैमासिक, प्रकाशक मारोती वि. तेगमपुरे (प्रमुख संपादक राहुल शं. म्होपरे) यांनी मराठी अर्थशास्त्र परिषद या संस्थेकरिता भारती मुद्रणालय, शाहूपुरी, कोल्हापूर येथे छापून मराठी अर्थशास्त्र परिषद, शहीद भगतसिंग नगर, भालचंद्र पेट्रोल पंपाच्यामागे, पारनेर रोड, अंबड - ४३१ २०४ येथे प्रसिद्ध केले.

# कोविड-१९ ची आर्थिक मंदी

**भरतकुमार सोलापुरे** †

**प्रस्तावना**

मानवाला आजारपण, रोगराई, नैसर्गिक व इतर प्रकारच्या आपत्ती इत्यादी बाबी नवीन नाहीत. विशेषतः वैद्यकशास्त्राच्या प्रगतीबरोबर मानवाने अपवाद वगळता वेळोवेळी उद्भवलेल्या आजारपणांवर व रोगराईंवर औषधे व लसी शोधून त्यावर मात केलेली आहे. तरीदेखील वैद्यकशास्त्राच्या प्रगतीआधी व त्यातही १९२८ मधील पेनिसिलीन या प्रतीजैविकाच्या (Antibiotics) आणि १९६० मधील विषाणूरोधक (Antivirus) औषधांच्या शोधापूर्वी वेगवेगळ्या जीवाणू व विषाणूमुळे पसरणाऱ्या साथींचे आजार आणि रोगांमुळे मृत्यूमुखी पडण्याचे प्रमाण खूप मोठे होते. उदा. १९१८ ते १९२० दरम्यानच्या स्पॅनिशफ्लूमुळे भारतात साधारणतः दीड कोटी तर जगभरात पाच कोटी मृत्यू झाल्याची नोंद आहे. स्वातंत्र्यापूर्वी भारतात मृत्युदर जो अधिक होता त्यामध्ये एका बाजूला साथींचे रोग तर दुसऱ्या बाजूला दारिद्र्य, अज्ञान, कुपोषण, अनारोग्यता व वैद्यकीय सुविधांचा अभाव इ. बाबींचाही वाटा होता हेदेखील लक्षात घ्यावे लागेल. गेल्या शतकभराचा विचार केला तर जिवाणूंमुळे प्लेग, कॉलरा, विषमज्वर, घटसर्प, क्षयरोग, डांग्या खोकला, धनुर्वात, न्यूमोनिया व कुष्ठरोग इ. जे रोग होतात ते प्रतीजैविकांमुळे बऱ्यापैकी आटोक्यात आलेले आहेत. तर विविध प्रकारच्या विषाणूंमुळे देवी, पोलिओ, गोवर, कांजिण्या, कावीळ, नागीण, स्वाईनफ्लू, बर्डफ्लू, इन्फ्लूएन्झा, एड्स, रुबेला, तसेच अलीकडील सार्स-१ व सार्स कोवि-२ म्हणजेच कोविड-१९ की जे कोरोनासमूहातील विषाणू असून त्यामुळे ताप, सर्दी, कोरडा खोकला इ. श्वसनाशी संबधित आजार होतात. यातील एड्सवर अद्याप औषध किंवा लस विकसित झालेले नाही त्याचप्रमाणे सार्स कोवि-२ अथवा कोविड-१९ या विषाणूजन्य आजारावर औषध किंवा लस नसल्याने जगभर त्याची दहशत निर्माण झाली आहे. कोविड-१९ मुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण अतिशय कमी म्हणजे बाधितांपैकी केवळ ५% पेक्षा कमी असूनही, ८०% बाधितांना अजिबात न दिसणारी लक्षणे व त्याच्या संसर्गाचा असणारा प्रचंड वेग यामुळे जगभरात त्याची मोठी दहशत निर्माण झाली आहे. कॅन्सर व एड्सवरदेखील इलाज नाही पण त्यापेक्षा कोविड-

† सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, लोकनेते गोपीनाथजी मुंडे महाविद्यालय, मंडणगड, जि. रत्नागिरी.
आजीव सभासद क्र. ८७३, भ्रमणध्वनी : ९५५२४२६६३५, ई-मेल : bharatsolapure@gmail.com

१९ मुळे जगभरामध्ये जास्त प्रमाणात भीती निर्माण झालेली दिसून येते. या भीतीमुळेच जगातील बहुतेक देशांमध्ये अंशतः किंवा अत्यावश्यक सेवा वगळता संपूर्ण टाळेबंदी (लॉकडाऊन) केल्यामुळे सर्वप्रकारच्या व्यवहारांवर परिणाम झालेला आहे. अर्थात यामध्ये अपवाद वगळता लोकांच्या जगण्याशी संबधित बहुतेक अर्थव्यवहार ठप्प झाले. त्यामुळे एका बाजूला उत्पादन, गुंतवणूक, रोजगार, वाहतूक व वितरण ही पुरवठ्याची बाजू तर दुसऱ्या बाजूला लोकांची कमाई, उपभोग व इतर प्रकारची खरेदी म्हणजेच मागणीची बाजू बाधित झाल्याने आधीच मंदीकडे वाटचाल करणाऱ्या जगामध्ये आणखी त्यात भर पडलेली दिसून येते. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने दिलेले वृद्धिदराचे आकडे व संयुक्त राष्ट्र संघटनेने बेरोजगारीविषयीचे व्यक्त केलेले अंदाज पाहता कोविड-१९ च्या मंदीची तीव्रता ही १९२९ च्या महामंदीपेक्षा जास्त असणार आहे. त्यामुळे १९२९ च्या मंदीची नोंद जशी 'महामंदी' म्हणून झालेली आहे त्याचप्रमाणे २०१९-२० मधील या मंदीची नोंद 'कोविड-१९ ची मंदी' म्हणून इतिहासात होईल, यात शंका नाही.

सदर लेख हा अर्थशास्त्रीय परंपरेनुसारचा संशोधनपर लेख नसून कोविड-१९ च्या बाधेमुळे निर्माण झालेली एकंदर सामाजिक, राजकीय, पर्यावरणीय व आर्थिक स्थिती, त्यांचे विविध प्रकारचे परिणाम, त्यानुसार शासनाकडून आखण्यात येत असणारी धोरणे व उपाय, विविध राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय संस्थांचे व तज्ज्ञांचे अहवाल आणि त्यांची मांडणी यावर आधारित विश्लेषणात्मक असा हा लेख असून यामध्ये पुढील वाटचालीविषयी काही अंदाज बांधण्याचाही प्रयत्न केलेला आहे.

**या लेखामधील विश्लेषणाचे महत्त्वाचे मुद्दे**

- कोविड-१९ मुळे निर्माण झालेली आरोग्यविषयक स्थिती, समस्या व त्यावर योजण्यात येत असलेले उपाय.
- कोविड-१९ मुळे निर्माण झालेली सामाजिक स्थिती व प्रश्न.
- कोविड-१९ काळातील राज्यकारभाराची दिशा, निर्णयप्रक्रियेची स्थिती व प्रश्न.
- कोविड-१९ मधून निर्माण झालेली आर्थिक स्थिती, आर्थिक समस्या आणि त्यासंबंधी विविध संस्था व तज्ज्ञांचे अहवाल आणि विश्लेषण.
- कोविड-१९ मुळे अर्थव्यवस्थांमध्ये आलेले संकट ही तात्पुरती अर्थघसरण की मंदी?
- कोविड-१९ च्या मंदीतून बाहेर पडण्यासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजना व त्यांची समर्पकता.
- कोविड-१९ च्या उपाययोजनेतील भारतातील त्रुटी आणि आर्थिक नुकसानविषयक निष्कर्ष.

**शिफारशी**

अशाप्रकारे कोविड-१९ या विषाणूजन्य आजारामुळे जगातील बहुतेक देशांमध्ये वैद्यकीय, सामाजिक, राजकीय, पर्यावरणीय व आर्थिक अशा सर्व क्षेत्रांमधील आमूलाग्र बदलातून ज्या समस्या निर्माण झालेल्या आहेत त्यांचा आढावा घेत असताना आर्थिक बाबींवर विशेष भर देऊन विश्लेषण करण्याचा प्रयत्न या लेखामध्ये करण्यात आला आहे.

**१. कोविड-१९ मुळे निर्माण झालेली आरोग्यविषयक स्थिती, समस्या व त्यावर योजण्यात येत असलेले उपायः**

सार्स कोवि-२ किंवा कोविड-१९ चा पहिला बाधित रुग्ण चीनमधील वुहान प्रांतात सापडल्याचे चीनकडून जागतिक आरोग्य संघटनेला ३१ डिसेंबर, २०१९ रोजी कळवण्यात आले होते. चीननंतर जगामध्ये इतरत्र त्याचा वेगाने होणारा प्रसार लक्षात

घेऊन जागतिक आरोग्य संघटनेने ३० जानेवारी, २०२० रोजी आंतरराष्ट्रीय स्तरावर आरोग्यविषयक आणीबाणी जाहीर केली तर ११ फेब्रुवारी, २०२० रोजी या विषाणूजन्य आजाराला 'कोविड-१९' (COVID-19= **CO**RONA **VI**RUS **D**ISEASE 20**19**) असे नाव देण्यात आले. कोविड-१९ म्हणजे कोरोना गटातील नव्या (NOVAL) विषाणूमुळे होणारा आजार की जो २०१९ मध्ये पहिल्यांदा आढळला.

भारतामध्ये कोविड-१९ ने बाधित पहिला रुग्ण ३० जानेवारी, २०२० रोजी केरळमधील थ्रिसुर (Thirssur) येथे सापडला तर महाराष्ट्रामध्ये पहिला रुग्ण पुणे येथे ०९ मार्च, २०२० रोजी सापडला. चीननंतर कोविड-१९ चा प्रसार युरोप व अमेरिकेमध्ये वेगाने झाला व त्यानंतर त्या देशांमधील बाधित लोकांनी जगातील इतर देशांमध्ये वेगवेगळ्या कारणांनी जसा प्रवास केला तसा जगातील २०० हून अधिक देशांमध्ये त्याचा प्रसार झालेला दिसून येतो.

३१ मे, २०२० अखेर जगामध्ये कोविड-१९ ची बाधा २१५ देशांमध्ये झाली होती व एकंदर जगामध्ये बाधित रुग्णांची एकूण संख्या ६३,११,३१६ तर मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या ३,७४,८१८ इतकी होती. बाधित रुग्ण व मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या पाहता अनुक्रमे अमेरिकेत सर्वाधिक १८,४१,६९८ व १,०६,२८१ होती, ब्राझीलमध्ये ५,१४,९९२ व २९,३४१ इतकी तर रशियामध्ये ४,१४,८७८ व ४,८५५ इतकी आणि स्पेनमध्ये २,८६,५०९ व २७,१२७ इतकी होती.

३१ मे, २०२० पर्यंतचा विचार करता कोविड-१९ च्या बाधितांबाबत भारताचा जगामध्ये ७ वा क्रमांक लागत होता. देशात बाधितांची संख्या १,९४,८३७ आणि मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या ५,५७७ (मृत्यूचे प्रमाण २.८६%) इतकी होती. यात महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक ६७,६५५ इतके बाधित आणि २,२८६ इतकी मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या होती. तामिळनाडूमध्ये २२,३३३ व १७३ इतकी बाधित व दगावलेल्यांची संख्या होती. दिल्लीमध्ये १९,८८४ बाधित व ४७३ इतकी मृत्युमुखी पडलेल्यांची संख्या होती. गुजरातमध्ये अनुक्रमे १६,७७९ व १,०३८ तर दीव व दमन आणि लक्षद्वीप येथे कोविड-१९ या विषाणूची बाधा झालेली नव्हती तर मिझोराम व सिक्कीम येथे प्रत्येकी एक-एक बाधित रुग्ण होते.

अशा रीतीने डिसेंबर, २०१९ च्या अखेरीस चीनमध्ये सापडलेल्या पहिल्या रुग्णापासून पुढील केवळ पाच महिन्यात जगामध्ये बाधितांची संख्या ६३ लाख ११ हजार ३१६ व मृत्यूमुखी पडलेल्यांची संख्या ३ लाख ७४ हजार ८१८ वर (मृत्यूचे प्रमाण ५.९३ %) पोहचली होती यावरून या विषाणूच्या प्रसाराचा वेग किती प्रचंड आहे हे लक्षात येते.

कोविड-१९ या विषाणूवर औषध किंवा लस नसल्याने व त्याचा प्रसाराचा वेग पाहता त्यावर कसे नियंत्रण आणावे? नेमके काय उपाय योजावेत? याविषयी सुरुवातीला कोणताच अंदाज व तयारी नव्हती. त्यामुळे या विषाणूची प्रथमतः लागण झालेल्या चीनमधील वुहान प्रांत हा संपूर्णपणे अनिश्चित काळासाठी बंद (सील) करण्यात आला. या काळामध्ये कोविड-१९ ची लक्षणे असणाऱ्यांना इलाजासाठी स्वतंत्रपणे दवाखान्यात दाखल करण्यात आले तर त्यांच्या संपर्कात आलेल्यांचे विलगीकरण करतानाच त्यांच्या संपर्कात इतर कोणीही येणार नाही याची काळजी घेण्यात आली. जगातील इतर देशांमध्ये जिथे जिथे या विषाणूचा प्रसार होत गेला तिथे कमीअधिक प्रमाणात त्याचे अनुकरण होत जाऊन एकाच प्रकारचे उपाय योजण्यात येऊ लागले. ते पुढीलप्रमाणे,

अ. कोविड-१९ विषाणूबाधित रुग्ण आढळलेला भाग/भूप्रदेश पूर्णतः बंद (सील) करणे.

आ. अशा प्रतिबंधित भागात अत्यावश्यक बाबींव्यतिरिक्त सर्व व्यवहार बंद ठेवणे.

इ. विषाणूची लक्षणे दिसणाऱ्या व्यक्तींची व इतरांची कोविड-१९ ची चाचणी करणे व इतर वैद्यकीय उपकरणांची आणि औषधांची व्यवस्था करणे .

ई. बाधितांवर त्वरित इलाज करण्यासाठी उभारलेल्या स्वतंत्र दवाखान्यांमध्ये रुग्णांना दाखल करणे व इलाज करणे.

उ. रुग्णांच्या संपर्कात आलेल्या व्यक्तींचे संस्थात्मक किंवा घरी विलगीकरण (Quarantine) करणे.

ऊ. विषाणूबाधित रुग्ण सापडलेल्या भागाचे निर्जंतुकीकरण करणे.

ए. खबरदारीचा उपाय म्हणून लोकांना साबणाने हात धुणे, नाका-तोंडाला हात न लावणे, मुखपट्टी वापरणे, शिंकताना, खोकताना काळजी घेणे, रोगप्रतिकारक्षमता (Immunity) वाढवणे व सर्व प्रकारची स्वच्छता राखण्यासंदर्भात जनजागृती करणे.

अशा प्रकारच्या उपायांमुळे एका बाजूला बाधितांवर उपचार व विषाणू प्रसाराच्या गतीला आळा बसत असला तरी सर्वप्रकारच्या टाळेबंदीमुळे एकंदर अर्थव्यवहार ठप्प झाल्याने अनेक आर्थिक समस्या जसे की उत्पादन बंद झाल्याने पुरवठ्याची कमतरता, बेरोजगारी, कमाई/क्रयशक्तीचा व मागणीचा अभाव आणि उपभोगाची समस्या इ. मुळे लोकांचे विशेषतः गरिबांचे जगणे मुश्कील झाल्याचे दिसून येते. साहजिकच विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी टाळेबंदी केल्याने आर्थिक समस्या निर्माण होऊन जगण्याचा प्रश्न उद्भवतो आणि याउलट आर्थिक समस्या सोडवून जगणे सुसह्य करण्यासाठी टाळेबंदी उठवल्यास विषाणूचा प्रसार वेगाने होण्याचा धोका निर्माण होऊ शकतो. या परिस्थितीत 'जीवन की उपजीविका' (Life or Livelihood) या दोन पर्यायांबाबत सर्व देशांच्या सरकारांसमोर एक अवघड 'निवडीचा पेचप्रसंग' (Government's Dilemma) निर्माण झालेला दिसतो. कारण यापैकी कोणताही एकच पर्याय निवडणे हे धोक्याचे ठरू शकते असा इशारा रघुराम राजन, अभिजीत बॅनर्जी यांच्यासारख्या अर्थतज्ज्ञांबरोबरच नारायण मूर्तीसारख्या उद्योजकांनीही दिलेला आहे. म्हणूनच हा पेचप्रसंग सोडवण्यासाठी योग्य अशा त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांचे मार्गदर्शन व अचूक नियोजन आणि प्रभावी अंमलबजावणी याची आवश्यकता ठरते.

याचा अर्थ कोविड-१९ चा विषाणूजन्य आजार किंवा आरोग्य समस्येतून आर्थिक समस्या निर्माण होत असल्याने त्याचा सर्व बाजूने विचार करणे आवश्यक ठरते.

## २. कोविड-१९ मुळे निर्माण झालेली सामाजिक स्थिती व प्रश्न

कोविड-१९ या विषाणूजन्य आजाराची समस्या ही केवळ आरोग्याशी संबंधित आहे असे नाही तर त्यातून आर्थिकबरोबरच वैज्ञानिक, तंत्रवैज्ञानिक, सामाजिक, राजकीय व पर्यावरणीय अशा मानवी जीवनाशी संबंधित सर्वांगावर त्याचा परिणाम होत असल्याने त्याचा सर्व दृष्टीने विचार व विश्लेषण होणे संयुक्तिक ठरते.

कोविड-१९ या विषाणूजन्य आजाराची लागण चीनमध्ये झाल्यानंतर वेगवेगळ्या कारणांनी त्या देशातील बाधित ठिकाणांहून प्रवास करून येणाऱ्यांमार्फत विविध देशांमध्ये या विषाणूचा वेगाने प्रसार झाला. या विषाणूच्या बाधेमुळे एका बाजूला कामधंदे बंद झाल्याने रोजगार नाहीसा झाला तर दुसऱ्या बाजूला विषाणूजन्य आजाराची भीती निर्माण

झाली. अशा या बिकट आणि संकटाच्या काळात नेहमीच माणसाला आपले मूळ ठिकाण सुरक्षित वाटत असते. याला अनुसरूनच विदेशातून देशात, महानगरे व शहरांमधून खेड्यांकडे 'उलट-स्थलांतर' (Reverse Migration) सुरू झाल्याचे दिसून आले. या स्थितीमध्ये विदेशात कामधंद्यांसाठी असणाऱ्या देशी नागरिकांकडून हा विषाणू देशात आल्याने त्याची बाधा देशातील सर्वसामान्यांना झाली म्हणून इतरवेळी विदेशात असणाऱ्यांविषयी अभिमान बाळगला जात असला तरी यावेळी मात्र पासपोर्टवाले विरुद्ध रेशनकार्डवाले असा सामाजिक विसंवाद निर्माण झालेला दिसून आला. एकाच देशातील राज्या-राज्यांमध्येही एकमेकांचे नागरिक हस्तांतरण करण्यावरून वाद निर्माण झाल्याचे दिसून आले. अशाच प्रकारे महानगरे/शहरे विरुद्ध खेडी असाही सामाजिक वाद निर्माण झाला, किंबहुना या परिस्थितीत शहरवासियांना आपल्या गावात येण्यास प्रतिबंध करण्यात येत असल्याचे अनेक ठिकाणी दिसून आले. त्याचबरोबर एकाच कुटुंबातील पण शहरात व ग्रामीण भागात राहणाऱ्या सदस्यांमध्येही वाद निर्माण झाल्याचे पाहावयास मिळाले. शिवाय एकाच परिसरात व वस्त्यांमध्ये राहणारे पण सरकारी वैद्यकीय क्षेत्रात कोविड-१९ च्या बाधितांवर उपचार करणारे डॉक्टर, परिचारिका व इतर कर्मचाऱ्यांना आपापल्या घरी येण्यास प्रतिबंध केल्याचीही उदाहरणे समोर आली. याच दरम्यान या विषाणूच्या प्रसारासाठी विशिष्ट अशा समाजाला दोषी धरून त्यांना लक्ष करण्यात आल्याचेही दिसून आले. त्याचाच एक भाग म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर चीन या देशाला आणि चीनी समाजाला दोषी धरण्याचा आग्रह विशेषतः अमेरिकेच्या अध्यक्षांकडून करण्यात आला. या सर्व बाबी सामाजिक दुहीची असलेली दिसून येतात.

यावरून कोविड-१९ या विषाणूमुळे माणसा-माणसांमधील किंवा समाजामधील संबंध हे किती कमकुवत पायावर आणि निव्वळ वैयक्तिक स्वार्थावर कसे उभे आहेत हे स्पष्टपणे समोर आले.

### ३. कोविड-१९ काळातील राज्यकारभाराची दिशा, निर्णयप्रक्रियेची स्थिती व प्रश्न

कोविड-१९ संसर्ग जगातील २०० हून अधिक देशामध्ये झालेला दिसून येतो. या संसर्गातून आजार वेगाने पसरत गेल्याने सर्व सुविधांनीयुक्त अशा विकसित देशांमध्येही मृत्यूची संख्या प्रचंड प्रमाणात वाढत गेली. या विषाणूबाधेवर औषध किंवा लस उपलब्ध नसल्याने याविषयी मोठ्या प्रमाणात भीतीचे वातावरण संपूर्ण जगभर निर्माण झाले. त्यामुळे या विषाणू संसर्गाकडे सुरुवातीला दुर्लक्ष करणाऱ्या देशांमध्ये खळबळ उडाली. अशा कठीण स्थितीमध्ये आपल्या देशात व राज्यांमध्ये नेमके काय करावे याचा निर्णय हा राज्यकारभाराचा (Governance) विषय असल्याने येथे राजकारण, राज्यकर्ते व विरोधी पक्षांचा संबंध येतो. राज्यकारभारामध्ये केवळ राजकीय नव्हे तर परराष्ट्रीय, सामाजिक, वैद्यकीय, शैक्षणिक, पर्यावरणीय, वैज्ञानिकतंत्र, वैज्ञानिक व आर्थिक इ. सर्वच बाबत निर्णय घेतले जातात. त्यामुळे एका बाजूला कोविड-१९ चा होणारा संसर्ग थांबवण्यासाठी वैद्यकीय उपाययोजना करणे आणि दुसऱ्या बाजूला टाळेबंदीमुळे थांबलेले अर्थचक्र गतिमान करण्यासाठी आर्थिक उपाययोजना करणे या दोन्ही बाजूने सरकारने उचित निर्णय घेणे अपेक्षित असते.

पण आधी स्पष्ट केल्याप्रमाणे अचानक कोसळलेल्या या विषाणू संकटामुळे गंभीर रूप धारण केल्याने नेमक्या कोणत्या उपाययोजना कराव्यात याबाबतीत अनेक देशांमध्ये गोंधळ निर्माण झालेला दिसून आला. कारण या विषाणूचा संसर्ग रोखण्यासाठी

टाळेबंदी चालू ठेवायची की टाळेबंदी हटवून अर्थचक्र चालू ठेवायचे अशा 'जीवन की उपजीविका' (Life or Livelihood) यापैकी कोणता निर्णय घ्यायचा याचा सरकारांपुढे पेचप्रसंग (Government's Dilemma) निर्माण झालेला दिसून आला. यातून ब्राझीलसारख्या देशामध्ये जीवनापेक्षा उपजीविकेला महत्त्व दिल्याचे दिसून आले. कारण ब्राझीलचे अध्यक्ष जैर बोल्सोनारो यांनी 'आजारपणामध्ये लोकं तर मरणारच पण त्यासाठी अर्थव्यवस्थेचा बळी देता येणार नाही' अशी एकांगी व टोकाची भूमिका घेतलेली दिसून आली तर भारतासारख्या देशांमध्ये 'उपजीविकेपेक्षा लोकांचा जीव महत्त्वाचा आहे' अशी मानवतावादी भूमिका घेऊन टाळेबंदी चालू ठेवल्याचे दिसून आले. जर्मनी व द. कोरियासारख्या कांही देशांमध्ये टाळेबंदी आणि अर्थचक्र या दोहोंमध्ये योग्य समन्वय साधून नियोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी सुरुवातीपासूनच विदेशातून येणाऱ्यांचे मोठ्या प्रमाणात कोविड-१९ च्या चाचण्या करून बाधितांचे विलगीकरण व त्वरित इलाज एका बाजूला करतानाच दुसऱ्या बाजूला अर्थचक्र सुरळीत चालू ठेवण्यावर भर दिला गेला. त्यामुळे 'जीवन की उपजीविका' या पेचप्रसंगातून यशस्वीपणे मार्ग काढण्यात अशा काही देशांना बऱ्यापैकी यश आलेले दिसून आले.

अनेक देशांच्या सरकारांना 'जीवन की उपजीविका' (Life or Livelihood) या पेचप्रसंगामध्ये किंवा कोंडीमध्ये पकडणाऱ्या कोविड-१९ च्या काळात सरकार व विशेषतः राजकीय नेत्यांच्या नेतृत्वाच्या ज्ञानाचा व प्रशासकीय कौशल्याचा कस लागताना दिसून आला. यामध्ये एका बाजूला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा होणारा संताप व आक्रस्ताळेपणा दिसला तर दुसऱ्या बाजूला जर्मनीच्या चान्सलर अन्जेला मर्केल या कठीण प्रसंगातून शांतपणे व यशस्वी मार्ग काढताना दिसून आल्या.

यावरून निर्माण झालेल्या या बिकट प्रसंगामध्ये आरोग्य व आर्थिक समस्या सोडवण्यासाठी संयम, प्रश्न समजून घेण्याची व तज्ज्ञांचा योग्य सल्ला/मार्गदर्शन घेण्याची तयारी, वैज्ञानिक दृष्टी व समावेशकवृत्ती असणारे नेतृत्व यशस्वी होताना दिसून आले तर त्या गुणांच्या अभावी धोरणसातत्याचा अभाव व हुकुमशाही पद्धतीचा राज्यकारभार अशीही स्थिती दिसून आली. किंबहुना अशा आणीबाणीच्या प्रसंगात हुकुमशाही शासनप्रणालीला चालना मिळण्याची शक्यता असते, असा इशारा अनेक तज्ज्ञांनी दिलेला असून त्याची प्रचिती अनेक देशांमध्ये येत असलेले दिसून आले.

### ४. कोविड-१९ मधून निर्माण झालेली आर्थिक स्थिती, आर्थिक समस्या आणि त्यासंबंधी विविध संस्था व तज्ज्ञांचे अहवाल आणि विश्लेषण

कोविड-१९ चा परिणाम जसा सामाजिक व राजकीय जीवनावर होताना दिसून आला त्याचप्रमाणे त्याचा त्याहून अधिक परिणाम मानवाच्या आर्थिक जीवनावर झालेला दिसून येतो. जगातील २०० हून अधिक देशांमध्ये या विषाणूचा जसा संसर्ग होत गेला त्यानुसार त्याचा प्रसार रोखण्यासाठी व प्रसाराची साखळी तोडण्यासाठी टाळेबंदीचा उपाय स्वीकारण्यात आला. याची सुरुवात अर्थातच चीनमधून झाली व पुढे विकसित, विकसनशील, भांडवलशाही, समाजवादी व मिश्र अशा सर्वच प्रकारच्या अर्थव्यवस्थांमध्ये प्रारंभी त्याच उपायांची अंमलबजावणी करण्यात आली. साहजिकच वैद्यकीय उपचार, शेती व अत्यावश्यक गरजांशी संबंधित अर्थव्यवहार वगळता इतर सर्व प्रकारच्या व्यवहारांवर आणि लोकांच्या संचारावर बंदी घालण्यात आली. त्यामुळे या सर्व देशांमध्ये साधारणतः ६०% ते

७०% अर्थव्यवहार थांबल्याचे दिसून आले. याचा परिणाम म्हणून लघु, मध्यम व मोठे उद्योग, अत्यावश्यक सोडून सर्व प्रकारचे लहान-मोठे व्यापार व सेवा व्यवसाय, पर्यटन, प्रवासी व मालवाहतूक, मनोरंजन, खाद्य व पेयपदार्थ आणि सर्व प्रकारचे हॉटेलव्यवसाय, शाळा, महाविद्यालये पूर्णतः बंद करण्यात आली.

अशारीतीने बहुतेक अर्थव्यवहार टाळेबंदीमुळे बंद केल्याने एकंदर उत्पादन, पुरवठा, रोजगार, उत्पन्न, मागणी इ. सर्व समग्रलक्षी आर्थिक घटकांमध्ये जगभरात अचानक व एकाचवेळी घट झाली. अशा या अचानक झालेल्या आर्थिक घटीला आर्थिक संकट किंवा आर्थिक मंदी म्हणता येईल. या आर्थिक संकट किंवा मंदीला कोविड-१९ हा विषाणूजन्य आजार कारणीभूत असल्याने त्याला कोविड-१९ ची मंदी असे संबोधणे संयुक्तिक ठरेल.

### ४.१ आर्थिक मंदी

आर्थिक मंदी तसेच महामंदीचा सामना अनेक देशांनी व जगाने वेळोवेळी केलेला आहे. यामध्ये १९२९ मधील महामंदीचा दाखला दिला जातो. कारण त्याची तीव्रता व व्याप्ती सर्वाधिक होती तसेच जास्त कालावधीसाठी ती टिकून राहिलेली होती हे स्पष्ट आहे. शिवाय १९२९ च्या महामंदीने अर्थविचारांची, मंदीवरील उपायांची साधने व आर्थिक धोरणांची एकंदर दिशा बदलून टाकली हे जगाने अनुभवले होते. म्हणजे प्रथमच त्यावेळी चलन (धोरण) उपायांबरोबरच राजकोषीय (धोरण) उपाय योजावे लागले होते हे सर्वज्ञात असून त्यातील लॉर्ड जे.एम.केन्स यांचे योगदान महत्त्वाचे ठरले होते. किंबहुना त्यातूनच केन्सचे ‘रोजगार, व्याज व पैसाविषयक सर्वसाधारण सिद्धांत’ हे जगप्रसिद्ध पुस्तक १९३६ मध्ये आले. त्यानंतर अलीकडच्या २००८ मधील अमेरिकेतील गृहकर्ज प्रकरणातून उद्‌भवलेल्या मंदीचा उल्लेख केला जातो. पण त्या दोन्ही मंदीपेक्षा कोविड-१९ च्या मंदीची तीव्रता जास्त राहील असे भाकीत अनेक अर्थतज्ज्ञांनी वर्तवले आहे. उदा. २००६ मध्येच अमेरिकेत प्रचंड तेजीत असणाऱ्या गृहकर्ज बाजाराचा फुगलेला फुगा फुटेल व प्रचंड अर्थसंकटाला सामोरे जावे लागेल (की जे २००८ मध्ये खरे ठरले होते) असे भाकीत वर्तविणारे अमेरिकेच्या न्यूयॉर्क विद्यापीठामधील स्टर्न स्कूल ऑफ बिझनेस येथे कार्यरत असलेले अर्थतज्ज्ञ नौरीएल रौबिनी यांनी २९ एप्रिल २०२० रोजी ‘द गार्डियन’ मध्ये लिहिलेल्या २०२० साठी अटळ असलेल्या ‘महामंदीला’ १० कारणे का कारणीभूत’ (Ten reasons why a 'Greater Depression' for the 2020s is inevitable - Nouriel Roubini) या लेखात कोणत्या १० कारणांमुळे जागतिक अर्थव्यवस्था येणाऱ्या काळात मंदीच्या गर्तेत जाणार आहे याचे स्पष्टीकरण केलेले आहे.

### ४.२ पारंपारिक आर्थिक मंदी व कोविड-१९ची मंदी

आर्थिक मंदीमध्ये बहुतेक सर्व समग्रलक्षी आर्थिक घटकांमध्ये मोठी घसरण होत जाऊन न्यूनतम गाठली जाते. व्यापारचक्रांच्या वैशिष्ट्यानुसार अशा घसरणीला प्रत्येक वेळी भिन्न घटक कारणीभूत ठरत असतात. साहजिकच जगामध्ये उद्‌भवलेल्या आत्तापर्यंतच्या प्रत्येक मंदीच्या स्थितीला वेगवेगळी कारणे कारणीभूत ठरलेली दिसून आली असल्याने त्यांचे वेगळे विश्लेषण केले जाते.

आर्थिक मंदीच्या कारणांचे वर्गीकरण प्रामुख्याने दोन प्रकारात करता येईल.

#### ४.२.१ आर्थिक कारणे

व्यापारचक्रांना किंवा मंदीला एकूण मागणी व पुरवठ्यातील असंतुलन, चलन किंवा राजकोषीय

धोरणांमधील समन्वयाचा अभाव, कोणत्याही देशातील अतिरेकी चलन/वित्त किंवा राजकोषीय धोरण, उत्पादन तंत्रातील मोठे बदल व व्यापार धोरणातील एकांगी मोठे बदल इत्यादी आर्थिक कारणे बहुतेकवेळा कारणीभूत ठरताना दिसून आलेली आहेत. उदा. १९२९ ची महामंदी तसेच २००८ मधील मंदी यांना प्रामुख्याने अशी आर्थिक कारणे कारणीभूत ठरलेली दिसतात.

### ४.२.२ अर्थिकेत्तर कारणे

व्यापारचक्रे किंवा मंदीच्या स्थितीला सामाजिक, राजकीय व नैसर्गिक घटक जसे की व्यापक व मोठ्या प्रमाणातील नैसर्गिक आपत्ती आणि कृत्रिम आपत्ती जसे की युद्धे किंवा महायुद्धे तसेच मोठे राजकीय संघर्ष, अनेक देशांमध्ये एकाच वेळी उद्‌भवणारी अंतर्गत यादवी इत्यादी घटकही कारणीभूत ठरू शकतात. पण ते प्रामुख्याने त्यांच्या व्यापकतेवर अवलंबून असते. कारण पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जरी उत्पादन, रोजगार, मागणी व पुरवठा यांच्यावर परिणाम झालेला असला तरी युद्धसाहित्याच्या उत्पादनावर भर दिला गेल्याने एकंदर उत्पादन, रोजगार यावर तेवढा विपरित परिणाम झालेला नव्हता पण जीवनावश्यक वस्तू व सेवांची टंचाई निर्माण झाली होती हे लक्षात घ्यावे लागेल. काही तज्ज्ञांच्या मते दुसऱ्या महायुद्धामुळे १९२९ च्या महामंदीतून बाहेर पडण्यास मदत झाली. नैसर्गिक आपत्तींचा विचार केल्यास एखाद्या किंवा काही मोजक्या देशांमध्ये काही प्रमाणात समग्रलक्षी आर्थिक घटकांवर विपरित परिणाम होत असल्याचे दिसून आले आहे. पण अद्यापपर्यंत म्हणजे कोविड-१९ च्या आपत्तीपर्यंत संपूर्ण जगाच्या एकंदर समग्रलक्षी आर्थिक घटकांवर एकाचवेळी नैसर्गिक आपत्तीमुळे मोठ्या प्रमाणात विपरित परिणाम झाल्याचे दिसून आलेले नाही म्हणून कोविड-१९ ची मंदी ही पूर्णतः वेगळी ठरते हे स्पष्ट आहे.

कोविड-१९ ची मंदी ही पहिली अशी मंदी आहे की जी अर्थिकेत्तर कारणामुळे आणि विशेषतः नैसर्गिक कारणामुळे निर्माण झालेली आहे. संपूर्ण जगातील बहुतेक देशांमध्ये एकाचवेळी बहुतेक सर्व समग्रलक्षी आर्थिक घटकांमध्ये मोठी घसरण होण्याची ही दुर्मिळ घटना आहे असे म्हणता येईल.

## ४.३ पारंपारिक आर्थिक मंदी व कोविड-१९ ची मंदी यामधील फरक

मंदी ही कोणत्याही कारणाने निर्माण झालेली असली तरी त्याचे आर्थिक दुष्परिणाम बहुतेक सर्वच क्षेत्रावर होतात. एकंदर उत्पादन, रोजगार, उत्पन्न, मागणी, पुरवठा, बचत, गुंतवणूक व किंमतपातळी इत्यादी सर्वच समग्रलक्षी आर्थिक घटक न्यूनतम पातळीकडे गेल्याने एका बाजूला उत्पादक व विक्रेते यांना नुकसान सोसावे लागते तर दुसऱ्या बाजूला रोजगार घटल्याने उत्पन्न व क्रयशक्ती कमी होऊन उपभोक्त्यांचे वास्तव राहणीमान घसरते.

असे असले तरी आत्तापर्यंतच्या आर्थिक मंदीमध्ये व कोविड-१९ च्या आर्थिक मंदीमध्ये पुढील काही बाबतीत फरक असल्याचे दिसून येते.

**४.३.१** आत्तापर्यंत उद्भवलेल्या बहुतेक आर्थिक मंदीच्या स्थितीला आर्थिक कारणे कारणीभूत ठरलेली दिसून येतात तर आत्ताच्या मंदीला आर्थिकेत्तर म्हणजे कोविड-१९ विषाणूजन्य आजार कारणीभूत असलेला दिसून येतो.

**४.३.२** पहिल्या तसेच दुसऱ्या महायुद्धामुळे किंवा आखाती युद्धाच्या वेळी काहीप्रमाणात निर्माण झालेल्या आर्थिक मंदीला आर्थिकेत्तरमधील राजकीय कारणे तर २०२० मध्ये मोठ्या प्रमाणात निर्माण झालेल्या आर्थिक मंदीला कोविड-१९ विषाणूजन्य

आजार म्हणजे आरोग्यविषयक कारण कारणीभूत असलेले दिसून येते.

**४.३.३** पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या काळात निर्माण झालेल्या मंदीमध्ये एका बाजूला जीवनावश्यक वस्तू-सेवांचा तुटवडा निर्माण झाला होता; परंतु युद्धसाहित्याच्या अधिकच्या उत्पादनामुळे रोजगार व क्रयशक्तीची हानी मोठ्या प्रमाणात झालेली नव्हती तरीही युद्धस्थिती असल्याने पुरेशी मागणी नव्हती. कोविड-१९ च्या मंदीकाळात मात्र जीवनावश्यक वस्तू-सेवांचा तुटवडा नसूनदेखील पुकारल्या गेलेल्या टाळेबंदीमुळे एका बाजूला उत्पादन ठप्प झाल्याने पुरवठ्याची साखळी खंडित झाली तर दुसऱ्या बाजूला बेरोजगारी निर्माण झाल्याने उत्पन्न व क्रयशक्ती कमी झाल्याने जीवनावश्यक वगळता इतर वस्तू व सेवांची मागणी मोठ्या प्रमाणात घटण्याची स्थिती दिसून आलेली आहे.

**४.३.४** १९२९ मधील महामंदी व २००८ मधील मंदीच्या काळात प्रामुख्याने एकूण मागणीची कमतरता निर्माण झाली होती तर आत्ताच्या कोविड-१९ च्या मंदीमध्ये एकाचवेळी एकूण मागणी तसेच एकूण पुरवठा या दोन्हींमध्ये मोठी घट झालेली दिसून येते.

**४.३.५** यापूर्वी निर्माण झालेल्या कोणत्याही मंदीमध्ये एकाचवेळी मागणी व पुरवठा या दोन्ही बाजूची साखळी ठप्प झालेली नव्हती पण आत्ताच्या कोविड-१९ च्या मंदीमध्ये अशी अभूतपूर्व स्थिती निर्माण झालेली दिसून येते.

**४.३.६** कोविड-१९ च्या मंदीकाळात अतिजीवनावश्यक वस्तू व सेवांव्यतिरिक्त इतर सर्व जीवनावश्यक आणि भांडवली वस्तू आणि सेवांच्या मागणी व पुरवठा या दोन्हींवर एकाचवेळी विपरित परिणाम झालेला दिसून येतो तर इतर वेळच्या आर्थिक मंदीकाळात मात्र अशी स्थिती दिसून आलेली नव्हती.

**४.३.७** १९२९ तसेच २००८ मधील मंदी संपूर्ण जगव्यापी नव्हती. कारण त्याला रशिया, चीन व भारतासारख्या काही देशांचा अपवाद होता तर कोविड-१९ ची मंदीमात्र संपूर्ण जगव्यापी असून कोणत्याही देशांचा अपवाद दिसून येत नाही.

**४.३.८** व्यापारचक्रे किंवा आर्थिक मंदी केवळ मुक्त भांडवलशाही देशांमध्येच उद्भवतात ही बाब इतर सर्व मंदींबाबत खरी ठरलेली असताना त्याला कोविड-१९ ची मात्र अपवाद ठरलेली दिसून येते.

**४.३.९** १९२९ च्या महामंदीपूर्वी केवळ चलनउपाय तर त्यानंतर चलन व राजकोषीय अशा दोन्हीप्रकारचे उपाय योजण्यात येऊ लागले. पण कोविड-१९ च्या मंदीवर ते दोन्ही उपाय पुरेसे ठरणार नसून त्याबरोबरच या विषाणूची सर्वांच्या मनात निर्माण झालेली धास्ती दूर करण्याचेही नवीन वैद्यकीय आणि मानसिक उपायदेखील योजावे लागणार असल्याने याचे हे वेगळेपण आहे.

अशारीतीने कोविड-१९ ची मंदी ही वरील अनेकदृष्टीने इतर मंदींपेक्षा वेगळी असलेली दिसून येते.

### ४.४ कोविड-१९ च्या मंदीचे स्वरूप

कोविड-१९ या विषाणूजन्य आजाराचा जलदगतीने होणारा प्रसार रोखण्यासाठी जगभरातील बहुतेक देशांमध्ये पुकारण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे आर्थिक व्यवहारांचे चक्र ठप्प होऊन निर्माण झालेल्या समस्येला आर्थिक समस्या किंवा आर्थिक मंदी म्हणता येईल. अत्यावश्यक वस्तू व सेवा वगळता इतर सर्व बाबींचे उत्पादन, वितरण/विक्री, वाहतूक इत्यादी बंद झाल्याने पुरवठ्याची साखळी खंडित होणे, बेरोजगारी, उत्पन्न/कमाईचा अभाव, मागणीचा अभाव यामुळे पुन्हा गुंतवणुकीचा अभाव, बेरोजगारीत भर

इत्यादी समस्या निर्माण झालेल्या आहेत.

अशा या कोविड-१९ मुळे निर्माण झालेल्या आर्थिक मंदीचे नेमके स्वरूप काय आहे हे प्रामुख्याने राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावरील अनेक संस्था, संघटना तसेच काही अर्थतज्ज्ञांनी प्रसूत केलेली आकडेवारी, अहवाल आणि मते जी मांडलेली आहेत त्यावरून स्पष्ट होण्यास मदत होईल.

**४.४.१ आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचा (आय.एम. एफ.) अहवाल :** कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने पुढीलबाबतीत माहिती प्रसिद्ध केलेली आहे.

अ. वृद्धिदर: एप्रिल२०२० च्या मध्यावर आय.एम.एफ. ने प्रसिद्ध केलेल्या अहवालामध्ये चालू व आगामी आर्थिक वर्षामध्ये वृद्धिदराविषयक अंदाज व्यक्त केलेले आहेत. त्यानुसार कोविड-१९ मुळे २०२० या चालू आर्थिक वर्षामध्ये जागतिक वृद्धिदर उणे ३% असेल तर अमेरिकेत हा दर उणे ६.१%, युरोपियन देशांमध्ये उणे ५.९%, जपान उणे ५.२% तर चीन व भारतामध्ये हा दर अनुक्रमे १.२% व १.९% इतका राहणार आहे. याचा अर्थ चीन व भारताचा अपवाद वगळता इतर बहुतेक देशांमध्ये वृद्धिदर उणे असणार आहे. असे असले तरी आय.एम.एफ. च्या एकंदर अनुमानानुसार वृद्धिदरातील ही घट गेल्या ४० वर्षातील सर्वात मोठी घट आहे.

आय.एम.एफ. च्या अंदाजाप्रमाणे आगामी २०२१ या आर्थिक वर्षामध्ये परिस्थिती सुधारणार असून जागतिक वृद्धिदर ५.८%, अमेरिकेमध्ये ४.७%, युरोपियन देशांमध्ये ४.७%, जपान ३%, चीन ९.२% आणि भारतामध्ये हा दर ७.४५% इतका राहणार आहे. याचा अर्थ आय.एम.एफ. च्या अंदाजाप्रमाणे अमेरीका, युरोपीय संघ व जपान अशा विकसित देशांसहित जगाचाही वृद्धिदर केवळ कमी होणार नसून तो उणे राहणार आहे तर भारत व चीनचा वृद्धिदर कमी होणार असला तरी तो उणे होणार नाही. पण २०२१ या पुढील आर्थिक वर्षामध्ये बहुतेक सर्वच देश आणि जगाचाही वृद्धिदर हा पूर्वपदावर येणार असल्याचा दिलासादायक अंदाज आय.एम.एफ. मार्फत व्यक्त करण्यात आला आहे. म्हणजे केवळ एका आर्थिक वर्षापुरताच कोविड-१९ चा आर्थिक फटका बसण्याचा अंदाज असून त्यानुसार जगाची अर्थव्यवस्था इंग्रजी 'V' अक्षराच्या आकाराप्रमाणे वाटचाल करेल, असा त्या अहवालाचा एकंदर अर्थ आहे.

आ. आंतरराष्ट्रीय व्यापार: आय.एम.एफ. ने आपल्या अहवालात वृद्धिदराबरोबरच आंतरराष्ट्रीय व्यापारासंदर्भातदेखील अंदाज व्यक्त केलेला आहे. त्यानुसार वृद्धिदराप्रमाणेच २०२० या चालू आर्थिक वर्षात जागतिक व्यापार ११% नी घटणार आहे; पण २०२१ या पुढील आर्थिक वर्षात जागतिक व्यापार ८.४% नी वाढण्याचा अंदाज आहे. म्हणजे आंतरराष्ट्रीय व्यापारालादेखील कोविड-१९ चा एका वर्षापुरताच फटका बसणार असून पुढे तो पूर्वपदावर येणार आहे.

इ. कच्च्या तेलाचे दर : आय.एम.एफ. च्या अंदाजाप्रमाणे कोविड-१९ मुळे २०२० या आर्थिक वर्षामध्ये कच्या तेलाचे दर साधारणपणे ४२% नी कमी होतील पण २०२१ या आगामी वर्षात त्यामध्ये ६.३% नी वाढ होणार आहे.

थोडक्यात कोविड-१९ मुळे जगभरातील बहुतेक देशांमध्ये पुकारण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे अत्यावश्यक वस्तू व सेवांचे व्यवहार वगळता इतर सर्व अर्थव्यवहार बंद राहिल्याने वृद्धिदर, आंतरराष्ट्रीय व्यापार व कच्च्या तेलाचे दर यांना मोठा फटका किमान चालू आर्थिक वर्षामध्ये बसेल पण पुढे त्यात सुधारणा होईल हे आय.एम.एफ. च्या अहवालावरून स्पष्ट होते.

### ४.४.२ संयुक्त राष्ट्र संघटनेचे अहवाल, निरीक्षणे व सूचना

कोविड-१९ मुळे उद्भवलेल्या आरोग्यविषयक व अर्थविषयक समस्यांच्या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विविध विभागांनी विविध प्रकारची माहिती प्रसूत केलेली आहे. त्याबरोबरच विविध निरीक्षणे नोंदवतानाच काही सूचनाही केलेल्या आहेत की ज्यावरून कोविड-१९ मुळे उद्भवलेली परिस्थिती व त्याचे स्वरूप समजण्यास मदत होईल.

अ. संयुक्त राष्ट्र शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटनेच्या (UNESCO) शिक्षण विभागाच्या महासंचालक स्टेफानिया गीय्यान्नी यांनी पी.टी. आय. ला २२ एप्रिल २०२० रोजी दिलेल्या मुलाखतीत कोविड-१९ समस्येतून निर्माण झालेल्या आर्थिक संकटामुळे शिक्षणातील मुलींचे गळतीचे प्रमाण वाढेल, शिक्षणात लिंग विषमता दर वाढेल आणि मुलींवर विवाह लवकर करण्याची सक्ती वाढेल अशी भीती व्यक्त केलेली आहे. कारण कोणत्याही कारणाने जेव्हा आर्थिक स्थिती घसरते तेव्हा त्याचा पहिला विपरित परिणाम मुली व स्त्रियांच्या जीवनावर होतो हे स्पष्ट आहे.

आ. संयुक्त राष्ट्राच्या जागतिक अन्न कार्यक्रमाचा (WFP) जागतिक अन्न संकटावरील २०२० चा अहवाल (Global Report on Food Crisis 2020) २२ एप्रिल, २०२० रोजी प्रकाशित झाला आहे. त्यामध्ये जगात भीषण अन्नटंचाईला सामोऱ्या जाणाऱ्या लोकांची संख्या २०१९ मध्ये जी १३५ दशलक्ष होती, ती २०२० मध्ये साधारणतः दुपटीने वाढून २६५ दशलक्ष होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. साहजिकच यामुळे जगात भूकबळींची संख्या वाढणार असून याचा सर्वाधिक फटका झिम्बाब्वे, येमेन, लेबेनॉन, द. अमेरिका, व आफ्रिकन देश इत्यादी अल्प उत्पन्न गटातील देशांना बसणार असून ते टाळण्याकरिता अंदाजे १२ अब्ज अमेरिकन डॉलर इतकी रक्कम लागणार असल्याचे त्यात नमूद करण्यात आले आहे.

इ. संयुक्त राष्ट्र अन्न व कृषी संघटनेने (UNFAO) कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर इशारा दिलेला आहे की या महामारीच्या काळात जगामध्ये पुरेसा खाद्यान्नाचा साठा असला तरी त्याचा गरजू देशांपर्यंत व विशेषतः तेथील गरीब लोकांपर्यंत व्यवस्थित वितरित करण्याचा प्रश्न गंभीर आहे. त्यामुळे जागतिक पुरवठा साखळीकडे दुर्लक्ष केल्यास अन्नाचे अरिष्ट निर्माण होऊन त्याचा सर्वाधिक फटका आफ्रिकन देशांना बसेल. ही बाब विशेषत्वाने जागतिक अन्नसाखळीविरोधी संघटनेने (Global Network Against Food Crisis) नोंदवलेली असून ते टाळण्याकरिता कृषी उत्पादन प्रक्रिया सुरळीत ठेवणे, कृषी निविष्ठांचा नियमित पुरवठा करणे, खाद्यान्न विक्रीतील अडथळे दूर करणे, अल्पभूधारकांना थेट अर्थसहाय्य करणे व व्यापारावर निर्बंध न घालणे इत्यादी उपाय सुचविले आहेत.

ई. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या गरिबी व मानवाधिकार परिषदेचे विशेष दूत फिलीप एल्सटन यांनी अमेरिकेमध्ये सरकारने जर वेळीच उपाय योजले नाहीत तर कोविड-१९ मुळे जवळपास ४.७ कोटी लोकांचा (३२% बेरोजगारी) रोजगार बुडणार असून तेथील कोट्यावधी लोक गरिबीच्या खाईत लोटले जातील, असा इशारा दिला आहे.

उ. संयुक्त राष्ट्र संघटनेचे महासचिव एंटोनियो गुरेट्स यांनी कोविड-१९ हे अर्थव्यवस्थेतील सर्वात वाईट मंदीचे कारण ठरू शकते, असे मत १८ एप्रिल, २०२० रोजी व्यक्त केले आहे. त्यांच्या मते निम्नउत्पन्न गटातील देशांबरोबरच इतर देशांनाही त्याची झळ

बसणार असून मोठ्या प्रमाणात बेरोजगारी वाढेल.

अशा रीतीने संयुक्त राष्ट्र संघटनेतील विविध विभाग व अधिकारी यांच्या अहवाल आणि निवेदनावरून कोविड-१९ मुळे निर्माण झालेल्या बिकट आर्थिक स्थितीची कल्पना येते.

**४.४.३ केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली व आय. आय. टी., मुंबईचा अहवाल**

कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर आरोग्य व अर्थसंकटासंबंधी अभ्यास करण्यासाठी आय. आय. टी. मुंबई व केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने आय. आय. टी., गांधीनगर, भारतीय वैद्यकीय संशोधन परिषद (ICMR) आणि विश्वभारती विद्यापीठ यांच्या सहकार्यातून नेमलेल्या ३६ तज्ज्ञांच्या अभ्यासगटाने 'संसर्गजन्य आजाराची बहुद्देशीय चिकित्सा' या नावाने अहवाल सादर केला आहे. त्यामध्ये पुढील बाबी स्पष्ट करण्यात आल्या आहेत.

अ. पहिल्या २१ दिवसाच्या टाळेबंदी काळात भारताच्या ढोबळ देशांतर्गत उत्पन्नाचे जवळपास ३.४६% इतके नुकसान होऊ शकते.

आ. टाळेबंदी जर दोन महिने चालू राहिली तर ढोबळ देशांतर्गत उत्पन्नाचे सुमारे १२% इतके नुकसान होऊ शकते.

इ. तीन आठवड्याच्या पहिल्या टाळेबंदीमध्ये ५८००० कोटी रुपये मूल्याचा रोजगार बुडाला आहे.

ई. महाराष्ट्र, गुजरात, तामिळनाडू, उत्तरप्रदेश व कर्नाटक या राज्यांना त्यांच्या ढोबळ राज्यांतर्गत उत्पन्नाच्या जवळपास ४७% इतके नुकसान होऊ शकते.

उ. महाराष्ट्र, तामिळनाडू, उत्तरप्रदेश, पश्चिम बंगाल व आंध्रप्रदेश या पाच राज्यांच्या उपभोग खर्चात म्हणजेच उपभोग मागणीत साधारणपणे ४५% इतकी घट होऊ शकते.

या अंदाजाप्रमाणे २१ दिवसाच्या टाळेबंदी काळात १,१०,५४२ कोटी रु. आणि जर टाळेबंदी दोन महिने चालू ठेवण्यात आली तर या पाच राज्यांमध्ये ३,१५,८३४ कोटी रु. चा उपभोग खर्च म्हणजेच उपभोग मागणी कमी होण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती.

ऊ. उत्तरप्रदेश, प. बंगाल, तेलंगणा, बिहार व मध्यप्रदेश या राज्यांतून इतर राज्यांत स्थलांतरित झालेले मजूर आपल्या राज्यांमध्ये जे उत्पन्न पाठवतात त्यामध्ये सुमारे ४५% घट होऊन तेवढे त्या राज्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

आय. आय. टी. मुंबई व केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयामार्फत सादर करण्यात आलेल्या या अहवालावरून टाळेबंदीच्या कालावधीनुसार होणाऱ्या नुकसानीचा अंदाज येण्यास येतो.

**४.४.४ सेंटर फॉर मॉनिटरींग द इंडियन इकॉनॉमी (CMIE), मुंबईचा अहवाल**

अ. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर मुंबईस्थित या संस्थेने ८ एप्रिल २०२० रोजी दिलेल्या आपल्या पहिल्या अहवालात टाळेबंदी काळातील बेरोजगारीचा अंदाज व्यक्त केलेला आहे. त्यानुसार पहिल्याच टप्प्यातील (२५ मार्च ते १४ एप्रिल २०२०) देशव्यापी टाळेबंदीमुळे भारतात आधीच ८.४% इतका असणारा बेरोजगारीचा दर ५ एप्रिल २०२० पर्यंत २३.८% वर गेला तर १९ एप्रिल २०२० अखेर हा बेरोजगारीचा दर २६.२% इतका वाढल्याचा अंदाज आहे. या काळात शहरी बेरोजगारीत चौपटीपेक्षा अधिक वाढ झाल्याचा अंदाज आहे.

या संस्थेच्या मते, भारतामध्ये मुळात असंघटित किंवा अनौपचारिक क्षेत्रातील रोजगाराचे प्रमाण ९०% हून अधिक असताना या वाढलेल्या बेरोजगारीचे संकट याच स्थलांतरित असंघटित कामगारांवर कोसळले आहे. त्यामुळेच शहरी भागातून या कामगारांचे लोंढे

मोठ्या प्रमाणात ग्रामीण भागाकडे स्थलांतरित होताना दिसतात, की ज्याला उलट-स्थलांतर (Reverse Migration) असे संबोधले जाते.

आ. मुंबईस्थित सी.एम.आय.इ. या संस्थेने केलेल्या सर्वेक्षणावर आधारित १३ मे, २०२० रोजी दिलेल्या आपल्या दुसऱ्या अहवालात १७ मे, २०२० रोजी भारतात संपणाऱ्या तिसऱ्या टप्प्यातील टाळेबंदीनंतर आणखी एका आठवड्याने जरी टाळेबंदी वाढविली तर काय होईल याचा पुढीलप्रमाणे अंदाज व्यक्त केला होता. (अ) देशातील किमान ३३% कुटुंबांना जीवनावश्यक साधनांचा तुटवडा निर्माण होईल. (आ) देशातील ८४% हून अधिक कुटुंबांच्या मासिक उत्पन्नात घट होईल. (इ) शहरी भागातील ६५% व ग्रामीण भागातील ५४% कुटुंबांकडे एका आठवड्याला पुरेल इतकेच सामान शिल्लक होते. (ई) दिल्ली, पंजाब व कर्नाटक या राज्यांच्या तुलनेत बिहार, हरियाणा व झारखंड या राज्यातील लोकांच्या उत्पन्नावर टाळेबंदीचा जास्त प्रमाणात विपरित परिणाम झालेला आहे. (उ) २० ते ३० या वयोगटातील २ कोटी ७० लाख तरुणांना केवळ एप्रिल, २०२० या एकाच महिन्यात रोजगार गमवावा लागला आहे.

बेरोजगारीसंदर्भात विचार करता भारताप्रमाणेच जगातील इतर देशांमध्येही कमी-अधिक प्रमाणात सारखीच परिस्थिती असलेली दिसून येते. उदा. आधी स्पष्ट केल्याप्रमाणे संयुक्त राष्ट्र गरिबी व मानवाधिकार परिषदेच्या अंदाजाप्रमाणे अमेरिकेत ४.७ कोटी लोकांना या कोविड-१९ च्या अर्थसंकटकाळात रोजगार गमवावा लागला असून बेरोजगारीचा दर ३३% वर पोहचला आहे की जो १९२९ च्या जागतिक महामंदीकाळापेक्षा (२५%) जास्त आहे. याच काळात कॅनडामध्येही ४४% इतकी बेरोजगारी निर्माण झाली आहे.

### ४.४.५ डॉ. नौरीएल रौबिनी

अमेरिकेतील न्यूयॉर्क विद्यापीठाच्या स्टर्न स्कूल ऑफ बिझनेस येथे कार्यरत अर्थतज्ज्ञ नौरीएल रौबिनी यांनी २९ एप्रिल, २०२० रोजी 'द गार्डियन' मध्ये लिहिलेल्या २०२० साठी अटळ असलेल्या 'महामंदीला' १० कारणे का कारणीभूत' (Ten reasons why a 'Greater Depression' for the 2020s is inevitable - Nouriel Roubini) हा लेख लिहिला आहे. या लेखात (i) सरकारची वाढती तूट व कर्जे, (ii) विकसित देशात अधिक संख्येने असणाऱ्या वृद्धांच्या आरोग्यावरील अधिकचा होणारा खर्च, (iii) बंद पडलेले उद्योग व वाढलेली बेरोजगारी, (iv) भाववाढीच्या नियंत्रणासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजना, (v) वेतन खर्च कपातीसाठी स्वयंचलित व डीजीटल तंत्राचा वाढत जाणारा वापर, (vi) जागतिकीकरण विरोधी धोरणे, (vii) वाढत जाणारा लोकशाहीविरोधी राज्यकारभार, (viii) अमेरिका व चीनमधील व्यापारयुद्ध, (ix) अमेरिकेच्या विरोधात होवू शकणारी मोर्चेबांधणी व शीतयुद्ध आणि (x) पर्यावरणीय प्रश्न इत्यादी १० कारणांमुळे जागतिक अर्थव्यवस्था येणाऱ्या काळात मंदीच्या गर्तेत जाणार असून ही मंदी १९२९ ची महामंदी व २००८ मधील गृह-कर्जाधारित मंदीपेक्षा अधिक तीव्र असणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. त्यांच्या या मताला विशेष महत्त्व असण्याचे कारण म्हणजे त्यांनी २००६ मध्येच अमेरिकेत प्रचंड तेजीत असणाऱ्या गृहकर्ज बाजाराचा फुगलेला फुगा फुटून प्रचंड प्रमाणात अर्थसंकटाला सामोरे जावे लागेल असे भाकीत वर्तवले होते की जे २००८ मध्ये खरे ठरले होते.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या अहवालानुसार कोविड-१९ च्या काळात वेगाने घसरलेल्या जगातील बहुतेक अर्थव्यवस्थांमध्ये २०२०-२१ या आगामी

आर्थिक वर्षात मात्र इंग्रजी 'V' आकाराप्रमाणे वेगाने पुनरुज्जीवन होणार आहे. पण डॉ. नौरीएल रौबिनी यांच्या मते तसे होणार नसून वर स्पष्ट केलेल्या १० कारणांमुळे जगातील बहुतेक अर्थव्यवस्थांची वाटचाल आगामी काही वर्षांमध्ये इंग्रजी 'L' आकाराप्रमाणे होण्याची शक्यता आहे म्हणजे ही मंदी त्वरित दूर होण्याची शक्यता नाही.

### ४.४.६ सोसायटी ऑफ इंडियन ऑटोमोबाईल मॅन्युफॅक्चरींग (SIAM) चा अहवाल

या संस्थेच्या एप्रिल २०२० मध्ये आलेल्या अहवालानुसार, २०१९ च्या मार्च महिन्याच्या तुलनेत मार्च २०२० या महिन्यात भारतात प्रवासी वाहनांच्या विक्रीमध्ये ५१% नी घट झाली होती जी गेल्या २२ वर्षातील सर्वात मोठी घसरण होती. तर याच संस्थेच्या मे, २०२० च्या अहवालानुसार, टाळेबंदीमुळे एप्रिल २०२० या महिन्यात भारतामध्ये एकाही प्रवासी वाहनाची विक्री झाली नाही व अशी स्थिती याआधी केव्हाही आली नव्हती. भारतातील वाहन उद्योग हा जगातील एक महत्त्वाचा उद्योग असून कोविड-१९ च्या संकटापूर्वीच या उद्योगात घसरण सुरू झालेली होती त्यात BS-IV ऐवजी BS-VI हा होणारा तंत्र बदल आणि या विषाणू संकटाची दुहेरी भर पडल्याने दुष्काळात तेरावा महिना अशी या क्षेत्राची स्थिती झालेली आहे.

### ४.४.७ बेनेट विद्यापीठ परिषद

टाइम्स ऑफ इंडियाशी संबंधित बेनेट विद्यापीठाच्या स्कूल ऑफ मॅनेजमेंटने १५ मे, २०२० रोजी ‘कोविड-१९- जान भी जहाँ भी’ या जागतिक ऑनलाइन परिषदेमध्ये सहभागी झालेल्या तज्ज्ञांनी निर्माण झालेल्या विषाणूजन्य अर्थसंकटावर महत्त्वपूर्ण असे विश्लेषण केले आहे. यामध्ये सहभागी ‘इंडिया प्रोग्राम ऑफ इंटरनॅशनल ग्रोथ सेंटर’चे संचालक डॉ. प्रणब सेन यांच्या मते, टाळेबंदीच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेचे साधारणपणे १८ लाख कोटी रु. चे नुकसान झाले असून त्वरित योग्य अशा उपाययोजना केल्या नाहीत तर हा नुकसानीचा आकडा ३५ कोटी रु. पर्यंत जाऊ शकतो. कॉर्नेल विद्यापीठातील डॉ. कौशिक बसू यांच्या मते भारत सरकारने जाहीर केलेले २० लाख कोटी रु. चे अर्थसहाय्य आवश्यक असले तरी पुरेसे नाही.

### ४.४.८ क्रिसिल (CRISIL) चा अहवाल

कोविड-१९ च्या आर्थिक संकटाच्या पार्श्वभूमीवर क्रिसिल या पतनिर्देशन संस्थेने २६ मे, २०२० रोजी आपला अहवाल सादर केला. त्यानुसार, भारतामध्ये सलग चार वेळा वाढवलेल्या टाळेबंदीचा परिणाम म्हणून देशात मंदी आल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतर १९५८, १९६६ व १९८० नंतरची ही चौथी मंदी असल्याचे त्यात स्पष्ट करतानाच शेती क्षेत्रामुळे देशाची अर्थस्थिती काही प्रमाणात टिकून राहण्यास मदत झाली असल्याचे क्रिसिलने नमूद केले आहे. क्रिसिलच्या मते, चालू आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्था किमान ५% नी आक्रसणार असून त्यातील २५% घसरण ही केवळ एप्रिल ते जून २०२० या पहिल्या तिमाहीतच होणार आहे आणि यात ढोबळ राष्ट्रीय उत्पादनाच्या (GDP) १०% इतके नुकसान अपेक्षित आहे.

**क्रिसिलची निरीक्षणे:** (i) कोविड-१९ पूर्वीच्या विकासदराची स्थिती पुन्हा येण्यास किमान तीन वर्षे लागतील, (ii) शिक्षण व पर्यटन क्षेत्रासाठी संपूर्ण वर्ष बिकट जाईल, (iii) मार्च २०२० मध्ये औद्योगिक उत्पादन १६% नी घसरले, (iv) एप्रिल २०२० मध्ये निर्यातीत ६०.३% घट झाली तर रेल्वे मालवाहतूक ३५% नी कमी झाली व (v) नव्या टेलिकॉम जोडणीमध्ये ३५% नी घट झाली. क्रिसिलच्या या

निरीक्षणावरून कोविड-१९ मुळे भारतातील आर्थिक स्थिती अतिशय संकटग्रस्त झाली असून त्यातून सावरण्यासाठी पुढील किमान तीन वर्षे लागतील, असा अंदाज आहे.

### ४.४.९ डॉ. अजित रानडे

आदित्य बिर्ला समूहाचे मुख्य अर्थतज्ज्ञ डॉ. अजित रानडे यांनी २६ मे, २०२० रोजी सारस्वत सहकारी बँक प्रस्तुत 'लोकसत्ता वेबसंवाद' (वेबिणार) कार्यक्रमात कोविड-१९ ची आरोग्यसमस्या व देशाची अर्थसमस्या या दोन्ही वेगवेगळ्या नसून अर्थगती योग्य नसेल तर त्याचा जीवनावर थेट परिणाम होतो असे स्पष्ट केले. त्यांच्या मते, अर्थव्यवहारांचे योग्य नियोजन न करताच भारतात टाळेबंदी सतत वाढवत नेल्याने अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम होत असून अर्थव्यवस्था रुळावर आणण्यासाठी प्राधान्य देण्याची गरज आहे. तसेच केंद्र सरकारने २० लाख कोटीची जी अर्थयोजना (पॅकेज) जाहीर केली आहे त्यामध्ये सुमारे १८ लाख कोटी रु. चे सहाय्य पतपुरवठ्याच्या रूपात असून उर्वरित केवळ २ लाख कोटी इतक्याच रक्कमेचा प्रत्यक्ष लाभ अर्थव्यवस्थेला होणार असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले.

थोडक्यात कोविड-१९ या विषाणूजन्य आजाराच्या संसर्गामुळे संपूर्ण जगभरातील सर्व अर्थव्यवस्थांमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक संकट निर्माण झालेले असून त्याचे स्वरूप व दुष्परिणाम किती गंभीर आहेत हे वरील अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रतिथयश संस्था व अर्थतज्ज्ञांच्या अहवाल आणि विश्लेषणावरून स्पष्ट होते.

## ५. कोविड-१९ मुळे अर्थव्यवस्थांमध्ये आलेले संकट ही तात्पुरती अर्थघसरण की मंदी?

कोविड-१९ या विषाणूजन्य आजाराची सुरुवात डिसेंबर २०१९ च्या शेवटी चीनच्या वुहान प्रांतामध्ये झाली. या विषाणूचा प्रसार जगामध्ये इतक्या वेगाने झाला की पुढच्या केवळ काही महिन्यामध्ये जगातील बहुतेक सर्वच देशांमध्ये त्याचा संसर्ग झालेला दिसतो. प्रसाराचा वेग जास्त आणि त्यावरील औषध/लस नसल्याने विशेषतः प्रगत देशांमध्ये वयस्क लोकांचा मोठ्या प्रमाणात त्यात बळी जात असल्याने या विषाणूविषयी संपूर्ण जगामध्ये भीती निर्माण झालेली आहे.

या भीतीमुळेच खबरदारीचा उपाय म्हणून त्याचा संसर्ग टाळण्यासाठी चीनपाठोपाठ इतर सर्वच देशांमध्ये टाळेबंदी घोषित करण्यात आलेली दिसून येते. या टाळेबंदीचा परिणाम म्हणून अत्यावश्यक सेवा वगळता सर्वच अर्थव्यवहार किमान ४० दिवस ते कमाल ७० दिवसाहून अधिक दिवस बंद राहिले. साहजिकच उत्पादन, विक्री/पुरवठा, रोजगार, उत्पन्न, खरेदी/मागणी व नवीन गुंतवणूक या सर्व समग्रलक्षी आर्थिक घटकांमध्ये तत्काळ मोठी घट झाली. अशा रीतीने बहुतेक सर्वच समग्रलक्षी आर्थिक घटकांमध्ये तात्काळ व जी मोठी घट झाली त्याला तात्पुरती अर्थघसरण म्हणता येईल की आर्थिक मंदी म्हणता येईल? याविषयी मतमतांतरे असलेली दिसून येतात.

''तात्पुरती अर्थघसरण म्हणजे काही कालावधीसाठी एकंदर उत्पादन व रोजगार यासारख्या समग्रलक्षी आर्थिक घटकांमध्ये घट होऊन पुन्हा अर्थस्थिती पूर्वपदावर येणे होय.'' यानुसार पाहता आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या कोविडोत्तर अर्थगतीच्या अंदाजानुसार चालू अर्थघसरण ही तात्पुरती असून २०२१ या आगामी वर्षात जगातील बहुतेक अर्थव्यवस्था या पूर्वपदावर येणार आहेत. याउलट ''मंदी म्हणजे अर्थव्यवस्थेतील एकंदर उत्पादन व रोजगार यासारखे समग्रलक्षी आर्थिक घटक न्यूनतम

पातळीला पोहचणे आणि बऱ्याच कालावधीसाठी ती न्यूनतम पातळीला राहणे होय.'' अमेरिकन अर्थतज्ज्ञ डॉ. नौरीएल रौबिनी आणि क्रिसिल या पतनिर्देशन (Credit Rating) संस्थेच्या मते कोविड-१९ च्या समस्येनंतर जगात निर्माण झालेली आर्थिक समस्या ही तात्पुरती अर्थघसरण नसून प्रत्यक्षात ती मंदीचीच स्थिती आहे किंबहुना नजीकच्या काळात तिचे निराकरण दृष्टिक्षेपात नसून तिचे रूपांतरण आत्तापर्यंतच्या सर्वात मोठ्या महामंदीमध्ये होणार आहे.

या दोन्ही बाजूंचा साकल्याने विचार करता असे दिसून येते की कोविड-१९ चे आरोग्य व अर्थविषयक संकट निर्माण होण्यापूर्वी चार वर्षापासूनच भारत व जगातील बहुतेक देशांमध्ये आर्थिक घसरण होत होती हे प्रामुख्याने मंद पण सातत्याने घटणारा वृद्धिदर, संथ पण सातत्याने वाढत जाणारी बेरोजगारी, या दोन्हींमुळे अमेरिका व चीन या देशांमध्ये विनिमय दर आणि व्यापाराबाबतीत झालेले मतभेद व शीतयुद्ध या बाबींवरून स्पष्ट होते. यात कोविड-१९ या विषाणूजन्य आजारामुळे स्वीकारण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे जगाचे अर्थचक्र एकदम थांबल्याने भरच पडली आणि समग्रलक्षी आर्थिक घटकांमधील वृद्धिदर जानेवारी ते मे २०२० या पाचच महिन्यात शून्याच्या खाली पोहोचला इतकेच नव्हे; तर भारत व चीनचा अपवाद वगळता बहुतांशी देशांमध्ये तो उणे झालेला दिसून आला. त्यामुळे या स्थितीला नक्कीच आर्थिक मंदी म्हणता येईल हे स्पष्ट आहे. शिवाय अद्याप किंवा येत्या नजीकच्या काळात कोविड-१९ या विषाणूजन्य आजारावर खात्रीशीर औषध/लस निघण्याची शक्यता दिसत नसल्याने संपूर्णतः टाळेबंदी उठवणे आणि पूर्वीप्रमाणे सर्व अर्थव्यवहार पूर्ण क्षमतेने चालू करणे शक्य दिसत नाही. तसेच कोविड-१९ च्या टाळेबंदी काळात एका बाजूला पुरवठा साखळी तुटल्याने शिल्लक असलेला उत्पादित माल, रोजंदारीवरील कामगारांचे मोठ्या प्रमाणात झालेल्या उलट दिशेच्या स्थलांतरामुळे (Reverse Migration) भेडसावणारा कामगारांचा तुटवडा व कच्च्या मालाची टंचाई यामुळे उत्पादन, रोजगार व पुरवठा वाढणे कठीण आहे तर दुसऱ्या बाजूला बहुसंख्येने असणाऱ्या असंघटित कामगारांचा रोजगार नाहीसा झाल्याने आणि स्वयंरोजगार थांबल्याने क्रयशक्तीच्या अभावी निर्माण होणारी मागणीची कमतरता लक्षात घेता मंदीच्या स्थितीतून लवकर बाहेर पडणे कठीण दिसते. या पार्श्वभूमीवर पुढील चार किंवा सहा महिन्यात कोविड-१९ ची समस्या जरी नाहीशी झाली तरी अर्थव्यवहार नजीकच्या काळात पुन्हा पूर्वपदावर येतील असे दिसत नाही. त्यामुळे कोविडसहित खबरदारी घेत जगण्याची सवय लावून घेत अर्थव्यवहारांना गती देण्याचे कार्य करावे लागेल आणि यामध्ये सरकारला सक्रिय सहभाग घ्यावा लागेल, हे स्पष्ट आहे. यावरून सध्याचे अर्थसंकट म्हणजे तात्पुरती अर्थघसरण नसून मंदीच आहे, हे स्पष्ट आहे.

## ६. कोविड-१९ च्या मंदीतून बाहेर पडण्यासाठी करण्यात येत असलेल्या उपाययोजना व त्यांची समर्पकता

कोणत्याही कारणाने जेव्हा आर्थिक मंदी निर्माण होते तेव्हा दोन प्रकारचे उपाय योजले जातात.

अ. मौद्रिक/चलनविषयक उपाय : यामध्ये बँक दराबरोबर रेपो व रिव्हर्स रेपो दर कमी करणे, रोख राखीव निधी प्रमाण (CRR) कमी करणे, वैधानिक रोखता दर (SLR) कमी करणे, खुल्या बाजारातून सरकारी कर्जरोख्यांची पुनर्खरेदी करणे (OMO), उपभोग्य कर्जावरील मर्यादा हटवणे, तारण मूल्य व कर्ज रक्कम यातील गाळा कमी करणे, व्यापारी बँकांना

अधिक कर्ज रक्कम उपलब्ध करून देणे व कर्जवसुली लांबवणे इत्यादी उपाय योजले जातात हे सर्वज्ञात आहे.

याला अनुसरून कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर जगातील बहुतेक देशांमध्ये मध्यवर्ती बँकांमार्फत वरील उपाय योजून कर्जे अधिक स्वस्तात व मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देण्यासाठी रोखता वाढवण्याचे धोरण राबवण्यात आलेले दिसून येते. भारतही याला अपवाद नाही. कारण भारतीय रिझर्व्ह बँकेने एप्रिल महिन्याच्या पहिल्याच आठवड्यात रेपो दर ५.१५% वरून ४.४% इतका आणि पुन्हा १८ मे २०२० रोजी हा दर ४% पर्यंत कमी केला. याचवेळी रिव्हर्स रेपो दरदेखील सुरुवातीला ४% वरून ३.७५% इतका आणि नंतर पुन्हा ३.३५% इतका कमी केला. यामागे उद्योग-व्यवसायांना अधिक स्वस्त कर्जे उपलब्ध करून अर्थचक्र सुरळीत ठेवणे हा उद्देश दिसून येतो. या दोन्ही व्याज दरांबरोबरच रोख राखीव निधी प्रमाण व वैधानिक रोखता दर या दोन्हींमध्ये भारतीय रिझर्व्ह बँकेने प्रत्येकी १% ची कपात केल्याने सर्व व्यापारी बँकांकडे मिळून ३.७ लाख कोटी इतकी अधिकची रक्कम कर्ज देण्यासाठी उपलब्ध झाली. या प्रमुख सवलतींच्या बरोबरीने भारतीय रिझर्व्ह बँकेने राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँकेसाठी (नाबार्ड) २५,००० कोटी रु., लघुउद्योग विकास बँकेसाठी (सिडबी) १५,००० कोटी रु., राष्ट्रीय गृहवित्त संस्थेसाठी १०,००० कोटी रु. आणि म्युच्युअल फंड कंपन्यांसाठी ५०,००० कोटी रु. चा विशेष निधी उपलब्ध करून दिला. तसेच एप्रिल ते ऑगस्ट २०२० या सहा महिन्यासाठी कर्जवसुलीला स्थगिती देण्यात आली आहे. शेती, ग्रामोद्योग, लघु व कुटीर उद्योग, गृहनिर्माण या मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध करून देणाऱ्या क्षेत्रांना निधीची कमतरता भासू नये या उद्देशाने भारतीय रिझर्व्ह बँकेने एक लाख कोटी रक्कमेचा हा अतिरिक्त निधी दिलेला दिसतो.

कोविड-१९ मुळे निर्माण झालेल्या मंदीतून अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेने एका बाजूला व्याज कपातीतून कर्जे स्वस्त करण्याचा व दुसऱ्या बाजूला सी. आर. आर. व एस. एल आर. कपात आणि विशेष निधीच्या माध्यमातून अधिकाधिक रक्कम अर्थव्यवस्थेमध्ये उपलब्ध करून देण्याचा आवश्यक व योग्य असा उपाय योजलेला दिसून येतो. या उपायांमुळे स्वस्त व मुबलक कर्जाऊ निधी मिळण्याचा मार्ग जरी मोकळा झाला असला तरी व्यावसायिकांमार्फत त्वरित त्याचा लाभ घेऊन कर्जे उचलली जातील आणि गुंतवणूक वाढेल, हे मात्र खात्रीने सांगता येणार नाही. कारण व्यावसायिकांमार्फत केली जाणारी गुंतवणूक ही प्रामुख्याने त्याच्यापासून अपेक्षित असणाऱ्या नफ्यावर अवलंबून असते आणि मंदीच्या स्थितीमध्ये नफ्याची शक्यता नसते. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे मध्यवर्ती बँकेच्या चलनउपायांमुळे अर्थव्यवस्थेतील केवळ उत्पादन व पुरवठ्याची बाजू प्रेरित होण्यास मदत होते पण दुसऱ्या बाजूने मागणी वाढणार असेल तरच त्याचा उपयोग होतो. अन्यतः स्वस्त व मुबलक निधी उपलब्ध होऊनदेखील गुंतवणूक वाढण्याची शक्यता नसते. याचा अर्थ भारतीय रिझर्व्ह बँकेच्या या चलन उपायांमुळे त्वरित अर्थव्यवस्थेला चालना मिळून मंदी दूर होण्यास मदत होईल असे नाही.

आ. राजकोषीय उपाय : मंदीच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही देशात राजकोषीय उपायाअंतर्गत एका बाजूला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांमध्ये कपात केली जाते आणि देशांतर्गत सार्वजनिक कर्जाची परतफेड करून लोकांच्या हातात अधिक रक्कम राहील हे पहिले जाते आणि देशांतर्गत उत्पादन वाढीला चालना

देण्यासाठी आयात जकाती वाढविल्या जातात. तर दुसऱ्या बाजूला सरकारच्या नियमित खर्चाबरोबरच अचानक उद्‌भवलेल्या समस्येच्या (उदा. कोविड-१९ ची आरोग्य समस्या) निराकरणासाठी अल्पकालीन आणि उत्पादन व रोजगार वाढीसाठी दीर्घकालीन खर्च म्हणजेच स्वायत्त स्वरूपाची गुंतवणूक गरजेप्रमाणे वाढवण्यात येते.

याला अनुसरून भारताप्रमाणेच इतर सर्व देशांमध्ये एका बाजूला कोविड-१९ मुळे उद्‌भवलेली आरोग्य समस्या सोडवण्यासाठी वैद्यकीय बाबींवर आणि टाळेबंदीमुळे बेरोजगार झालेले कामगार व स्वयंरोजगारीचे लहान व्यवसाय बंद झाल्याने कमाईपासून वंचित राहिलेले लोक यांना तात्पुरत्या स्वरूपाची आर्थिक मदत आणि खाद्यान्न पुरवठा या बाबींवर मिळून तात्कालिक/अल्पकालीन सार्वजनिक खर्च गरजेनुसार केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर भारतासहित बहुतेक देशांनी कोविड-१९ च्या अर्थमंदीतून बाहेर पडण्याच्या दृष्टीने वेगवेगळ्या बाबींवर खर्च करण्यासाठी विशिष्ट रक्कमेची तरतूद केलेली दिसून येते. उदा. मार्च २०२० च्या अखेरीस अमेरिकेने त्यांच्या जी.डी.पी. च्या साधारणतः १०% म्हणजे २ लाख कोटी डॉलर्सची योजना कार्यान्वित केली, युरोपियन संघाने १०० अब्ज युरो इतक्या खर्चाची योजना जाहीर केली, डेन्मार्कने त्यांच्या जी.डी.पी. च्या १३% रक्कमेची योजना कार्यान्वित केली. नेदरलँडमध्ये सर्व खाजगी क्षेत्रातील कामगारांचे पुढील तीन महिन्याचे वेतन सरकारमार्फत देण्याचे जाहीर करण्यात आले. ब्रिटनच्या इतिहासात पहिल्यांदाच खाजगी क्षेत्रातील कामगारांचे किमान ८०% वेतन सरकारमार्फत देण्याचे ब्रिटनचे अर्थमंत्री ऋषी सुनक यांनी जाहीर केले.

भारत सरकारनेदेखील पहिल्या टप्प्यामध्ये १.७ लाख कोटी खर्चाची योजना जाहीर केली. त्यामध्ये प्रामुख्याने कोविड-१९ चा अटकाव करण्यासाठी वैद्यकीय बाबींवर आणि देशातील ८० कोटी जनतेला रास्त दराने गहू व तांदूळ पुरवणे, महिलांच्या जनधन खात्यावर प्रत्येकी रु.५००/- व किसान सन्मान योजनेअंतर्गत अल्पभूधारकांना पहिला आगाऊ हप्ता प्रत्येकी रु.२०००/- यावरील खर्चाला प्राधान्य दिल्याचे आणि ते अत्यावश्यक असल्याचे दिसून येते. पण सरकारने केलेली १.७ लाख कोटीची ही तरतूद जी.डी.पी. च्या १% देखील नसून सामान्यांना दिलासा देण्यासाठी तिचा फारसा उपयोग होणार नसल्याची सार्वत्रिक टीका करण्यात आली. अशी टीका विरोधी पक्षांबरोबरच नोबेल पुरस्कारप्राप्त अर्थतज्ज्ञ अभिजीत बॅनर्जी, आर.बी.आय.चे माजी गव्हर्नर रघुराम राजन आणि इतर तज्ज्ञांनी देखील केली.

या टीकेमुळे आणि कोविड-१९ च्या वाढत्या प्रसारामुळे टाळेबंदीचा वाढणारा कालावधी यामुळे अर्थव्यवस्थेचे वाढते नुकसान लक्षात घेऊन १२ मार्च २०२० रोजी भारत सरकारमार्फत जी.डी.पी. च्या साधारणतः १०% म्हणजे २० लाख कोटीची योजना जाहीर केली की ज्यात भारतीय रिझर्व्ह बँक आणि केंद्र सरकारने तोपर्यंत जाहीर केलेल्या मदतीची रक्कम समाविष्ट असेल असे स्पष्ट करण्यात आले. त्याला अनुसरून भारताच्या अर्थमंत्र्यांनी पाच टप्प्यामध्ये त्याचा तपशील जाहीर केला. त्यामध्ये सूक्ष्म, लघु, मध्यम उद्योग (३ लाख को. कर्ज), शेती (१ लाख को.रु.), ग्रामीण विकासाकरिता कृषी कर्ज, मनरेगा (४० हजार को.रु.) व नाबार्ड (३३ हजार कोटी रु.), शहरी गरिबांसाठी (११ हजार को.रु.) अधिकची तरतूद यांचा समावेश आहे. कोळसा, खनिज, शस्त्रास्त्र, विमानतळ, वीज वितरण, अवकाश व औष्णिक ऊर्जा

या क्षेत्रात खाजगी व विदेशी गुंतवणूक वाढवण्याचा धोरणात्मक निर्णय घेऊन गुंतवणूक वाढवण्यावर भर दिलेला दिसून येतो.

भारत सरकारने जाहीर केलेल्या या रु.२० लाख कोटीचे जे विश्लेषण झाले त्यानुसार, साधारणपणे रु.१८ लाख कोटी इतकी रक्कम ही सवलतीच्या दरातील कर्ज व कर्जासाठी रक्कम उपलब्ध करून देण्यात आलेली आहे म्हणजे त्यातील केवळ रु.२ लाख कोटी इतकीच रक्कम खरे अर्थसहाय्य स्वरूपात असल्याचे दिसून येते. भारताचे माजी अर्थमंत्री पी. चिदंबरम् यांच्या मते सरकारच्या रु. २० लाख कोटीमध्ये खऱ्या अर्थसहाय्याची रक्कम केवळ रु. १.८६ लाख कोटी इतकीच आहे. तर अर्थतज्ज्ञ अजित रानडे यांच्या मते ही रक्कम रु. २ लाख कोटी इतकीच असून ती खूपच अपुरी आहे. याचा अर्थ भारत सरकारचाही भारतीय रिझर्व बँकेप्रमाणेच अधिक भर हा कर्जरूपी रक्कम जास्त प्रमाणात उपलब्ध करून देण्यावर आहे.

अर्थतज्ज्ञ जे.एम. केन्स यांच्या मते, मंदीच्या काळात खाजगी गुंतवणूकदारांना नफ्याची प्रेरणा (भासिका) नसल्याने त्यांच्याकडून प्रेरित (Induced) स्वरूपाची गुंतवणूक होत नाही अशावेळी सरकारने स्वायत्त (Autonomous) स्वरूपाची गुंतवणूक करणे अपेक्षित असते. म्हणजे विविध प्रकारचे रस्ते, लोहमार्ग, सिंचनाचे प्रकल्प, शैक्षणिक व सार्वजनिक आरोग्यासाठीच्या इमारती, विजेचे प्रकल्प इत्यादी प्रकल्पांची उभारणी सरकारी खर्चातून त्वरित सुरू करण्यात आली तर त्यातून एका बाजूला त्यासाठी आवश्यक साहित्य व उपकरणांची मागणी आणि दुसऱ्या बाजूला रोजगार व लोकांचे उत्पन्न वाढल्याने उपभोग्य मागणी वाढत जाऊन अर्थव्यवस्था मंदीतून बाहेर पडण्यास मदत होते. असे असताना प्रत्यक्षात मात्र भारत सरकारचे बहुतेक अर्थसहाय्य हे कर्जरूपी रक्कम अधिक उपलब्ध करून देणारे आहे त्यामुळे अधिक गुंतवणूक होईल व अर्थव्यवस्था मंदीतून बाहेर पडेल अशी सरकारची अपेक्षा दिसते. प्रत्यक्षात आधी स्पष्ट केल्याप्रमाणे स्वस्त व सुलभ पतपुरवठा उपलब्ध करून उत्पादन व पुरवठ्याला चालना देण्याचे कार्य मध्यवर्ती बँकेचे असून सरकारने राजकोषीय उपायांतर्गत प्रत्यक्ष अधिकचा खर्च व उत्पादक गुंतवणूक करून लोकांना अधिक रोजगार देणे व त्यांच्या उत्पन्न वाढीतून मागणी वाढीवर भर देणे अभिप्रेत असताना त्याकडे दुर्लक्ष झाल्याचे स्पष्ट दिसून येते.

### ७. कोविड-१९ च्या उपाययोजनेतील भारतातील त्रुटी व आर्थिक नुकसानविषयक निष्कर्ष

जगातील बहुतेक देशांप्रमाणेच भारतामध्येही कोविड-१९ विषाणूजन्य आजाराचा प्रसार झाल्याने एका बाजूला आरोग्यविषयक समस्या तर दुसऱ्या बाजूला टाळेबंदीमुळे अर्थसमस्या निर्माण झाल्या. त्यावर ज्या काही उपाययोजना राबवण्यात आल्या त्यामध्ये अनेक त्रुटी असलेल्या दिसून येतात.

### ७.१ कोविड-१९ च्या उपाययोजनेमधील त्रुटीसंदर्भातील निष्कर्ष

अ. चीन व युरोपियन देशात कोविड-१९ चा वेगाने प्रसार सुरू झाल्यानंतर व ३० जानेवारी, २०२० रोजी भारतात पहिला रुग्ण आढळल्यानंतर वेळीच खबरदारी घेतली गेली नाही.

आ. फेब्रुवारी २०२० च्या सुरुवातीपासून केरळने ज्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय विमानतळांवर येणाऱ्या सर्वांची तपासणी व विलगीकरण केले तसे संपूर्ण भारतात करण्यात आले नाही.

इ. भारतात २५ मार्च, २०२० पासून म्हणजे खूप उशिरा टाळेबंदी स्वीकारण्यात आली.

ई. टाळेबंदी पुकारण्यापूर्वी त्याचे नियोजन करण्यात

आल्याचे अजिबात दिसून आले नाही.

उ. विशेषतः मुंबईसारख्या एकेका महानगरात रोजंदारीवरील लाखो स्थलांतरित कामगार अतिशय दाटीवाटीने राहून सामूहिक स्वच्छतागृहांचा वापर करत असताना योग्य शारीरिक-अंतर राखण्यासारखे नियम पाळणे शक्य नसल्याने विषाणूचा जलद प्रसार होणार हे स्पष्ट असतानादेखील टाळेबंदीच्या वेळी त्याकडे लक्ष दिले गेले नाही. त्यामुळेच या महानगरांमध्ये व विशेषतः झोपडपट्टींमध्ये विषाणूचा प्रसार सर्वाधिक झालेला दिसून येतो.

ए. टाळेबंदीमुळे रोजंदारीवरील लाखो स्थलांतरित कामगार अचानक बेरोजगार झाले; पण त्यांच्या उदरनिर्वाहासाठी कोणतीच ठोस उपाययोजना करण्यात आली नाही.

ऐ. संकटकाळात आपल्या मूळ ठिकाणी जाण्याची माणसाची नैसर्गिक प्रवृत्ती दिसून येते त्यानुसार सर्व महानगरे व शहरी भागातील मिळून कोट्यावधी रोजंदारी कामगारांची जाण्याची कोणतीच व्यवस्था वेळीच करण्यात आली नाही. त्यामुळे त्यांना शेकडो किलोमीटरचा पायी प्रवास कडक उन्हांमध्ये व संचारबंदी असताना करावा लागला की ज्यात अनेकांचा चालण्याच्या त्रासामुळे किंवा अपघातामध्ये मृत्यू झाला.

ओ. एका बाजूला विदेशातील आपल्या नागरिकांना देशात सन्मानाने आणत असताना दुसऱ्या बाजूला या रोजंदारीवरील कामगारांना वेळीच त्यांच्या मूळ गावी जाऊ दिले नाही. शिवाय त्यांच्याशी शासकीय यंत्रणेकडून अतिशय अपमानास्पद व गुन्हेगारांसारखी वागणूक देण्यात आली. यावरून 'सर्व समान असले तरी काही लोक अधिक समान असतात', या जॉर्ज ऑर्वेलच्या मताची प्रचीती येथे आली.

औ. सार्वजनिक आरोग्यव्यवस्थेकडे खाजगीकरणाच्या नावाखाली झालेल्या दुर्लक्षाचा दुष्परिणाम कोविड-१९ च्या काळात सर्व देशाला भोगावा लागत आहे.

अं. कोविड-१९ मुळे टाळेबंदीचा उपाय योजताना अर्थव्यवहार सुरळीत राहण्यासाठी कोणत्याच उपाययोजना करण्यात आल्या नाहीत.

### ७.२ कोविड-१९ मुळे झालेल्या आर्थिक नुकसानासंदर्भातील निष्कर्ष

अ. नियोजनाशिवाय अचानक पुकारण्यात आलेल्या टाळेबंदीमुळे शेती व अत्यावश्यक बाबीवगळता सर्वच वस्तू व सेवांचे उत्पादन बंद झाले.

आ. त्यामुळे भारताच्या इतिहासातील सर्वाधिक म्हणजे ३०% हून अधिक बेरोजगारी निर्माण झाली.

इ. यातून एका बाजूला एकंदर पुरवठा व दुसऱ्या बाजूला एकंदर मागणी प्रचंड प्रमाणात कमी झाली.

उ. टाळेबंदीची आर्थिक किंमतः मुंबईस्थित सी.एम.आय.ई. आणि आय. आय.टी. मुंबई यांच्या अनुमानानुसार, पहिल्या दोन टप्प्यातील ४० दिवसाच्या टाळेबंदीमुळे भारतातील जवळपास ६५% उत्पादन क्षेत्र बाधित झाले आहे. यावरून साधी आकडेमोड केल्यास झालेल्या नुकसानीचा अंदाज येतो. उदा. २०१९-२० च्या आर्थिक पाहणी अहवालानुसार, भारताचे ढोबळ राष्ट्रीय उत्पन्न रु. २०२ लाख कोटी म्हणजे प्रतिदिन सरासरी रु. ५५,३४२ कोटी इतके असणार होते. त्याच्या ६५% या हिशोबाने प्रतिदिन रु. ३५,९७२ कोटीचे नुकसान झाले हे स्पष्ट आहे. यावरून टाळेबंदीच्या पहिल्या ४० दिवसाचा हिशोब केल्यास रु. १४.३८ लाख कोटीचे नुकसान

झाले असे म्हणता येईल. तसेच पुढच्या तिसऱ्या व चौथ्या टाळेबंदीच्या २८ दिवसात ५०% चालू व ५०% अर्थव्यवहार बंद राहिले असे गृहीत धरल्यास प्रतिदिन रु.२७,६७१ कोटीचे नुकसान झाले असे मानावे लागेल. याचा हिशोब केल्यास नंतरच्या २८ दिवसात साधारणपणे रु.७.७४ लाख कोटीचे नुकसान झाले. अशारीतीने भारतातील २५ मार्च ते ३१ मे, २०२० या ६८ दिवसांच्या टाळेबंदीमुळे साधारणतः रु.२२.१२ लाख कोटीचे नुकसान झाले, असे म्हणता येईल. नुकसानीची ही रक्कम भारत सरकारच्या २०२०-२१ च्या अर्थसंकल्पीय रक्कमेच्या सुमारे ७४% येते. यावरून भारताला कोविड-१९ मुळे टाळेबंदीच्या ३१ मे, २०२० पर्यंतच्या ६८ दिवसांत किती मोठी आर्थिक किंमत मोजावी लागली हे स्पष्ट होते.

ऊ. रोजंदारीवरील बहुतेक कामगार गावांकडे स्थलांतरित झाल्याने टाळेबंदीनंतरच्या काळात कामगारांचा तुटवडा शहरी उद्योग व व्यवसायांना भासणार आहे.

ए. टाळेबंदीनंतर कदाचित उद्योगांचा कल स्वयंचलित (Automation) तंत्र वापरण्याकडे दिसून येतो व तसे झाल्यास बेरोजगारीची मोठी समस्या उद्‌भवणार आहे.

## ८. शिफारशी

अ. धोरणात्मक शिफारशी

१. सार्वजनिक आरोग्यक्षेत्र बळकट करणे अत्यावश्यक आहे. कारण ज्याप्रमाणे संरक्षण क्षेत्राबाबत दुसऱ्या देशांवरील अवलंबित्व धोक्याचे ठरते तसेच आरोग्यविषयक आणीबाणीच्या काळात खाजगी क्षेत्रावरील अवलंबित्व जोखमीचे ठरते, हे कोविड-१९ च्या काळात जगभरात स्पष्ट झाले आहे.

२. उद्योग व व्यवसायांचे नियोजनबद्धरित्या विकेंद्रीकरण करणे आवश्यक आहे. कारण उद्योग व व्यवसायांचे मर्यादित अशा शहरे व महानगरांमध्ये केंद्रीकरण झाल्याने दाटीवाटीने व झोपडपट्टीत राहावे लागते की ज्यामुळे कोविड-१९ चा प्रसार जलदगतीने झाला. म्हणून हे टाळण्यासाठी विकेंद्रित विकास आवश्यक ठरतो.

३. कृषी व संलग्नित क्षेत्रांवर हेतुपुरस्सरपणे अधिक भर देणे आवश्यक आहे. कारण युद्धाचा प्रसंग किंवा कोविड-१९ सारखी आरोग्य आणीबाणीची स्थिती असेल अशावेळी दूध, भाज्या, फळे व खाद्यान्न असे केवळ खाद्य व पेय पदार्थांचीच आवश्यकता असते म्हणून याबाबतीत 'आत्मनिर्भर' असणे गरजेचे असते.

४. सार्वजनिक क्षेत्रामार्फत ग्रामीण पायाभूत सुविधांचा व कृषिमाल प्रक्रिया उद्योगांचा विकास करणे. कारण सिंचन, वीज, रस्ते व इतर वाहतूक आणि वित्तीय सुविधांबाबतीत खाजगी क्षेत्रावर अवलंबून राहणे बहुसंख्येने असणाऱ्या अल्पभूधारकांना परवडणारे नाही.

५. सार्वजनिक शिक्षणव्यवस्था विकसित करणे आवश्यक आहे. आरोग्यक्षेत्राप्रमाणेच शिक्षणाबाबतीत खाजगी क्षेत्रावर अवलंबून राहणे जोखमीचे ठरते. कारण तसे झाल्यास भारतात बहुसंख्य असणाऱ्या सामान्य कुटुंबातील पाल्यांना समान पातळीचे दर्जेदार शिक्षण मिळणार नाही की, ज्यामुळे समाजातील सर्व प्रकारची विषमता वाढते हे आत्ता दिसून येतच आहे. म्हणून ज्याप्रमाणे कोविड-१९ ची समस्या आल्याने सार्वजनिक आरोग्य क्षेत्राचे महत्त्व लक्षात आले त्याप्रमाणे सार्वजनिक शिक्षण व्यवस्थेचे महत्त्व लक्षात येण्यासाठी कोणतीतरी समस्या येण्याची

वाट पाहू नये.

६. संघटीत रोजगारात वाढ करणे आवश्यक आहे. कारण कोविड-१९ सारख्या आणीबाणीच्या काळात बहुसंख्येने असणाऱ्या असंघटित कामगारांचे जे हाल झाले ते एका बाजूला दिसून आले; पण दुसऱ्या बाजूला त्यांचा रोजगार व कमाई बुडाल्याने त्यांच्याकडून येऊ शकणारी मागणी थांबल्याने येत्या काळात मंदीची तीव्रता वाढणार आहे, हे स्पष्ट आहे.

७. आयातीवर अवलंबून न राहता शक्य असणाऱ्या सर्व वस्तू व सेवांचे देशांतर्गत उत्पादन वाढवण्यावर भर देणे आवश्यक आहे. कारण संकटकाळात परावलंबित्व धोक्याचे ठरते.

आ. बिगर- धोरणात्मक शिफारशी

१. कामगार, उत्पादक व व्यावसायिकांना थेट लाभ देणाऱ्या योजना राबवणे.

२. शहरी असंघटित कामगार, छोटे शेतकरी, शेतमजूर व इतर छोटे व्यावसायिक यांना अल्पकाळासाठी थेट मदत देणे.

३. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा विस्तार करणे.

४. आर्थिकदृष्ट्या कमकुवत व रोजगार गमविलेल्या सर्वांना मोफत व माफक दरात गहू व तांदळाबरोबरच डाळी, कांदे, तिखट, मीठ, बटाटे इ. अत्यावश्यक बाबी पुरवणे.

५. स्वायत्त स्वरूाची गुंतवणूक वाढवणे. सरकारमार्फत अर्थसंकल्पाव्यतिरिक्तचे लहान व मोठे विकासाचे प्रकल्प गरजेनुसार सुरू करणे आवश्यक आहे. कारण अर्थसंकल्पात तरतूद झालेल्या प्रकल्पांव्यतिरिक्त जर इतर रस्ते, लोहमार्ग, बंदरे, सिंचन प्रकल्प, सार्वजनिक शाळा, दवाखाने इ.च्या इमारतींचे बांधकाम, विजेचे प्रकल्प यामध्ये सरकारने स्वायत्त स्वरूपाची गुंतवणूक वाढवली तर अर्थतज्ज्ञ जे. एम. केन्सच्या मतानुसार, रोजगार वाढीबरोबरच सिमेंट, लोखंड, पोलाद, यंत्रे, माल वाहतुकीची वाहने व इंधनाचीही मागणी वाढते. की ज्यामुळे मंदी दूर होण्यास मदत होते.

६. आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा अधिक व्यापक व विस्तारित करणे व आपत्ती निवारण कोश वाढवणे.

७. सर्व स्तरावरील शासन व प्रशासन यंत्रणेमध्ये योग्य समन्वय राखतानाच राजकीय भेदभाव टाळण्याची बिगर-राजकीय यंत्रणा तयार करणे.

**संदर्भ**


१. Conference on COVID-19 organized by School of Management, Bennett University on 15th May 2020.

२. Dr. Nouriel Roubini, "Ten reasons why a 'Greater Depression' for the 2020s is inevitable", The Guardian, 29th April 2020.

३. Economic Survey Report of India- 2019-20.

४. International Monetary Fund (IMF) Report 18th April 2020.

५. Report of United Nations Conference on Poverty Human Rights- April 2020.

६. Report of Central HRD I.I.T. Mumbai on Impact of COVID-19 on 22nd April 2020.

७. Report of Centre for Monitoring Indian Economy (CMIE), Mumbai, 8th April & 13th May, 2020.

८. Reports of United Nations Organization- April and May 2020.

९. Report of Society of Indian Automobile Manufacturing (SIAM) April and May 2020.

१०. Report of CRISIL on Impact of COVID-19 on Indian Economy, 26th May 2020.

११. United Nations Food Agricultural Organization's (UNFAO) Global Report on Food Crisis 2020- 22nd April 2020.

१२. United Nations Educational, Social Cultural Organization (UNESCO) - 22nd April 2020.

१३. United Nations Food Agricultural Organization's (UNFAO) Report of Global Network against Food Crisis April 2020.

१४. डॉ. अजित रानडे, 'लोकसत्ता वेबसंवाद' (वेबिनार) मधील सादरीकरण- २६ मे २०२०

◆

## निवेदन : अर्थसंवाद वर्गणी

अर्थसंवाद अंकाचे वर्गणीदार होऊ इच्छिणाऱ्या महाविद्यालय / शैक्षणिक संस्था / व्यावसायिक संस्था/ग्रंथालये यांच्यासाठी **त्रैवार्षिक वर्गणी रु. २०००/- तर पंचवार्षिक वर्गणी रु. ३०००/-** आहे. ही वर्गणी कृपया 'मराठी अर्थशास्त्र परिषद' या नावाने राष्ट्रीयीकृत बँकेच्या डिमांड ड्राफ्टद्वारे किंवा संपादकांशी संपर्क साधून NEFT (मराठी अर्थशास्त्र परिषद, बँक ऑफ इंडिया, राजारामपुरी, कोल्हापूर. खाते क्र. : 09472011000368, IFSC : BKID0000947) द्वारे पाठवावी. **मनिऑर्डर व वार्षिक वर्गणी स्वीकारली जात नाही.** सदर वर्गणी कृपया प्रमुख संपादकाच्या पुढील पत्त्यावर कव्हरिंग लेटरसह पाठवावी.

**डॉ. राहुल शं. म्होपरे**

विद्यापीठ क्वार्टर्स नं. डी-३४, सायबर समोर, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, ता. करवीर, जि. कोल्हापूर. पिन : ४१६ ००४. भ्रमणध्वनी : ०९९२३८७९०२०

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

## निवेदन

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सर्व आजीव सदस्यांना व अर्थसंवाद लेखकांना कळविण्यात येते की, कार्यकारिणीच्या ठरावानुसार दि. १ एप्रिल २०२० पासून अर्थसंवाद हा '**तज्ज्ञ परिक्षित नियतकालीक**' करण्यात आलेला आहे. त्यामुळे यापुढील काळात अर्थसंवादचे लेख हे तज्ज्ञांकडून परिक्षण करुन घेऊन, गरजेनुरूप त्यामध्ये लेखकांकडून योग्य त्या सुधारणा करुन घेऊनच अर्थसंवादमध्ये प्रसिद्ध केले जातील. युजीसीचे बदलते धोरण आणि गुणवत्ता वाढीच्या अनुषंगाने सदर हितावह बदल अर्थसंवादमध्ये करण्यात आलेला आहे, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# भारतातील स्थलांतराचे मापन: विशेष संदर्भ महाराष्ट्र राज्य

**प्रमोद पांडुरंगराव लोणारकर** †

**प्रस्तावना**

जन्मदर आणि मृत्यूदर या जीवशास्त्रीय घटकानंतर स्थलांतर हा लोकसंख्या निर्धारणाचा तिसरा आणि आजमितीस महत्त्वपूर्ण ठरत चाललेला घटक आहे. स्थलांतर हे साधारणतः देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन प्रकारचे आणि देशांतर्गत पातळीवर ते आंतरराज्यीय, राज्यांतर्गत (आंतरजिल्हा) आणि त्यापेक्षाही अधिक लघु पातळीवर विभागता येतात. या ठिकाणी स्थलांतरित म्हणजे अशी व्यक्ती की, जिचे गणना केलेले ठिकाण हे जन्माच्या ठिकाणापेक्षा वेगळे आहे आणि स्थलांतरित नसलेली व्यक्ती म्हणजे जिचे गणना केलेले आणि जन्माचे ठिकाण एकच आहे (जनगणना २००१). भारताच्या बाबतीत स्थलांतराचा एक वैविध्यपूर्ण इतिहास आहे. साधारणतः भारतीयांची देशाबाहेरील स्थलांतरे ही १७५ वर्षांपूर्वी ब्रिटिश काळापासूनच लाक्षणिकदृष्ट्या झाली. तेव्हा कमी कौशल्य असणारे कामगार भारताकडून ब्रिटिश वसाहतीच्या औद्योगिक आणि इतर गरजा पूर्ण करण्यासाठी पाठवली जात असत. याचे कारण म्हणजे भारतातील दारिद्र्य आणि स्वीकारलेली गुलामगिरी हे होते. असे म्हटले जाते की गरीब, भुकेल्या आणि असाध्य लोकांमध्ये स्थलांतराची प्रवृत्ती अधिक असते (किंग आणि स्निइडर १९९१), हे जसे आंतरराष्ट्रीय पातळीवर पाहावयास मिळत होते ते आता आंतरराज्यीय पातळीवर पाहावयास मिळते आणि तुलनात्मक वेतनातील तफावत हे आंतरराष्ट्रीय स्थलांतराचे कारण होत असल्याचे पाहावयास मिळते. भारताच्या बाबतीत स्थलांतराचे प्रमाण गेल्या दशकभरात वाढल्याचे दिसते. २००१च्या जनगणनेनुसार एकूण लोकसंख्येच्या ३१% लोक हे स्थलांतरित होते तर २०११च्या जनगणनेनुसार ते ३७.४% होते, यापैकी ३६.४७% एवढे देशांतर्गत तर उर्वरित ०.९७ % हे आंतरराष्ट्रीय स्थलांतरित होते.

स्थलांतराच्या कारणामागे अनेक 'प्रेरक आणि नाईलाजाने केलेली' स्थलांतरे असे घटक असतात. स्थलांतराची कारणे काहीही असली तरी, जेथून स्थलांतरे (Out Migration) झाली आणि जेथे झाली (In Migration) त्या दोन्ही ठिकाणच्या वयोरचनेवर, लिंग गुणोत्तरावर, रोजगारावर,

† सहाय्यक प्राध्यापक आणि विभाग प्रमुख (अर्थशास्त्र), सामाजिक शास्त्रे संकुल, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड, आजीव सभासद क्र. : १५६४, भ्रमणध्वनी : ७७४५०८३३७७ ई-मेल: pramodlonarkar83@gmail.com

प्रजननावर, कुटुंबाच्या आकारावर आणि इतर अनेक घटकावर त्याचा परिणाम होत असतो म्हणून स्थलांतरितांचे योग्य मोजमाप आणि त्यांच्यासाठी एक ठोस धोरण हवे असते. मात्र भारतात अशा स्थलांतरितांसाठी ठोस धोरण असल्याचे दिसून येत नाही. जी काही गरिबांसाठीची धोरणे आहेत ती देखील अनेक कारणामुळे स्थलांतरितांपर्यंत पोहोचत नाहीत, औपचारिकदृष्ट्या त्यांना नागरिकत्व असले तरी त्यांचे आर्थिक, सामाजिक आणि राजकीय अधिकार पूर्ण होत नाहीत (IIPS 2020). सध्या कोविड १९ च्या महामारीमुळे जी मोठ्या प्रमाणात स्थलांतरे झाली, त्यामुळे स्थलांतरितांचे प्रश्न पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहेत. यावरून विशिष्ट कालखंडात आंतरराज्य स्थलांतराचे मापन आणि त्यानुसार धोरणांची आखणी करणे गरजेचे आहे. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात दोन जनगणनांतर्गत झालेल्या निव्वळ आंतरराज्य स्थलांतराचे आणि विशेषतः ज्या राज्यात सर्वाधिक स्थलांतरितांचा अंतर्प्रवाह होतो त्या महाराष्ट्र राज्यात स्थलांतराच्या होणाऱ्या अंतर्प्रवाहाचे (In Migration) आणि बहिर्गमन प्रवाहाचे (Out Migration) विश्लेषण केले आहे आणि त्यावरून धोरण आखणीच्या निकडीवर प्रकाश टाकला आहे.

**निवडक संशोधन साहित्याचा आढावा**

लूसोम रमण आणि आर. बी. भगत (२००६) यांनी १९७१ ते २००१ या दरम्यान झालेल्या स्थलांतराचे स्त्री-पुरुष, ग्रामीण शहरी, आंतरजिल्हा आणि आंतरराज्य स्थलांतराचा कल विश्लेषित केला आहे, भगत (२०१०) यांनी १९७१ ते २००१ या दरम्यान झालेल्या स्थलांतराचे सामाजिक आणि आर्थिक विश्लेषण केले आहे. कैलास दास आणि शुभाशीष शहा यांनी १९९१ ते २००१ दरम्यान झालेल्या स्थलांतराच्या अंतर्गत आणि बहिर्गत प्रवाहाचे विश्लेषण 'राहण्याचे शेवटचे ठिकाण' (डी-२ टेबल) यावरून केले आहे आणि काही आर्थिक घटकांच्या संबंधाचे संख्याशास्त्रीय साधने वापरून विश्लेषण केले आहे. राज्यांतर्गत स्थलांतराबाबत झालेल्या अभ्यासात डॉ. रवी श्रीवास्तव (२०११) यांनी NSSO च्या ४९, ५५, आणि ६४ व्या फेरीतील आकडेवारीचा वापर करून स्थलांतराची कारणे, ग्रामीण शहरी, स्त्री-पुरुष, अल्पकालीन आणि दीर्घकालीन अशी स्थलांतराची विभागणी करून विश्लेषण केले आहे. प्रिया देशिंगकर आणि मात्तेव संदी (२०११) यांनी स्थलांतर आणि मानव विकास याचे विश्लेषण केले आहे. भगत यांनी शहरातील स्थलांतरितांचे नाकारलेले अधिकार याचे, तर इंदू अग्निहोत्री आणि नीता एन. (२०११) यांनी स्थलांतरातील लिंगभाव याचे विश्लेषण केले आहे.

स्थलांतराबाबत झालेल्या वरील अभ्यासात अधिकतर, २००१ च्या जनगणनेची आकडेवारी किंवा NSSO च्या आकडेवारीचा वापर झाला आहे. शिवाय या अभ्यासात सर्वाधिक स्थालांतरितांचा अंतर्प्रवाह होणाऱ्या महाराष्ट्र राज्यावर फारसा भर दिलेला नसल्याचे लक्षात येते. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न केला आहे.

**शोधनिबंधाची उद्दिष्ट्ये**

प्रस्तुत शोधनिबंधाची पुढील उद्दिष्ट्ये ठरवलेली आहेत, ज्यात जनगणनांतर्गत स्थलांतराचे मापन करणे हा प्रमुख उद्देश आहे.

१) भारतातील आणि महाराष्ट्रातील स्थलांतरितांची ग्रामीण-शहरी आणि स्त्री-पुरुष विभागणी अभ्यासणे.
२) स्थलांतरितांच्या वयरचनेचा अभ्यास करणे.
३) स्थलांतराच्या कारणांचे विश्लेषण करणे.
४) २००१ आणि २०११ या दोन जनगणनांतर्गत

महाराष्ट्रात झालेल्या निव्वळ आंतरराज्य स्थलांतराचे मापन करणे.

५) स्थलांतराबाबत धोरण पूरक शिफारशी सुचवणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत शोधनिबंध हा जनगणना २००१ आणि २०११ ने प्रसिद्ध केलेल्या तथ्यावर, म्हणजेच द्वितियक तथ्याच्या वापरावर आधारित आहे. आकडेवारीचे विश्लेषण शेकडा प्रमाणात आणि आवश्यक तेथे पूर्ण संख्येच्या स्वरूपात केले आहे. संशोधनाचा मूळ उद्देश जनगणनांतर्गत झालेले निव्वळ स्थलांतर मोजणे हा आहे. त्यासाठी जन्माचे ठिकाण आणि जनगणनेचे ठिकाण ही माहिती असलेल्या डी-१ आणि डी-१(-A) या तक्त्याचा वापर केला आहे.

जनगणनांतर्गत निव्वळ स्थलांतर मोजण्यासाठी जन्माचे ठिकाण आणि गणनेचे ठिकाण यावर आधारित प्रत्यक्ष मापन पद्धतीचा वापर केला आहे, ज्यात स्थलांतराचा अंतर्प्रवाह आणि बहिर्गत प्रवाह पुढील प्रमाणे मोजला आहे.

| **जन्म ठिकाण** | **गणनेचे ठिकाण** | | | |
|---|---|---|---|---|
| | A | B | C | D |
| A | a11 | a12 | a13 | a14 |
| B | a21 | a22 | a23 | a24 |
| C | a31 | a32 | a33 | a34 |
| D | a41 | a42 | a43 | a44 |

वरील तक्त्यात A, B, C आणि D हे प्रदेश (राज्य) आहेत, तर जन्माचे ठिकाण आणि गणनेचे ठिकाण याची माहिती उभ्या आणि आडव्या स्वरूपात नोंदवलेली आहे. कर्णघटक हे जन्माचे आणि गणनेचे ठिकाण एकच असल्याचे (स्थलांतरित नसणारे लोक) दर्शवतात तर, कर्ण वगळता ओळीतील इतर घटकांची बेरीज ही स्थलांतराचा अंतर्प्रवाह दर्शवतात तर कर्णघटक वगळता स्तंभातील इतर घटकांची बेरीज ही स्थलांतराचा बहिर्गत प्रवाह दर्शवतात. म्हणून a12+ a13+ a14 = X1 हे A प्रदेशातील स्थलांतराचा अंतर्प्रवाह दर्शवतात तर, a21+ a31+ a41 = Y1 हे A प्रदेशातील स्थलांतराचा बहिर्गत प्रवाह दर्शवतात. याचप्रमाणे X2, X3, X4 हे B, C, D प्रदेशातील स्थलांतराचा अंतर्प्रवाह दर्शवतात तर, Y2, Y3, Y4 हे B, C, D प्रदेशातील स्थलांतराचा बहिर्गत प्रवाह दर्शवतात.

यावरून निव्वळ स्थलांतर = X - Y असे मिळते, आणि जनगणनांतर्गत निव्वळ स्थलांतर पुढीलप्रमाणे काढले आहे.

$$NM^2 = (It+n - Ot+n) - (SiIt - SoOt)$$

जिथे

$NM^2$ = जनगणनांतर्गत निव्वळ स्थलांतर.

It+n - विशिष्ट प्रदेशातील t+n काळात झालेला स्थलांतराचा अंतर्प्रवाह.

Ot+n - विशिष्ट प्रदेशातून t+n काळात झालेला स्थलांतराचा बहिर्गत प्रवाह.

It - विशिष्ट प्रदेशातील t काळात झालेला स्थलांतराचा अंतर्प्रवाह.

Ot - विशिष्ट प्रदेशातून t काळात झालेला स्थलांतराचा बहिर्गत प्रवाह.

वरील सूत्रात Si & So विशिष्ट प्रदेशासाठीचे जगण्याचे प्रमाण असून त्याने (निव्वळ स्थलांतराचे अतिरिक्त अनुमान टाळण्यासाठी) पहिल्या जनगणनेतील स्थलांतराच्या अंतर्गत आणि बहिर्गत प्रवाहाला गुणले आहे.

Si & So = जगण्याचे प्रमाण हे दुसऱ्या जनगणनेत n आणि त्यापेक्षा अधिक वयोगटातील लोकसंख्येचे पूर्वीच्या जनगणनेतील एकूण लोकसंख्येशी असलेले गुणोत्तर असे घेतले आहे. हे प्रमाण स्थलांतरितांचा

अंतर्प्रवाह आणि बहिर्गत प्रवाह यासाठी समान मानले आहे.

**भारत आणि महाराष्ट्रातील स्थलांतरे**


२००१ च्या जनगणनेमध्ये १०२.८६ कोटी लोकांपैकी ३०.७२ कोटी लोकांचे जन्माचे ठिकाण हे गणनेच्या ठिकाणांपेक्षा वेगळे असल्याची नोंद आहे. तर ६१.६७ लाख लोकांचे जन्माचे ठिकाण हे देशाबाहेचे असल्याची नोंद आहे. यावरून २००१ मध्ये ३०.४६% लोकसंख्या ही स्थलांतरित लोकसंख्या असल्याचे नोंदवता येते. त्यातही एकूण स्थलांतरितांच्या १३.७६% लोकसंख्या ही आंतरराज्य स्थलांतरित होती. म्हणजेच एका राज्यातून दुसऱ्या राज्यात स्थलांतरित लोकसंख्या ४.२३ कोटी एवढी मोठी असल्याचे निदर्शनास येते. २०११ च्या जनगणनेत मात्र देशांतर्गत स्थलांतरितांचे प्रमाण १४.०१ कोटीने वाढून ४४.७३ कोटी एवढे झाले. त्यात विदेशातून आलेल्यांची ५६.५३ लाख एवढी संख्या मिळून एकूण लोकसंख्येच्या ३७.४०% लोक हे स्थलांतरित होते. २०११ मध्ये एकूण स्थलांतरितांच्या १२.४०% म्हणजेच ५.६२ कोटी लोक हे आंतरराज्य स्थलांतरित होते.

यावरून आपल्याला देशात मोठ्या प्रमाणात होणारी स्थलांतरे आणि आंतरराज्य स्थलांतराचा अंदाज येऊ शकतो. आंतरराज्य स्थलांतरामध्ये महाराष्ट्र राज्यात स्थूलमानाने सर्वात जास्त स्थलांतरितांची गणना झाल्याचे दोन्ही जनगणनेत दिसून येते (१८.३१% आणि १७.४२%). म्हणून पुढील विश्लेषणात भारतासोबतच महाराष्ट्र राज्यातील स्थलांतराचे विश्लेषण केले आहे.

**ग्रामीण-शहरी विभागणी**

२००१ च्या जनगणनेत भारतातील एकूण स्थलांतरितांच्या ६७% लोक हे शहरी भागात तर ३३% लोक हे ग्रामीण भागात स्थलांतरित झाले होते. २०११ मध्ये मात्र ग्रामीण स्थलांतरितांमध्ये वाढ होऊन ते ४४% एवढे झाले. महाराष्ट्राच्या बाबतीत मात्र पूर्वीच्या गणनेत (२००१) शहरी स्थलांतराचे प्रमाण ८४% आणि नंतरच्या गणनेत (२०११) हे प्रमाण ८५% एवढे मोठे असल्याचे निदर्शनास येते.

**आकृती क्र.१: स्थलांतराची ग्रामीण-शहरी विभागणी (भारत आणि महाराष्ट्र)**





स्रोत: जनगणना २००१ आणि २०११ मधील डी आणि डी-१ तक्ता मालिकेवर आधारित मोजमाप.

## स्त्री-पुरुष रचना

खालील आकृतीत दाखवल्याप्रमाणे २००१ च्या गणनेत भारतात एकूण स्थलांतरितांमध्ये स्त्रियांचे प्रमाण ५३.५३% होते ते वाढून २०११ मध्ये ५५.८६% झाल्याचे दिसते. महाराष्ट्रात मात्र याउलट परिस्थिती दिसून येते. जिथे २००१ मध्ये स्त्रियांचे प्रमाण ४२.९१% तर २०११ मध्ये ते ४५.९३% होते. देशपातळीवर आणि राज्यपातळीवर असणारी ही तफावत स्थलांतराच्या कारणावर अवलंबून असते. जिथे महाराष्ट्रात काम किंवा रोजगाराच्या उद्देशाने आलेल्या स्थलांतरितांचे प्रमाण मोठे आहे, सहाजिकच आंतरराज्य स्थलांतरात स्त्रियांच्यापेक्षा पुरुषांची गतिशीलता अधिक असते. पुढे टेबल क्र.१.१ मध्ये हे निदर्शनास येते.

**आकृती क्र.२: स्थलांतरितांमधील लिंगरचना (भारत आणि महाराष्ट्र)**




**स्रोत**: जनगणना २००१ आणि २०११ मधील डी आणि डी-१ तक्ता मालिकेवर आधारित मोजमाप.

## स्थलांतराचे कारण

स्थलांतराच्या कारणानुसार विभागणी केली असता भारतात आणि महाराष्ट्रात स्थलांतराची प्रमुख कारणे पुढील तक्त्यात नोंदवली आहेत. तक्त्यावरून असे दिसते की, दोन्ही जनगणनेत भारतातील स्थलांतराचे प्रमुख कारण लग्न हे आहे, तर कुटुंबासोबत झालेले स्थलांतर आणि रोजगाराच्या शोधात झालेले स्थलांतर याचे प्रमाणही मोठे आहे. महाराष्ट्रासंदर्भात मात्र काम किंवा रोजगाराच्या शोधात झालेल्या स्थलांतराचे प्रमाण दोन्ही जनगणनेत अधिक असल्याचे निदर्शनास येते. त्या पाठोपाठ लग्न आणि कुटुंबासोबत झालेली स्थलांतरे यांचे प्रमाण येते. महाराष्ट्र हे औद्योगिक आणि पर्यायाने आर्थिकदृष्ट्या प्रगत राज्य असल्याने महाराष्ट्रातील स्थलांतराच्या कारणात रोजगारासाठी झालेली स्थलांतरे ही अधिक असल्याचे निदर्शनास येते.

**स्थलांतरितांची वयरचना :**

स्थलांतराच्या कारणात रोजगारास्तव झालेल्या स्थलांतराचे प्रमाण मोठे असल्यामुळे कार्यकारी वयोगटातील स्थलांतरितांचे प्रमाण जास्त असल्याचे

**तक्ता क्र.१: स्थलांतराच्या कारणानुसार झालेली विभागणी % मध्ये (भारत आणि महाराष्ट्र)**

| स्थलांतराचे कारण | भारत २००१ | भारत २०११ | महाराष्ट्र २००१ | महाराष्ट्र २०११ |
|---|---|---|---|---|
| काम/ रोजगार | २६.३९ | २३.१३ | ३६.६७ | ३०.६७ |
| व्यवसाय | १.९८ | १.६ | १.२९ | १.४६ |
| शिक्षण | १.३३ | १.३७ | १.४७ | १.३३ |
| लग्न | २९.७२ | ३१.१३ | १९.७७ | २०.९१ |
| जन्मानंतर स्थान बदलले | ३.८७ | ४.६२ | ७.६७ | ७.७७ |
| कुटुंबासोबत स्थलांतर | २३.५८ | २४.०५ | २०.६५ | २०.९३ |
| इतर | १३.१२ | १४.०९ | १२.४७ | १६.९४ |

**स्रोत:** जनगणना २००१ आणि २०११ मधील डी-३ तक्त्यावर आधारित मोजमाप.

भारत आणि महाराष्ट्र या दोहोंसंदर्भात दिसते. त्यातही ३५ ते ५९ वयोगटातील स्थलांतरित सर्वाधिक आहेत, त्या पाठोपाठ २५ ते ३४ वयोगटातील आणि त्यानंतर १५ ते २४ वयोगटातील स्थलांतरित येतात. या १५ ते ५९ वयोगटातील स्थलांतरितांचे प्रमाण जास्त असण्याचा आणि लग्न व कुटुंबासोबत झालेले स्थलांतर या कारणांचा संबंध असल्याचे देखील इथे प्रतीत होते.

**जनगणनांतर्गत निव्वळ स्थलांतराचे मापन आणि धोरणांची आवश्यकता**

स्थलांतरितांसंदर्भात धोरण ठरवण्यापूर्वी विशिष्ट कालखंडात आंतरराज्य स्थलांतरितांचा योग्य अंदाज

**तक्ता क्र.२ : स्थलांतरितांची वयोरचना % मध्ये**

| जनगणना / वयोगट | ० - ४ | ५-९ | १०-१४ | १५-२४ | २५-३४ | ३५-५९ | ६०+ | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| भारत २००१ | ३.१७ | ४.२१ | ४.७९ | १८.४८ | २४.७ | ३६.११ | ८.३६ | ०.१७ |
| भारत २०११ | ३.३ | ४.०३ | ४.४१ | १६.९१ | २३.५२ | ३७.३७ | १०.१२ | ०.३३ |
| महाराष्ट्र २००१ | ४.०९ | ४.८१ | ५.०८ | २०.०६ | २४.९३ | ३३.२ | ७.७७ | ०.०७ |
| महाराष्ट्र २०११ | ४.१३ | ४.६८ | ४.८४ | १८.०३ | २३.६९ | ३४.७६ | ९.४४ | ०.४३ |

**स्रोत:** जनगणना २००१ आणि २०११ मधील डी आणि डी-१ तक्ता मालिकेवर आधारित मोजमाप.

असणे आणि त्याची दिशा माहीत असणे गरजेचे आहे. यासाठी वर उल्लेख केलेल्या जनगणनांतर्गत निव्वळ स्थलांतर मापनाच्या प्रत्यक्ष पद्धतीचा वापर करून महाराष्ट्र राज्यासंदर्भात स्थलांतराचा अंतर्प्रवाह आणि बहिर्गत प्रवाह मोजला आहे आणि त्यावरून निव्वळ स्थलांतर मोजले आहे.

भारतात मागील दोन्ही जनगणनेत सर्वात जास्त बहिर्गमन स्थलांतर हे उत्तर प्रदेशातून झाल्याचे दिसून येते. त्यानंतर बिहार, राजस्थान, महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या राज्यांचा क्रमांक येतो. स्थलांतराच्या


अंतर्प्रवाहाच्या बाबतीत मात्र २००१ च्या जनगणनेत महाराष्ट्र राज्य हे प्रथम क्रमांकावर होते आणि त्या पाठोपाठ दिल्ली, उत्तर प्रदेश, हरियाणा आणि गुजरात या राज्यांचा क्रमांक होता. २०११ च्या जनगणनेतही महाराष्ट्र आणि दिल्ली ही दोन राज्येच पुन्हा अग्रेसर होती. मात्र तिसरे स्थान गुजरातने घेतले तर उत्तरप्रदेश चवथ्या स्थानावर ढकलला गेला आणि हरियाणा पाचव्या स्थानावर राहिला. या ठिकाणी हे निदर्शनास येते की, उत्तर प्रदेश आणि बिहार या दोन राज्यांत स्थलांतरितांचे राज्याबाहेर होणारे बहिर्गमन आणि परराज्यातून स्वराज्यात होणारे अंतर्गमन यातील तफावत ही फार मोठी आहे. साधारणत: १.५ कोटीहून अधिक लोक या दोनच राज्यांतून इतर राज्यात स्थलांतरित झाल्याचे २०११ च्या जनगणनेत दिसून येते (परिशिष्ट तक्ता क्र.१).

स्थलांतराचा अंतर्प्रवाह आणि बहिर्गमन प्रवाह यातील तफावत ही निव्वळ स्थलांतर दर्शवते. आकृती क्र.३ मध्ये काही राज्यांच्या निव्वळ स्थलांतराची स्थिती दर्शवलेली आहे, यातील धनमूल्य स्थलांतराचा अंतर्प्रवाह दर्शवतात तर ऋणमूल्य हे स्थलांतराचा बहिर्गत प्रवाह दर्शवतात. यावरून महाराष्ट्र, दिल्ली, गुजरात आणि हरियाणा या राज्यांत मागील दोन दशकात मोठ्या प्रमाणात निव्वळ स्थलांतरित आल्याचे दिसते. तर उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, तामिळनाडू आणि केरळ या राज्यांतून मोठ्या प्रमाणात निव्वळ बहिर्गमन झाल्याचे दिसते.

**महाराष्ट्रातील जनगणनांतर्गत स्थलांतरे**

मोठ्या प्रमाणात स्थलांतरितांचा अंतर्प्रवाह असणाऱ्या महाराष्ट्र राज्यात हा प्रवाह कोणकोणत्या राज्यातून येतो आणि २००१ आणि २०११ या दोन

**आकृती क्र.३: राज्यनिहाय स्थलांतराची स्थिती**




**स्रोत:** जनगणना २००१ आणि २०११ मधील डी आणि डी-१ तक्ता मालिकेवर आधारित मोजमाप.

जनगणनांतर्गत झालेली निव्वळ स्थलांतरे किती? या प्रश्नांच्या उत्तरादाखल वर उल्लेख केलेल्या पद्धतीचा वापर करून पुढील निरीक्षणे मांडता येतात.

महाराष्ट्रात २००१ आणि २०११ च्या जनगणनेनुसार अनुक्रमे ५६,०४,३१७ आणि ६९,१३,४२४ एवढ्या लोकांचे निव्वळ स्थलांतर झाले आहे. वरील आकृतीत काही राज्यांसंदर्भात दोन्ही जनगणनेत नोंदवलेली स्थलांतरे ही धनमूल्य दाखवतात

**आकृती क्र ४ : महाराष्ट्रातील निव्वळ जनगणनांतर्गत स्थलांतरे**




**स्रोत:** जनगणना २००१ आणि २०११ मधील डी आणि डी-१ तक्ता मालिकेवर आधारित मोजमाप

ज्यात उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, मध्यप्रदेश आणि कर्नाटक या राज्यांतून महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात स्थलांतरित आल्याचे निदर्शनास येते (परिशिष्ट तक्रता क्र.२). मात्र यात मागील मोठा काळ समाविष्ट असतो, यात अलीकडच्या काळातील स्थलांतराचा अंदाज येत नाही.

मात्र जनगणनांतर्गत स्थलांतरावरून आपल्याला मागील १० वर्षात निव्वळ किती लोक स्थलांतरित झाले हे कळते. याशिवाय ही निव्वळ स्थलांतरे कोणत्या राज्यातून आली आणि कोणत्या राज्यात गेली हे देखील कळते. आकृतीत दाखवल्याप्रमाणे जनगणनांतर्गत निव्वळ स्थलांतराचा वक्र खालील बाजूस असल्याने एकूण निव्वळ स्थलांतरितांपेक्षा जनगणनांतर्गत स्थलांतरे कमी असल्याचे निदर्शनास येते. २००१ ते २०११ दरम्यान १४,३२,५३४ लोक स्थलांतरित झाले आहेत हे स्पष्ट होते. यात उत्तरप्रदेशातून आलेले स्थलांतरित ८ लाख ६२ हजार तर बिहार मधून आलेले २ लाख ८८ हजार एवढे आहेत. याउलट महाराष्ट्रातून आंध्रप्रदेश आणि गुजरातमध्ये स्थलांतराची संख्या अनुक्रमे ९१ हजार आणि ९० हजार एवढी आहे (इतर राज्यांच्यासाठी परिशिष्ट तक्ता क्र. २ पाहा).

**निष्कर्ष आणि शिफारशी**

भारतात स्थलांतरितांच्या नोंदीचा विश्वनीयस्त्रोत उपलब्ध नसल्याने जनगणनेतील आकडेवारीचा वापर करून स्थलांतराचे मापन केले जाऊ शकते. वरील विश्लेषणावरून असे निदर्शनास येते की, देशात आणि विशेषतः महाराष्ट्रात झालेली स्थलांतरे ही मोठ्या प्रमाणात शहरी भागात झाली आहेत. स्थलांतरितांची लिंगरचना ही देशपातळीवर स्त्रियांचे अधिक स्थलांतर दर्शवते; तर महाराष्ट्र राज्याच्या पातळीवर पुरुषांचे अधिक स्थलांतर दर्शवते. याचे स्पष्टीकरण हे स्थलांतराच्या कारणावरून आणि स्थलांतरितांच्या वयोरचनेतून निदर्शनास येते. महाराष्ट्राबाबत स्थलांतर हे रोजगार किंवा कामाच्या कारणास्तव अधिक सर्वाधिक प्रमाणात झाले आहे. याबाबत कार्यकारी

वयोगटातील अधिक संख्येने पुष्टी मिळते. रोजगाराच्या संधी शहरी भागातच अधिक असल्याने तेथे अधिक स्थलांतर झाल्याचे निदर्शनास येते.

देशातील एकूण स्थलांतराच्या महाराष्ट्रातील स्थलांतरितांचा अंतर्प्रवाह सर्वाधिक आहे तर महाराष्ट्रातील स्थलांतरे ही उत्तर प्रदेश आणि बिहार या राज्यांतून अधिक होताना दिसतात. मोठ्या प्रमाणात होणाऱ्या या स्थलांतरासंदर्भात विशिष्ट धोरणाची आवश्यकता असून त्यासाठी नियमितपणे विशिष्ट कालखंडात राज्यांतर्गत स्थलांतराची मोजणी करणे अगत्याचे ठरते. वर उल्लेख केलेल्या पद्धतीने जनगणनांतर्गत निव्वळ स्थलांतराचे मापन करता येऊ शकते. यापद्धतीने महाराष्ट्रात २००१ ते २०११ या दरम्यान १४,३२,५३४ एवढ्या निव्वळ स्थलांतरितांचा अंतर्प्रवाह झाला आहे.

आर. बी. भगत यांच्या मते स्थलांतरीत हे भेदभाव आणि शोषण याबाबतीत अतिशय असुरक्षित असतात. कारण ते गरिबी, निरक्षरता आणि झोपडपट्ट्यातील राहणीमानामुळे नैसर्गिक आपत्तीला देखील अधिक प्रवण असतात आणि याबाबत स्त्रियांना अधिक हालअपेष्टाला सामोरे जावे लागते.

स्थलांतरितांच्या संदर्भात पुरेषा आणि विश्वसनीय आकडेवारीचे जतन केल्याचे दिसून येत नाही. २०१६-१७ च्या आर्थिक सर्वेक्षणात आंतरराज्य स्थलांतराचे मापन रेल्वेप्रवासी आकडेवारीवरून केल्याचे दिसून येते. यावरून आकडेवारीची कमतरता प्रकर्षाने जाणवते, जी धोरण ठरविण्यासाठी महत्त्वपूर्ण असते.

स्थलांतरितांच्या बाबत त्यांच्या हक्कांचे जतन व्हावे यासाठी ज्या राज्यात स्थलांतरित येतात आणि ज्या राज्यातून ते जातात अशा दोहोंची स्थलांतरितांचे अधिकार जतन करण्याची जबाबदारी असते.

राज्यांतर्गत स्थलांतराची एकूणच स्थिती पाहता आणि मागील जनगणनांतर्गत स्थलांतराचा कल पाहता सर्वाधिक स्थलांतरितांचा अंतर्प्रवाह असणाऱ्या महाराष्ट्र, दिल्ली, गुजरात, हरियाणा इत्यादी सारख्या राज्यांत आणि स्थलांतरितांचा सर्वाधिक बहिर्गमन प्रवाह असणाऱ्या उत्तर प्रदेश, बिहार, राजस्थान, तामिळनाडू, केरळ, आंध्रप्रदेश, ओरिसा इत्यादी राज्यांसाठी केंद्रीय पातळीवर स्थलांतर धोरण ठरवणे आवश्यक आहे. स्थलांतरितांच्या वयोरचनेला पाहता त्यांच्याशी संबंधित ठोस धोरण असण्याची आवश्यकता देखील यातून दिसून येते. कारण ० ते १४ वयोगटातील स्थलांतरितांच्या शैक्षणिक गरजा आणि ६०+ अधिक वयोगटातील वृद्धांच्या वैद्यकीय गरजा याची काळजी घेणे देखील शासनाची जबाबदारी आहे. याशिवाय महाराष्ट्र राज्याने देखील स्थलांतरितांचा मोठा ओढा शहरी भागातच केंद्रित होऊन नव्या समस्या निर्माण होऊ नये यासाठी उद्योगांचे शहरीकडून ग्रामीण भागाकडे विकेंद्रित करण्याच्या योजना आखाव्यात.

मुंबईस्थित India Migration Now या गैरनफा संस्थेने शिक्षण, श्रमबाजार, बालहक्क, राजकीय सहभाग, ओळख आणि नोंद, राजकीय लाभ, घरे, आरोग्य आणि स्वच्छता इत्यादी दृष्टीकोनातून राज्या-राज्यांच्या स्थलांतर धोरणाची चिकित्सा करण्यासाठी आंतरराज्य स्थलांतर धोरण निर्देशांक तयार केला. त्यात केरळ हे राज्य ६२ एवढ्या निर्देशांक मूल्यांसह प्रथमस्थानी होते. आणि खेदाची बाब म्हणजे एकाही राज्याने त्यानंतर ५० एवढे देखील निर्देशांक मूल्य गाठले नाही. महाराष्ट्र हे ४२ एवढ्या निर्देशांक मूल्यासह दुसऱ्या क्रमांकावर होते. महाराष्ट्र हे राज्य आर्थिकदृष्ट्या प्रगत असून देखील स्थलांतरितांच्या बाबत एक ठोस, प्रभावी आणि सकारात्मक धोरण आखण्याच्या बाबतीत केरळच्या तुलनेत मागे असल्याचे निदर्शनास येते. म्हणून केरळप्रमाणेच

स्थलांतरितांच्या बाबतचे धोरण सर्वच राज्यांनी आखणे गरजेचे आहे, असे प्रकर्षाने नमूद करावेसे वाटते.

**संदर्भ सूची :**


1) Bhagat R.B., Conceptual Issues in Measurement of Internal Migration in India, Paper Presented in XXVth IUSSP International Conference held in Tours, 18-23 July 2005, France.
2) Bhagat R. B., Internal Migration in India: Are the Underprivileged Migrating More?, Asia-Pacific Population Journal, June 2010, Vol. 25, No. 1, P.31 - 49.
3) Bhagat R. B. and Kunal Keshri, "Internal Migration in India: Intensity, Flows and Impact', This Paper is presented in the workshop on Comparing Internal Migration in the Countries of Asia, Asian Demographic Research Institute, July 910, 2018, Sanghai University, Sanghai, China.
4) R. B. Bhagat (2017), Migration, Gender and Rights to the city, Economic and Political Weekly, Vol -52, Issue 32.
5) C. Horace Hamilton and F. M. Henderson, "Use of the Survival rate Method in Measuring Net Migration, downloaded from https://about.jstor.org/terms.
6) Hope T. Eldridge and Yun Kim, The Estimation Of Intercensal Migration From Birth-Residence Statistics: A Study Of Data For The United States, 1950 And 1960, Population Studies Center, University of Pennsylvania ScholarlyCommons. http://repository.upenn.edu/psc_penn_papers/3.
7) India an the Move and Churning : New evidance, Economic Survey, 2016-17.
8) Interstate Migration Policy Index - 2019 (IMPEX - 2019) India Migration Now.
9) King,A. and B. Schneider, The First Global Revolution: A Report by Council of Rome, New York, 1991, Pantheon Books.
10) Lusome Raman and Trends and Patterns of Internal Migration in India, 1971-2001, Paper presented at the Annual Conference of Indian Association for the Study of Population (IASP) during 7-9 June, 2006, Thiruvananthapuram.
11) Priya Deshingkar and Matteo Sandi, Migration and Human development In India: New Challenges and Opportunities, Workshop Compendium, National Workshop on Internal Migration and Human Development in India, December, 2011, Vol 2, p. 48-79.
12) Rabiul Ansary, Emerging patterns of migration streams in India: A state-level analysis of the 2011 census, Migration Letters, July 2018, Volume: 15, No: 3 pp. 347 - 360.
13) Ravi Srivastava, International Migration in India: An overview of its features, trends and policy challenges, Workshop Compendium, National Workshop on Internal Migration and Human Development in India, 6-7, December 2011, Vol 2, p. 1-47.
14) The COVID-19, Migration and Livelihood in India: Challenges and Strategies, IIPS 2020, https://iipsindia.ac.in/sites/default/files/iips_covid19_mlli_PB.pdf
15) www.censusindia.gov.in


◆

# १४ व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणाचे अर्धशतक आणि सद्यस्थिती

**एम. एन. शिंदे** †

**प्रस्तावना**

भारतात पाश्चिमात्य बँकिग पद्धतीचा उगम १८ व्या शतकात झाला. सन १७७० मध्ये कलकत्ता येथे अलेक्झांडर कंपनीच्या पुढाकरातून 'बँक ऑफ हिंदुस्थान'ची स्थापना करण्यात आली. त्यानंतर बँक ऑफ कलकत्ता, बँक ऑफ बेंगाल (१८०६), बँक ऑफ बॉम्बे (१८४०) व बँक ऑफ मद्रास (१८४३) या तीन प्रेसिडन्सी बँका स्थापना झाल्या व त्यानंतर भारतात इतर बँका निघाल्या. स्वातंत्र्यपूर्व काळात सन १९३५ मध्ये झालेली रिझर्व्ह बँकऑफ इंडियाची स्थापना व राष्ट्रीयकरण, सन १९४९ चा बँकिंग रेग्युलेशन ॲक्ट या दोन घटनांमुळे भारतातील बँक व्यवसायात मोठ्या प्रमाणात कार्यात्मक व रचनात्मक बदल घडून आले. सन १९५५ मध्ये इंपीरियल बँकेचे रूपांतर स्टेट बँक इंडियात करण्यात आले. सन १९६० च्या सुमारास ८ विभागीय बँकाचे राष्ट्रीयकरण करून 'स्टेट बँक ऑफ इंडिया' समूह तयार केला. भारतीय बँकिग क्षेत्रात हा नवीन प्रयोग करण्यात आला. या बँकांनी निमशहरी व ग्रामीण भागात नव्या शाखा उघडून सर्वसामान्य लोकांना आधुनिक बँकिंग सेवा उपलब्ध करून दिल्या. सन १९६२ मध्ये बँक ठेवीदारांना संरक्षण देण्यासाठी डिपॉझिट इन्शुरन्स कॉर्पोरेशनची स्थापना करण्यात आली. या सर्व घटनामुळे राष्ट्रीयकरणपूर्व काळात भारतात आधुनिक बँक व्यवसाय विकसित होण्यास मदत झाली.

**बँक राष्ट्रीयकरण पूर्वस्थिती**

सन १९६९ च्या राष्ट्रीयकरणापूर्वी भारतातील बँकांवर मोठे उद्योजक व व्यावसायिकांचे वर्चस्व होते. कारण या बँका त्यांनीच स्वतःच्या फायद्यासाठी स्थापन केल्या होत्या. बँकांच्या संचालक मंडळामध्ये बडे उद्योग व व्यावसायिकांचे प्रतिनिधी होते. त्यांचे हितसंबंध जपण्यासाठी बँकांचा कारभार चालत असे. या बँका प्रामुख्याने खाजगी क्षेत्रात होत्या, महत्तम नफा हे त्यांचे उद्दिष्ट्य होते. बँकांचे केंद्रीकरण मोठ्या शहरात झाले होते. बँका निमशहरी व ग्रामीण भागात शाखा विस्तारात रस दाखवत नव्हत्या. मोठ्या उद्योगांच्या नियंत्रणामुळे बँकिंग व्यवसायावर थोड्या लोकांची मक्तेदारी निर्माण होऊन आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण त्यांच्या हाती झाले होते. सरकारच्या राष्ट्रीय नियोजनातील प्राधान्यक्रमांना डावलले जात होते.

† माजी अध्यक्ष व विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. ६६८, भ्रमणध्वनी : ९८९०११४८९६, ई-मेल : mnshinde.isl@gmail.com

बँकांच्या कार्यप्रणालीत सामाजिक उद्दिष्टांचा अभाव होता. शेती क्षेत्रे, लघुउद्योग वगैरे प्राधान्यक्षेत्रांना कर्जपुरवठा केला जात नव्हता. तसेच सट्टेबाजी व काळा बाजारवाले यासारख्या समाज विघातक प्रवृत्तींना मोठ्या प्रमाणात कर्जपुरवठा केला जात होता. सन १९६९ पूर्वी नेमण्यात आलेल्या 'के.एन. रॉय कमिटी', 'महालनोबीस कमिटी व विवियन बोस' यांनी बँकिंग कायद्यातील त्रुटी बँका व बडे उद्योगपती यामधील संबंधांवर प्रकाश टाकला आणि बँकिंग कार्यप्रणालीत सुधारणा करण्याची आवश्यकता स्पष्ट केली.

भारत सरकारने देशातील बँकिंग, क्षेत्रातील दोष दूर करणे व बँकांनी देशाच्या आर्थिक विकासात 'उत्प्रेरक'(Catalyst) म्हणून महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडावी म्हणून, त्यांचे राष्ट्रीयकरण केले पाहिजे, यावर जोर दिला. या पाठीमागे सरकारची भूमिका अशी होती की, बँका नागरिकांच्या जीवनाशी संबंधित असतात म्हणून त्यांनी सामाजिक उद्दिष्टांची पूर्तता करणे, रोजगार वाढ, शेती, लघुउद्योग निर्यात वगैरे क्षेत्रांचा विकास, नवउद्योजकतेला चालना, मागास भागांचा विकास राष्ट्रीय प्राधान्यक्रम असणारी क्षेत्रे वगैरेंच्या विकासाला आवश्यक ती कार्ये केली पाहिजेत, त्यासाठी बँकांचे राष्ट्रीयकरण केले पाहिजे, अशी सरकारची धारणा झाली. म्हणून भारत सरकारने १९ जुलै, १९६९ रोजी १४ बड्या (५० को.रु.पेक्षा जास्त भांडवल असणाऱ्या) व्यापारी बँकांचे राष्ट्रीयकरण केले. त्यानंतर १५ एप्रिल १९८० रोजी पुन्हा ६ बड्या बँकाचे (२०० को.रु.पेक्षा जास्त भांडवल असणाऱ्या) राष्ट्रीयकरण केले. या बँकावर भारत सरकारची मालकी प्रस्थापित केली. बँकाच्या राष्ट्रीयकरणाची प्रमुख उद्दिष्ट्ये पुढील होती.

१. देशातील बँकिंग क्षेत्राची पुनर्रचना करणे.
२. ग्रामीण व बँकिंग सोयीबाबत वंचित भागात बँकांचा विस्तार करणे.
३. शेती, लघुउद्योग, निर्यात, अन्नप्रक्रिया उद्योग, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक इत्यादींना आर्थिक मदत करणे.
४. देशाच्या आर्थिक विकासाला चालना देणे, वगैरे.

राष्ट्रीयकरणानंतर बँकाच्या कामगिरीवर काही मर्यादा पडल्या असल्या तरी देखील राष्ट्रीयकरणानंतरची व्यापारी बँकाची कामगिरी चांगली राहिली. भारतातील बँक राष्ट्रीयकरणामुळे देशाचा फायदा झाला की तोटा याबाबत नवउदारमतवादी अर्थतज्ज्ञांमध्ये (Neo Liberals) एकवाक्यता नाही. 'शंकर आचार्य' सन २००२ च्या 'टाइम्स ऑफ इंडिया'मध्ये म्हणतात, बँक राष्ट्रीयकरणानंतर तीन दशकापेक्षा अधिक काळ उलटून गेल्यानंतर राष्ट्रीयकरणाच्या फायद्याचा विचार करता असे म्हणता येते की, 'बँक राष्ट्रीयकरण ही आर्थिक धोरणातील मोठी चूक (Major Error) होती' तर दुसरे नवउदारमतवादी अर्थतज्ज्ञ 'सी रंगराजन' यांनी सन १९९४ च्या बँक अर्थतज्ज्ञांच्या परिषदेला संबोधित करताना म्हटले की, ''भारतातील बँकिंग पद्धती दीर्घकालीन बदलांच्या उंबरठ्यापासून दूर आहे. सन १९६९ चे बँक राष्ट्रीयकरण हे बँकिंग क्षेत्रातील पहिली क्रांती होय, ती दुसऱ्या बँकिंग क्रांतीची सुरुवात आहे, जी बँका आर्थिकदृष्ट्या सक्षम व यशस्वी करणारी असेल.'' ते 'शंकर आचार्यांच्या' मताशी सहमत नाहीत. त्यांचा बँक राष्ट्रीयकरणाबाबतचा दृष्टिकोन अधिक समतोल वाटतो. 'जयंती बोस' या नवउदारमतवादी अर्थतज्ज्ञ म्हणतात, ''बँक राष्ट्रीयकरणामुळे तत्कालीन परिस्थितीत बँकिंग क्षेत्रावर अत्यंत निकडीचे असणारे सरकारचे व्यापक नियंत्रण व निर्देशन हे उद्दिष्ट पूर्ण झाले.''

बँक राष्ट्रीयकरणाबाबत विविध अर्थतज्ज्ञांमध्ये मतभेद असले तरी देखील राष्ट्रीयकरणामुळे भारतात

व्यापारी बँकांच्या झालेल्या प्रगतीकडे दुर्लक्ष करता येत नाही. बँक राष्ट्रीयकरणानंतर भारतातील व्यापारी बँकांचा विविधांगी विकास झाला. विविध प्रकारामध्ये बँका अस्तित्वात आल्या. सार्वजनिक क्षेत्रातील बँका, सार्वजनिक क्षेत्रातील बँकामध्ये राष्ट्रीयकृत बँका स्टेट बँक समूह, खाजगी क्षेत्रातील बँका, प्रादेशिक ग्रामीण बँका, परदेशी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, नागरी सहकारी बँका अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांत कर्जपुरवठ्याचे काम करीत आहेत. या सर्व बँका 'अधिसूचित बँका' म्हणून कार्यरत आहेत.

राष्ट्रीयकरणानंतर बँकांनी आपल्या कार्यात विविधता आणली आहे. व्यापारी बँका लोकांना विविध प्रकारच्या सेवा पुरवत आहेत. त्यामध्ये मर्चंट बँकिंग, म्युच्युअल फंड, किरकोळ बँकिंग, एटीएम सेवा, सदासर्वकाळ बँकिंग, आंतरजाल बँकिंग, फॅक्टरींग सेवा वगैरेंचा समावेश होतो.

सन १९६९ च्या बँक राष्ट्रीयकरणामुळे शहरी व ग्रामीण भागात कर्जपुरवठा शाखाविस्तार झाला, त्यांच्याकडील ठेवी, एकूण कर्जपुरवठा, शेती, लघुउद्योग, किरकोळ व्यापारी वगैरे घटकांना कर्जे मिळू लागली. बँक राष्ट्रीयकरणापूर्वी वित्त पुरवठ्यापासून जे घटक वंचित होते त्यांना आता पुरेसी कर्जे मिळत आहेत. त्यामुळे बँक राष्ट्रीयकरण म्हणजे मोठी घोडचूक होय, हे शंकर आचार्यांचे मत योग्य वाटत नाही. खालील तक्ता क्र. १ सन १९६९ नंतर भारतातील व्यापारी बँकांची प्रगती दर्शविते.

तक्ता क्र. १ वरून असे दिसून येते की, सन १९६९ ते २०१८-१९ या कालावधीत भारतातील व्यापारी बँकांच्या शाखांची संख्या ८,२६० वरून १,४५,५८२ इतकी झाली. ग्रामीण भागातील शाखांची संख्या १,८६० वरून ५१,४०० झाली. एकूण ठेवी ४,३३८ को.रु. वरून १,२५,७३,७७२ को.रु. अशा वाढल्या. व्यापारी बँकाचा एकूण कर्जपुरवठा ३,०२२ को.रु. वरून ९७,७१,७२२ को.रु. झाला. प्राधान्य क्षेत्र कर्जपुरवठा ४४० को.रु. वरून २,०७,६०० को.रु. वाढला, शेती कर्जपुरवठा १६० को.रु. वरून १५,८०,५६८ को.रु. इतका झाला तर प्रति बँक शाखा लोकसंख्या ६३,८०० वरून १२,६७० इतकी

**तक्ता क्र. १**

**सन १९६९ नंतर भारतातील व्यापारी बँकांची प्रगती**

| अ.क्र. | घटक | १९६९ | २०१८-१९ | वाढ पटीत |
|---|---|---|---|---|
| १) | व्यापारी बँकाच्या एकूण शाखा | ८२६० | १,४५,५८२ | १७ |
| २) | ग्रामीण शाखा | १८६० | ५१,४०० | २८ |
| ३) | एकूण ठेवी (को.रु.) | ४३३८ | १,२५,७३,७७२ | २८९८ |
| ४) | एकूण कर्जपुरवठा (को.रु.) | ३०२२ | ९७,७१,७२२ | २२५२ |
| ५) | प्राधान्य क्षेत्र कर्जपुरवठा(को.रु.) | ४४० | २,०७,६०० | ४७२ |
| ६) | शेतीकर्ज (को. रु.) | १६० | १५,८०,५६८ | ९८७८ |
| ७) | लोकसंख्या प्रतिबँक शाखा | ६३८०० | १२,६७० | ५ पटीने कमी |

स्त्रोत : १. रिझर्व्ह बँक वार्षिक अहवाल २०१८-१९ बँकिंग अॅन्ड फायनान्स.
२. रिझर्व्ह बँक, हॅन्ड बुक ऑफ स्टॅटिस्टिक्स् ऑन इंडियन इकॉनॉमी २०१८-१९.

कमी झाली.

याचा अर्थ असा होतो की, राष्ट्रीयकरणानंतर एकूण बँक शाखात १७ पट, ग्रामीण बँक शाखात २८ पट, एकूण ठेवीत २,८९८ पट, एकूण कर्जपुरवठ्यात २२५२ पट, प्राधान्य क्षेत्र कर्जपुरवठा ४७२ पट व शेती कर्ज पुरवठ्यात ९,८७८ पट वाढ झाली. तर प्रति बँक लोकसंख्या कमी झाल्यामुळे बँकांना कार्यक्षम सेवा पुरविणे शक्य झाले.

प्राधान्य क्षेत्र कर्जपुरवठा लघुउद्योग वंचित घटकांना कर्जपुरवठा हे बँक राष्ट्रीयकरणाचे प्रमुख उद्दिष्ट्ये होते, ते साध्य झाल्याचे दिसून येते. पुढील तक्ता क्र.२, बँक राष्ट्रीयकरणानंतर प्राधान्य क्षेत्र व लघुउद्योग क्षेत्राला झालेल्या कर्जपुरवठ्याचे प्रमाण दर्शवितो.

तक्ता क्र. २ वरून दिसून येते की, सन १९६९ ते मार्च २०१८ पर्यंत व्यापारी बँकांच्या प्राधान्य क्षेत्र

**तक्ता क्र. २**

**राष्ट्रीयकरणानंतर प्राधान्य क्षेत्र कर्जपुरवठ्याचे प्रमाण**

| अ.क्र. | क्षेत्रे | १९६९ | मार्च २०१८ |
|---|---|---|---|
| १. | प्राधान्य क्षेत्रे | १४% | ३९.९०% |
| २. | शेती क्षेत्रे | ५.२% | १८.००% |
| ३. | लघु उद्योग | ७.९% | १३.३३% |
| ४. | इतर प्राधान्य क्षेत्रे | ०.९% | ८.५७% |

स्त्रोतः रिझर्व्ह बँक अहवाल, हॅन्डबुक ऑफ स्टॅटिटिक्स ऑन इंडियन इकॉनॉमी २०१८-१९

कर्जपुरवठ्यात ५.२ टक्क्यांवरून १८%, लघुउद्योग ७.९ टक्क्यांवरून १३.३३% तर इतर क्षेत्र कर्जपुरवठ्यात ०.९ टक्क्यांवरून ८.५७% वाढ झाली. म्हणजे प्राधान्य क्षेत्र कर्जपुरवठ्यात ४०% वाढ करणे हे बँक राष्ट्रीयकरणाचे प्रमुख उद्दिष्ट्य साध्य झाले आहे.

सन १९६९ च्या बँक राष्ट्रीयकरणाचे जसे काही फायदे झाले आहेत, तसेच काही तोटे देखील झाल्याचे दिसून येते. बँक राष्ट्रीयकरणामुळे बँकिंग क्षेत्रात सरकार, राजकारणी लोकांचा हस्तक्षेप सुरू झाला, तसेच बँकांच्या सरकारीकरणामुळे बँकिंग क्षेत्रात नोकरशाहीचे दोष निर्माण झाले. अलीकडच्या काळात या सर्वांचा अतिरेक होऊन बँकिंग क्षेत्र धोक्यात आले. परिणामी अनेक बँका तोट्यात गेल्या. बँकाचे तोटे कमी करून त्यांची कामगिरी सुधारण्यासाठी सरकारने विविध समित्या नेमल्या. त्यामध्ये प्रो. चक्रवर्ती समिती(१९८२) व खुस्त्रो समिती(१९८६) व नरसिंहम् समिती (१९९१ व १९९८) या प्रमुख होत्या. या समित्यांनी भारतीय बँकिंग क्षेत्रातील खालावलेल्या कामगिरीची पुढील कारणे सांगितली आहेत.

राष्ट्रीयकरणामुळे सरकार निर्देशित पतपुरवठा, निर्देशित गुंतवणूक प्राधान्य क्षेत्र कर्जपुरवठा, सवलतीचे व्याजदर, प्रशासकीय खर्चातील वाढ, बँकिंग क्षेत्रात स्पर्धेचा अभाव, सामाजिक दृष्टिकोन कर्जे इत्यादी. बँकाची कामगिरी सुधारावी म्हणून चक्रवर्ती समिती व खुस्त्रो समितीने सुचवलेल्या उपायाकडे सरकारने दुर्लक्ष केले. पुढे १९९१ च्या आर्थिक संकटानंतर सरकारने हाती घेतलेल्या आर्थिक सुधारणामध्ये बँकिंग क्षेत्रातील सुधारणांचा समावेश केला. नरसिंहम् समितीच्या बहुतेक सर्व शिफारशी स्वीकारल्या. त्यामध्ये दूरदर्शी निकष (Prudential Norms)

सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे पुनर्वसन करणे, सी. आर. आर. व एस. एल. आर. कमी करणे, भांडवल बाजारात बँकांनी प्रवेश करावा व भांडवल उभारावे, बँकांचे खाजगीकरण व मोठ्या बँकांची स्थापना करणे, प्रशासित व्याजदर ऐवजी अनियंत्रित व्याजदराचा अंगिकार करणे, भांडवल पर्याप्तता गुणोत्तर टप्प्याटप्प्याने ४% पासून ९% पर्यंत वाढविणे, सरकार व राजकीय हस्तक्षेपापासून बँकिंग क्षेत्राची मुक्तता करणे, बँकांचे कार्यक्षम नियंत्रण व देखरेख, प्राधान्य क्षेत्र कर्जपुरवठा ४० टक्क्यांवरून १० टक्क्यांपर्यंत कमी करणे. मत्ता पुनर्रचना निधीची (ARF) स्थापना, कर्जवसुली लवादाची नेमणूक करणे वगैरेंचा समावेश होतो. त्यानुसार सरकारने अनुउत्पादक मत्ता (NPA) तरतुदी, जोखीमभारीत कर्जासाठी ९% भांडवल पर्याप्तता निकष, सन २००२ मध्ये सरफेशी कायदा (Securitazation and reconstruction of financial assets and enforcement of security interest Act-2002- SARFAESI- Act-2002) केला, सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे पुनर्भांडवलीकरण करणे, व्याजदर ठरविण्याचे स्वातंत्र्य दिले, 'बोर्ड ऑफ फायनान्शियल सुपरव्हिजन'ची स्थापना केली. कडक व कार्यक्षम बँक नियंत्रणासाठी श्री. एस पद्मनाथन समितीच्या शिफारशी स्वीकारल्या. सन १९९३ मध्ये कर्जेवसूल कायदा केला. बँकिंग लोकपालाची नेमणूक केली. परंतु सरकारने प्राधान्य क्षेत्रे कर्जपुरवठा ४०% वरून १०% करावा, ही नरसिंहम् समितीची शिफारस स्वीकारली नाही. नरसिंहम् समिती प्राधान्य क्षेत्र कर्जपुरवठ्याच्या विरुद्ध होती. परंतु चक्रवर्ती समितीने असे म्हटले होते की, बँकांनी फक्त नफ्यावरच लक्ष केंद्रित करू नये तर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांनी रोजगारवाढ, दारिद्र्य निर्मूलन या सारख्या सामाजिक गरजांच्या पूर्ततेसाठी देखील वित्तपुरवठा करावा. तसेच चक्रवर्ती व खुस्त्रो समितीने सामाजिक दृष्टिकोनातून सवलतीच्या व्याजदराचा पुरस्कार केला. समाजातील दुर्बल घटकांना सवलतीच्या व्याजदराने कर्जे मिळाली पाहिजेत, असे त्याचे मत होते. प्राधान्य क्षेत्रांचा कर्जपुरवठा व सवलतीचे व्याजदर कमी करणे ही नरसिंहम् समितीची शिफारस सरकारच्या आर्थिक धोरणाच्या विरोधी होती.

नरसिंहम् समितीच्या सार्वजनिक बँकांचे मोठ्या बँकेत विलीनीकरण करावे या शिफारशीनुसार सरकारने २०१७ मध्ये स्टेट बँकेत तिच्या ५ सहयोगी बँका व महिला बँक अशा एकूण सहा बँकांचे विलीनीकरण केले. त्यानंतर पंजाब नॅशनल बँकेत ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स व युनायटेड बँक, सन २०१८ मध्ये बँक ऑफ बडोदामध्ये विजया बँक व देना बँक आणि ३० ऑगस्ट २०१९ रोजी १० सरकारी बँकाचे ४ मोठ्या बँकांत एकत्रीकरण केले. त्यामुळे २०१७ मध्ये सार्वजनिक क्षेत्रात असणाऱ्या एकूण २७ बँकांची संख्या १२ वर आली. तसेच या बँकांना पुनर्भांडवलीकरणासाठी ५५,२५० को.रु. देण्याचे घोषित केले.

सरकारने बँक सबलीकरणासाठी विविध उपाययोजना अमलात आणल्या तरी देखील बँका आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या नाहीत. रिझर्व्ह बँकेचा अहवाल दर्शवितो की, मार्च २०१८ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील १८ बँकांपैकी ६ बँकाच नफ्यात होत्या, म्हणजे १२ बँका तोट्यात होत्या, तर मार्च २०१९ मध्ये १८ पैकी १४ बँका नफ्यात होत्या व ४ बँका तोट्यात होत्या. मार्च २०१९ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे थकीत कर्जाचे प्रमाण ७.९ लाख को.रु. होते हे प्रमाण ९.१% होते, तर त्या अगोदरच्या वर्षात ते ८.६५ लाख को.रु. म्हणजे ११.२% होते. पुढील तक्ता क्र. ३ भारतातील सर्व व्यापारी बँकांची अनुत्पादक कर्जे दर्शवितो.

**तक्ता क्र. ३**

**बँकांची विविध क्षेत्रातील अनुत्पादक कर्जे** **(को.रु.)**

| वर्ष | प्राधान्य क्षेत्र | बिगर प्राधान्य क्षेत्रे | शेती क्षेत्र | सूक्ष्म व लघु उद्योग | इतर प्राधान्य क्षेत्रे |
|---|---|---|---|---|---|
| २०१७ | १७०३०० (२३.४%) | ५५८७०० (७६.६%) | ६०२०० (८.३) | ८२८००० (११.४%) | २७३०० (३.७%) |
| २०१८ | २०७२०० (२१.६%) | ७५६०० (७८.४%) | ८३२०० (८.६) | ९१० (९.५%) | ३३४०० (३.५%) |

स्त्रोतः रिझर्व्ह बँक अहवाल २०१९., टीप : कंसातील आकडे टक्केवारी दर्शवितात.

तक्ता क्र.३ वरून दिसून येते की, मार्च २०१८ पर्यंत देशातील सर्व व्यापारी बँकांच्या प्राधान्य क्षेत्रातील अनुत्पादक कर्जाचे प्रमाण २१.६% होते, तर बिगर प्राधान्य क्षेत्रातील अनुत्पादक कर्जाचे प्रमाण ७८.४% होते. तर याचकाळात शेती क्षेत्रातील अनुत्पादक कर्जाचे प्रमाण ८.६% होते. यावरून असे दिसून येते की, औद्योगिक क्षेत्र, सेवा क्षेत्रातील अनुत्पादक कर्जे प्राधान्य क्षेत्रापेक्षा जास्त होती. तरी देखील प्राधान्य क्षेत्रे कर्जाबाबतची नरसिंहम् समितीने कर्जे ४०% वरून १०% पर्यंत कमी करावीत ही शिफारस योग्य वाटत नाही, ती सरकारने स्वीकारली नाही ते योग्यच केले, कारण बँकांनी फक्त नफाच मिळवू नये तर काही सामाजिक उपक्रमांसाठी देखील खर्च केला पाहिजे. तसेच शेती क्षेत्रातील अनुत्पादक कर्जाचे प्रमाण इतर क्षेत्रापेक्षा कमी असून देखील बँका शेतकऱ्यांना कर्जे देण्यास फारशा उत्सुक नसतात म्हणून प्राधान्य क्षेत्रे निर्देशित कर्जाचा सरकारचा दृष्टिकोन योग्य वाटतो.

बँकिंग सुधारणासाठी केंद्र सरकारने सन १९६९ पासून २०१३ पर्यंत आर.जी. सरैय्या ते ऊर्जित पटेल समिती अशा एकूण १४ समित्या नेमल्या, तरी देखील बँक व्यवसायातील घोटाळे कमी झाले नाहीत. या बँक घोटाळ्याची सुरुवात सन १९९२ च्या हर्षद मेहता घोटाळ्यापासून झाली. त्यानंतर २००१ मध्ये केतन पारेख बँक घोटाळा या दोघांनी बँक अधिकाऱ्यांशी संगनमत करून बँक पैशाच्या साहाय्याने शेअर बाजारात कृत्रिम तेजी निर्माण केली. जास्त नफ्याच्या अपेक्षेने बँकांनी त्यांना मोठ्या रकमेची कर्जे दिली. त्यामुळे शेअर बाजारातील गुंतवणूकदारांचे व बँकांचे प्रचंड नुकसान झाले. अलीकडच्या काळातील विजय मल्ल्या, नीरव मोदी, मेहुल चोक्सी, पंजाब व महाराष्ट्र सहकारी बँक (PMC-Bank) इत्यादींनी हजारो कोटी रुपयांचे घोटाळे करून बँकांना फसविले, परिणामी अनेक बँका तोट्यात गेल्या. या घोटाळ्यामध्ये उद्योगपती, व्यावसायिक बँकांचे चेअरमन, संचालक, बँक अधिकारी, कर्मचारी, ऑडिटर वगैरे अशी साखळी दिसून येते. सन २०१९ च्या रिझर्व्ह बँकेच्या अहवालानुसार, सन २०१३-१४ ते २०१७-१८ या वर्षात देशातील बँकिंग क्षेत्रातील झालेले वेगवेगळ्या प्रकारचे घोटाळे पुढील तक्ता क्र. ४ दर्शवितो.

**तक्ता क्र. ४**

**भारतीय बँकिंग क्षेत्रातील विविध प्रकारचे घोटाळे**

| वर्ष | बँक घोटाळ्यांची एकूण संख्या | बँक घोटाळ्यातील एकूण रक्कम (को.रु) |
|---|---|---|
| २०१३-१४ | ४३०८ | १०१७०.८० |
| २०१४-१५ | ४६३९ | १९४५५.१० |
| २०१५-१६ | ४६९३ | १८६९८.८० |
| २०१६-१७ | ५०७६ | २३९३३.९० |
| २०१७-१८ | ५९१७ | ४११६७.७० |
| २०१८-१९ | ६८०१ | ७१५४३.०० |
| वाढ | ५७.८७ % | ६०३.४७ % |

स्त्रोतः रिझर्व्ह बँक अहवाल २०१९.

सन २०१३-१४ ते २०१८-१९ या ६ वर्षाच्या काळात देशातील बँकिंग क्षेत्रातील घोटाळ्याची संख्या ४३०८ वरून ६८०१ इतकी वाढली, ही वाढ ५७.८७% आहे तर बँक घोटाळ्यातील एकूण वाढ ६०३.४७ टक्के इतकी आहे. हे घोटाळे कर्जे, ठेवी, नेट बँकिंग सायबर, परकीय चलन वगैरे प्रकारातील आहेत. सन २०१८-१९ या वर्षात देशातील विविध बँक घोटाळ्यात ७१,५४३ को.रु. फस्त झाले आहेत.

भारतातील बँका तोट्यात जाण्यास बड्या कार्पोरेट क्षेत्रातील बड्या कर्ज बुडविणाऱ्या खातेदारांची एकूण संख्या मार्च २०१९ मध्ये ९८० इतकी होती. हे सर्व खातेदार १०० को.रु. व ५०० को.रु. पेक्षा जास्त रकमेची कर्जे असणारे होते, त्यांनी २.७५ लाख कोटी रु. कर्जे बुडवली, बँकांनी ही कर्जे राईट ऑफ केली आहेत. पुढील तक्ता क्र. ५ विविध बँकांनी वसूल न होणारी म्हणून सोडून दिलेली कर्जे दर्शवितो.

तक्ता क्र.५ असे दर्शवितो की, एकूण बुडीत कर्जखात्यांची संख्या ९८० होती त्यापैकी १०० को.रु. पेक्षा जास्त रकमेची ६८७ खाती होती, तर ५०० को.रु.पेक्षा जास्त रकमेची ६५ होती, तर उर्वरित २२८ खाती इतर रकमेची होती. अशा प्रकारे एकूण २.७५ लक्ष को.रु. बुडीत रकमेपैकी स्टेट बँक ऑफ इंडियाचा वाटा सर्वात जास्त ७६,६००रु. तर पंजाब नॅशनल बँकेचा २७,०२४ कोटी रु. बुडीत कर्जाबाबत दुसरा क्रमांक लागतो. ही सर्व कर्जे बँकांनी सोडून दिली. बड्या कार्पोरेट कंपन्यांनी या कर्जाची लूट केली आहे. शेतकरी किंवा सर्वसामान्य लोकांनी नव्हे. सार्वजनिक क्षेत्रातील बँकाचा अशा प्रकारे सरकार, पुढारी, बँक अधिकारी, पदाधिकारी बडे उद्योजक वगैरेंच्या हस्तक्षेपामुळे बँका तोट्यात जात आहेत. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचा तोटा भरून काढण्यासाठी जनतेकडून कररूपाने गोळा केलेला पैसा या बँकांच्या पुनर्भांडवलीकरणासाठी वापरला जात आहे.

आजपर्यंत सरकारने बँकांच्या पुनर्भांडवलीकरणासाठी एकूण ३.५ लाख को.रु. पेक्षा अधिक निधी दिला तर २०१९ या वर्षात पुन्हा ५५,२५० को.रु. देण्याचे घोषित केले आहे. परिणामी सरकारला विकास कामासाठी पैसा कमी पडतो. बँकाचे पुनर्भांडवलीकरण किंवा बुडीत कर्जाची पुनर्रचना करून बँकांना तत्कालीन संकटातून बाहेर काढता येईल.

**तक्ता क्र . ५**

**विविध बँकांनी वसूल न होणारी सोडून दिलेल्या कर्जांची संख्या व एकूण रक्कम**

| अ.क्र. | बँक | १०० को.रु. पेक्षा जास्त कर्जे संख्या | ५०० को.रु. पेक्षा जास्त कर्जे संख्या | कर्जाची रक्कम को.रु. |
|---|---|---|---|---|
| १ | स्टेट बँक ऑफ इंडिया | २२० | ३३ | ७६६०० |
| २ | पंजाब नॅशनल बँक | ९४ | १२ | २७०२४ |
| ३ | कॅनरा बँक | ६३ | ०७ | - |
| ४ | बँक ऑफ इंडिया | ५६ | ०३ | - |
| ५ | कार्पोरेशन बँक | ५० | ०२ | - |
| ६ | बँक ऑफ बडोदा | ४६ | ०० | - |
| ७ | सेंट्रल बँक ऑफ इंडिया | ४५ | ०४ | - |
| ८ | ॲक्सिस बँक | ४३ | ०० | - |
| ९ | आय.सी.आय.सी. बँक | ३७ | ०० | - |
| १० | इंडियन ओव्हरसीज बँक | ३३ | ०४ | - |
| ११ | एकूण खाती | ६८७ | ६५ | २.७५ लक्ष को.रु. |

स्त्रोत : १) http://mi.rozbuzz.com/Article, २) RBI to dwn news., ३) दैनिक पुढारी १२ ऑक्टो. २०१९.

परंतु त्यांची उत्पादकता वाढल्याशिवाय त्यांचा दीर्घकालीन विकास होणार नाही.

भांडवलाची अनुपलब्धता हे बँकांच्या आजारपणाचे एकमेव कारण नाही, तर सरकारचे नियंत्रण व हस्तक्षेप हे बँकांच्या आजारपणाचे मूळ कारण आहे. आय.डी.बी.आय. या सरकारी बँकेच्या बुडीत कर्जाचे प्रमाण २५% पेक्षा जास्त असून देखील तिला तारण्यासाठी भारतीय आयुर्विमा महामंडळास सरकारने आय.डी.बी.आय. बँकेचे ५१% भागभांडवल ताब्यात घ्यावयास भाग पाडले. त्यामुळे भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या स्वातंत्र्य व स्वायत्ततेवर गदा आली. म्हणजे येथे पुन्हा सर्वसामान्य विमाधारकांचा पैसा बँकेचे आजारपण दुरुस्त करण्यासाठी वापरला गेला. या प्रकारच्या कुबड्यांनी बँका आर्थिकदृष्ट्या सक्षम होणार नाहीत, तर त्यांची कार्यक्षमता वाढली पाहिजे. बँकांना आर्थिक विकासाचे इंजिन मानले जाते. त्यामुळे आर्थिक तेजी-मंदीच्या काळात बँकांचे मौद्रिक धोरण तारक ठरते. सध्या जागतिक अर्थव्यवस्था मंदीच्या फेऱ्यातून जात आहे, त्याला भारतीय अर्थव्यवस्था देखील अपवाद नाही. भारतीय अर्थव्यवस्थेच्या अनेक आर्थिक घटकांमध्ये घसरण सुरू आहे. शेतीक्षेत्र विकासदर ५.२% वरून २%, उद्योगक्षेत्र १२.१% वरून ०.६%, तर सेवाक्षेत्राचा विकास दर ५२.४% वरून ४८.७% असा कमी झाला आहे. तसेच बेरोजगारी दर या दशकातील सर्वोच्च ६.१% असा आहे. ही घसरण अर्थव्यवस्थेतील एकूण मागणीत घट झाल्यामुळे निर्माण झाली आहे.

सरकारची वित्तीय तूट वाढत आहे म्हणून व आर्थिक मंदीचे नियंत्रण करण्यासाठी सरकार अंदाजपत्रक बाह्यमार्गांनी उत्पन्न मिळविण्याचा प्रयत्न करीत आहे.

सन २०१९ मध्ये सरकारने रिझर्व्ह बँकेकडून १.७६ लक्ष कोटी रु. सरप्लस रिझर्व्ह फंडातून घेतले, त्याशिवाय सरकारला द्यावयाच्या लाभांशाची रक्कम वेगळीच सरकारने रिझर्व्ह बँकेकडून हा जास्तीचा निधी घेण्यास अनेक अर्थतज्ज्ञांचा विरोध होता. सरकारच्या या निर्णयामुळे रिझर्व्ह बँकेच्या स्वायत्ततेवर घाला घातला गेला अशी अनेकांची धारणा झाली आहे. हे देशाच्या अर्थव्यवस्थेला घातक आहे. या प्रकारचा अनुभव जगातील काही देशांनी घेतला आहे.

भारतीय अर्थव्यवस्थेतील घसरणीला तोंड देण्यासाठी सरकारने रिझर्व्ह बँकेला आजपर्यंत ५ वेळा रेपो दर १.३५% कमी करण्यास भाग पाडले. हे रेपो दर २०10 पूर्वीच्या निचांकी पातळीवर आले आहेत. रेपो दर ५.१५% तर रिव्हर्स रेपोदर ४.९०% वर आले आहेत. या पाठीमागे सरकार व रिझर्व्ह बँकेची अशी धारणा आहे की व्याजदर कमी होऊन कर्जाची मागणी वाढेल, देशातील गुंतवणूक वाढून आर्थिक घसरण थांबेल, परंतु रिझर्व्ह बँकच्या रेपोदर कपातीस आतापर्यंत व्यापारी बँकांनी अल्पप्रतिसाद दिला. कर्जाचे व्याजदर फक्त ०.७०% नी कमी केले. परंतु बँकिंग व्यवसायातील अपप्रवृत्तीमुळे स्वस्त कर्जातून २००८ ची अमेरिकेतील लेहमन ब्रदर्सची पुनरावृत्ती होता कामा नये. वरील घटनावरून रिझर्व्ह बँक व वित्तीय संस्थांच्या कामकाजात केंद्र सरकारचा हस्तक्षेप वाढत असल्याचे दिसून येते.

बँकिंग व्यवसाय हा विश्वासावर चालणारा आहे. आजदेखील सार्वजनिक क्षेत्रातील बँकांवरील जनतेचा विश्वास खाजगी व सहकारी बँकांपेक्षा जास्त आहे. म्हणून लोक आपल्या ठेवींसाठी सरकारी बँकांना प्राधान्य देतात. सरकारी पाठबळामुळे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमधील ठेवी व पैसा सुरक्षित असल्याची भावना लोकांमध्ये आहे. परंतु खरेच सरकारी बँकांतील ठेवी सुरक्षित आहेत काय? हा प्रश्न निर्माण होतो. कारण १ लाख रुपयापर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण आहे. त्यापेक्षा जास्त ठेवींचे काय? बँक दिवाळखोरीत निघाल्यास १ लाख रुपयापेक्षा जास्त असणाऱ्या सर्व ठेवींची रक्कम लोकांना परत मिळण्यासाठी काय केले पाहिजे, याबाबत सरकारने उपाययोजना केल्या पाहिजेत व सर्व ठेवींची रक्कम परत मिळाली पाहिजे. तसेच सरकारने पूर्वी आणलेल्या FRDI विधेयकाचे काहीजण समर्थन करतात, त्यामुळे बँक ठेवीदारांचे नुकसान झाल्यास लोकांचा बँकावरील विश्वास उडेल व बँक व्यवसायाला धोका निर्माण होईल.

आर्थिक मंदीच्या परिस्थितीत धोरणात्मक निर्णय घेताना राजवित्तीय धोरण व चलनविषयक धोरण दोहोंत संघर्ष होता कामा नये. आर्थिक मंदीच्या नियंत्रणासाठी रेपोदर कमी करावयास लावणे, रिझर्व्ह बँकेचा राखीव फंडातील पैशाचा वापर वित्तीय तूट भरून काढण्यासाठी करणे व सार्वजनिक बँकांच्या कामकाजातील सरकारचा अनावश्यक हस्तक्षेप टाळला पाहिजे.

देशातील आर्थिक मंदी एकूण देशांतर्गत मागणीत घट झाल्यामुळे निर्माण झाली आहे. एकूण मागणीत वाढ करून आर्थिक मंदीच्या नियंत्रणासाठी राजवित्तीय धोरणातील साधनांचा (कर, खर्च, कर्ज व अंदाजपत्रक) जास्तीत जास्त वापर करून, शेती व ग्रामीण भागातील खर्च व गुंतवणूक वाढवावी, हे न करता महामंडळ कर कपात, रेपोदरात घट वगैरेद्वारे फार काही साध्य होणार नाही.

देशातील बँकिंग क्षेत्राच्या विकासासाठी कार्यक्षम व्यवस्थापन, कडक देखरेख, लोकांचा विश्वास, बँकाची आर्थिक सक्षमता वगैरे प्रस्थापित करण्यासाठी सरकार, पुढारी, बडे उद्योजक, बँक पदाधिकारी यांचा बँकिंग क्षेत्रातील हस्तक्षेप कमी झाला पाहिजे. तरच बँकिंग क्षेत्राला उज्ज्वल भवितव्य लाभेल.

**संदर्भसूची:**

१) Annual Report (August 2019), Reserve Bank of India.

२) Datt G. & Mahajan Ashwani (2012), "Indian Economy", S. Chands Company Ltd., New Delhi.

३) Deshmukh P.K.(2004), "Money & Financial System", Phadake Prakashan, Kolhapur.

४) Hand Book of statistics on Indian Economy 2018-19.

५) Misra S. K. Puri V.K. (2006), "Indian Economy" Himalaya Publishing House New Delhi.

६) Mithani D. M. (1995), "Money Banking International Trade and Public Finance", Himalaya Publishing House Girgaon, Bombay.

७) Report On ternd and progress of Banking in India. RBI-2017-18.

८) http://mi.rozbuzz.com/ Article.

९) डॉ. एम.एन. शिंदे, डॉ. अनिल सत्रे 'भारतीय अर्थव्यवस्था', अजित पब्लिकेशन्स, इस्लामपूर- २०१७.

१०) दैनिक लोकसत्ता पुणे, विविध अंक दि. १३ ऑक्टो. २०१९, ८ सप्टेंबर २०१९, १३, ३० व ३१ ऑगस्ट २०१९, २ व २३ सप्टेंबर २०१९.

११) दैनिक पुढारी सांगली- ३१ ऑगस्ट २०१९, १२ ऑक्टोबर २०१९.

(टीप : लेखकांनी प्रस्तुत विषयावर मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या सोलापूर येथे संपन्न झालेल्या ४३व्या राष्ट्रीय अधिवेशनाच्या ऐनवेळच्या विषयावर भाषण दिलेले आहे.)

◆

## डॉ. सौ. अरुणा रारावीकर आर्थिक लेख पुरस्कार

मराठी अर्थशास्त्र परिषदेतर्फे २०११ पासून हा पुरस्कार सुरू केला आहे. परिषदेच्या आजीव सदस्यांनी आर्थिक विषयांवर सतत वाचन-मनन करून त्यावर जिल्हा व राज्यपातळीवरील मराठी दैनिक वृत्तपत्रासाठी वैचारिक व प्रबोधनात्मक लेख लिहिण्यास उद्युक्त व्हावे, हा त्यामागील हेतू आहे. त्यांच्या अशा प्रसिद्ध झालेल्या व निवड समितीने शिफारस केलेल्या लेखांना दोन पुरस्कार दिले जातील. प्रथम पुरस्कार ₹ १०००/- चा व द्वितीय पुरस्कार ₹ ५००/- याप्रमाणे आहे. या पुरस्कारासाठी १ जानेवारी, २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९ या कालावधीतील लेख विचारात घेतले जातील. एक सदस्य जास्तीत जास्त आपले तीन लेख (चार प्रती) पाठवू शकतील. त्यासाठी प्रसिद्ध झालेले लेख, वृत्तपत्रांचे नाव व दिनांकासह झेरॉक्स करून ३० सप्टेंबर, २०२० पूर्वी कार्यवाह, मराठी अर्थशास्त्र परिषद यांच्याकडे पाठवावे. २०२० च्या परिषदेच्या अधिवेशनात हे पुरस्कार दिले जातील. पत्रव्यवहारासाठीचा पत्ता- कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद, डॉ. मारोती तेगमपुरे 'संगाई', घर क्रमांक २२, भालचंद्र पेट्रोल पंपाच्या मागे, शहीद भगतसिंग नगर, पारनेर रोड, अंबड, जि. जालना- ४३१२०४ (भ्रमणध्वनी ९४२३९९३१३७)

**- मारोती वि. तेगमपुरे**

कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद

# विदर्भ आणि मराठवाड्यातील कुपोषण निर्मूलन कार्यक्रमाचा मागोवा

**प्रशांत एन. देशमुख** †
**आर. एस. सोळुंके** ††

**प्रस्तावना**

कुपोषण हा एक सामाजिक अभिशाप आहे. कुपोषण कमी करण्यासाठी प्रत्येक स्तरावर मोठ्या प्रमाणात प्रयत्न केले जात आहेत. सशक्त आणि निरोगी बालकच खऱ्या अर्थाने देशाची संपत्ती आहे. त्यामुळे कुटुंबासाठी बालक ही संकल्पना न राहता बालकासाठी कुटुंब ही संकल्पना समाजात रूजवण्याची गरज आज निर्माण झाली आहे. महाराष्ट्र राज्य देशातील विकसित राज्य म्हणून ओळखले जाते. मागच्या काही दशकात राज्याची आर्थिक वृद्धी होत आहे. देशाच्या एकूण उत्पादनात राज्याचा वाटा वाढत आहे. एकीकडे महाराष्ट्राची आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रगती होत आहे; परंतु दुसरीकडे कुपोषणासारखी भयावह समस्या महाराष्ट्राला कलंकित करीत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील विदर्भ, खानदेश, मराठवाडा विभागात कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्याचे अनेक संशोधनातून पुढे आले आहे. विदर्भ व मराठवाड्यातील हजारो बालके कुपोषण ग्रस्त असल्याचे आढळते. मानव विकास निर्देशांकात आपली स्थिती बिहार, छत्तीसगड अशा राज्यासमान असल्याचे दिसून येते. विदर्भ व मराठवाड्यातील हजारो बालकांना पूरक पोषण आहार मिळत नसल्याचे दिसून आले आहे. कुपोषण निर्मूलनासाठी शासन अनेक योजना राबवत असले तरी होणारा खर्च आणि मिळणारा लाभ याचा ताळमेळ बसत नसल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र राज्य हे देशातील उच्च दरडोई उत्पन्न असलेल्या राज्यांपैकी एक आहे. उत्पादनाच्या बाबतीत महाराष्ट्राचा देशात दुसरा क्रमांक लागतो. परंतु राज्यातील ४०% कुटुंबातील ८०% लोकांना एका दिवसासाठी आवश्यक असणाऱ्या २७०० उष्मांकापेक्षा कमी उष्मांक अन्नातून मिळतो. डॉ. अभय बंग समितीच्या अहवालनुसार, बालकांमधील कुपोषणाच्या बाबतीत महाराष्ट्राचा क्रमांक भारताच्या मागासलेल्या प्रांताच्या रांगेत लागतो. एवढेच नाही, तर महाराष्ट्रातील ग्रामीण भागांतील कुपोषित बालंकाच्या प्रमाणापेक्षा विदर्भातील आदिवासी भागातील कुपोषित बालकांचे प्रमाण दुपटीने

† सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय, औरंगाबाद.
आजीव सभासद क्र. : १६०५, भ्रमणध्वनी : ८००७३९३३३९, ई-मेल : prashantdeshmukh67@gmail.com
†† माजी अर्थशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.
आजीव सभासद क्र. : ८१६, भ्रमणध्वनी : ७५८८४२४५९९, ई-मेल : ramkrishna.solunke@rediffmail.com

अधिक असल्याचे अहवालातून दिसून येते. याचाच अर्थ महाराष्ट्राने विविध क्षेत्रांत प्रगती केली असली तरी आरोग्य व पोषण आहार या क्षेत्रांत राज्यात विभागीय विषमता मोठ्या प्रमाणात आढळून येते.

विदर्भ आणि मराठवाडा विभाग शिक्षण आणि विकासात इतर विभागापेक्षा मागे आहेत. परंतु आरोग्यविषयक सुविधा या विभागातील लोकांना मिळतात का? आरोग्य सुविधांचा लाभ या विभागातील ग्रामीण जनतेला मिळतो का? या विभागातील कुपोषणाची सध्या स्थिती काय आहे? कुपोषण निर्मूलन कार्यक्रमावर होणारा शासनाचा खर्च योग्य दिशेने होत आहे का? सर्वांसाठी आरोग्य ही संकल्पना विदर्भ आणि मराठवाडा या विभागात दिसून येते का? बालमृत्युत कुपोषणाचे प्रमाण किती आहे? सशक्त मनुष्यबळ निर्मितीसाठी वरील प्रश्न महत्त्वाचे वाटतात. प्रस्तुत शोधनिबंधातून वरील प्रश्नांचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**कुपोषणाची व्याख्या**

कुपोषणाच्या अनेक व्याख्या आहेत पण कुपोषणाची सर्वसाधारण व्याख्या खालीलप्रमाणे सांगता येईल.

१) डेव्हिड वर्नर - पुरेसा व योग्य आहार न घेतल्यामुळे किंवा न मिळाल्यामुळे जी अशक्तपणाची व आजारीपणाची परिस्थिती निर्माण होते तिला 'कुपोषण' असे म्हणतात. ज्या बालकास असे कुपोषण झालेले असते त्यास 'कुपोषित बालक' असे म्हणतात.

२) डॉ. प्रकाश वेदपाठक - कमी पोषण आहारामुळे तयार होणारा रोग म्हणजे कुपोषण होय.

३) व्यक्तीला शारीरिक आवश्यकतेनुसार सर्व पोषक तत्त्वे उदा : प्रथिने, कर्बोदके, स्निग्ध पदार्थ, खनिजे व जीवनसत्वे इत्यादी समतोल प्रमाणात न मिळाल्यास शरीरावर जे हानिकारक परिणाम होतात त्याला 'कुपोषण म्हणतात.'

**कुपोषणाचे प्रकार**

कुपोषण ही समस्या प्रामुख्याने शरीर पोषणासाठी असलेल्या समतोल आहाराच्या व्यवस्थेत खंड पडून तसेच आहारातील कमतरता आणि शरीरास अपायकारक व न पचणाऱ्या अन्नपदार्थाच्या सेवनामुळे निर्माण होते. गर्भवती स्त्रियांना योग्य पोषण आहार न मिळणे तसेच प्रथिने, कॅल्शियम, मॅग्नेशियम, लोह, जस्त, आयोडिन व जीवनसत्व योग्य प्रमाणात न मिळाल्यामुळे जन्म घेणारी बालके कुपोषणास बळी पडतात. वरील सर्व घटकांच्या अभावातून निर्माण होणाऱ्या कुपोषणाचे खालील प्रकार दिसून येतात.

**१) प्रथिने व उष्मांक या पोषक घटकांच्या अभावी होणारे कुपोषण :** या घटकांच्या अभावातून दोन प्रकार दिसून येतात.

अ) सुकटी : या प्रकारात खालीलप्रमाणे लक्षणे दिसून येतात. स्नायू शिथिलता, त्वचेखालील मेदाचा थर नाहीसा होणे. हाडांचा सापळा स्पष्ट दिसणे, डोळे खोल जाणे, पोट आत गेलेले किंवा फुगलेले, हातापायांच्या काड्या झालेल्या व चेहरा निस्तेज दिसतो. या प्रकारात बालकाची शारीरिक वाढ व मानसिक विकासदेखील खुंटतो. तसेच तीव्र कुपोषणामुळे बालकांचा मृत्यू होऊ शकतो.

ब) सुजवटी : सुजवटी या कुपोषण प्रकारात हात, पाय, चेहरा व शरीराच्या इतर भागांना सूज येऊन ते फुगतात. वाढ खुंटते. केस व त्वचेत बदल आढळतात. चेहरा उदासिन निरूत्साही व चंद्रासारखा गोल फुगलेला दिसतो, लघवीत प्रथिने आढळतात. यकृत मोठे होते. काही मुलांमध्ये सुकटी आणि सुजवटी या दोन्ही रोगांची लक्षणे, एकाच वेळी दिसून येतात. त्याला 'मॅरॅस्मिक कॉशिआरकर' असे शास्त्रीय नाव

दिले जाते.

**२) रक्ताशय :** रक्ताशय हा कुपोषणाचा एक प्रकार आढळून येतो. या प्रकारात बालकाच्या डोक्याच्या पापणीचा खालील भाग फिकट, जीभ पांढुरकी, त्वचा फिकट, नखे चापट व चमच्यासारखी खोल गेलेली दिसतात, तसेच अशा प्रकारातील बालकांमध्ये अशक्तपणा, थकवा व दम लागणे ही लक्षणे दिसून येतात.

**३) जीवनस्तव 'अ' च्या अभावाने येणारे अंधत्व:** रातआंधळेपणा, डोळ्यांना कोरडेपणा येतो, सुरकुत्या पडतात, डोळ्याच्या पांढऱ्या भागावर धुरकट रंगाची त्रिकोणी गोल किंवा लंबगोल आकाराचे डाग येतो. त्याला 'बिराट स्पॉट' असे म्हणतात. जागतिक मानकानुसार १ ते ६ वयोगटातील २१% पेक्षा जास्त बालकांमध्ये किंवा त्या भागातील लोकांमध्ये बिराट स्पॉट किंवा कोरडेपणा आढळल्यास त्या भागातील लोकांमध्ये जीवनसत्व 'अ' ची तीव्र कमतरता आहे असे समजण्यात येते.

**४) गलगंड :** गर्भावस्थेच्या काळात स्त्रीला आहारात आयोडीन या खनिजद्रव्याची कमतरता जर झाली तर होणाऱ्या बालकांना शारीरिक व मानसिक अपंगत्वाचे विकार होतात. अशा मातांना गर्भाशयातच अर्भकाच्या मेंदू व शरीराची वाढ खुंटण्याच्या संभव असतो. त्यामुळे अशा स्त्रियांच्या पोटी जन्माला आलेली बालके मतिमंद जन्माला येतात. जागतिक मानकानुसार अशा प्रकारात जन्माला येणाऱ्या बालकांचे प्रमाण हे एक टक्क्यापेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

वर उल्लेख केलेल्या कुपोषणाच्या प्रमुख प्रकाराबरोबरच जीवनसत्व 'ब-१' च्या कमतरतेमुळे 'बेरीबेरी', जीवनसत्व 'क' च्या कमीने 'स्कर्व्ही' तर जीवनसत्व 'ड' च्या कमतरतेतून मुलांमध्ये 'मुडदूस' नावाचा रोग होतो व अशी बालके कुपोषित बालके म्हणूनच ओळखली जातात.

**कुपोषणाची कारणे :**

| शारीरिक कारणे | आर्थिक कारणे | सामाजिक कारणे | भौगोलिक कारणे |
|---|---|---|---|
| १) बाह्य कारणे<br>अ) पौष्टिक घटकांचा अभाव<br>ब) गरजेनुसार अन्नाचा अभाव<br>२) आंतरिक कारणे<br>अ) आजार<br>ब) शारीरिक क्रियांमध्ये बिघाड | १) गरिबी<br>२) उत्पादनाची मर्यादित साधने | १) निरक्षरता व अज्ञान<br>२) अंधश्रद्धा<br>३) सवयी<br>४) कुटुंबाचा आकार<br>५) व्यसनाधिनता<br>६) वातावरण | १) दुष्काळ<br>२) भूकंप<br>३) स्थलांतरण |

**विदर्भ व मराठवाड्यातील कुपोषणाची सद्यस्थिती :**

महाराष्ट्र राज्याचा एकात्मिक बालविकास सेवा योजनेच्या एप्रिल २०१७ च्या अहवालानुसार राज्यात एकूण १२३६ बालमृत्युंची नोंद झालेली आहे. त्याचप्रमाणे राज्यात ७९,६१९ बालके तीव्र कुपोषित गटात मोडतात. तक्ता क्र.१ मध्ये विदर्भ व मराठवाड्यातील कुपोषणाची सद्यस्थिती दर्शविली आहे.

तक्ता क्र. १ मध्ये विदर्भ आणि मराठवाडा विभागातील कुपोषणाचे प्रतिशत प्रमाण दर्शविले आहे. मार्च २०१४ मध्ये विदर्भात कुपोषणाचे प्रमाण (११.७६%) होते तर २०१८ मध्ये (११.५७%)

**तक्ता क्र.१ : विदर्भ आणि मराठवाडा विभागातील कुपोषणाचे प्रतिशत प्रमाण (२०१४ ते २०१८)**

| अ.क्र. | विभाग | मार्च २०१४ | मार्च २०१८ |
|---|---|---|---|
| १. | विदर्भ | ११.७६% | ११.५७% (१२,७०,३१८) |
| २. | मराठवाडा | ८.२९% | ८.३०% (१२,१४,३६५) |

**स्त्रोत** - www.icds.gov.in

**टीप :** कंसातील अंक २०१८ मधील वजन घेतलेल्या एकूण बालकांची संख्या दर्शवितात.

असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे मराठवाडा विभागात मार्च २०१४ मध्ये असणारे कुपोषणाचे प्रमाण हे (८.२९%) तर मार्च २०१८ मध्ये मराठवाड्यात कुपोषणाचे प्रमाण (८.३०%) असल्याचे दिसून येते. एकंदरीत दोन्ही विभागात २०१४ ते २०१८ या कालावधीत कुपोषणाच्या प्रमाणात फारशी घट न झाल्याचे आढळून येते. याचाच अर्थ कुपोषण निर्मूलनावर होणारा शासनाचा खर्च योग्य दिशेने होत नाही किंवा शासकीय यंत्रणा कुठेतरी अपयशी होत असल्याचे दिसून येते. या संदर्भात मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने कुपोषणाच्या प्रश्नावर दाखल अनेक जनहित याचिकांवर सुनावणी दरम्यान निरीक्षण नोंदवताना (२०१९) मध्ये असे म्हटले होते की, महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात कुपोषणामुळे एकाही बालकाचा मृत्यू झाला तर ते राज्यासाठी भूषणावह नाही, तर अत्यंत चिंतेचा विषय आहे. महत्त्वाचे म्हणजे कुपोषणाची मोठी समस्या असलेल्या मेळघाट परिसर हा विदर्भात आहे आणि राज्याचे मुख्यमंत्रीही विदर्भातीलच होते. असे असताना मागील पाच वर्षात ही समस्या गंभीरच आहे हे अत्यंत खेदजनक आहे. यापुढे जाऊन उच्च न्यायालयाने सरकारवर ताशेरे ओढताना असे मत नोंदवले की, 'बालमृत्यू रोखण्यासाठी राज्य सरकार अनेक योजना राबवून दरवर्षी कोट्यावधी रुपये खर्च करते. मग अखेर या योजनांवरील पैसा जातो कुठे? का केवळ योजनेचे नाव बदलले जात आहे आणि त्या योजनेची अंमलबजावणी जैसे तेच राहत आहे, असे तर होत नाही ना? मा. उच्च न्यायालयाने नोंदवलेल्या या निरीक्षणावरून महाराष्ट्रातील विशेषत: विदर्भातील कुपोषणाचे भयावह सत्य समोर येत असल्याचे दिसून येते.

### एकात्मिक बालविकास योजनेवरील खर्च प्रवृत्ती

एकात्मिक बालविकास योजनेवर केंद्र सरकार दरवर्षी अर्थसंकल्पात खर्चाची तरतूद करते त्याप्रमाणे राज्य सरकार आपला वाटा त्यात टाकते. तक्ता क्र. २ मध्ये केंद्रीय अर्थसंकल्पात या योजनेसाठी केलेली तरतूद व त्याची प्रवृत्ती दर्शविली आहे. तक्ता क्र. २ वरून असे दिसून येते की, या योजनेवरील खर्च २०१५-१६ (-४९.६६) हे आर्थिक वर्ष वगळता सातत्याने वाढीची प्रवृत्ती दर्शविते. २०१३-१४ मध्ये या योजनेवर १६३.१२ (लाख कोटी) रुपये खर्चाची तरतूद आहे हेच प्रमाण २०१७-१८ मध्ये १६७.४५ पर्यंत गेल्याचे आढळते. परंतु देशातील कुपोषणाची

भयावह स्थिती पाहता या खर्च तरतुदीत मोठ्या प्रमाणात वाढ होणे अपेक्षित आहे. जागतिक आरोग्य संघटनेच्या मते, जगभरात १५ करोडपेक्षा जास्त मुलं कुपोषण समस्येने ग्रस्त आहेत. पाच वर्षांपर्यंतच्या बालमृत्युमध्ये ५०% बालमृत्यू कुपोषणाने होत आहेत. बालकांमधील कुपोषणात 'स्टंटेड' (सर्वांग सूज/खुंटलेली वाढ) आणि वेस्टिंग (रोडपणा) ही समस्या मोठ्या प्रमाणात आढळते. स्टंटेड म्हणजे वयानुसार बालकांची उंची न वाढणे आणि वेस्टिंग म्हणजे उंचीनुसार वजन न वाढणे यानुसार कुपोषणाचे मध्यम कुपोषित व तीव्र कुपोषित बालके असे वर्गीकरण केले जाते. ग्लोबल न्यूट्रिशन रिपोर्ट २०१८ नुसार भारतात जगातील सर्वाधिक

**तक्ता क्र. २ : केंद्रीय अर्थसंकल्पातील एकात्मिक बालविकास योजनेवरील खर्च प्रवृत्ती (२०१३-१४ ते २०१७-१८) रु. लाखात.**

| अ.क्र. | आर्थिक वर्ष | अर्थसंकल्पीय तरतूद | वार्षिक प्रवृत्ती वाढ / घट |
|---|---|---|---|
| १. | २०१३-१४ | १६३.१२ | - |
| २. | २०१४-१५ | १६५.६१ | १.५३ |
| ३. | २०१५-१६ | ८३.३६ | -४९.६६ |
| ४. | २०१६-१७ | १४८.५० | ७८.१४ |
| ५. | २०१७-१८ | १६७.४५ | १२.७६ |

**स्त्रोत -** महिला आणि बालकल्याण मंत्रालय भारत सरकार - https://wcd.nic.in-23/04/2020

'स्टंटेड' बालके (४.६६) कोटी आढळतात. तर विश्व बँकेच्या रिपोर्टनुसार बालपणी ज्या बालकात मोटापा (स्टंटेड) आढळतो त्यांच्या वयातील सरासरी उंची १ प्रतिशतने कमी असते तर आर्थिक उत्पादकता १.४ प्रतिशत कमी होते. भारतात 'स्टंटेड' बालकांचे प्रमाण जास्त आढळते त्यामुळे एकात्मिक बालविकास योजनेवरील खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होणे गरजेचे आहे.

**राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण २०१५-१६**

अनेक सर्वेक्षणातून व अभ्यासातून हे दिसून येते की बालकाचे कुपोषण हे मातेच्या गर्भातच सुरू होते. ज्याला आपण गर्भकुपोषण असे म्हणतो. गरोदर मातेचे योग्य पोषण होत नसेल, तिला पूरक पोषण आहार जर मिळत नसेल तर गर्भातील बाळ हे कुपोषितच जन्माला येणार. या संदर्भात पुण्याचे मधुमेह तज्ज्ञ डॉ. याज्ञिक असे प्रतिपादन करतात की, भारतातील सध्याचे कुपोषण बऱ्याच प्रमाणात ऐतिहासिक वारसा हक्काने मिळालेले आहे. आपली बालके कमी वजनाची जन्मतात (अडीच किलोच्या खाली ३५%). कारण भारतीय माताची मुळात उंची व कटिभाग श्रेणिकध छोटा असतो व आईच्या स्तनातून मिळणारे पोषणही कमी असते. ७०% भारतीय स्त्रिया ॲनिमियाग्रस्त असल्याचे आढळते. मुळात घोटभर दुधापासून पातेलाभर चहा पिण्याची आपली प्रवृत्ती आहे. जिथे पोटाला पोटभर खायलाच मिळत नाही तिथे पोषणाचा प्रश्न येतोच कुठं म्हणूनच स्त्रियाच्या गर्भातच कुपोषणाला सुरुवात होत असल्याचे दिसून येते. तक्ता क्र. ३ मध्ये राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्व्हेक्षणाचा २०१५-१६ चा अहवाल दर्शविला आहे.

**तक्ता क्र. ३ : राष्ट्रीय कुटुंब सर्वेक्षण अहवाल (२०१५-१६) प्रमुख निर्देशक विदर्भ व मराठवाडा विभाग (प्रतिशत प्रमाण)**

| अ.क्र. | निर्देशक | विदर्भ | मराठवाडा | महाराष्ट्र |
|---|---|---|---|---|
| १. | शिक्षित महिला (वय १५-४९) | ६५.३६ | ६९.८० | ७४.८० |
| २. | १० वी किंवा त्यापेक्षा जास्त वर्ग शिकलेल्या महिला | २४.९० | २६.१२ | ३२.६० |
| ३. | २० ते २४ वर्षातील महिला ज्यांचे लग्न १८ वर्षे वयापेक्षा कमी वयात झालेले आहे. | ४७.८६ | ४५.२८ | ३२.५० |
| ४. | १५ ते १९ वयाखालील महिला ज्या या सर्वेक्षणा अगोदरच गरोदर होत्या त्यांचे प्रमाण | १७.१९ | १५.२५ | १०.४० |
| ५. | आंतरिक काळजी घेणाऱ्या महिलांचे प्रमाण | २१.१६ | २२.३२ | २९.६० |
| ६. | रक्तक्षय असणाऱ्या महिला (वय १५-४९) | ४६.५० | ४०.१३ | ४७.८० |

**संदर्भ :** राष्ट्रीय कुटुंब सर्वेक्षण अहवाल IV(२०१५-१६).

तक्ता क्र. ३ मध्ये राष्ट्रीय कुटुंब सर्वेक्षण IV (२०१५-१६) चा अहवाल दर्शविला असून या अहवालातून अनेक धक्कादायक बाबी निदर्शनास येतात. या अहवालानुसार, १८ वर्षापेक्षा कमी वयात लग्न होणाऱ्या महिलांचे प्रमाण विदर्भात (४७.८६%) तर मराठवाड्यात हेच प्रमाण (४५.२८) प्रतिशत असल्याचे आढळते. एवढेच नव्हे, तर १५ ते १९ वयोगटातील महिला ज्या या सर्वेक्षणा अगोदरच गरोदर होत्या त्यांचे प्रमाण विदर्भात (१७.१९%) तर मराठवाड्यात हे प्रमाण (१५.२७%) असल्याचे दिसून येते. सदरील सर्वेक्षणानुसार, विदर्भातील अॅनेमिया असणाऱ्या महिलांचे प्रमाण (४६.५०%) तर मराठवाड्यात हे प्रमाण (४०.१३% ) असल्याचे दिसून येते. एकंदरीत महाराष्ट्रात (४७.८०%) महिला या रक्तक्षय असणाऱ्या आहेत. या सर्वेक्षणानुसार वयानुसार अल्पवजनी मुलांचे प्रमाण महाराष्ट्रात ४०% (भारतात ४६%) वयानुसार उंची खुंटलेली मुले महाराष्ट्रात ३८% (भारतात ३८%) उंचीनुसार वजन कमी असणे महाराष्ट्रात हे प्रमाण १५% (भारतात १९%) ६ महिने ते ३५ महिने वयोगटातील रक्त कमी असलेल्या मुलांचे प्रमाण महाराष्ट्रात ७२% (भारतात हे प्रमाण ७९%) असल्याचे आढळते.

आंतराष्ट्रीय खाद्य संशोधन संस्थेने नुकत्याच जाहीर केलेल्या आपल्या अहवालानुसार, ११९ देशाच्या 'ग्लोबल हंगर इंडेक्स'मध्ये भारत १०० व्या स्थानी आहे. या इंडेक्समध्ये भारताची स्थिती उत्तर कोरिया व बांग्लादेश या सारख्या देशापेक्षाही वाईट असल्याचे आढळते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या रिपोर्टनुसार, भारतात पाच वर्षाखालील ३८.४% बालके स्टंटेडने ग्रासलेली आहेत तर ५१.४% माता गरोदरपणातच अॅनेमियाग्रस्त असल्याच्या आढळून येतात. एवढेच नाही, तर भारतात दरवर्षी जेवढे मृत्यू होतात त्यापैकी ५% मृत्यू हे केवळ कुपोषणामुळे होत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आल्याचे दिसून येते. याचाच अर्थ 'सर्वांसाठी आरोग्य' ही संकल्पना महाराष्ट्रातील विदर्भ आणि मराठवाडा

विभागात दिसून येत नाही. तसेच बालमृत्युत कुपोषणाने होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण अधिक असल्याचे आढळते.

वरील सर्व सर्वेक्षण अहवालातून महाराष्ट्रातीलच नाही तर देशातील कुपोषणाचे भयावह सत्य समोर येते; परंतु हे सत्य लपवण्याचा केविलवाणा प्रयत्न सरकार सातत्याने करत असल्याचे आढळते.

**महाराष्ट्र राज्यातील बालमृत्यू**

महाराष्ट्र राज्यातील कुपोषित बालकांचे प्रश्न व त्यामुळे होणारे बालमृत्यू हा गंभीर प्रश्न अद्याप सुटलेला दिसून येत नाही. जानेवारी २०१८ ते सप्टेंबर २०१८ या नऊ महिन्याच्या कालावधीत राज्यात ११,९३२ बालमृत्युंची नोंद झाल्याचे दिसून येते. तक्ता क्र. ४ मध्ये महिना निहाय बालमृत्यू दर्शविलेले आहेत.

**तक्ता क्र. ४ : महाराष्ट्रातील बालमृत्यू (जानेवारी ते सप्टेंबर २०१८)**

| अ.क्र. | महिना | नवजात मृत्यू | बालमृत्यू | एकूण मुलांचे मृत्यू |
|---|---|---|---|---|
| १. | जानेवारी | १११८ | ३०४ | १४२२ |
| २. | फेब्रुवारी | ८९७ | २६३ | ११६० |
| ३. | मार्च | ९०३ | २६१ | ११६४ |
| ४. | एप्रिल | ८५९ | २५३ | १११२ |
| ५. | मे | ९१८ | २२६ | ११४४ |
| ६. | जुन | १००५ | २५६ | १२६१ |
| ७. | जुलै | १०१६ | ३०४ | १३२० |
| ८. | ऑगस्ट | १३४५ | ३०१ | १६४६ |
| ९. | सप्टेंबर | १३१८ | ३८५ | १७०३ |
| | एकूण | ९३७९ | २५५३ | ११९३२ |

**स्रोत :** महाराष्ट्र टाइम्स २९ डिसेंबर, २०१८

तक्ता क्र. ४ वरून असे दिसून येते की, जानेवारी ते सप्टेंबर २०१८ या नऊ महिन्यात राज्यात एकूण ११९३२ बालमृत्युंची नोंद झालेली आहे. यात सर्वाधिक बालमृत्यू सप्टेंबर महिन्यात (१७०३) तर सर्वांत कमी बालमृत्यू एप्रिल महिन्यात (१११२) झाल्याचे आढळते. असे असले तरी या एकूण बालमृत्युत विदर्भ व मराठवाडा विभागात झालेले बालमृत्यू अधिक असल्याचे आढळते. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेच्या माहितीनुसार, दगावलेली मुले शून्य ते पाच वयोगटातील आहेत. यामध्ये शून्य ते एक वर्ष वयोगटातील ९ हजार ३७९ मुलांचा तर १ ते ५ वर्षे वयोगटातील २५५३ मुलांचा समावेश आहे. कुपोषित मुलांसाठी पोषण आहाराच्या अनेक योजना राबवून, तत्पर वैद्यकीय सुविधा पुरवूनही सरकार बालमृत्यू रोखण्यात अपयशी ठरत असल्याचे दिसून येते. याचाच अर्थ कुपोषण निर्मूलन व बालमृत्यू रोखण्यासाठी होणारा शासन खर्च योग्य दिशेला होत नाही व बालमृत्युत कुपोषणाचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

**महाराष्ट्र राज्यातील कुपोषणाचे प्रमाण (२०१९)**

जागतिक बँकेने नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या आपल्या अहवालात स्पष्ट नमूद केले आहे की, १९९० ते २०१८ च्या दरम्यान भारताने गरिबी निर्मूलनासाठी अतुलनीय कार्य केलेले आहे. विशेषत: वर्ष २००६ ते २०१६ या काळात भारतातील दारिद्र्याचे प्रमाण झपाट्याने कमी झालेले आहे. असे असले तरीही कुपोषण आणि भूक या दोन समस्या मात्र आजही भारतात मोठ्या प्रमाणात आढळतात. मागील २० वर्षात भारताचे अन्नधान्य उत्पादन १९८ मिलियन टनावरून २६९ मिलियन टन झाले; परंतु असे असले तरीही भारतातील कुपोषणाचे वाढते प्रमाण एक चिंतेचा विषय असल्याचे मत अहवालात नमूद करण्यात आले आहे. भारतातील प्रत्येक मोठी राज्ये 'कुपोषण' या समस्येने ग्रासलेली दिसून येतात.

'द स्टेट ऑफ द वर्ल्ड्स चिल्ड्रन' २०१९ च्या अहवालानुसार, जगातील ५ वर्षाखालील प्रत्येक तीन मुलांमध्ये एक बालक कुपोषित असून भारतात हे प्रमाण दोनात एक असल्याचे नमूद केलेले आढळते. अहवालात असेही नमूद करण्यात आले आहे की, २०१८ मध्ये भारतातील प्रमुख सहा राज्यांत ५ वर्षाखालील एकूण ८.८ लाख बालकांचे मृत्यू कुपोषणाने झाले आहेत. जे नायजेरिया (८.६ लाख), पाकिस्तान (४.६९ लाख) आणि कांगो (२.९६ लाख) यापेक्षा अधिक आहेत. अहवालात असेही म्हटले आहे की, भारतातील प्रमुख सहा राज्यांतील (महाराष्ट्रासह) ६ ते २३ महिन्या आतील बालकांपैकी केवळ ९.६% बालकांना योग्य पोषण आहार मिळतो. एवढेच नाही, तर कुपोषणामुळे भारतात जीडीपीचे दरवर्षी ६.४% नुकसान होते. ज्यात महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याचा वाटा सर्वाधिक असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र राज्य हे देशातील पुढारलेले राज्य आहे, परंतु असे असले तरीही महाराष्ट्रात आढळून येणारे कुपोषण विशेषत: विदर्भ व मराठवाड्यातील ग्रामीण भागातील कुपोषण हा या राज्यातील एक चिंतेचा विषय आहे. तक्ता क्र. ५ मध्ये जून महिन्यातील महाराष्ट्र राज्याचा कुपोषण अहवाल दर्शविला आहे.

तक्ता क्र. ५ वरून असे दिसून येते की, जून २०१९ मध्ये महाराष्ट्र राज्यात ६ लाख ९० हजार ५७५ बालके कुपोषित आहेत. यामध्ये ९३ हजार ७२१ (१.६१%) तीव्र कुपोषित तर ५ लाख ९६ हजार ८५४ (१०.३०%) बालके मध्यम कुपोषित असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र शासनाचा महिला व बालविकास विभाग पूरक पोषण आहार व गर्भवती

**तक्ता क्र. ५ : जून २०१९ मधील महाराष्ट्र राज्यातील कुपोषणाचे प्रमाण**

| अ.क्र. | वजन घेतलेली एकूण बालके | साधारण श्रेणीतील बालके | मध्यम कमी वजनाची बालके | तीव्र कमी वजनाची बालके | एकूण कमी वजनाची बालके (मध्यम + तीव्र) |
|---|---|---|---|---|---|
| १. | ५७,९१,३३८ (१००%) | ५१,००,७६३ (८८.०७%) | ५,९६,८५४ (१०.३०%) | ९३,७२१ (१.६१%) | ६,९०,५७५ (११.९१%) |

**स्रोत :** www.icds.gov.in

**टीप :** कंसातील अंक एकूणाशी प्रतिशत प्रमाण दर्शवितात.

महिलांच्या पौष्टिक आहारावर करोडो रुपये खर्च करूनही कुपोषणाचे प्रमाण कमी होत नसल्याचे आढळते. याचाच अर्थ पूरक पोषण आहार व आरोग्य सुविधांचा लाभ महाराष्ट्रातील ग्रामीण जनतेला मिळत नाही किंवा शासकीय योजना केवळ कागदावरच दाखवल्या जातात की काय अशा शंका उपस्थित होतात याविषयी बोलताना अर्थशास्त्राचे नोबेल पुरस्कार विजेते अर्मत्य सेन म्हणतात की, कुपोषण व भूक थांबण्यासाठी केले जाणारे प्रयत्न अपुरे आहेत आपणास यापेक्षा वेगळे मार्ग हाताळण्याची गरज आज निर्माण झालेली आहे.

## महाराष्ट्रातील अंगणवाड्या व त्यांचे कुपोषण निर्मूलनासाठीचे कार्य

राज्य शासनामार्फत बालविकास कार्यक्रमांतर्गत एकात्मिक बालविकास योजना राबविली जाते. या योजनेत प्रत्येक तालुक्यात अंगणवाड्याच्या माध्यमातून महिला, गर्भवती महिला, स्तनदा माता व बालकांची विशेष काळजी घेण्यात येते. यात नियमित आरोग्य तपासणी, लसीकरण, पूरक पोषण आहार, पूर्व माध्यमिक शिक्षण इत्यादी बाबींचा समावेश होतो. महाराष्ट्र राज्यात जवळपास १,०८,००५ अंगणवाड्या, मिनी आंगणवाडी केंद्र आहेत. राज्यात ५५० पेक्षा जास्त एकात्मिक बालविकास सेवा प्रकल्प चालू आहेत ज्यात ४००० वर पर्यवेक्षक आणि अंदाजे २ लाखांपेक्षा जास्त अंगणवाडी कर्मचारी, मदतनीस आणि छोट्या (मिनी) अंगणवाडीमधील कर्मचारी कार्यरत आहेत आणि ते संपूर्ण आईसीडीएस प्रकल्प निम्मस्तरापासून चालवत असल्याचे दिसून येते. आईसीडीएस अंतर्गत अंगणवाडी हे सर्व आरोग्य, पोषण आणि शिक्षणविषयक योजनांचे मध्यवर्ती केंद्र आहे. खालील तक्त्यामध्ये या केंद्रामार्फत उपलब्ध सेवा व लाभार्थी यांची माहिती दिली आहे.

तक्ता क्र. ६ मध्ये महाराष्ट्रातील अंगणवाडी केंद्राच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या विविध सेवा व त्याचे लाभार्थी दर्शविलेले आहेत. या वरून असे निदर्शनास येते की, आईसीडीएस अंतर्गत अंगणवाडी केंद्रातून गरोदर माता, किशोरवयीन मुली अन्य महिला व १ ते ६ वयोगटातील बालके यांच्यासाठी आरोग्य तपासणी, लसीकरण, पूरक पोषण आहार, आरोग्य शिक्षण व इतर संदर्भिय सेवा पुरवल्या जातात असे दिसून येते.

## कुपोषण निर्मूलनासाठी उपाययोजना

१. देशाचा व राज्याचा विकासदर वाढवला पाहिजे ज्यातून आपण कुपोषण व भूक यावर मात करू शकू.
२. दारिद्र्य व कुपोषण याचा दर कमी करण्यासाठी सर्वप्रथम आपण कृषी क्षेत्रावर लक्ष केंद्रित करून देशाचे कृषिक्षेत्र बळकट केले पाहिजे. यावर विसंबून असणाऱ्यांचे प्रमाण जास्त असल्याने या गटातील लोकांच्या उत्पन्नात वाढ झाल्यास त्यांच्या पोषणात सुधारणा होऊ शकते.
३. नवीन आरोग्य धोरणाची यशस्वीपणे अंमलबजावणी करून आरोग्यावरील एकूण खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ होणे अपेक्षित आहे.
४. शैक्षणिकदृष्टया मागास भागातील युवकांना रोजगारभिमुख , अभ्यासक्रम व प्रशिक्षण देऊन त्यांना प्रशिक्षित करणे आवश्यक आहे.
५. कुपोषणाचे प्रमाण कमी करत असताना गर्भवती स्त्रियांकडे लक्ष देऊन कमी वजनाची बालके जन्म घेणार नाहीत याची काळजी घेणे.
६. आरोग्य शिक्षण व आजारी मुलांचे उपचार हे कार्यक्रम प्रत्यक्षात राबवून कुपोषण निर्मूलन कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.
७. गावागावांत जनजागृती करून बाळांचे आरोग्य, स्वच्छता, रीतीरिवाज, पूरक पोषण आहार इ.

**तक्ता क्र . ६ : अंगणवाडी केंद्रामार्फत दिल्या जाणाऱ्या विविध सेवा व लाभार्थी**

| अ.क्र. | लाभार्थी | उपलब्ध सेवा |
|---|---|---|
| १. | गरोदर व उपचार चालू असलेल्या माता, किशोरवयीन ११ ते १८ वयोगटातील मुली | १. आरोग्य तपासणी<br>२. गरोदर मातांचे धनुर्वात विरोधी लसीकरण<br>३. संदर्भ सेवा<br>४. पूरक पोषण आहार<br>५. पोषण आणि आरोग्य शिक्षण |
| २. | अन्य महिला वयोगट १५ ते ४५ वर्षे | १. पोषण आणि आरोग्य शिक्षण |
| ३. | १ वर्षाखालील बालके | १. पूरक पोषण आहार<br>२. लसीकरण<br>३. आरोग्य तपासणी<br>४. संदर्भ सेवा |
| ४. | १ ते ३ वयोगटातील बालके | १. पूरक पोषण आहार<br>२. लसीकरण<br>३. आरोग्य तपासणी<br>४. वजन मापन<br>५. संदर्भ सेवा |
| ५. | ३ ते ६ वयोगटातील बालके | १. पूरक पोषण आहार<br>२. लसीकरण<br>३. आरोग्य तपासणी<br>४. अनौपचारिक पूर्वशालेय शिक्षण<br>५. संदर्भ सेवा |

**संदर्भ :** महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन - https://wcd.nic.in-23/04/2020

बाबत सोप्या भाषेत प्रबोधन करणे अत्यंत गरजेचे आहे.

## सारांश

आंतरराष्ट्रीय अन्नधारेण संशोधन संस्थेच्या अहवालानुसार, भारतात खुंटलेल्या (स्टंटेड) बालकांचे प्रमाण सर्वाधिक ४७.९% आहे. आताची कुपोषित बालके २०३० सालापर्यंत कमावती होतील तेव्हा त्यांची उत्पादनक्षमता कमी झाल्याने देशाला ४६ अब्ज डॉलरची (किमान २३०० अब्ज रुपये) हानी सहन करावी लागणार असल्याचे 'सेव्ह द चिल्ड्रन' संस्थेच्या अभ्यासातून दिसून येते. एका दशकात एखाद्या देशाचा वृद्धिदर वर्षाला सरासरी ४% राहिला असेल तर मुलांमधील कुपोषणाचे प्रमाण वर्षाला २% या दराने कमी होणे अपेक्षित असते पण भारतात असे घडलेले

दिसत नाही. या मानकानुसार मागील १५-२० वर्षाच्या काळात कुपोषणाचे प्रमाण ३० टक्क्यांनी कमी होणे अपेक्षित होते; परंतु प्रत्यक्षात ही घट ११ ते १२ टक्केच असल्याचे आढळते. एकात्मिक बालविकास योजनेच्या माध्यमातून देशात व राज्यात राबवल्या जात असलेल्या कुपोषण निर्मूलन कार्यक्रमात अनेक त्रुटी आढळतात. त्यात अंगणवाडीत मिळणाऱ्या सुविधांचा अभाव, वजनकाटे प्रमाणित नसणे, पोषण आहाराची योग्य अंमलबजावणी न होणे, प्रशासकीय दिरंगाई, पोषण निकष व तपासण्याचा घोळ, ग्रामबालविकास केंद्राचा बोजबारा, सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे अपयश इत्यादी. महाराष्ट्रातील पर्यायाने देशातील कुपोषण निर्मूलनासाठी चतुसुत्री कार्यक्रमाची आखणी करून अंमलबजावणी बारकाईने करावी लागेल. कुपोषण निर्मूलनसंबंधी योजनांची योग्य सांगड घालावी लागेल. कुपोषण व पोषण आहारासंबंधी तात्काळ माहिती मिळवून उपाय योजावे लागतील. गरोदर व स्तनदा माता यांच्या योग्य पोषणाची काळजी घेऊन जनजागृती व माहिती तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वापर करावा लागेल. कुपोषण निर्मूलन कार्यक्रमात खाजगी संस्था व लोकसहभाग महत्त्वाचा आहे.

देशाची भावी पिढी सक्षम करण्याच्या दिशेने धोरणांची आखणी व अंमलबजावणी आवश्यक आहे. कुपोषण कमी करण्यासाठी आसिडीएस व आरोग्य विभागात आधुनिक सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतील. स्थानिक स्तरावर रोजगार निर्मिती करून सार्वजनिक वितरण व्यवस्था व आरोग्य व्यवस्था बळकट करणे आवश्यक आहे. स्त्रियांना आरोग्य शिक्षणाच्या माध्यमातून अंधश्रद्धा निर्मूलन आणि बालविवाह कमी करण्याबाबत मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्याची गरज आज निर्माण झाली आहे.

**संदर्भ सूची**


१) कॉम्रेड गोविंद पानसरे व डॉ. जे. एफ. पाटील (२०१२,१५) - 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी पर्यायी दृष्टिकोन', श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर.

२) खडसे इंदिरा, (२००१), 'अन्न व पोषणशास्त्र' हिमालया प्रकाशन, मुंबई.

३) डॉ. निमिष कपूर - 'कुपोषण से होनेवाली बिमारियाँ और उनसे बचाव', कुरूक्षेत्र जानेवारी २०२०.

४) डॉ.शाम अष्टेकर व डॉ.रत्ना अष्टेकर, 'महाराष्ट्रातील कुपोषण श्वेतपत्रिकेबद्दल काही मुद्दे,' आरोग्यविद्या.

५) राष्ट्रीय कुटुंब अहवाल सर्वेक्षण खत, २०१५-१६.

६) राठी शुभांगी, 'महाराष्ट्रातील बालमृत्युबाबत डॉ. अभय बंग समितीचा अहवाल योजना', मे २००५.

७) दैनिक लोकसत्ता, २ सप्टेंबर २०१५.

८) दैनिक पुढारी, १५ डिसेंबर २०१७.

९) दैनिक महाराष्ट्र टाइम्स, दि. २९ डिसेंबर २०१८.

१०) दैनिक सकाळ, २२ जून २०१९.

११) दैनिक महाराष्ट्र टाइम्स, ६ नोव्हेंबर २०१९.

१२) www.icds.org.in


◆

महागाई म्हणजे कायदे न करता कर आकारणे

**- मिलटन फ्राइडमॅन**

# आरोग्यसेवेचे स्वरूप आणि उत्पादन

**सतीश श्रीवास्तव** †

**प्रस्तावना**

निरोगी आणि स्वास्थ्यपूर्ण जीवन असलेला लोकांचा देश आर्थिक प्रगती करू शकतो. 'आरोग्यम् धन संपदा' हे सत्य असले तरी धन संपादनासाठीही उत्तम आरोग्याची इतर अनेक गोष्टींसह जोड हवी हे देखील खरे आहे. निरोगी आणि स्वास्थ्यसंपन्न जनता देशाचे अत्यंत महत्त्वाचे मानव संसाधन आहे. आरोग्य अर्थशास्त्राच्या काही मूलभूत संकल्पना आपल्याला समजून घ्याव्या लागतील. मुळात आरोग्य अर्थशास्त्राची सुरुवातच तशी अगदी अलीकडची म्हणता येईल. केनेथ अँरो या अर्थशास्त्रातील नोबेल प्राईझ विजेते अमेरिकन अर्थशास्त्रज्ञाने १९६३ मध्ये लिहिलेल्या 'अन्सर्टनटी अँड वेल्फेअर इकॉनॉमिक्स ऑफ मेडिकल केअर' या लेखापासून आरोग्य अर्थशास्त्राचा अर्थशास्त्रातील एक स्वतंत्र ज्ञानशाखा म्हणून अभ्यास केला जाऊ लागला. त्यामुळे त्यांच्या या लेखाचे अनन्यसाधारण महत्त्व आहे. गेल्या काही वर्षापासून भारतातही आरोग्य अर्थशास्त्राविषयी कुतूहल निर्माण झालेले आहे. विद्यापीठांच्या स्तरावर हा अत्यंत महत्त्वाचा विषय अद्याप दुर्लक्षित आहे. बोटावर मोजता येतील इतक्या कमी विद्यापीठात याविषयाच्या अभ्यासाला सुरुवात झाली आहे असे दिसते. त्यामुळे आरोग्य अर्थशास्त्रातील अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाची (विशेषत्वाने भारतीय संदर्भात) वानवा आहे. आरोग्य सेवांचे स्वरूप हे कसे आहे, त्यात आणि अन्य आर्थिक सेवांमध्ये असलेली भिन्नता कोणती आणि अर्थशास्त्रातील उत्पादनफल सिद्धांतानुसार आरोग्य सेवांच्या उत्पनाचे विश्लेषण करता येणे शक्य आहे काय हा या लेखाचा प्रतिपाद्य विषय आहे. आर्थिक वस्तू आणि सेवांचे आदानानुसार (Inputs) प्रदानामध्ये (Outputs) बदल होतात आणि त्यांचे वाढते, स्थिर आणि घटते उत्पादनफल असे मोजमाप करता येते. आरोग्य सेवांचे उत्पादनाचे या नियमानुसार विश्लेषण करता येणे शक्य आहे काय याचे विवेचन प्रस्तुत लेखात करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**आरोग्यसेवेचे स्वरूप**

केम्ब्रिज शब्दकोशानुसार आरोग्यसेवेत व्यक्तीचे शारीरिक आणि मानसिक अनारोग्य सुधारण्यासाठी जे संघटित आणि वैयक्तिक प्रयत्न केले जातात त्याचा

† सेवानिवृत्त अर्थशास्त्र विभाग प्रमुख, के.टी.एच.एम. कॉलेज, नाशिक
आजीव सभासद क्र. १७७२, भ्रमणध्वनी : ९४२२२४५८५९, ई-मेल : satish.shree@gmail.com

समावेश आरोग्यसेवेत होतो. सार्वजनिक आणि खाजगी आरोग्यसेवा आणि सुविधा (हेल्थ केअर अँड सर्व्हिसेस) हा आरोग्य अर्थशास्त्राच्या अंतर्गत अर्थशास्त्रीय सिद्धांत आणि कसोट्याच्या आधारे अभ्यासला जाणारा विषय आहे. आरोग्यसेवा सार्वजनिक आणि खाजगी या दोन्ही प्रकारे दिली जाते. सामान्यतः सार्वजनिक आरोग्यसेवा 'ना नफा' तत्त्वावर तर खाजगी आरोग्यसेवा ही 'नफा' तत्त्वावर आधारित असते. या दोहोंचा अभ्यास आरोग्य अर्थशास्त्रात होतो. आर्थिक सिद्धांत, आर्थिक चल (इकॉनॉमिक व्हॅरिएबल्स) साधनसामग्रीचा पर्याप्त उपयोग, भांडवल गुंतवणूक, किंमत धोरण इ. यांच्या साहाय्याने सार्वजनिक आणि खाजगी आरोग्यसेवेचे विश्लेषण करता येते. आरोग्यसेवांची मागणी आणि पुरवठा, त्यावर प्रभाव टाकणारे घटक, आरोग्यसेवांची उपलब्धता, आरोग्यसेवांचे उत्पादन, वितरण, त्यासाठी लागणारा खर्च, आरोग्यसेवांची बाजारपेठ, खर्च आणि लाभ गुणोत्तर, आरोग्य विमा, आरोग्यसेवा मिळण्याची संधी आणि न्याय्य वाटप (ऍक्सेस अँड इक्विटेबल डिस्ट्रिब्युशन) अशा अनेक अंगाने आरोग्य अर्थशास्त्रात अभ्यास केला जातो. आरोग्यसेवा मिळण्याचा प्रत्येकाला हक्क आहे आणि सामाजिक कल्याणाचे आणि आर्थिक प्रगतीचे ते एक महत्त्वपूर्ण साधन आहे हे एकदा लक्षात घेतल्यास आरोग्य अर्थशास्त्राचे वाढते महत्त्व लक्षात येऊ शकते.

आपल्याला किती आणि कशा प्रकारच्या दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध होतात यावर जगण्याची गुणवत्ता आणि पर्यायाने आयुष्यमान अवलंबून असते. त्यामुळे अशा आरोग्यसेवेचे आर्थिक मूल्यांकन आणि विश्लेषण आवश्यक ठरते. यातूनच आरोग्यसेवेत महत्त्वाच्या समस्यांचा शोध घेणे आणि त्यावर उपाययोजना करणे शक्य असते. दुसरे म्हणजे भारतासारख्या देशातील आरोग्यसेवेच्या क्षेत्राचा आकार प्रचंड आहे. यातील रोजगार, सेवांचे आणि वस्तूंचे उत्पादन, भांडवल गुंतवणूक, यातून मिळणारे परकीय चलन, असा मोठाच विस्तार या सेवाक्षेत्राचा आहे. अर्थशास्त्रातील सिद्धांताच्या आधारे यांचे विवेचन करणे शक्य होते. आरोग्यसेवा आणि आर्थिकवाढीचा निकटचा संबंध आहे, परंतु आर्थिक वाढ झाली किंवा निराळ्या शब्दात देशातील स्थूल राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली तर आरोग्यसेवांवरील गुंतवणुकीतही वाढ घडवून आणता येणे शक्य असते.

**आरोग्यसेवेतील निवडीचा प्रश्न**

व्यक्ती, शासन आणि आरोग्यसेवेचा पुरवठा करणाऱ्यांच्या निर्णयाचे आणि निवडीचे अर्थसिद्धांत, आर्थिक प्रतिमाने, प्रयोगसिद्ध किंवा अनुभवजन्य (इम्पिरिकल) तंत्र अशा प्रकारची आर्थिक विश्लेषणाची साधने वापरून आरोग्यसेवेच्या बाबतीत अभ्यास केला जातो. अर्थशास्त्र हे पर्यायी उपयोगाच्या पण मर्यादित साधनांच्या साहाय्याने अमर्यादित गरजा पूर्ण कशा कराव्यात या बाबतच्या माणसाच्या आर्थिक बाजूचा अभ्यास करते. मर्यादित साधने आणि अमर्याद गरजा यात संतुलन साधायचे कसे? म्हणून अर्थशास्त्रात योग्य निवड (चॉईस) करण्याचा प्रश्न निर्माण होतो, हाच आर्थिक प्रश्न होय. व्यक्तीच्या आणि देशाच्या बाबतीतही हे प्रश्न निर्माण होतात. साधने मर्यादित आणि गरजा किंवा साध्ये अमर्यादित अशा स्थितीत निवडीचा प्रश्न स्वाभाविकपणे निर्माण होतो. विकसनशील देशांच्या बाबतीत आरोग्यसेवेच्या संदर्भातही तो विशेषत्वाने निर्माण होतो, कारण अशा देशात साधनसामग्रीची कमतरता असते. या प्रश्नांची उकल करण्याचा प्रयत्न आरोग्य अर्थशास्त्र करते. परंतु त्यापलीकडे रुग्ण, डॉक्टर्स, रुग्णालये, रुग्ण सेवा इ. च्या उत्पन्न, खर्च आणि साधनसामग्रीचे वाटप व

स्वरूप यांचा विचार आरोग्य अर्थशास्त्रात होतो. अर्थव्यवस्थेत कोणत्या वस्तू आणि सेवांचे उत्पादन कुणासाठी आणि कशा पद्धतीने करायचे याचा निर्णय शासनव्यवस्थेला घ्यावा लागतो. त्यानुसार देशातील साधनांच्या वाटपाचा क्रम ठरविला जातो. आरोग्यसेवा देशातील सर्व लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी रुग्णालये, वैद्यकीय महाविद्यालये, यासाठी लागणारे प्रशिक्षित मनुष्यबळ, वैद्यकीय साधने, यंत्रसामग्री, औषधे यावरील खर्च आणि भांडवल गुंतवणूक हे सर्व आदान किंवा इनपुट असतील तर यातून होणारी आरोग्यसेवेची निर्मिती हे प्रदान किंवा आउटपुट असेल. पुन्हा यातही आरोग्यसेवेतील तातडीच्या गरजांचा विचार करणे क्रमप्राप्त ठरेल. उदा. भारतातील बालकांना पोलिओ मुक्त करणे किंवा क्षयरोग मुक्त देश करणे. यात पोलिओ डोसच्या उत्पादनाला किंवा क्षयरोगमुक्तीच्या औषधी गोळ्यांच्या उत्पादनास प्राधान्य द्यावे लागेल. शासनाच्या प्राधान्यक्रमानुसार यावर खर्च होईल. सार्वजनिक (आणि खाजगी देखील) खर्चाच्या बाबतीत एका गरजेवर खर्च याचा अर्थ दुसऱ्या अन्य गरजेवरील खर्चास एक तर कात्री लावणे वा त्यावर खर्च अजिबात न करणे. खर्च करता आला असता पण खर्च करण्याची संधी गमवावी लागली अशा खर्चास अर्थशास्त्रात संधित्याग खर्च म्हणतात. अशा खर्चाचा विचार आरोग्य अर्थशास्त्रातही केला जातो. गरजेच्या मानाने दुर्मिळ अशा वस्तू आणि सेवेला 'आर्थिक वस्तू किंवा सेवा' (इकॉनॉमिक गुड अँड सर्व्हिसेस) म्हटले जाते. अशा वस्तू व सेवेच्या उत्पादनासाठी आणि उपभोगासाठी जे निर्णय आणि निवड केली जाते त्याच्याशी आर्थिक विश्लेषण संबंधित असते. या अर्थाने आरोग्यसेवाही आर्थिक वस्तू ठरते. आरोग्यसेवा निर्माण करण्यासाठी असणारी साधनसामग्री ही मर्यादित आहे तर आपली आरोग्यसेवेची मागणी ही अमर्याद आहे.

**संधित्याग खर्च**

नव्याने निर्माण होणाऱ्या रोगांबरोबर आरोग्यसेवांच्या गरजादेखील वाढत आहे. वाढत्या पर्यावरणीय असमतोलातून आणि प्रदूषणातून आणि सामाजिक कारणामुळे नवनवीन शारीरिक आणि मानसिक रोगांच्या उत्पत्तीत भर पडत आहे. त्यामुळे आरोग्यसेवाही एक अमर्याद गरज निर्माण झालेली आहे. मर्यादित साधनांच्या साहाय्याने हा आर्थिक प्रश्न सोडविणे हा आरोग्य अर्थशास्त्राचा अभ्यास विषय आहे. एकदा आपण हे मान्य केले की आरोग्यसेवा ही आर्थिक सेवा आहे तर अर्थशास्त्रातील किती आणि कशा प्रकारे या सेवेचे उत्पादन करायचे हा प्रश्न निर्माण होतो. या सेवेचे मूल्य कोण देणार आणि याचे समतोल वाटप कशा प्रकारे करता येणार हेही प्रश्न उपस्थित होतात. यामुळे वर उल्लेख केल्यानुसार संधित्याग खर्चाचा विचार यासाठी अर्थशास्त्रात केला जातो. एका वस्तू वा सेवेवर खर्च करायचा असला तर दुसऱ्या कुठल्यातरी वस्तू वा सेवेचे उत्पादन करण्यावर पाणी सोडावे लागेल उदा. प्राथमिक शिक्षणावरील खर्चाच्या बाबतीत रोगप्रतिबंधक लसींवर आणि दुपारच्या जेवणावर खर्च करायचा झाल्यास एकावर अधिक खर्च केल्यास दुसऱ्या बाबीवरील खर्च कमी करावा लागेल, यासाठी प्राथमिकता, अनुभवजन्य निष्कर्ष आणि गरज यांचा समन्वय साधून दोन्ही गोष्टीवर खर्च करता येणे शक्य आहे काय या प्रश्नाचे उत्तर आरोग्य अर्थशास्त्र देऊ शकते.

**आरोग्य सेवा आणि आर्थिक वस्तू**

आरोग्य अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची अशी शाखा आहे की ज्यात आरोग्यसेवेच्या खर्च, लाभ, साधनसामग्रीचा वाटप व उपयोग, त्यासाठीची आदाने आणि प्रदान (इनपुट्स अँड आऊटपुट्स) इत्यादिंचा

अभ्यास केला जातो. परंतु बाजारपेठेतील नेहमीच्या मागणी-पुरवठ्याच्या कसोट्या आरोग्यसेवेला जशाच्या तशा लागू होत नाही, कारण आरोग्यसेवा जवळपास अत्यावश्यक असते. ह्यावरील खर्च हा ऐच्छिक नव्हे. आरोग्यसेवेच्या साहाय्याने आरोग्य राखता येते. आरोग्यसेवेचा हेतूच आरोग्यसंपन्नता हा आहे. त्यामुळे आरोग्याला इतर वस्तू आणि सेवांप्रमाणे आर्थिक वस्तू मानता येईल का हा प्रश्न निर्माण होतो. आरोग्यास आर्थिक वस्तू मानता आले तरच मागणी, पुरवठा इ. आर्थिक सिद्धांताच्या साहाय्याने विश्लेषण शक्य आहे. आरोग्य ही मनुष्यनिहीत वा अंतर्भूत वस्तू आहे व त्याची देवघेव करता येत नाही, परंतु आरोग्यासाठी व्यक्ती किंमत देण्यास तयार असते आणि त्याच्या वैयक्तिक कल्याणात भर पडते. आजारपण हे व्यक्तीच्या आरोग्य मागणीचे निदर्शक आहे. या अर्थाने आरोग्य ही आर्थिक वस्तू आहे असे मानल्यास इतर वस्तू आणि सेवांप्रमाणे विवेचन करता येणे शक्य आहे. अर्थात आरोग्यात सुधारणा ही प्रत्यक्ष खरेदी करता येण्याजोगी नाही तर ती आरोग्यसेवेची खरेदी करून व्यक्त होते, म्हणजेच आरोग्यसेवा ही परोक्ष मागणी ठरते. अर्थशास्त्रात केवळ इच्छेची अभिव्यक्ती म्हणजे मागणी नव्हे तर इच्छेला क्रयशक्तीची जोड असेल तरच ती प्रभावी मागणी मानली जाते. आरोग्यसेवा ही केवळ मागणी नव्हे तर गरज आहे असे मानले जात असले तरी सर्वच गरजा मागणी नसतात आणि सर्व प्रकारची मागणी ही गरज नसते. उदा. दात दुखत असेल तर दंतवैद्याच्या सेवेची मागणी निर्माण होते, पण तातडीने ती पूर्ण करणे दातदुखीच्या तीव्रतेवर अवलंबून राहील. तीव्रता कमी असल्यास दंतवैद्याकडे पेशंट जाईलच असे नाही. तसेच नैसर्गिकरीतीने अपत्य प्राप्ती करता येणे शक्य असूनही एखाद्या स्त्रीपेशंटने ती सिझेरिअन पद्धतीने व्हावी असे सांगितल्यास गरज नसताना तशा प्रकारच्या आरोग्यसेवेची मागणी निर्माण होऊ शकते. आरोग्यसेवेचा उद्देश व्यक्तीच्या आरोग्यात सुधारणा घडवून आणणे हा असतो. त्यामुळे आरोग्यसेवा उदा. इस्पितळे, औषधे, अत्यावश्यक उपकरणे, प्रशिक्षित मानव संसाधने इ. आरोग्यसेवेचा भाग आहे. परंतु आरोग्य ही व्यक्तिसापेक्ष आणि व्यक्तीच्या शरीरसंस्थेशी निगडित आणि शरीरांतर्गत स्थिती आहे आणि ती जीवनशैली, पर्यावरण, आरोग्यविषयक जाणीव, आरोग्यसेवेची उपलब्धता आणि ती मिळण्याबाबतची सुलभता (ॲक्सेस) आरोग्य सल्ला अशा अनेक घटकांवर अवलंबून असते. व्यक्तीच्या निरोगी शारीरिक अवस्थांचा किंवा निरामय आरोग्याचा संबंध थेट देशातील उत्पादकतेशी, रोजगाराशी आणि एकूणच सौख्य निर्देशांकाशी (हॅप्पीनेस इंडेक्स) शी संबंधित आहे.

### आरोग्यसेवा आणि विनिमेयता (एक्स्चेंज्याबिलिटी)

आरोग्यसेवा आणि आरोग्य यातील दुसरा महत्त्वाचा फरक म्हणजे आरोग्यसेवेची देवघेव होऊ शकते. औषधे किंवा इस्पितळातील सुविधा यांची दृश्यस्वरूपात देवघेव होते. तशी व्यक्तीच्या आरोग्याची देवघेव होत नाही. कारण ती एक अमूर्त (इंटॅनजिबल) गोष्ट आहे. तरी देखील आरोग्य ही मानवासाठी दुर्मिळ आणि अत्यावश्यक गोष्ट आहे. तसेच व्यक्तीचे शारीरिक अस्तित्व जोपर्यंत आहे तोपर्यंत ती अमर्याद स्वरूपात आणि न संपणारी अशी गरज आहे. आरोग्य ही आर्थिक वस्तू ठरते, कारण ती मानवनिर्मित आहे. त्याचा व्यक्तीच्या आणि देशाच्या कल्याणाशी संबंध आहे. आरोग्य प्राप्त करण्यासाठी लोक पैसे खर्च करण्यास तयार असतात, तसेच आरोग्य हे दुर्मिळ आहे. त्यामुळे अर्थशास्त्रीय सिद्धांत मागणी, पुरवठा, उत्पादन इ. आरोग्याला लागू पडू शकतात. आरोग्य

ही विनिमययोग्य (ट्रेडेबल) वस्तू नसल्यामुळे अर्थातच जिथे वस्तूची वा सेवेची खरेदीविक्री होते अशा बाजारपेठेच्या संदर्भात त्याचा विचार करता येत नाही, आरोग्यातील सुधारणा ही विक्रेय नाही. मात्र आरोग्यसेवा विक्रेय आहे. व्यक्तीच्या आरोग्याची मागणी अप्रत्यक्षरूपाने म्हणजेच आरोग्यसेवेच्या मागणीच्या स्वरूपात व्यक्त होते. त्यामुळे आरोग्यसेवा ही आरोग्याच्या मागणीतून निर्माण होणारी परोक्ष मागणी आहे. इतर कोणत्याही वस्तू किंवा सेवेप्रमाणे आरोग्यसेवेचेही उत्पादन होते.

**आरोग्यसेवा आणि उत्पादन फलन**

आरोग्यसेवेचा खर्च आणि पुरवठा यांचे विश्लेषण करायचे झाल्यास अर्थशास्त्रातील उत्पादनासंबंधीचे सिद्धांत उपयुक्त ठरू शकतात. आरोग्यसेवेची मागणी तसेच आरोग्यसेवा (आऊटपुट्स) आणि त्यासाठी वापरले जाणारे आदान (इनपुट्स) यातील सहसंबंधांचा विचार उत्पादन फलन (प्रॉडक्शन फंक्शन) या संकल्पनेच्याद्वारे करता येणे शक्य होते. वस्तू किंवा सेवा हवेतून निर्माण करता येत नाही. साधनसामुग्रीचा एक एकक (युनिट) वापरला असता उत्पादनात किती वाढ होईल हे उत्पादन फलाचे सिद्धांत स्पष्ट करतात. स्पर्धा, किमती, बाजाराचे स्वरूप, सरकारी धोरण यांचाही प्रभाव आणि परिणाम आदाने आणि उत्पादनावर पडतो. परंतु आरोग्यसेवेच्या बाबतीत आदाने आणि उत्पादन यांची संख्यात्मक परिमाणात मोजदाद करणे किंवा बाजारभावाने किंमत मोजता येणे शक्य असते. एक रुग्णसेविका किंवा एक डॉक्टर हॉस्पिटलमध्ये नेमला असता किती रुग्णांना त्याचा लाभ होईल. हॉस्पिटलच्या कार्यक्षमतेत आणि उत्पादकतेत त्यामुळे किती वाढ होईल, या बाबत निरनिराळे क्रमपरिवर्तन और संयोजन (परम्युटेशन अँड कॉम्बिनेशन) यांची जुळणी करता येणे शक्य असते. उदा. एक नर्स आणि एक डॉक्टर यांच्यामुळे रुग्णसेवेत होणारी वाढ किंवा एकच नर्स किंवा एकच डॉक्टर असल्यास त्यामुळे रुग्णसेवेत होणारी घट इ. त्यामुळे उत्पादन फलांच्या सिद्धांतानुसार आरोग्यसेवांच्या उत्पादनाचे विवेचन केले जाऊ शकते.

**आरोग्यसेवा आणि अनिश्चितता**

केनेथ अँरो यांच्या मते, आरोग्यसेवेचे सगळ्यात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे अनिश्चितता हे होय. अन्नधान्याची मागणी व गरज जशी निश्चित असते तशी आरोग्यसेवेची मागणी वा गरज निश्चित नसते. व्यक्तीला ती कधी आजारी पडेल हे जसे ज्ञात नसते, तसेच कोणत्या प्रकारची आणि किती किंमत देऊन त्याला आरोग्यसेवा विकत घ्यावी लागेल हेही माहीत नसते. त्याचप्रमाणे एखाद्या रोगापासूनच्या हमखास मुक्ततेची खात्री देता येत नाही. कारण व्यक्ती तितक्या प्रकृती असतात आणि प्रत्येकाची प्रकृती विशिष्ट रुग्ण सेवेला किंवा औषधोपचारास सारखाच प्रतिसाद देईल असे दिसून येत नाही. केनेथ अँरो यांच्या मते, रुग्ण हा आरोग्यसेवेच्या बाजारातील ग्राहक असला तरी बाजारातील इतर ग्राहक आणि आरोग्यसेवेचा ग्राहक यात मूलत: काही फरक असतात. पहिला म्हणजे, आरोग्यसेवेचा ग्राहक हा त्याला मिळणाऱ्या सेवेची, त्याचा वापर करण्यापूर्वी चाचणी (टेस्ट) करू शकत नाही. ह्या बाबतीत एका दुकानात वस्तू आवडली नाही तर दुसऱ्या दुकानात बघ असे करून त्याला चालत नाही. अपघात झाला तर जे सगळ्यात जवळचे इस्पितळ असेल त्यात उपचार घेणे आवश्यक ठरते. दुसरे म्हणजे आरोग्यसेवेतील ग्राहकाला (रुग्णाला) आरोग्यसेवेचा पुरवठा करणाऱ्यापेक्षा (डॉक्टरपेक्षा) अत्यल्प किंवा अजिबातच ज्ञान नसते. कारण वैद्यकीय ज्ञान हे अत्यंत गुंतागुंतीचे असते. त्यामुळे आरोग्यसेवेचा पुरवठा करणाऱ्यावर त्याला विसंबावे लागते. तसेच

आरोग्यसेवेचे उत्पादन होण्यास एखाद्या संसर्गजन्य रोगबाधित रुग्णाकडून (पुरेशा काळजी अभावी) इतर अनेक रुग्णांना बाधा होऊन मागणीत वाढ होऊ शकते. उदा. कोरोना विषाणूच्या साथीमुळे जगभर निर्जंतुक द्राव्य औषधे (सॅनिटायझर), मास्क, विलगीकरण रुग्ण कक्ष, डॉक्टर आणि रुग्णसेविका/सेवक यांच्या मागणीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

आरोग्यसेवा ही प्रामुख्याने डॉक्टरांकडून पुरवली जाते. खाजगी क्षेत्रात नफा हे व्यवसायाचे तत्त्व असले तरी सामाजिक आणि कायदेशीर आणि नैतिक नीतिनियम याचाही प्रभाव पडतो. ग्राहकाची वित्तीय नव्हे तर शारीरिक स्थिती लक्षात घेऊन वैद्यकीय उपाययोजना करावी लागते. कुठलाही रोग हा ग्राहकांची आर्थिक स्थिती बघून होत नाही. श्रीमंताला अधिक फ्लू आणि गरिबाला कमी असे होत नाही. तसेच सर्व ग्राहकांकडून एकाच प्रकारच्या रोगासाठी एकच शुल्क न आकारता आर्थिक स्थितीनुसार शुल्क आकारणी केली जाऊ शकते. अँरोच्या मते, रुग्ण आणि डॉक्टर यांच्यातील विश्वास हा सर्वाधिक महत्त्वाचा घटक आहे. कारण यातील एक घटक त्याला घ्याव्या लागणाऱ्या सेवेबद्दल अनभिज्ञ असतो.

**समारोप**

आरोग्य ही माणसाच्या अस्तित्वाशी संबंधित बाब आहे म्हणून त्याचे महत्त्वही सर्वोच्च आहे. अर्थशास्त्रातील मूलभूत सिद्धांतांची तत्त्वाच्या आधारे आरोग्यविषयक अनेक समस्यांची उत्तरे मिळू शकतात. आरोग्यसेवांचे स्वरूप इतर आर्थिक सेवांपेक्षा काहीसे निराळे असले तरी आर्थिक सिद्धांताच्या साहाय्याने आरोग्यसेवांच्या आर्थिक प्रश्नांची सोडवणूक शक्य आहे. आरोग्यसेवांचे उत्पादन फल सिद्धांताच्या आधारे विवेचन करता येणे शक्य आहे. एवढेच नव्हे तर व्यक्ती, शासन आणि आरोग्यसेवेचा पुरवठा करणाऱ्यांच्या निर्णयाचे आणि निवडीचे अर्थसिद्धांत, आर्थिक प्रतिमाने, उत्पादन, वितरण, समानता (इक्विलिटी) बाजारपेठांचे सिद्धांत, प्रयोगसिद्ध किंवा अनुभवजन्य (इम्पिरिकल) तंत्र अशा प्रकारची आर्थिक विश्लेषणाची साधने वापरून आरोग्यसेवेचा अभ्यास करता येतो.

**संदर्भ सूची:**


१. अँरो केनेथ, अन्सर्टन्टी अँड वेलफेअर इकॉनॉमिक्स ऑफ मेडिकल केअर, अमेरिकन इकॉनॉमिक रिव्ह्यू, व्हॉल्युम ५३, इश्यू ५, डिसे. १९६३, ९४१-९७३.

२. माहोरे य. रा., आरोग्याचे अर्थशास्त्र, अर्थसंवाद, ऑक्टो. ते डिसें. २०१९, खंड ४३, अंक ३.

३. मॉरीस स्टीफन, नॅन्सी डेव्हलीन इ., 'इकॉनॉमिक अन्यालीसिस इन हेल्थ केअर, विली इंडिया प्रा.लि.२०१२.

४. श्रीवास्तव सतीश, हेल्थ इकॉनॉमिक्स इन इंडिया, गुणगौरव न्यास पब्लिकेशन, नाशिक, २०१८.

५. श्रीवास्तव सतीश, भारतातील अत्यवस्थ आरोग्य व्यवस्था, लोकसत्ता, दि.२२ फेब्रु .२०१९


◆

**निवेदन : अर्थसंवाद**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्या आजीव सदस्यांना अंक मिळत नसेल किंवा पत्त्यात बदल झाला असेल तर त्यांनी प्रमुख संपादक, अर्थसंवाद यांच्याकडे तशा आशयाचे पत्र पाठवून त्या पत्रात आपला नवीन पत्ता लिहून पाठवावा; मात्र या पत्रात आजीव सदस्य क्रमांकाचा उल्लेख असणे अत्यंत गरजेचे आहे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# केंद्र सरकारचे कोरोना पॅकेज : काही अनुत्तरित प्रश्न

**विकास विनायकराव सुकाळे** †

संपूर्ण जगात कोरोनाचे संकट धुमाकूळ घालत आहे. या संकटास भारत देखील अपवाद नाही. या संकटामुळे संपूर्ण जगावर व भारतावर आर्थिक आरिष्ट येण्याची भीती आहे. कदाचित यानंतर जागतिक अर्थव्यवस्थेचे दोन भागात विश्लेषण होईल. एक म्हणजे कोरोना पूर्वीची अर्थव्यवस्था व कोरोना नंतरची अर्थव्यवस्था. भारतात कोरोनानंतर आर्थिक आरिष्ट येऊ शकते. या पार्श्वभूमीवर आर्थिक आरिष्ट टाळण्यासाठी १२ मे, २०२० रोजी भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी देशाला जवळपास २० मिनिटे संबोधित केले. या संबोधनामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारताला आत्मनिर्भर होण्याचा नवीन कार्यक्रम दिला. आत्मनिर्भर योजनेचा उद्देश केवळ कोरोनाचे आर्थिक आरिष्ट टाळणे एवढा मर्यादित नाही, तर भविष्यामध्ये भारताची वाटचाल आत्मनिर्भर किंवा स्वावलंबी होईल, असे त्यांना सुचवायचे आहे. भारताला स्वावलंबी बनण्यासाठी पंतप्रधानांनी भारतासाठी २० लाख कोटी रुपये पॅकेजची घोषणा केली. या पॅकेजच्या पार्श्वभूमीवर भारताच्या अर्थमंत्री निर्मला सीतारामन व अर्थ राज्यमंत्री श्री. अनुराग ठाकूर यांनी विविध ७ क्षेत्रातील निर्णयाची घोषणा ५ टप्प्यातं केली . हे टप्पे पुढीलप्रमाणे आहेत.

**औद्योगिक विकासाचा टप्पा**

भारताच्या औद्योगिक क्षेत्राच्या विकासासाठी अर्थमंत्र्यांनी विविध सवलती दिल्या आहेत. त्यातील ठळक मुद्दे पुढीलप्रमाणे सांगता येतील. ३१ ऑक्टोबरपर्यंत ३ लाख कोटी रुपये कर्ज वाटपासाठी बँकेमार्फत उपलब्ध होणार आहेत. विकास प्रकल्प पूर्तीसाठी ६ महिने मुदतवाढ दिली आहे. दोनशे कोटी रुपये पर्यंतचे टेंडर छोट्या उद्योगांना दिले जाईल, टीडीएसमध्ये सूट दिली आहे, उद्योगाची व्याख्या बदलली आहे. १० कोटी रुपये पर्यंत गुंतवणूक असेल तर ते लघुउद्योग आणि २० कोटी रुपयांपर्यंत गुंतवणूक असेल तर ते मध्यम उद्योग म्हणून संबोधले जातील. अशा प्रकारे उद्योगाच्या विकासासाठी विविध तरतुदी पहिल्या टप्प्यात दि.१४ मे २०२० रोजी जाहीर केल्या आहेत.

**शेतकरी व शेतमजुरांसाठी धोरण**

अर्थमंत्र्यांनी दुसऱ्या टप्प्यातील घोषणा शेतकरी व शेतमजुरांसाठी केली आहे. हा दुसरा टप्पा ३.१६

† सहयोगी प्राध्यापक व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख, पीपल्स कॉलेज, नांदेड.
आजीव सभासद क्रमांक -५२३, भ्रमणध्वनी : ९४२३३४५१४५, ई-मेल : vvsukale@gmail.com

लाख कोटीचा आहे. यात शेतकरी, मच्छिमार, पशुपालक, आदिवासी, स्थलांतरित मजूर, फेरीवाले, छोटे व्यावसायिक व मध्यमवर्गीय इत्यादींचा समावेश आहे. या सर्वांना दिलासा देण्यासाठी ९ योजना जाहीर केल्या आहेत. शेतकरी, मच्छिमार व पशुपालक यांना किसान क्रेडिट कार्डच्या माध्यमातून २ लाख कोटी रुपये सवलतीच्या दराने कर्जे उपलब्ध करून दिली जाणार आहेत. तीन कोटीची अतिरिक्त कर्जे तसेच दोन महिने मोफत धान्य दिले जाणार आहे. फेरीवाल्यांसाठी दहा हजार कोटी कर्ज वाटप ठरविण्यात आले आहे. छोटे व्यावसायिक गृहनिर्माण व मध्यम उत्पन्न गटासाठी ७० हजार कोटींची तरतूद केली आहे. ६ लाख ते १८ लाखपर्यंत उत्पन्न असणाऱ्यांसाठी क्रेडिट लिंकड सबसिडी स्किम (सीएलएसएस) राबवण्यात येणार आहे. त्याचबरोबर आवश्यक वस्तूंच्या कायद्यामध्ये ही अल्पसा बदल केला जाणार आहे. आवश्यक वस्तूंच्या कायद्यांमधील काही शेतमाल किंवा शेतीसंबंधी घटक या कायद्यामधून वगळण्यात येण्याची घोषणा केली आहे.

**कोळसा, संरक्षण व हवाई क्षेत्र**

तिसऱ्या टप्प्यामध्ये अर्थमंत्र्यांनी आर्थिक वृद्धीला चालना देऊन रोजगार निर्मिती करण्यासाठी कोळसा, संरक्षण उत्पादने आणि हवाई क्षेत्रात संरचनात्मक सुधारणा करण्यासाठी विविध तरतुदी केल्या आहेत. यात १२ विमानतळाचे खाजगीकरण केले जाणार आहे. संरक्षण क्षेत्रातील उत्पादनातील विदेशी गुंतवणूक ४९% वरून ७४% पर्यंत वाढवली आहे आहे. शस्त्रास्त्र आयातीवर निर्बंध घालण्यात येतील. कोळसा खाणीचे खाजगीकरण करण्यात येईल. पाच लाख हेक्टरवर ३३७६ औद्योगिक वसाहती अथवा एसईझेड निर्माण केले जाईल. अशा प्रकारे उद्योगासाठी विविध प्रकारच्या तरतुदी जाहीर केलेल्या आहेत.

**मजूर व मनरेगासाठी तरतुदी**

चौथ्या व पाचव्या टप्प्यामध्ये स्थलांतरित मजूर व मनरेगांसाठी विविध तरतुदी सुचविल्या आहेत. स्थलांतरित मजूर व मनरेगासाठी ४० हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. लॉकडाऊनमुळे बेरोजगार झालेल्या मजुरांना त्यांच्या गावात रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून चाळीस हजार कोटी रुपये तरतूद केली आहे. या पाचव्या टप्प्यात मनरेगा सुधारणा, आरोग्य, शिक्षण, व्यापार, उद्योग व कंपनी कायदा दुरुस्ती, सार्वजनिक उपक्रम, व्यवसाय सुलभता, राज्यांचे आर्थिक स्त्रोत वाढवणे इत्यादींचा समावेश आहे.

एकंदरीत केंद्र सरकारने कोरोनामुळे निर्माण होणारे आर्थिक आरिष्ट कमी करण्यासाठी २० लाख कोटींची तरतूद केली आहे. या २० लाख कोटी रुपयांचा तपशील पुढीलप्रमाणे सांगता येईल. पॅकेजच्या पहिल्या टप्प्यामध्ये ५.९४ लाख कोटी, दुसऱ्या टप्प्यात ३.१ लाख कोटी, टप्पा तीन मध्ये १.५ लाख कोटी आणि टप्पा चार व पाच मध्ये ४८ हजार १०० कोटी अशी तरतूद सांगितली आहे. याच पॅकेजमध्ये पूर्वीच्या काही योजनांचा समावेश आहे. २२ मार्चपासून कर बुडवल्याप्रकरणी सात हजार ८०० कोटी रुपये तरतूद केली होती. प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना १.७ लाख कोटी, आरोग्य कार्यक्रमासाठी १५ हजार कोटी व रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या घोषणेप्रमाणे ८.१ लाख-कोटी. अशाप्रकारे एकूण २० लाख कोटी रुपये पॅकेजचा तपशील आहे. केंद्र सरकारने कोरोनाचे आरिष्ट टाळून त्यानंतर येणारी मंदी दूर करण्यासाठी वरील प्रकारचे उपाय सुचवले आहेत. या उपायांचे स्वागतच आहे. यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत सुधारणा होणार आहे .

**काही अनुत्तरित प्रश्न**

केंद्र सरकारच्या कोरोना पॅकेजचा अर्थशास्त्रीय

पातळीवर विचार केला असता काही प्रश्न निर्माण होतात, त्यांची चर्चा पुढीलप्रमाणे केली आहे .

**पॅकेजसाठी लागणारी रक्कम कशी उभा करणार?**

आत्मनिर्भर भारत योजनेसाठी रक्कम कोठून उभा करणार किंवा उत्पन्नाचे मार्ग कोणते असणार, याविषयी अर्थमंत्र्यांनी कोठेही उल्लेख केला नाही. यामध्ये असाही एक विचार आहे की, वर्ष २०२०-२१च्या केंद्रीय अर्थसंकल्पाची रक्कम या पॅकेजसाठी वापरली जाणार आहे; परंतु अशा प्रकारचा बदल संसदेच्या परवानगीशिवाय करता येत नाही. जर तो बदल केला तर हा बदल घटनाबाह्य ठरेल. मागील तीन वर्षांपासून आपले स्थूल राष्ट्रीय उत्पादनाचा (GDP) दर घसरत आहे. या परिस्थितीमध्ये हा निधी कोठून उपलब्ध होईल हे स्पष्ट करावयास हवे होते. २०२०-२१ च्या अर्थसंकल्पाचा विचार केला तर एक लाख ७० कोटी रुपये तरतुदीचा या पॅकेजमध्ये समावेश आहे. मग हे पॅकेज बजेटपेक्षा वेगळे आहे हे की, २०२०-२१ च्या अर्थसंकल्पातील तरतुदी वेगळ्या प्रकारे सांगितल्या आहेत हे स्पष्ट होत नाही. सध्या सरकारची वित्तीय तूट वाढत आहे त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारातून कर्ज घेऊन निधी उभा करावा लागेल असे वाटते.

**यास पॅकेज म्हणता येईल काय ?**

केंद्र सरकारने जाहीर केल्याप्रमाणे २० लाख कोटी रुपयांचे विविध योजनांद्वारे व राज्य सरकारला वाटप होणार नाही. अर्थमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे या योजना भविष्यात राज्य सरकारने राबवल्या तर त्यावर किती रुपये खर्च येईल अशा प्रकारचे पॅकेज आहे. जर राज्य सरकारने या पॅकेजची अंमलबजावणी केली नाही तर केंद्र सरकारचा कोरोना आरिष्ट कमी करण्यासाठी सांगितलेल्या बाबींवर खर्च होणार नाही. त्यामुळे यामध्ये महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, केंद्र सरकार, राज्य सरकारला विविध घटकांच्या विकासासाठी पैसे वाटप करणार नसेल तर यास पॅकेज कसे म्हणता येईल.

**आत्मनिर्भरता कशी साध्य करणार?**

आपण १९९१ पासून खाजगीकरणाचाही मार्ग स्वीकारला आहे. या पॅकेजद्वारे केंद्र सरकारने कोळसा व संरक्षणातील परकीय गुंतवणूक वाढवली आहे. केंद्र सरकारने जाहीर केल्याप्रमाणे आत्मनिर्भरता हे उद्दिष्ट समोर ठेवून देशाला लागणाऱ्या वस्तूचे देशांमध्ये उत्पादन करावे असे अभिप्रेत आहे. ही आत्मनिर्भरता कशी साध्य करणार याचे स्पष्ट विश्लेषण सरकारने द्यावयास हवे होते. समजा, आपण परकीय व्यापार मर्यादित केला किंवा आपण आयात कमी केली तर हे धोरण डब्ल्यूएचओ ला मान्य होईल का? हाही विचार येथे करावयास हवा. आज आपण अनेक वस्तू विदेशातून आयात करतो मग ही आयात बंद होणार का? इत्यादीचे अधिक स्पष्टीकरण करणे आवश्यक आहे.

**आवश्यक वस्तू कायदा पूर्ण रद्द करायला हवा**

सरकारने आवश्यक वस्तू कायद्यामधील काही भाग म्हणजे शेती संबंधित काही वस्तू वगळणार असल्याचे जाहीर केले आहे. परंतु काही अल्पवस्तू आवश्यक वस्तू कायद्यातून वगळणे पुरेसे नाही तर संपूर्ण कायदाच रद्द होणे आवश्यक आहे.

स्वातंत्र्यापूर्वी १३ सप्टेंबर १९४६ रोजी आवश्यक पुरवठा अध्यादेश ब्रिटिश सरकारने काढला. पुढे या अध्यादेशाला १९४८ व १९४९ मध्ये मुदतवाढ मिळाली. शेवटी तिसरी घटनादुरुस्ती करून १ एप्रिल १९५५ मध्ये आवश्यक वस्तू कायदा भारतात मंजूर झाला. या कायद्यामध्ये आवश्यक वस्तूंची व्याख्याच दिलेली नाही. सरकारचे अधिकारी किंवा सरकारचे मंत्री यांना वाटतील त्या वस्तूंचा समावेश या कायद्यामध्ये करण्याची तरतूद आहे. या कायद्यात

शेतीसंबंधी वस्तू अधिक आहेत. आजघडीला जवळपास २००० वस्तूंचा समावेश या कायद्यात केला आहे. यामध्ये सर्वाधिक वस्तू शेतीसंबंधित आहेत. या कायद्यामुळे शेतमालाचे उत्पादन, वहन, वितरण इ. यावर अनेक निर्बंध येत आहेत. तर दुसऱ्या बाजूला औषधासारख्या अतिमहत्त्वाच्या वस्तूंचा समावेश या कायद्यामध्ये केलेला नाही. शेतीसंबंधी वस्तू अधिक असल्यामुळे सरकार या कायद्याचा उपयोग करून शेतमालाच्या उत्पादनावर, किमतीवर व वितरणावर विविध बंधने आणत आहे. आवश्यक वस्तू कायद्यामुळे शेतकऱ्याला स्वतःच्या शेतमालाचे उत्पादन करणे, वहन करणे, किंमत ठरवणे, वितरण करणे इ. चे स्वातंत्र्य नाही. मूळघटनेमध्ये नववे परिशिष्ट नाही. घटनादुरुस्ती करून नववे परिशिष्ट निर्माण केले. या परिशिष्टात जे कायदे आहेत त्या कायद्याच्या विरोधात सर्वोच्च न्यायालयामध्ये दाद मागता येत नाही, अशी तरतूद करण्यात आली. अशा प्रकारच्या बेड्या या कायद्याने शेतकऱ्यांच्या पायात घातलेल्या आहे. यापूर्वी सरकारने या आवश्यक वस्तू कायद्यामधून काही वस्तू वगळल्या होत्या. परंतु पुन्हा त्या वस्तूंचा त्यामध्ये समावेश केला. शेतकऱ्याला उत्पादनाचे आणि वितरणाचे स्वातंत्र्य द्यायचे असेल तर आवश्यक वस्तू कायदा हा संपूर्णपणे रद्द करणे आवश्यक आहे. सरकारने २०२२ पर्यंत शेतीचे उत्पादन दुप्पट करू असे म्हटले आहे. परंतु या उत्पादन वाढीचा शेतकऱ्यांना काहीच आर्थिक फायदा होणार नाही. या उत्पादन वाढीमुळे शेतकऱ्याचे पैशातील उत्पन्न वाढत नाही. केवळ शहरी मतदारांना खूश करण्यासाठी या कायद्याचा वापर होत आहे असे जाणवते. जर शेतकऱ्यांचे पैशातील उत्पन्न वाढले तर त्याचा फायदा शेतीचा विकास होण्यासाठी होईल. म्हणून जर शेतीचा संपूर्ण विकास करावयाचा असेल तर आवश्यक वस्तूचा कायदा संपूर्णपणे रद्द होणे आवश्यक आहे.

**श्रमिकांकडून वस्तूंना मागणी वाढायला हवी**

केंद्र सरकारच्या मताप्रमाणे उद्योगांमधून मजुरांना कमी केले जाणार नाही. अशाच प्रकारचे मत सुप्रीम कोर्टाचे आहे. आता प्रश्न असा आहे की, सरकारने आत्मनिर्भर या पुनर्रचना कार्यक्रमात खासगीकरणाचा पुरस्कार केला आहे. मग यामध्ये एखाद्या क्षेत्रात सार्वजनिक क्षेत्रातील एखादा उद्योग टिकून राहिला तरी चालेल आणि बाकीचे उद्योग खासगी क्षेत्रात देण्यास हरकत नाही, अशी सरकारची भूमिका आहे. जेथे सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग राहणार नाहीत, तेथे मजुरांना काम कसे मिळेल, हे मजूर बेरोजगार होतील. सरकारने तर सांगितले आहे की, मजुरांना कामावरून काढू नका पण उद्योग नसतील तर काम कसे मिळेल, याबाबत स्पष्टता हवी. जोपर्यंत श्रमिकांना काम मिळणार नाही तोपर्यंत त्यांचे उत्पन्न वाढणार नाही आणि उत्पन्न वाढल्याशिवाय त्यांची वस्तूंना असणारी मागणी वाढणार नाही. कारण खाजगी क्षेत्र अपेक्षित नफा मिळणार असेल तरच गुंतवणूक करते आणि त्यामुळे रोजगार निर्माण होतो.

**केवळ निमित्त कोरोनाचे?**

सध्याच्या केंद्र सरकारने सुरुवातीपासून अनेक महत्त्वपूर्ण योजना राबविण्यास सुरुवात केली आहे. उदाहरणार्थ- मेक इन इंडिया, मेड इन इंडिया, स्टार्ट अप योजना. अनेक योजना सरकारने सुरू करून खासगीकरणाला प्रोत्साहन दिले आहे. सध्या सरकारने जे कोरोणाचे पॅकेज दिले आहे त्याद्वारे सरकार आपल्या पूर्वीच्या विविध योजना राबवू इच्छित आहे. खरे तर या योजना आणि कोरोणा यांचा संबंध जुळतो का ते पाहिले पाहिजे. सरकारच्या पॅकेजमुळे अर्थव्यवस्थेवरील कोरोनाचे आरिष्ट लगेच कमी होणार आहे काय? या प्रश्नाचे उत्तर नकारार्थीच येईल. कारण अर्थमंत्र्यांच्या

मतानुसार हे पॅकेज पूर्ण होण्यासाठी किमान २ ते ३ वर्षाचा कालावधी लागू शकेल. यावरून सरकार आपला पूर्वीचा अजेंडा कोरोनाचा उपयोग करून राबवू पाहत आहे असे वाटते.

**सारांश**

शेवटी अर्थव्यवस्थेचा विकास होणे आवश्यक आहे. अर्थव्यवस्थेसाठी आलेले आर्थिक आरिष्ट कमी होणे आवश्यक आहे. सध्या लोकांचे उत्पन्न कमी झाल्यामुळे सर्वसामान्य लोकांची मागणी वाढवणे आवश्यक आहे. जोपर्यंत मागणी वाढणार नाही, तोपर्यंत विकासाचे चक्र फिरणार नाही. सध्या एक ते दोन महिन्यांत कोरोना संपुष्टात येईल, अशी अशा आहे. यानंतर लगेच लोकांना काम मिळणे आवश्यक आहे. काम मिळाले तरच त्यांची वस्तूसाठी असलेली मागणी वाढेल. यामुळे वस्तूंची विक्री होईल हा विचार करता दीर्घकालीन विकास योजना सोबत अल्पकालीन विकास योजना राबवणे आवश्यक आहे. कदाचित केंद्रसरकारने या उद्देशानेच २० लाख कोटींचे आर्थिक पॅकेज जाहीर केले असेल. या पॅकेजमध्ये काही त्रुटी वाटतात. त्या दुरुस्त होणे आवश्यक आहे. केंद्र सरकारचे पॅकेज जीडीपीच्या केवळ १.६% आहे. हा खर्च वाढून जीडीपीच्या १०% पर्यंत असावा असे वाटते. प्रत्यक्षात२० लाख कोटी रुपये पैकी ३ लाख २२ हजार कोटी ₹ खर्च होणार आहेत. उर्वरित रक्कम पूर्वीच्या विविध योजनांची आहे, अशा प्रकारची टीका होत आहे. याच बरोबर केंद्र सरकारने खाजगी क्षेत्राला सार्वजनिक क्षेत्राच्या बरोबरीने स्थान दिले आहे. किंबहुना सार्वजनिक क्षेत्रापेक्षा खाजगी क्षेत्राला अधिक महत्त्व दिले आहे. अर्थव्यवस्थेमध्ये स्पर्धा हवी असेल तर सार्वजनिक क्षेत्र असणे आवश्यक आहे. ते पूर्णपणे बंध करून चालणार नाही. आवश्यक वस्तू कायद्यामध्ये केलेली दुरुस्ती ही अतिशय अल्प प्रमाणामध्ये आहे. आवश्यक वस्तूकायद्यात दुरुस्ती करण्याऐवजी हा कायदाच संपूर्णपणे रद्द करणे आवश्यक आहे तरच शेतकऱ्यांना उत्पादन वाढीचा फायदा होईल. कोरोनामुळे आलेले आर्थिक आरिष्ट लवकर संपुष्टात येणे आवश्यक आहे. परंतु पॅकेजचा उपयोग होऊन हे आरिष्ट लवकर संपेल, असे वाटत नाही. कारण हे पॅकेज राज्य सरकारने राबवायचे आहे. राज्य सरकारने योग्य प्रतिसाद दिला नाही तर या पॅकेजची उपयोगिता असा राहणार नाही. सर्वांचे प्रयत्न देशाचा विकास होण्यासाठीच आहेत. शेवटी देश म्हणजे देशातील माणसे व देशाचा विकास म्हणजे लोकांचा विकास. हा विकास देशातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचला तरच आर्थिक विकास झाला असे म्हणता येईल. या हा विकास देशातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचेल अशी अपेक्षा करू या.

**संदर्भ**


- १३ मे,२०२० - लोकसत्ता, The Tribune, The Economic Times, Financial Express.
- १४ मे,२०२० - लोकसत्ता, लोकमत, The Economic Times, The Indian Express.
- १५ मे,२०२० - सकाळ, लोकसत्ता, The Economic Times, Financial Exphttps://m.youtuberess.
- १६ मे, २०२० -लोकसत्ता, The Economic Times, Financial Express.
- १७ मे, २०२० - लोकसत्ता, The Indian Express, The Economic Times.
- https://m.marathi.thewire.in- 05/05/20
- https://m.youtube.com-06/05/20
- https://www.esakal.com-15/05/20
- https://www.agrowon.com-20/05/20


◆

# आर्थिक पाहणी अहवाल २०१९-२० : चिकित्सक आढावा

**राहुल शं. म्होपरे** †

**प्रस्तावना**

अर्थसंकल्प सादर करण्याच्या पूर्वसंध्येला म्हणजेच ३१ जानेवारी, २०२० रोजी केंद्रीय अर्थ व वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी संसदेत वर्ष २०१९-२० चा आर्थिक पाहणी तथा सर्वेक्षण अहवाल संसदेत सादर केला. सदर आर्थिक पाहणी अहवाल केंद्र सरकारचे मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. कृष्णमूर्ती सुब्रह्मण्यम यांच्या नेतृत्वाखाली व मार्गदर्शनाखाली तयार करण्यात आला. शिकागो विद्यापीठातून वित्तीय अर्थशास्त्रामधून विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्राप्त करणाऱ्या डॉ. सुब्रह्मण्यम यांची गणना जगातील उच्चस्तरीय बँकींग कार्पोरेट गव्हर्नन्स आणि इकॉनॉमिक पॉलिसी तज्ज्ञांमध्ये केली जाते. आर्थिक पाहणी अहवालाच्या ऋणनिर्देशनाच्या पहिल्या ओळीतच डॉ.सुब्रह्मण्यम यांनी हा अहवाल म्हणजे सांघिक कामाचे फलित आहे, असे नमूद करून आपल्या सर्व सहकाऱ्यांच्या योगदानाप्रति आदर व्यक्त केलेला आहे. प्रस्तुत आर्थिक पाहणी अहवाल दोन खंडामध्ये विभागला गेला आहे. तसेच सांख्यिकी परिशिष्टे स्वतंत्ररित्या दिलेली आहेत. विविध स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी, आर्थिक प्रश्नांचे अभ्यासक, संशोधक, राजकीय व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, जागरूक नागरिक तसेच विद्यार्थी असे समाजातील सर्वच घटक आर्थिक पाहणी अहवालाच्या सादरीकरणाची व प्रसिद्धीची अतिशय आतुरतेने वाट पाहत असतात. कारण या अहवालाद्वारे मागील आर्थिक वर्षात देशाची नेमकी स्थिती काय होती याची सहज कल्पना येते. थोडक्यात, हा अहवाल म्हणजे देशाच्या सरलेल्या आर्थिक वर्षाचा आरसा असतो. सदर अहवाल अर्थव्यवस्थेच्या विविध पैलूंचे वास्तवचित्र सांख्यिकी, आलेख आणि विश्लेषणाच्या माध्यमातून सर्वांसमोर ठेवत असतो. या अहवालाची तयारी साधारणत: तीन ते चार महिन्यांपासून चालू असते. सदर अहवालातील माहिती तज्ज्ञ संशोधक व कुशल अन्वेषकांच्या माध्यमातून विशिष्ट संशोधन पद्धतीचा आधार घेऊन जमा केली जाते. त्यामुळे हा अहवाल विश्वसनीय मानला जातो. प्रस्तुत लेखात लेखकाने वर्ष २०१९-२० च्या आर्थिक पाहणी अहवालातील काही महत्त्वाचे पैलू चिकित्सकरित्या मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

† सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग (पदवी व पदव्युत्तर) देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता.कागल, जि.कोल्हापूर.
आजीव सभासद क्र. ११९४, भ्रमणध्वनी : ९९२३८७९०२०, ई मेल : rahulmhopare@rediffmail.com

## आर्थिक पाहणी अहवाल - अंतरंग

२०१९-२० चा आर्थिक पाहणी अहवाल 'संपत्ती निर्मिती' या संकल्पनेवर आधारित असून तो दोन खंडामध्ये विभागला असून त्याबाबतचे विश्लेषण खालीलप्रमाणे देता येते. जुन्या आणि नव्या कल्पनांच्या संगमांचे प्रतीक म्हणून या अहवालाच्या मुखपृष्ठासाठी फिकट जांभळा रंग वापरला आहे.

### १. आर्थिक पाहणी अहवाल - खंड १

सदर अहवालाचा पहिला खंड हा एकूण २९८ पृष्ठांचा असून तो ११ प्रकरणांमध्ये विभागला आहे. पहिले प्रकरण संपत्ती निर्मितीवर (Wealth Creation: The Invisible Hand Supportd By the Hand of Trust)आधारित असून यामध्ये गुंतवणुकीमध्ये वाढ करून संपत्ती निर्माण करण्याचे नमूद केले आहे. यासाठी जुनी प्राचीन भारतीय संस्कृती आणि नवीन भारतीय सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे एकत्रीकरण करून संपत्ती निर्माण करू शकणाऱ्या अदृश्य घटकांना मजबूत करणे आवश्यक आहे, असे नमूद केले आहे. उदा. रोजगार निर्मितीसाठी व्यापार, नवीन प्रवेश करणाऱ्यांना समान संधी इ. दुसरे प्रकरण संयोजक आणि संपत्ती निर्मिती (Enterpreneurship and Wealth Creation At the Grassroots) यावर आधारित असून यामध्ये कामगार वर्गातील संयोजकत्व, स्पर्धात्मक बाजारासाठी उद्योगपूरक धोरण, बाजाराला कमकुवत करणाऱ्या धोरणांना नष्ट करणे अशा प्रकारच्या विविध माध्यमांद्वारे संपत्ती निर्मितीचे धोरण राबविले पाहिजे, असे नमूद केले आहे. तिसरे प्रकरण हे 'उद्योगपूरक विरुद्ध बाजारपूरक' (Pro-Business Versus Pro-Crony) या आशयाचे असून भारताला ५ ट्रिलियन अमेरिकन डॉलरची अर्थव्यवस्था बनविण्यासाठी अधिकच्या उद्योगपूरक धोरणांची गरज असून बाजारपूरक धोरणांचा त्याग करणे गरजेचे असल्याचे नमूद केले आहे. चौथे प्रकरण बाजारव्यवस्थेला धोका (Undermining Markets : When Govt. Intervention Hurts More That it Helps) यावर आधारित असून बाजारामधील सरकारने हस्तक्षेपी भूमिका मर्यादित करावी, असे अहवालात नमूद केले आहे. याबरोबरच सरकारच्या हस्तक्षेपी भूमिकेमुळे बाजारावर ऋणात्मक परिणाम कसा झाला आहे याची उदाहरणे सुद्धा दिलेली आहेत. त्यामुळे सरकारने विशिष्ट बाजारांच्या बाबत हस्तक्षेपी भूमिकेची गरज आहे किंवा नाही याबाबत निर्णय घ्यावा. पाचवे प्रकरण रोजगार निर्मिती आणि साखळी उत्पादनांच्या निर्यातीचे विशेषीकरण (Creating Jobs and Growth by Specializing to Exports in Network Products) यावर आधारित असून भारताचा निर्यात हिस्सा २०२५ मध्ये ३.५% तर २०३० मध्ये ६% पर्यंत वाढविण्याचे नमूद केले आहे. तसेच याच कालावधीत अनुक्रमे ४ कोटी आणि ८ कोटी रोजगार निर्मितीची अपेक्षा व्यक्त केली आहे. यासाठी निर्यातीबाबतचे चीनचे धोरण अवलंबिले जावे, असे देखील नमूद केले आहे. सहावे प्रकरण उद्योग सुलभतेवरील लक्ष केंद्रीकरण (Trageting Ease of Doing Business) यावर आधारित असून यामध्ये अहवालात असे नमूद केले आहे की, जागतिक बँकेच्या अहवालानुसार, उद्योग सुलभतेमध्ये २०१४ साली भारताचा जगात १४२ वा क्रमांक होता त्यामध्ये ७९ अंकांची प्रगती होऊन २०१९ मध्ये भारत ६३व्या क्रमांकावर आले आहे. तरीदेखील आजही कर, मालमत्तेची नोंदणी यासारख्या विविध घटकांबाबत अजूनही अर्थव्यवस्थेला अडचणींचा सामना करावा लागत आहे. अर्थव्यवस्थेतील पर्यटन क्षेत्र, उत्पादन क्षेत्र यांसारख्या क्षेत्रांवर उद्योग सुलभतेच्या अनुषंगाने अधिक लक्ष केंद्रित करण्याची गरजदेखील अहवालात नमूद केली आहे. सातवे प्रकरण हे बँक राष्ट्रीयीकरणाच्या सुवर्ण महोत्सवावर (Golden Jubillee of Bank Nationalisation) आधारित असून यामध्ये असे

नमूद केले आहे की, २०१९ हे वर्ष बँक राष्ट्रीयीकरणाचे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या वृद्धिदरांच्या प्रमाणात भारतीय बँकींग क्षेत्राची वृद्धी होत नसल्याचे अहवालात नमूद केले आहे. आजपावेतो जगातील उत्कृष्ठ १०० बँकांमध्ये भारताची एकमेव बँक आहे. वर्ष २०१९ मध्ये सार्वजनिक क्षेत्रातील बँकेमध्ये गुंतविलेल्या १ रुपयाचा सरासरी २३ पैसे तोटा झालेला आहे. त्यामुळे अहवालात असे नमूद केले आहे की, सार्वजनिक क्षेत्रातील बँका अधिक कार्यक्षम करणे गरजेचे आहे. आठवे प्रकरण हे बिगर बँकींग वित्तीय संस्था क्षेत्रातील वित्तीय कमकुवतपणा (Financial Fragility in The NBFC Sector) यावर आधारित असून यामध्ये गृह वित्तीय संस्था (HFCS) आणि बिगर बँकींग वित्तीय संस्था (NBFC) यामधील फरक नमूद केला आहे. तसेच धोका नष्ट करण्यासाठी संकल्पनात्मक आखणी, धोरण, परिणाम इ. बाबतची माहिती दिलेली आहे. आर्थिक पाहणी अहवालातील नववे प्रकरण हे खाजगीकरण आणि संपत्ती निर्मिती (Privatization And Wealth Creation) या शीर्षकाचे असून यामध्ये खाजगीकरणाच्या माध्यमातून रोजगार आणि संपत्ती निर्मितीला चालना दिली जाऊ शकते, असे नमूद केले आहे. व्यूहरचनात्मक निर्गुंतवणुकीमुळे (Strategic disinverstment) भारतात BPCLच्या माध्यमाने ३० हजार कोटी रु.ची संपत्ती निर्माण झाली आहे. सामूहिकरित्या निव्वळ नफा, निव्वळ मूल्य, मत्तेचा परतावा यामध्ये देखील लक्षणीय प्रगती झाल्याचे अहवालात सांगितले आहे. उच्च नफ्यासाठी अधिक जोरकसपणे निर्गुंतवणुकीकरण करण्याचा सल्ला अहवालाच्या या प्रकरणात देण्यात आला आहे. अहवालातील दहावे प्रकरण हे भारतात स्थूल देशांतर्गत उत्पादनाचा दर वाढवून सांगितला जातोय काय? नाही, (Is India's GDP Growth Rate Overstated? No!) या शीर्षकाचे असून यामध्ये स्थूल देशांतर्गत उत्पादन चुकीच्या पद्धतीने वर्तविले आहे का? निदानात्मक विश्लेषण इ. बाबत सविस्तर ऊहापोह केलेला आहे. आर्थिक पाहणी अहवालाच्या पहिल्या खंडातील शेवटचे अकरावे प्रकरण हे थालीनॉमिक्स (थाळीचे अर्थशास्त्र) (Thalinomocs - The Economics of Plate of Food in India) या शीर्षकाचे असून सदर प्रकरणाच्या आधारे भारतात महागाई घटल्याचा निर्वाळा देण्याचा प्रयत्न सरकारने केल्याचे दिसून येते. थालीनॉमिक्स ही संकल्पना पहिल्यांदाच सर्वांसमोर मांडण्यात आली आहे. थालीनॉमिक्सनुसार २००६-०७ च्या तुलनेत २०१९-२० मध्ये भोजनाची शाकाहारी थाळी २९% आणि मांसाहारी थाळी १८% नी स्वस्त झाल्याचे अहवालात नमूद केले आहे. तसेच या स्वस्ततेमुळे कष्टकऱ्याचा वार्षिक फायदा १०,८८७ ते ११,७८७ रुपयांच्या दरम्यान असल्याचा दावा देखील अहवाल करण्यात आला आहे.

**२. आर्थिक पाहणी अहवाल - खंड २**

प्रस्तुत अहवालाच्या दुसरा खंड हा एकूण ३२० पृष्ठांचा असून तो एकूण १० प्रकरणांमध्ये विभागला गेला आहे. यामधील पहिले प्रकरण अर्थव्यवस्थेचा आढावा (State of The Economy) या शीर्षकाचे आहे. या प्रकरणात २०१९-२० मधील जागतिक अर्थव्यवस्था, भारतीय अर्थव्यवस्था, मंदीची सद्यस्थिती अशा घटकांचे सांख्यिकीच्या व आलेखांच्या आधारे विश्लेषण केलेले आहे. दुसरे प्रकरण वित्तीय विकास (Fiscal Development)या शीर्षकाचे आहे. सदर प्रकरणात केंद्र राज्य वित्तीय साधने, संयुक्त वित्तीय साधनांचा आढावा घेण्यात आलेला आहे. अहवालातील तिसरे प्रकरण बाह्य क्षेत्रावर (External Sector) आधारित असून यामध्ये भारताचा व्यवहारतील, चालू खात्यामधील तूट, प्रत्यक्ष

विदेशी गुंतवणूक, बाह्य व्यापारी कर्जे त्याच्या पद्धती, निव्वळ आंतरराष्ट्रीय गुंतवणूक स्थिती अशा विविध पैलूंचा सविस्तर आढावा घेतलेला आहे. चौथे प्रकरण मौद्रिक व्यवस्थापन आणि वित्तीय मध्यस्थी (Monetary Management and Financial Intermediation) यावर आधारित असून यामध्ये २०१९-२० मध्ये झालेला मौद्रिक विकास, रोख राखीव स्थिती आणि त्याचे व्यवस्थापन, बँकींग क्षेत्र, बिगर बँकींग वित्तीय संस्था, भांडवल बाजाराचा विकास, विदेशी गुंतवणूकदारांची गुंतवणूक स्थिती, विमा क्षेत्र यांसारख्या घटकांचा ऊहापोह केल्याचे दिसून येते. वर्ष २०१९-२० मध्ये अल्प वृद्धिदर आणि अल्प भाववाढ यामुळे रेपो दरात ११० बेसीस अंकांनी घट केली आहे. अहवालातील पाचवे प्रकरण किमती आणि भाववाढ (Prices and Inflation) या शीर्षकाचे असून यामध्ये भाववाढीचा सध्याचा कल, देशातील भाववाढ स्थिती, कच्चे तेल आणि इंधन भाववाढ, औषधांच्या किमती, अन्न भाववाढ, जीवनावश्यक वस्तुंच्या किमतीत होणारे चढउतार, जागतिक स्तरावर वस्तूंच्या किमतीचा कल यांसारख्या विविध घटकांवर सांख्यिकी व आलेखांच्या माध्यमातून प्रकाश टाकला आहे. २०१८-१९ च्या तुलनेत २०१९-२० ग्राहक किंमत निर्देशांकात ०.४%नी वाढ झाल्याचे सांगून तो ३.७% वरून ४.२% वर गेल्याचे नमूद केले आहे. याउलट घाऊक किंमत निर्देशांक ४.७% (२०१८-१९) वरून १.५% (२०१९-२०) पर्यंत घटला आहे. प्रस्तुत खंडातील सहावे प्रकरण हे चिरंजीवी विकास आणि वातावरणीय बदल (Sustainable Development and Climate Change) या शीर्षकाचे असून यामध्ये वातावरणीय बदल, आंतरराष्ट्रीय स्तरावर भारत करत असलेले प्रयत्न, भारतातील जंगले, पुढील दिशा अशाप्रकारच्या विविध घटकांवर लक्ष केंद्रित केल्याचे दिसून येते.

अहवालातील सातवे प्रकरण हे शेती आणि अन्न व्यवस्थापन (Agriculture and Food Management) या आशयाचे असून या प्रकरणात शेतीचा आढावा, किमान आधारभूत किमती, सूक्ष्म जलसिंचन, शेती कर्ज, पीक विमा, शेती व्यापार, शेती संशोधन आणि शिक्षण, शेती आधारित व्यवसाय, अन्नप्रकिया, उद्योग, खते, अन्न व्यस्थापन अशा नानाविध बाबींवर सांख्यिकी व आलेखांच्याद्वारे प्रकाश टाकलेला आहे. आठवे प्रकरण उद्योग आणि पायाभूत सुविधा (Industry and Infrastructure) या शीर्षकाचे असून यामध्ये भारतातील औद्योगिक क्षेत्राचा कल, पायाभूत सुविधा, क्षेत्रीय विकास, पुढील दिशा यांसारख्या घटकांना अनुसरून विश्लेषण केलेले आहे. अहवालानुसार २०१८-१९ (५%)च्या तुलनेने २०१९-२० मध्ये भारताच्या औद्योगिक क्षेत्रात ०.६%नी वृद्धी झाली आहे. खतनिर्मितीमध्ये ४%, स्टीलमध्ये ५.२% पर्यंत वृद्धी झाल्याचे नमूद केले आहे. वर्ष २०२० ते २०२५ दरम्यान राष्ट्रीय पायाभूत पाईपलाईन प्रकल्पासाठी १०२ लाख को. रु. खर्च करण्यात येणार असल्याचे या प्रकरणात नमूद केले आहे. नववे प्रकरण सेवा क्षेत्रावर (Service Sector) आधारित असून भारतातील सेवा क्षेत्राची प्रगती, प्रमुख सेवा, उपक्षेत्र निहाय कामगिरी आणि सेवा क्षेत्राबाबतची सध्याची धोरणे इ. घटकांची सविस्तर चर्चा केलेली आहे. आर्थिक पाहणी अहवालाच्या दुसऱ्या खंडातील दहावे आणि अखेरचे प्रकरण हे सामाजिक पायाभूत सुविधा, रोजगार आणि मानव विकास (Social Infrastructure, Employment and Human Development) या शीर्षकाचे असून यामध्ये असे नमूद केले आहे की, सामाजिक सेवांवरील (उदा. शिक्षण, आरोग्य इ.) सरकारचा खर्च स्थूल देशांतर्गत उत्पादन वाढीच्या प्रमाणात वाढविण्यात आला असून तो २०१९-२० मध्ये ७.७%नी वाढलेला

आहे. भारताने मानव विकास निर्देशांकात जागतिक स्तरावर २०१७ (१३०वा क्रमांक) च्या तुलनेत २०१८मध्ये (१२९वा क्रमांक) प्रगती केलेली आहे. सर्वसाधारण रोजगाराचे प्रमाण २०११-१२ मध्ये ८% होते ते २०१७-१८ मध्ये ९.९८% पर्यंत वाढले आहे. महिला कामगारांच्या संख्येत घट झाल्याने श्रम बाजारातील पुरुष-महिला कामगारांच्या प्रमाणातील तफावत रुंदावली आहे. गृहनिर्माणमध्ये भारताच्या ग्रामीण भागातील ७६% कुटुंबांकडे आणि शहरी भागातील ९६% कुटुंबांकडे पक्की घरे असल्याचे या प्रकरणात नमूद केले आहे.

**३. तांत्रिक जोडपत्रे आणि सांख्यिकीय तक्ते**

प्रस्तुत अहवालात एकूण १७५ पृष्ठांची तांत्रिक जोडपत्रे आणि सांख्यिकी तक्ते दिलेले आहेत. संख्याशास्त्रीय तक्ते तथा जोडपत्रे यांचे विभाजन पुढीलप्रमाणे केलेले आहे. १) राष्ट्रीय उत्पन्न आणि उत्पादन, २) अंदाजपत्रकीय व्यवहार, ३) रोजगार, ४) मौद्रिक कल, ५) किमती, ६) ताळेबंद पत्रक, ७) विदेशी व्यापार, ८) बाह्य मदत, ९) मानव विकास निर्देशांक.

**४. आर्थिक पाहणी अहवालातील प्रमुख बाबी**

वर्ष २०१९-२० च्या आर्थिक पाहणी अहवालातील प्रमुख बाबी खालीलप्रमाणे सांगता येतील.

१. वित्तीय वर्ष २०२०-२१मध्ये आर्थिक विकासाचा दर ६ ते ६.५% राहील.
२. वर्ष २०२०-२१ या वित्तीय वर्षाकरिता सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या प्रमाणात ३% वित्तीय तुटीचे लक्ष राखले आहे. यासाठी खाद्यान्न अनुदान १.८४ लाख कोटी रुपयांनी कमी करण्याचे लक्ष आहे.
३. सरकारी बँकांमध्ये भांडवल म्हणून सरकारने दिलेल्या अर्थसहाय्याच्या प्रत्येक रुपयातील २३ पैसे बँकांनी बुडविले आहेत, असे अहवालात नमूद केले आहे.
४. सन २०११-१२ मध्ये असलेला रोजगार निर्मितीचा १७.९% दर २०१७-१८ मध्ये २२.८%.
५. वर्ष २०२४-२५ पर्यंत अर्थव्यवस्था ५ ट्रिलियन डॉलरवर नेण्यासाठी पायाभूत सुविधांवर १.४ ट्रिलियन डॉलर खर्च करण्याची आवश्यकता.
६. वर्ष २०११-१२ ते २०१७-१८ या काळात २.६२ कोटी नवीन रोजगार निर्मिती झाली. महिलांच्या रोजगारात ८%नी वाढ झाली.
७. सार्वजनिक क्षेत्रातील बँकांबाबत अधिक विश्वासार्हता निर्माण होण्यासाठी त्यांच्या व्यवस्थापनामध्ये बदलाची आवश्यकता.
८. एप्रिल २०१९ मध्ये असलेला चलनवाढीचा ३.२% दर डिसेंबर २०१९ मध्ये २.२६% एवढा खाली आला.
९. जानेवारी २०२० अखेर ४५८ अब्ज डॉलर परकीय गंगाजळीचा साठा.
१०. सरकारकडून केल्या जाणाऱ्या अनावश्यक हस्तक्षेपाचा आणि बाजारपेठेला कमी लेखण्याच्या संदर्भातील मुद्द्यांबाबत सरकारने शिस्तबद्धपणे पारखून घेण्याची आर्थिक अहवालात सूचना.
११. कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली घट, वित्तीय तूट कमी करते. चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या सहामाहीत आयातीत निर्यातीच्या तुलनेत मोठी घट.
१२. जागतिक बँकेच्या उद्योगानुकुलता क्रमवारीत भारताने २०१४ च्या तुलनेत २०१९ मध्ये १४२ वरून ६३व्या स्थानावर झेप घेतली आहे. तरीही नवीन व्यवसायासाठी परवाना राजचा मोठा अडथळा आहे. दिल्लीत हॉटेलसाठी पोलिसांकडून लागणाऱ्या परवान्यांची संख्या तब्बल ४५ आहे.

तर बंदुकीसाठी फक्त १९ आणि फटाक्यांसाठी केवळ १२ परवाने लागतात.

१३. सप्टेंबर २०२० अखेर भारतावर ५५७.५ अब्ज डॉलर एवढे विदेशी कर्ज आहे.

१४. वर्ष २०१९-२० भारताचे दरडोई उत्पन्न स्थिर मूल्यानुसार ९६,५६३ रु. तर बाजार मूल्यानुसार १,३५,०५० रु. एवढे आहे.

१५. 'मेक इन इंडिया' धोरणात चीनच्या नीतीचा अवलंब केल्यास येत्या पाच वर्षात ४ कोटी नवीन रोजगार निर्मिती शक्य.

१६. २०२५ पर्यंत ५ लाख कोटी डॉलरची अर्थव्यवस्था गाठण्यासाठी पायाभूत सोयीसुविधांवर १.४ लाख डॉलर खर्च करावे लागतील.

१७. एप्रिल ते नोव्हेंबर २०१९ दरम्यान जी.एस.टी. वसुलीत ४% नी वाढ.

**५. अहवालावरील चिकित्सक भाष्य :**

एकंदरीत आर्थिक पाहणी अहवाल २०१९-२० मागोवा घेतल्यानंतर असे दिसून येते की, शासनाने अर्थव्यवसथेत सर्व स्तरावर सर्व काही चांगले आहे असे दाखविण्याचा अयशस्वी प्रयत्न केलेला आहे. अर्थात काही घटकांबाबत नक्कीच प्रगती आहे. परंतु स्थूल राष्ट्रीय उत्पादन (जी.डी.पी.) वाढीचा दर मागील काही वर्षांतील निम्न पातळीला आहे. दुसऱ्या बाजूला चलनवाढ उच्च पातळीवर आहे. विकासदरापेक्षा चलनवाढ अधिक असणे हे भारतासारख्या विकसनशील राष्ट्राला बिलकूल हितकारक नाही. शेती उत्पादनाबाबत एकीकडे शेतकरी राजा नाराज तर भाववाढीमुळे दुसरीकडे ग्राहकवर्ग नाखूश होरपळलेला. अशा परिस्थितीत मागणी, पतपुरवठा, उत्पादन, निर्यात यामध्ये प्रगती तथा वृद्धी होणार नसेल तर आपण आगामी वर्षात ६.५% जीडीपी वृद्धिदर कसा काय गाठणार हे लक्षात न येण्यासारखे आहे. भारतीय अर्थव्यवस्था मोठ्या प्रमाणात जागतिक अर्थव्यवस्थेशी निगडित आहे. त्यामुळे येणाऱ्या काळातील जागतिक मंदीच्या झळा निश्चितच भारताला देखील सहन कराव्या लागणार आहेत, हे विसरून चालणार नाही. तरीही अजून इंधनाचे दर आवाक्याबाहेर गेलेले नाहीत पण तेल राष्ट्रांमध्ये काही अघटित घडले आणि इंधन दरवाढ झाली तर भारतीय अर्थव्यवस्था आणखी खोलात जाईल. सरकारी बँकांच्या व्यवस्थापनात देखील रातोरात सुधारणा होणार नाही. थोडक्यात, एवढ्या सगळ्या अडचणी असताना येणाऱ्या १२ महिन्यांच्या काळात भारतीय अर्थव्यवस्था ६.५% जीडीपी वाढीपर्यंत उसळी घेण्यासाठी काहीतरी चमत्कारच घडणे अपेक्षित आहे, असे लेखकाला वाटते.

**संदर्भ सूची :**

१. Economic Survey 2019-20 A Govt. of India, Ministry of Finance, Deptt. of Economic Affairs, New Delhi, Jan. 2020.

२. http://www.jagranjosh.com/current-affairs/economic-survey - 2020 - detailed - analysis - for- government - exams-ias- ibps - 1580451713 - 1- Date:05/02/2020.

३. विविध वर्तमानपत्रे - दै.लोकसत्ता, दै.लोकमत, दै.सकाळ, दै.महाराष्ट्र टाइम्स, दि.१/०२/२०२०.

◆

व्यवसाय म्हणजे काम करण्याचा आर्थिक मार्ग

**- एल्बर्ट हबार्ट**

# चौकटीपल्याडचा नागरी सेवक (Not Just a Civil Servant)

**मंजुषा मुसमाडे**[†]

**लेखक :** अनिल स्वरूप
**अनुवादित नाव :** 'चौकटीपल्याडचा नागरी सेवक'
**अनुवादक :** देवयानी देशपांडे
**पृष्ठे :** १६२, **किंमत :** २५०रु.
सुनिधी प्रकाशन, पुणे २०१९.
**ISBN :** 978-93-85262-21-0PB

**प्रस्तावना**

नागरी सेवांच्या महत्त्वपूर्ण आणि प्रतिष्ठित जगातले अंतरंग रंजक पद्धतीने उलगडून दाखवण्याचे काम हे पुस्तक करते. अनिल स्वरूप या नागरी सेवेमधील उच्चपदस्थ अधिकाऱ्याचे हे प्रांजळ अनुभवकथन या क्षेत्रातील अनेक खाचाखोचा स्पष्ट करते. पुस्तकाची प्रस्तावना नंदन निलेकणी यांनी लिहिली आहे, ही एक उल्लेखनीय बाब होय.

वडिलांच्या इच्छेनुसार नाइलाजाने नागरी सेवांच्या क्षेत्रात प्रवेश केलेल्या स्वरूप यांनी आपल्या कारकिर्दीतील अनेक रोचक अनुभवांचे कथन तितक्याच रंजकतेने केलेले आहे. वाहतुकीच्या नियमांचे पालन, बँकलूट प्रकरणाचा छडा लावण्यातील सक्रिय भूमिका, शीख दहशतवाद्यांचा धैर्याने केलेला सामना, बाबरी मशीद पतनाचा प्रत्यक्ष अनुभव, भ्रष्ट कोळसा मंत्रालयाचे व्यवस्थापन अशा अनेक घटनांमधील त्यांची निर्भीड आणि निर्णायक भूमिका आपल्याला वाचायला मिळते. लेखकाने सरकारी नोकरीतील बदलीची तुलना मृत्यूशी केली आहे, त्यांच्या मते दोन्ही तितकेच अटळ असतात.

**पुस्तक परिचय**

या पुस्तकातील अनुभवकथन घडणीची वर्षे, जगावेगळी व्यवस्थापन कौशल्ये, बाबरी मशीद पतन, अंत्यजांची सेवा, माणुसकीच्या कथा, धनाढ्यांचा सेवक, कोळशाचा काळाशार डोह, शालेय शिक्षण विभागात नेत्रदीपक कामगिरी, सहकाऱ्यांची पाठराखण, इस्लामाबादची वारी-समीपतेतील दुरावलेपण आणि पुनर्जन्म असेल तर अशा प्रकरणांतून मांडलेले आहे. यातील मुख्य आणि ठळक भागाचा सारांश पुढीलप्रमाणे-

लेखकाने बाबरी मशीद पतन काळातील उत्तरप्रदेशचे तत्कालीन मुख्यमंत्री कल्याणसिंह यांच्या धीरोदात्त वर्तनाचे अनुभव सांगितले आहेत. सध्या या प्रकरणाचा सर्वोच्च न्यायालयातील निकाल जाहीर

[†] अर्थशास्त्र विभागप्रमुख, नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे.
आजीव सभासद क्र.-९३१, भ्रमणध्वनी-९८८१३४०७२५, ई मेल- manjushamusmade@gmail.com

झाल्यामुळे ही थरारक घटना वाचण्याचे महत्त्व अधिकच वाटते.

गुंतागुंतीच्या आणि आगळ्यावेगळ्या शासकीय आरोग्यविमा योजनेचे बीजारोपण करताना मूलभूत पातळीवरील अनुभव लेखकाच्या गरीबांविषयीच्या कळकळीचे दर्शन घडवतात. त्यांचे दारिद्र्यावरील विचार मननीय आहेत. या योजनेमुळे गरिबाला खासगी इस्पितळात उपचार घेणे शक्य झाले आणि लाभार्थींना निवडीचे स्वातंत्र्य मिळाले आणि इस्पितळे म्हणजे गुंतवणूकदारांना खुणावणारी अफाट संधी असल्याचे नमूद करून या योजनेमुळे दुर्गम भागांमध्ये खासगी इस्पितळे बांधणीला प्रोत्साहन मिळाले असल्याचे ते सांगतात.

ही योजना धूमकेतूप्रमाणे आहे असे त्यांचे मत आहे. योजना राबवताना राज्यवार आलेले अनुभव सांगताना विशेषकरून, ईशान्येकडील राज्ये आणि कर्नाटकातील अडचणींचे स्वरूप त्यांनी स्पष्ट केले आहे. नोकरशहांमुळे काही वेळा एरवी प्रगत असलेल्या राज्याचे कसे नुकसान होते हे त्यांनी कर्नाटकच्या उदाहरणातून दाखवून दिले आहे. नागालँडचा अपवाद वगळता ईशान्येकडील राज्ये शिथिल असल्याचे ते म्हणतात. योजनेच्या अंमलबजावणीतील अनिल स्वरूप यांच्या सक्रियतेमुळे 'The Wall - Street Journal' या प्रख्यात नियतकालिकात गुरुचरण दास यांनी 'The Best Diwali Gift' या नावाचा स्तुतीपर लेख लिहिला. या योजनेच्या जाहिरातीवर एक पै खर्च न करता प्रसारमाध्यमांनी जाहिरात करून सहकार्य केल्याचा उल्लेख त्यांनी कृतज्ञतेने केला आहे. स्वरूप यांनी खिशातील दमडीही खर्च न करता गरीब लाभार्थींच्या सदिच्छा मिळणे हाच सर्वोत्तम पुरस्कार म्हटले आहे.

**इतर अनुभव**

माणुसकीच्या कथांमध्ये अपंग, व्यसनी तरुणाची नोकरी परत मिळवून देण्याचा हृदय अनुभव, अंध दाम्पत्याला दिलेल्या शंभर रुपयांमुळे कालांतराने ते स्वावलंबी बनल्याचे पाहून 'भारतरत्न' सन्मान मिळाल्याची भावना, असे अनेक रंजक प्रसंग सांगितले आहेत.

विविध प्रकल्पांचे रखडलेले प्रस्ताव मार्गी लावण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचे महत्त्व त्यांनी सोदाहरण कथन केले आहे. कोळसा खाणीच्या लिलावातील अनेक गैरव्यवहार ज्या पारदर्शक प्रक्रियेतून उघड केले गेले, त्याचेही चिकित्सक विश्लेषण आहे. कुणाचाही मुलाहिजा न राखता परखड मते मांडून त्यांनी नोकरशहांची प्रतिमा बदलून टाकली. मात्र, नागरी सेवकांची प्रसिद्धी आणि श्रीमंतीची हाव यावर आणि स्वतःची प्रतिमा 'छाव्या'प्रमाणे निर्माण करणाऱ्यांवर त्यांनी ताशेरे मारले आहेत.

**शिक्षण क्षेत्रावर परखड भाष्य**

आपल्या सर्वांच्या जिव्हाळ्याच्या शिक्षण क्षेत्रातील स्वरूप यांचे अनुभव चिंतनीय आहेत. या क्षेत्रातील त्यांची कारकीर्द नेत्रदीपक ठरली. विद्यार्थ्यांना जास्त गुण देऊन उत्तीर्ण करणे आणि सर्व विषयांना सारखे गुण देण्याचे 'गुणनियमन' या नावाचे 'हास्यप्रयोग' म्हणजे 'भविष्याची किंमत मोजून वर्तमानाचे चोचले पुरवले जाणे होय', असे ते म्हणतात. शिक्षणाच्या खालावलेल्या दर्जाबद्दल ते खंत व्यक्त करतात. तसेच शिक्षण हक्क कायद्याचा हेतू साध्य झाला का, यावर शंका व्यक्त करतात. ठाणे जिल्ह्यातील पाश्तेपाडा या खेड्यातील शाळा संदीप गुंड या शिक्षकामुळे कशी पूर्ण डिजिटल (Digital) झाली, ही यशोगाथा वाचून मनात आले तर शिक्षक अडचणींतून कसा मार्ग काढू शकतो हे आपल्याला

पाहता येते आणि प्रेरणा मिळते.

त्यांच्या मते, शिक्षण क्षेत्र राजकारणाने व्यापून टाकले आहे. सरकारी शिक्षकांना नोकरीचे संरक्षण असल्याने जबाबदारीची जाणीव नाही आणि त्याचा परिणाम विनाशकारी आहे, असे ते परखडपणे सांगतात.

जेम्स टुली यांच्या 'The Beautiful Tree' या पुस्तकाचा आधार घेत त्यांनी असा निष्कर्ष काढला आहे की, खासगी शाळेतून शिक्षण घेतलेले विद्यार्थी सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांपेक्षा सामाजिक दृष्टीने अधिक हितकारक ठरतात. टुली यांच्या संशोधनानुसार भारतात जवळजवळ प्रत्येक खेड्यात खासगी शाळा होती. ब्रिटिशांनी त्याऐवजी एक सरकारी व्यवस्था निर्माण केली. ब्रिटिशांनी 'एक सुंदर झाड' मुळापासून उपटण्याचा गुन्हा केल्याचा आरोप टुली यांनी केल्याचा दाखला लेखक देतात. खासगी शाळेत शिक्षक - व्यवस्थापक - पालक उत्तरदायी असतात. शासकीय शाळेत शिक्षकांच्या कामगिरीचा आणि बढती, पगाराचा काहीही संबंध नसतो. त्यामुळे सुधारणांची आशा कमी असते, असे स्वरूप यांच्यासारख्या शासकीय अधिकाऱ्यांनी म्हणणे विचारार्ह ठरते! नोकरशाहीतील राजकारण्यांच्या अवाजवी प्रभावा-विषयीही त्यांनी अनेक उदाहरणे दिली आहेत.

**पाकिस्तानबद्दल मत :** पाकिस्तान भेटीवरील त्यांची प्रतिक्रिया अतिशय सकारात्मक आहे. तेथे रात्रीही कोणीही रस्त्यावरचे सिग्नल (Signal) तोडत नाही, तिथली भाषणे लांबलचक नसतात इत्यादी गोष्टी आपल्याला शिकण्यासारख्या आहेत असे त्यांनी म्हटले आहे. मात्र, केवळ दोन दिवसांच्या उच्चस्तरीय भेटीतून असे मत मांडणे योग्य ठरेल का, असेही आपण म्हणू शकतो.

**समारोप**

आपल्या पदाद्वारे परिपूर्ण सेवा देण्याचा अनिल स्वरूप यांनी घेतलेला ध्यास आणि सांभाळलेली पदप्रतिष्ठा यामुळेच त्यांना पुढील जन्मीही नागरी सेवेत अधिकारी व्हायलाच आवडेल, हे त्यांचे मनोगत खरोखरच हृदयस्पर्शी आहे. त्यांच्या मते, या पृथ्वीतलावर इतर कोणत्याही नोकरीत तुम्हाला इतके स्वातंत्र्य आणि भरभरून संधी मिळणार नाहीत. प्रामाणिकपणाची कास धरू शकू, अशी ही एकमेव नोकरी आहे. ज्यांना लोककल्याणाचे काम करायचेय त्यांना विलक्षण संधी आहे. तुम्ही प्रामाणिक असाल तरीही या व्यवस्थेत तग धराल आणि अप्रामाणिक असाल तरीही तग धराल, इतर कोणता पेशा तुम्हाला इतके पर्याय देईल? हा त्यांचा सवाल खरोखरच विचारात टाकणारा आहे.

मूळ पुस्तकाचा उत्तम अनुवाद वाचून इंग्रजीतील पुस्तक वाचण्याचा मोह होतो, याबद्दल अनुवादिकेचे अभिनंदन. हे पुस्तक शिक्षक, प्रशासक, नेते, विद्यार्थी, प्रशासकीय सेवेत जाऊ पाहणारे तरुण या सर्वांनाच उपयुक्त ठरेल. विशेषतः स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये मराठीचा टक्का वाढतो आहे, या पार्श्वभूमीवर ही साहित्यकृती निश्चितच प्रेरणा देणारी आहे.

◆

गरिबी म्हणजे संधीपासून वंचित राहणे.

**- अमर्त्य सेन**

पुस्तक परिचय

# आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

## (The Disaster Management Act 2005)

**सुभाष तुळशीदास कोंबडे** †

**पुस्तकाचे नाव :** आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
**लेखक :** श्री. सुजित मुढे - २०२०
'सोनु ग्राफिक्स', प्लॉट नं. ६१५, सुर्यवंशी कॉलनी, वर्षानगर, कोल्हापूर, भ्रमणध्वनी : ९९७०४६२४९९
**पृष्ठे :** १४०
**ISBN :** 978-93-5407-636-7

**प्रस्तावना**

अलीकडील काळात नैसर्गिक असमतोल कमालीचा वाढत असल्याचे आपणास मान्य करावे लागेल. नैसर्गिक असमतोलामुळे निसर्गचक्रामध्ये अनेक बदल होताना दिसून येतात. याचबरोबर मानवी जीवनास आवश्यक असलेल्या हवा व पाणी या नैसर्गिक संसाधनामध्येही अनेक बदल होत आहेत. या नैसर्गिक असमतोलाचे मानवी जीवनावर अनेक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम होत आहेत. खात्रीचे पर्जन्यमान असलेल्या भूभागावरही पर्जन्यातील अनियमितता दिसून येते. निसर्गाच्या अनियमिततेमुळे मानवी व भौतिक संपत्तीचे अतोनात नुकसान होते आहे. अलीकडील २० वर्षांमध्ये याचा प्रत्यय अनेक ठिकाणी आल्याचे आपणास दिसून येते. नैसर्गिक आपत्ती, भूकंप, चक्रीवादळे, त्सुनामी, दुष्काळ, आगडोंब, विविध साथीचे रोग इ. मुळे मानवीजीवन, मालमत्ता, पायाभूत सुविधा व पर्यायाने अर्थव्यवस्था याचे अतोनात नुकसान होत असून ही एक जगातील सर्वच राष्ट्रांसमोर एक मोठी समस्या उभी असल्याचे दिसते. भारतातही या आपत्तीमुळे दरवर्षी हजारो नागरिकांना आपला जीव गमवावा लागतो. अनेक लोक बेघर होतात. अब्जावधी रुपयांच्या संपत्तीचे नुकसान होते. या आपत्तीचा सामना करण्यासाठी व त्यातून होणारे नुकसान टाळण्यासाठी भारतामध्ये इ.स. २००५ मध्ये 'आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५' अमलात आणण्यात आला. यास केंद्रीय कायदा म्हणून ओळखले जाते. या कायद्याद्वारे तीन स्तरीय आपत्ती व्यवस्थापन संरचना तयार केली आहे. यामध्ये केंद्रीय, राज्य व जिल्हा असे तीन स्तर तयार केलेले आहेत. यामध्ये राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचा समावेश होतो. यामध्ये राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था, राष्ट्रीय आपत्ती निवारण दल इ. संस्थाही निर्माण केलेल्या आहेत. याबाबतीतील वित्तीय तरतूद तिन्ही स्तरावरून केली जाते. या आपत्ती व्यवस्थापनामध्ये प्रामुख्याने पाच

† सहयोगी प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ
आजीव सभासद क्र. १८११, भ्रमणध्वनी-९८२२८८१५६५, ई मेल- skombde@gmail.com

टप्पे असतात. यात नियोजन, पूर्वकाळजी, तयारी, निवारण व नुकसानभरपाई यांचा समावेश असतो. हा आपत्ती व्यवस्थापन कायदा सर्वांच्यासाठी असून यामधील अनेक कलमे व उपकलमे जशी प्रशासनाशी संबंधित आहेत तशीच ती सर्वसामान्य नागरिकांशी ही संबंधित आहेत. 'आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५' चे समाजातील सर्व नागरिकांना परिपूर्ण ज्ञान व्हावे यासाठी लेखक श्री. सुजित मुळे यांनी या कायद्याचा मराठी अनुवाद करून महाराष्ट्रातील सर्वच जनतेसाठी एक उत्तम योगदान दिलेले आहे. 'आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५' हा मूळ इंग्रजी भाषेमध्ये आहे. मात्र समाजातील सर्वच स्तरातील जनतेस इंग्रजी भाषा येत नसल्यामुळे हे पुस्तक अतिशय उपयुक्त आहे. मराठी अनुवादित पुस्तकामुळे महाराष्ट्रासह मराठीचे ज्ञान असलेल्या देशातील प्रत्येक व्यक्तीस अत्यंत सुलभरित्या हा कायदा समजून घेता येईल, यात कोणतीही शंका नाही. मराठी अनुवाद करताना लेखकाने सर्वांना समजेल अशा सरळ व सोप्या भाषेचा प्रयोग केलेला आहे. या पुस्तकास विधी महाविद्यालयातील प्रा. श्री. श्रीपाद श्रीधर देसाई यांची प्रस्तावना लाभलेली आहे. प्रस्तावनेतच त्यांनी हा अनुवाद अत्यंत सोप्या मराठी भाषेत केल्याचे नमूद केलेले आहे. वडोदरा शहराचे पोलीस उपायुक्त श्री.संजय खरात यांनी पुस्तकास शुभसंदेश दिलेला आहे. महाराष्ट्र राज्याचे राज्य संपर्क अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग डॉ. अतुल साळुंखे यांनी अनेक नैसर्गिक आपत्तींचा उल्लेख करून त्यांचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी कायद्याचे परिपूर्ण ज्ञान आवश्यक असल्याचे मत व्यक्त केलेले आहे. कायद्याचे मराठीतील अनुवाद एक नावीन्यपूर्ण कार्य असल्याचे नमूद केलेले आहे. या पुस्तकाद्वारे कायद्याबाबतीत पूर्ण ज्ञान होणार असल्याबद्दलचा विश्वास व्यक्त केलेला आहे. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक श्री.अभय जायभाये यांचाही शुभसंदेश लाभलेला आहे. मनोगत व्यक्त करताना लेखकाने कायदा पार्श्वभूमी स्पष्ट करून भाषांतराच्या/अनुवादाच्या मर्यादाही नोंदवलेल्या आहेत.

**सविस्तर परिचय**

'आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५' मध्ये एकूण ११ प्रकरणे असून प्रत्येक प्रकरणाचा सविस्तर अनुवाद केलेला आहे. पुस्तकाचे मुखपृष्ठ अत्यंत सुबक व शीर्षकाला साजेसे केल्याचे दिसून येते. पहिल्या प्रकरणामध्ये संक्षिप्त नावे, विस्तार व प्रारंभ व त्याचबरोबर व्याख्येचा अनुवाद केलेला आहे. इंग्रजीमधील अवघड व कायदा विषयक परिभाषांचा अर्थ मराठीमध्ये अगदी सोप्या शब्दांत दिलेला आहे. यातून कायदा पूर्णपणे समजून घेणे सोपे होते. प्रकरण २ मध्ये राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, त्याची स्थापना, अधिकारी व कर्मचारी नियुक्त्या, अधिकार व कार्ये, सल्लागार समिती व तिची कार्ये, विविध उपसमित्या, राष्ट्रीय कार्यकारिणी समिती इ. कलमे व उपकलमे यांचा मराठीमध्ये सोप्या पद्धतीने अनुवाद केलेला आहे. प्रकरण ३ मध्ये राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणा बाबतीत अनेक बाबींचा उल्लेख आहे. प्रत्येक राज्य सरकारने राजपत्रातून अधिसूचनेद्वारे राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करावी लागते. ते राज्य सरकारवर बंधनकारक असून त्याअंतर्गत राज्य कार्यकारिणीची स्थापना केली जाते. कायद्यातील अधिकार व कर्तव्ये यांचा सखोल अनुवाद केलेला आहे. राज्य कार्यकारिणी व विविध उपसमित्यांची कार्ये याबद्दलही उल्लेख आहे. राज्य प्राधिकरणाद्वारे राज्य योजनाही तयार केली जाते. आपत्तीजनक स्थितीमध्ये राज्य कार्यकारिणी समितीचे अधिकार व कार्य याबाबत स्पष्टपणे लेखन केलेले आहे. प्रकरण ४ मध्ये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण त्याची स्थापना, समित्याचे गठण,

प्राधिकरणाच्या अध्यक्षाचे अधिकार, सल्लागार समिती व अन्य समित्या व त्यांचे कायद्यानुसार गठन कसे केले जाते इ. ची पूर्ण माहिती आहे. जिल्हा प्राधिकरण हे प्रत्यक्षपणे प्रभावित क्षेत्रामध्ये कार्य करते. या व्यवस्थापनेबद्दल अनेक प्रशिक्षण वर्ग व कार्यशाळा घेऊन प्रत्यक्षपणे कार्य करणाऱ्यास पूर्ण ज्ञान दिले जाते. जिल्हा प्राधिकरणाद्वारे जिल्हा योजना तयार केली जाते. जिल्हा योजनेबाबतीत अनुवाद यामध्ये केलेला आहे. आपत्तीजनक परिस्थितीमध्ये जिल्हा प्राधिकरणाचे अधिकार व कर्तव्ये सर्वसामान्य व्यक्तीस माहीत असणे आवश्यक असते. या पुस्तकाच्या माध्यमातून ते पूर्णपणे माहीत करून घेता येते.

प्रकरण ५ मध्ये आपत्ती व्यवस्थापनाबाबतीत सरकारद्वारे केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची परिपूर्ण माहिती करून घेता येते. यामध्ये सरकारची भूमिका व उपाययोजनांबाबतीत पूर्ण माहिती मिळते. केंद्र सरकार व राज्य सरकारांच्या सर्वच मंत्रालयाद्वारे तयार केल्या गेलेल्या कार्यक्रमामध्ये आपत्ती व्यवस्थापनाबाबत तरतूद करण्याबाबतची माहिती आहे. भारत सरकारची मंत्रालये व विभागांच्या जबाबदाऱ्यांबद्दलचे विश्लेषणही यामध्ये नमूद केले आहे. केंद्र सरकार, राज्य सरकार आणि त्यांच्या विभागामार्फत अनेक उपाययोजना केल्या जातात. प्रकरण ६ मध्ये अनेक स्थानिक प्राधिकरणाबद्दलची माहिती दिलेली आहे. यामध्ये स्थानिक प्राधिकरणाची कर्तव्येही नमूद केलेली आहेत. प्रकरण ७ मध्ये राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या स्थापनेविषयी प्रक्रिया नमूद केलेली आहे. उपकलम ८ मध्ये अंतर्भूत तरतुदीनुसार विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्याबाबतची प्रशिक्षण वर्ग व कार्यशाळा आयोजित करून प्रशिक्षण दिले जाते. प्रकरण ८ मध्ये राष्ट्रीय आपत्ती निवारण दल याबाबतीत कलमे व उपकलमे आहेत. या दलाची कार्ये अत्यंत महत्त्वाची आहेत. सैन्याप्रमाणेच यांना प्रशिक्षण दिले जाते व सक्षम बनविले जाते. आपत्ती प्रभावित क्षेत्रामध्ये अत्यंत धोकादायक कार्ये या दलाद्वारे पूर्ण केली जातात. यामध्ये बचाव कार्ये यांचा समावेश होतो. प्रकरण ९ मध्ये आपत्ती व्यवस्थापनाच्या लेखा व लेखा परीक्षणाच्या बाबतीत अनेक तरतुदी आहेत. राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी, राज्य आपत्ती निवारणनिधी तसेच विविध मंत्रालये व विभागाद्वारे केलेल्या निधीचे वाटप इ. बाबतीत अनेक कलमे व उपकलमे आहेत. आणीबाणी परिस्थितीतील खरेदी बाबतीत असलेले नियम व लेखाविषयक बाबी यांचाही समावेश आहे. प्रकरण १० मध्ये अपराध व दंडविषयक तरतुदी आहेत. यामध्ये कामामध्ये अडथळा निर्माण करण्याबाबतीतील शिक्षा व दंड तसेच खोट्या दाव्याच्या बाबतीतील दंडविषयक अनेत उपकलमांचा समावेश आहे. कर्तव्य पालनात कसूर केल्याबाबतही तरतुदी आहे. प्रकरण ११ मध्ये संकीर्ण बाबींचा समावेश आहे. यामध्ये भेदभाव विरोधात मनाई व केंद्र सरकारची निर्देशपारित करण्याबाबतची उपकलमे आहेत. नुकसान भरपाई बाबतीतही तरतुदी आहेत. यामध्ये वार्षिक अहवाल प्रकाशित करण्याबाबतीतही उपकलमे आहेत.

पुस्तकामध्ये डाव्या बाजूस इंग्रजी मजकूर असून उजव्या बाजूस मराठी अनुवाद असल्यामुळे अनुवाद समजून घेण्यात अडचण आल्यास तत्काळ इंग्रजी मजकूर पाहता येतो. ही एक प्रकारची चांगली सोय लेखकाने केल्याचे दिसून येते. लेखकाने वरील सर्व प्रकरणातील कलमे व उपकलमे यांचा सोप्या व सुलभ शब्दामध्ये मराठी अनुवाद केलेला असून 'आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५' प्रस्तुत पुस्तकातून सहजपणे समजून घेता येतो. लेखकाने हा अनुवाद करण्यासाठी कठीण परिश्रम घेतले असून मराठी तथा इंग्रजीचे ज्ञान असणाऱ्या देशातील प्रत्येक व्यक्तीने हा ग्रंथ आपल्या संग्रही ठेवणे अत्यंत उपयुक्त ठरेल.

◆

# महाराष्ट्राचा रोटी रिपब्लिक अर्थसंकल्प : भाष्य

**शि. ना. माने** †

दि. ६ मार्च, २०२० रोजी अर्थमंत्र्यांनी महाराष्ट्राचा सन २०२०-२१ चा अर्थसंकल्प सादर केला. एका बाजूला महाराष्ट्राच्या राजकोषीय पैशावरील (Fiscal Space) मर्यादा व दुसऱ्या बाजूला लोकानुनयवादी बाबींवरील प्रस्तावित खर्चाचे आकडे यांच्यावर नजर टाकल्यानंतर हा अर्थसंकल्प रोटी रिपब्लिक अर्थसंकल्प तर नाही ना अशी साधार शंका निर्माण होते. रोटी रिपब्लिक म्हणजे असे प्रजासत्ताक की जे अभिमत अर्थशास्त्रीय सिद्धांताला पर्याय म्हणून ठरावीक वस्तू व सेवा माफक किंवा जवळपास मोफत पुरविण्याचा धोरणात्मक निर्णय घेते. तो घेताना लोकानुनय हे साधन असते आणि सत्ता संपादन करणे व ती टिकविणे हे साध्य असते. सुरुवातीला सर्व खूश असतात. हळूहळू वस्तू गायब होतात आणि त्या पुरविण्यासाठी आवश्यक असणारा निधी आटतो. अखेरीस प्रदान पेच (Payment Crisis) निर्माण होतो आणि 'ग्रीक ट्रॅजेडी' सारख्या संकटाला प्रजासत्ताकाला तोंड द्यावे लागते. हे सर्व गव्हाच्या उद्याच्या पुरवठ्याऐवजी आजच्या चपातीच्या मागणीवर लक्ष केंद्रित केल्यामुळे घडले. मागील दशकातील झिंबाब्वे, थायलंड व ग्रीस या देशांतील वित्तीय संकटे ही त्याची ताजी उदाहरणे आहेत. अधिक स्पष्टीकरणासाठी पुढील तक्त्याचा विचार करू.

या तक्त्याच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा विचारविमर्श करू. त्यापूर्वी एक खुलासा करणे जरूर आहे. तक्त्यातील आकडे जेवढ्या गोष्टी अभिव्यक्त (Reveal) करतात त्यापेक्षा हे जास्त गोष्टी लपवितात (Conceal). उदाहरणार्थ, ४०,००० कि.मी. लांबीच्या रस्त्यांसाठी १,५०१ कोटी रुपये हा आकडा निर्धारित करण्यासाठी कोणती विदा (Data) वापरली? वेगवेगळ्या विविध प्राकृतिक/भौगोलिक वैशिष्ट्यांचा पुरेसा विचार केला काय? रस्ते वाहतूक क्षेत्रातील तज्ज्ञांचा किंवा त्यांच्या अभ्यासांचा आधार घेतला काय? शिवाय रस्ता तयार करण्याबरोबरच त्यासाठीच्या तितक्याच महत्त्वाच्या देखभाल खर्चाची वेगळी तरतूद केली काय? याचे कारण असे की, अल्पप्रमाणावरील स्वतंत्र देखभाल खर्चामुळे रस्त्याचे आयुष्य मोठ्या प्रमाणात वाढते असा अनुभव आहे. आतापर्यंतच्या महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पांचा सर्वसाधारण अनुभव असा आहे की वित्तीय लक्ष्ये व प्राकृतिक लक्ष्ये (प्रत्यक्ष

† माजी अध्यक्ष, मराठी अर्थशास्त्र परिषद, निवृत्त प्राध्यापक, धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा.
आजीव सभासद क्र. : १०८, भ्रमणध्वनी : ७७३८३५६७८१

**तक्ता क्र. १ : रोटीसघन प्रस्तावित खर्चाच्या बाबी व खर्च (कोटी रुपये)**

| अ. क्र. | रोटीसघन प्रस्तावित खर्चाच्या बाबी | प्रस्तावित खर्च (कोटी रुपये) |
|---|---|---|
| १ | कर्जमाफी | २२००० |
| २ | ग्रामीण रस्ते (४०००० कि.मी.) | १५०१ |
| ३ | १६०० नव्या एस. टी. बसेस खरेदी व बस स्थानकांचे अत्याधुनीकरण | ४०० |
| ४ | ग्रामीण शाळांत सॅनिटरी नॅपकिन यंत्रे व नॅपकिन्सची विल्हेवाट | १५० |
| ५ | राष्ट्रपुरुष व राजकीय नेत्यांची स्मारके | ३५००० |
| ६ | प्रतिदिन शिवभोजन थाळींच्या संख्येत १ लक्षापर्यंत वाढ करणे | आकडा उपलब्ध नाही |

स्रोत : महाराष्ट्राचा अर्थसंकल्प २०२०-२१.

फलप्राप्ति) यांच्यामध्ये असाधारण तफावत आढळते. परिणाम? साधनसंपत्तीचा अपव्यय अटळ होतो. यासाठीच प्रस्तावित खर्चाची लक्ष्ये निश्चित करताना उपलब्ध विदा व अभ्यास महत्त्वाचे ठरतात. एवढ्या प्राथमिक खुलाशानंतर २०२०-२१ च्या अर्थसंकल्पाच्या संबंधात निर्माण होणाऱ्या पुढील वित्तीय प्रश्नांचा क्रमशः परामर्श घेऊ.

सुरुवात रोटी रिपब्लिक अर्थसंकल्पाशी संबधित शिवभोजन थाळीपासून करू. या महत्त्वाकांक्षी योजनेची सुरुवात तीन महिन्यांपूर्वी झाली. १० रुपये थाळी याप्रमाणे तीन महिन्यांसाठी ही योजना सुरू करण्यात आली. प्रतिदिन ५० हजार थाळ्या अशी मर्यादा होती. आता २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात थाळ्यांची संख्या दुप्पटीने वाढून ती प्रतिदिन एक लक्ष करण्याचा प्रस्ताव आहे. शिवाय, तिची मुदत ३ महिन्यांऐवजी १२ महिन्यांपर्यंत वाढविल्याचे दिसते. म्हणजे स्थूलमानाने रु. १० x १ लक्ष थाळ्या x ३६५ दिवस = रु.३६,५०,००,००० इतका खर्च २०२०-२१ या संपूर्ण वर्षासाठी अपेक्षित आहे.

कोणी म्हणेल रु.३६ कोटी हा आकडा मोठा नाही. तो नगण्य आहे. मान्य. राष्ट्रपुरुष व राजकीय नेत्यांच्या स्मारकांसाठीच्या प्रस्तावित रु.३५,००० कोटींच्या तुलनेत रु.३६ कोटी हा आकडा नगण्य असेलही. परंतु तो समर्थनीय नाही. एका राज्याच्या वित्तीय व्यवहाराच्या दृष्टिकोनातून तो दुर्लक्ष करण्यासारखा निश्चितपणे नाही. याचे कारण काय? वरवर पाहाता त्या रु.३६ कोटींच्या पोटात एक कूट प्रश्न दडला आहे. ग्यानबाची मेख ती हीच. एका अनामिकाने म्हटल्याप्रमाणे आकडे लबाड नसतात. परंतु आकडेमोड करणारे लबाड प्रसिद्धीच्या प्रकाशात येतात. (It is not the figures that lie. But it is the liars who figure.) काय आहे ती तथाकथित लबाडी? समजा, आजच्या बाजारभावाने त्या थाळीची किमान किंमत रु.२०० आहे. (आगामी ३१ मार्च २०२१ पर्यंतच्या तिच्यातील ५-१०% संभवनीय वाढीकडे तूर्तास दुर्लक्ष करू). दुसऱ्या शब्दात, १०

रु.च्या थाळीमागे कोणीतरी (सरकार नावाची संस्था) रु.१९० चुकते करणार. 'फ्री लंच' चे भूत डोक्यातून काढून टाकणेच श्रेयस्कर. आता थाळीमागे रु.१९०x १,००,००० थाळ्या x वर्षाचे ३६५ दिवस = ९३,५०,००,००० रुपये एवढी मोठी रक्कम सरकारी तिजोरीतून (कर महसूलातून) खर्च होणार. तरीदेखील आपण १० रु. थाळीचे पोवाडे गाणार. कारण त्या थाळीचा ऋणानुबंध एका उत्तुंग व इतिहास रचणाऱ्या राष्ट्रप्रमुखाच्या नावाशी मोठ्या हुशारीने जोडला आहे. हा विपणन व्यूहाचा (Marketing Strategy) एक आदर्श नमुना आहे. 'सत्यमेव जयते' एवढेच आमचे आकलन. त्याच्या पुढील 'नानृतम्' (असत्याचा जय होत नाही) हे शब्द आमच्या शब्दकोशातच नाहीत. मूकदर्शक म्हणून आपण जी गोष्ट उघड करण्याचे धाडस करत नाही ती 'एंपरर्स न्यू क्लोद्ज' या मिथकातील १० वर्षीय मुलाने बेधडकपणे ओरडून उघड केली.

त्याचे असे झाले. सम्राटाने दरबारी शिंप्याकडून उंची, तलम व पारदर्शी कपडे तयार करवून घेतले. सम्राटाने कपडे परिधान केलेत किंवा नाही अशी शंका येण्याइतपत कपडे पारदर्शी होते. नव्या कपड्यात सम्राट कसा दिसतो हे वदवून घेण्यासाठी दरबार भरला. कोणी काहीच बोलेना. सम्राट कपडे परिधान करूनही नागडाच हे सत्य बोलण्याचे धाडस कोण करणार? इतक्यात दरबारातील एक छोटा मुलगा ओरडला, ''नवीन कपडे परिधान करून देखील सम्राट नागडेच!'' या मिथकाचा बोध असा आहे की, खजिना रिता असताना सम्राटाने स्वत: उंची कपडे परिधान करणे समर्थनीय नाही. १० रु. थाळीच्या पोटात दडलेले वित्तीय व्यवहाराचे गुह्य निराळे असू शकत नाही. 'सत्यमेव जयते, नानृतम्।'

दुसरा कूट प्रश्न आहे अर्थसंकल्पातील शेतकऱ्यांच्या रु.२२ हजार कोटी कर्जमाफीचा. या प्रश्नाच्या तपशीलात जाण्याचे हे ठिकाण नाही. परंतु ॲग्रॉनॉमीचा संदर्भ टाळून केवळ कर्जमाफीने शेतकऱ्यांचे भले होणे नाही, असा माझा दावा नव्हे. महाराष्ट्राच्या राज्यकारणातील कर्जमाफी हे कोडे आहे आणि कर्जमुक्ती हे गूढ आहे. येथे आखिल भारतीय ग्रामीण पत पाहाणी अहवालातील एका विधानाचे स्मरण होते. मूळ फ्रेंच भाषेतील एका मार्मिक विधानाचे इंग्रजीतील भाषांतर पुढे उद्धृत केले आहे. "Farmer's credit, like hangman's rope, supports the hangman to kill the person hanged." त्याचा मराठी अनुवाद पुढे दिला आहे. फाशी दिलेल्या व्यक्तीचा जीव घेण्यासाठी फाशी देणाऱ्याला मदत करण्याच्या दोरखंडाप्रमाणे शेतकऱ्यांचे कर्ज त्याला मदत करते. दुसऱ्या शब्दात, शेतकऱ्याचे कर्ज म्हणजे त्याला फासावर चढविणारा दोरखंड.

प्रश्न केवळ कर्जमाफीचा नाही. प्रश्न केवळ हमीभावाचा नाही. प्रश्न केवळ किमान दीडपट आधार किमतीचा नाही. एम. एस. स्वामीनाथन कार्याध्यक्ष असलेल्या नॅशनल कमिशन ऑन फार्मर्सच्या अंतर्गत ५ व्या व अंतिम अहवालाच्या (४ ऑक्टोबर, २००६) 'शेतकऱ्यांची सेवा करणे व ॲग्रॉनॉमी वाचविणे' (Serving Farmers and Saving Farming) शीर्षकाची कर्जमाफीच्या समर्थकांना क्वचितच आठवण होते. महाराष्ट्राच्या कृषी विकासाचे अनेक प्रश्न आहेत. परंतु त्या प्रश्नांची गुरुकिल्ली कृषी व शेतकरी यांच्या पलीकडील 'मृद व्यवस्थापन व पीक उत्पादनाच्या शास्त्रात' (Agronomy) आहे. त्यात माती परीक्षण, पीक विविधीकरण, आंतर-पीक पद्धती, पीक फेरपालट इत्यादी घटकांचा समावेश होतो. एम. एस. स्वामीनाथन प्रथम ॲग्रॉनॉमिस्ट व नंतर सर्व काही आहेत. कर्जमाफी, हमीभाव व दीडपट किमान आधार किंमत यांच्यापेक्षा मृद व्यवस्थापन व पीक

उत्पादनाचे शास्त्र, शेतीतील अतिरिक्त शेतकऱ्यांचा प्रश्न व साखरेच्या अतिरिक्त उत्पादनाचा प्रश्न हे जास्त महत्त्वाचे प्रश्न आहेत.

तिसरा प्रश्न आहे राष्ट्रपुरुषांच्या व राजकीय नेत्यांच्या स्मारकांसाठीच्या रु.३५ हजार कोटी खर्चाच्या तरतुदीचा. आज राज्याची वित्तीय प्रकृती नाजूक बनली आहे. राज्याच्या राजकोषीय पैशावर (Fiscal Space) मर्यादा आहेत. केंद्राकडून मिळणाऱ्या वस्तू व सेवा करातील वाट्यात कपात झाली आहे. पुरवणी मागण्यांचे प्रस्थ वाढले आहे. प्रदीर्घ काळात हमखास परतावा देणाऱ्या गुंतवणुकीसाठी पुरेसा निधी उपलब्ध होऊ शकत नाही. अशा परिस्थितीत राजकोषीय दृढीकरण (Fiscal Consolidation), कामगिरीप्रधान अर्थसंकल्प (Performance Budget), प्रत्येक मंत्रालयाच्या खर्चावर कमाल मर्यादा लावणे, विदेशी अनावश्यक अभ्यास दौरे टाळणे, अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्याला प्राथमिकता देणे इत्यादी मार्गाचा अवलंब करणे जरूर असते. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी आहे की, या मार्गांकडे विशेषत्वाने लक्ष न देता अर्थमंत्र्यांनी आमदारांच्या विकासनिधीत प्रत्येकी सध्याच्या रु. दोन कोटींवरून रु. तीन कोटींपर्यंत वाढ प्रस्तावित केली. राष्ट्रपुरुषांविषयी योग्य आदर व्यक्त करून असे वाटते की, निदान सद्यस्थितीत स्मारकांसाठी रु.३५,००० कोटींचा विलास महाराष्ट्राला परवडणार नाही.

**समारोप**

महाराष्ट्राच्या २०२०-२१ च्या अर्थसंकल्पाविषयी मला महत्त्वाचे वाटणारे प्रश्न वाचकांपुढे ठेवले. मागील दशकापासून महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पांत जो प्रवाह किंवा जी प्रवृत्ती निर्माण होत आहे तिच्याविषयी मला माझे मनोगत व्यक्त करावयाचे आहे. तो प्रवाह किंवा ती प्रवृत्ती म्हणजे दुर्बिणांकित किंवा दूरदर्शकांकित विकास (Telescopic Development). या संज्ञेचा प्रतिकूल परिणाम म्हणजे विकास प्रक्रियेची छेडछाड (Tampering) करणे. काय आहे ती दुर्बिणांकित संज्ञा?

आता आपण सॅम्युअलसन यांनी त्यांच्या इकॉनॉमिक्स (१९७३, पृष्ठ ७८२) मध्ये उपक्रमी व नवप्रवर्तन यांच्या तसेच न्यून-विकसित देशांच्या संदर्भात सूतोवाच केलेल्या टेलिस्कोपिक विकास संज्ञेचा विचार करू. पुढील उदाहरणात ते स्पष्ट करतात : अमेरिकेसारख्या देशात विकासाची वर्तमान पायरी गाठण्यासाठी काही दशके प्रयत्न करावे लागले. उलट, भारतासारख्या न्यून-विकसित देशाच्या सरकारला ती पायरी वर्षभरात पार करण्याची घाई झाली आहे. दुर्बिणीतून दूरची वस्तू अगदी जवळ दिसते त्याप्रमाणे त्या देशातील निवडक लोकांनी अमेरिकेचा अभ्यास दौरा करावा. तेथील अधिकतर कार्यदक्ष उत्पादन पद्धतींची नक्कल करावी. मायदेशात परत येऊन तेथे त्या पद्धतीचा प्रयोग करावा आणि नंतर स्वस्थ बसून जादा उत्पादनाची वाट पाहावी. हे आहे विकासाचे जादूमयी आश्चर्य. विकास प्रक्रिया इतकी सहजसिद्ध प्रावस्था नसते. यातून 'ग्रीक ट्रॅजेडी' सारखे गहिरे आर्थिक संकट निर्माण होते. ग्रीस, पोर्तुगाल आदि युरोपिय देशांचा हा ताजा इतिहास आहे. महाराष्ट्र त्याला अपवाद नाही.

◆

माणूस सहसा आपल्या तत्वांपेक्षा आपल्या पैशांची जास्त काळजी घेतो.

**- एल्फ वाल्डो हमर्सन**

# कोविड - १९ : नवीन शब्द संग्रह

**जे. एफ. पाटील** †

रमेश वेंकटरमण यांनी इंडियन एक्सप्रेसच्या १९/४/२०च्या अंकात एक विशेष सदर दिले आहे. त्याचे शीर्षक "A Pandemic Glossary" असे आहे. शब्द हे अनुभूती व भावना यांच्या अभिव्यक्तीचे आधार साधन असते.

कोरोना साथीच्या अदृश्य आक्रमणानंतर मानवी जीवनामध्ये अनेक नवे अनुभव व जाणीवा यांची भर पडली. त्यांचे वर्णन करण्यासाठी सध्याच्या शब्दकोशात (इंग्रजी) शब्द नाहीत. तरी काही व्यक्तीनी निरनिराळ्या ठिकाणी काही नव्या शब्दांचा वापर केला आहे. त्याच अर्थाचे मराठी शब्द चलित करण्याचा हा छोटासा प्रयत्न.

Pandam freude पँडम फ्रॉड-साथ उपहास (नाम) : कोविड-१९ मुळे अतिश्रीमंत अमेरिकन देखील हतबल झाले याकडे इतरांनी बघण्याचा जाणवणारा अर्थ.

Lockazon लॉकाझॉन - स्वेच्छा बंदी (नाम) : कोरोना साथीमुळे एक मोठा समाज स्वत:कडून कुलूपबंद होतो व अमेझॉनच्या मदतीने व्यवहार संपर्क करतो, त्यांना स्वेच्छाबंदी म्हणायचे.

Covit कोव्हिट - कोभीती (क्रियापद) : कोरोना संक्रमण थांबविण्यासाठी हे करतो, ते करतो अशा अर्थशून्य वल्गनांचा उल्लेख करणे.

Nomofomo नोमोफोमो-अघटनावस्था (नाम) : संपूर्ण जगभर कुलूपबंदीचे वातावरण असल्यामुळे कुठेच काही विशेष घडत नाही तसेच आपल्यासारखीच इतरांची अवस्था आहे ही संतुलित भावना.

Corona Virtuous कोरोना व्हर्च्युअस (नाम) - कोरोनासद्‌गुणी : सामाजिक दूरांतरणाच्या अटींचे अतिरिक्त पालन करणारी व्यक्ती.

Selfimic सेल्फेमिक (नाम) - मनोध्वस्त : कोरोना साथीनंतर समाजातील फॅशनवाले व सामाजिक माध्यमावर कार्यरत असणाऱ्यांची विस्कटलेली मानसिक अवस्था.

Textwhack टेक्स्टव्हॅक (नाम) - शब्दसांत्वन : ज्यांच्याशी बराच काळात संपर्क झालेला नाही, अशा लोकांनी कोरोना साथीच्या दरम्यान आपली चौकशी करणे व अर्थशून्य ''घ्या काळजी'' असा सल्ला देणे.

Tinderfrust टिंडरफ्रस्ट (नाम) - दुरांतरण भंग : दूरसंचार माध्यमातून स्नेह-भेटीची शक्यता निर्माण झाली असता सामाजिक दूरांतरणामुळे ती चुकणे किंवा रद्द होण्यामुळे पदरी पडलेला अपेक्षाभंग.

Quantuminfect क्वांटमइनफेक्ट (क्रियापद) - बहूल संक्रमण : जेव्हा विषाणूचे संक्रमण एकाचवेळी अनेकांना होते किंवा संक्रमण न झालेले पण संभाव्य बळी, विशेषत: चाचणी क्षमता कमी असताना!

† माजी अध्यक्ष, कार्याध्यक्ष व विश्वस्त, मराठी अर्थशास्त्र परिषद.
आजीव सभासद क्र. : ६२, भ्रमणध्वनी : ९४२२०४६३८२

Vicarivirus व्हिकारीव्हायरस (विशेषण) - विषाणूसावध : सार्वत्रिक विषाणू संक्रमणाच्या भीतीने आपल्यापुरती सावधगिरी - पूर्वखबरदारी घेणारा (हात धुणे, मास्क लावणे, दूर राहणे, फळभाज्या धुवून घेणे इ.)

Pandepic पँडेपिक (नाम) - विश्वकथा : वैश्विक वितरणाचा भव्य चित्रपट व त्यात भाग घेण्याची शक्यता आहे असा कलाविष्कार.

Medipulate मेडिप्युलेट (क्रियापद) - वैद्य-विकृतीकरण : साथीच्या दरम्यान आरोग्यविषयक आकडेवारी व बातम्या यांचा सोईस्कर वापर करुन लोकांना त्यांच्या नागरी स्वातंत्र्यावरच्या मर्यादा मान्य करण्यास भाग पाडणे.

Doomtrim डूमट्रिम (नाम) - स्वकेशकर्तन : कुलूपबंदीच्या काळात न्हावी लोकांची दुकाने, केशकर्तनालये बंद झाली. अनेकांच्या दाढ्या वाढल्या, केस वाढले, लहान मुलांचे केस वाढले. अशावेळी (Doom) अनेकांनी स्वत:च घरी आपले व मुलांचे केस कापले. म्हणून स्वकेशकर्तन!

Voluntitch व्हॅलंटिच (नाम)-स्वयंसेवालहर : सोईप्रमाणे, साथ आटोक्यात आणण्याच्या स्थानिक प्रयत्नात सहभागी होण्याची इच्छा व अधिक आकर्षक वेळ घालविण्याचा प्रकार मिळाला की बाजूला होण्याची प्रवृत्ती.

Pandeficate पँडेफिकेट (क्रियापद) - वाचन-वैद्यकी : कुलूपबंदीमुळे घरी अडकल्यामुळे साथीसंबंधात इंटरनेटवरची माहिती वाचून सामाजिक माध्यमातून तज्ज्ञता व्यक्त करणे.

Mememonger मेमेमाँगर (क्रियापद) - संगणकवाचाळ : सामाजिक माध्यमातून उपलब्ध होणारी, अयोग्य, असंबंध, फालतू माहिती आपल्या गटातील साखळीतील लोकांच्या माथी मारणे किंवा मारणारा.

Watchboard वॉचबोर्ड (नाम) - संगणक वार्तालाप : कुलूपबंदीतील लोकांना कंटाळवाणी असंबंध माहिती, संगणकाद्वारे देण्याच्या उपद्व्याप करणे.

Zoombomb झूमबाँब (क्रियापद) - देहक्षेप : दुसऱ्याच्या दृकश्राव्य लेखनामध्ये अनाहूतपणे देहक्षेप/प्रवेश करणे.

Spantop स्पॅनटॉप (विशेषण)-तोंडघेवडा/वार्ताढोंगी : चेहऱ्यावर (छातीच्या वरच्या भागातच) व्यावसायिक व व्यवहार दक्षता दाखविणे.

Videogle व्हिडीओगल (क्रियापद)-आ वासणे : मुलाखतीच्या दरम्यान, मुलाखत देणाऱ्याच्या म्हणण्यापेक्षा त्याच्या परिसराकडे आ वासून पाहणे.

Desporado डेस्पॅरॅडो (नाम)-आभास संमेलन : बैठक किंवा संमेलन जे दृक-श्राव्य माध्यमातून घेतले जाते.

◆

## निवेदन - अर्थसंवाद

अर्थसंवादच्या सर्व वर्गणीदार शैक्षणिक संस्था, व्यावसायिक संस्था, ग्रंथालयांना कळविण्यात येते की, मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणी व सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार १ एप्रिल, २०२० पासून अर्थसंवादची त्रैवार्षिक वर्गणी २००० रु. व पंचवार्षिक वर्गणी ३००० रु. करण्यात आलेली आहे. ज्या वर्गणीदार सदस्यांनी यापूर्वीच जुन्या दराने रक्कम पाठवली आहे त्यांनी फरकाची रक्कम त्वरित पाठवून देवून सहकार्य करावे.

**- प्रमुख संपादक, अर्थसंवाद**

# नोबेल पारितोषिकप्राप्त अभिजित बॅनर्जी यांचे योगदान

**मंजूषा मुसमाडे** †

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४४व्या वार्षिक अधिवेशनासाठी सैद्धांतिक विषयावरील चर्चासत्रासाठी 'नोबेल पारितोषिकप्राप्त अभिजित बॅनर्जी यांचे योगदान' हा विषय निश्चित केला गेला आहे. या विषयावर संशोधनपर लेख लिहिण्याच्या दृष्टीने मार्गदर्शनपर हे टिप्पण आहे.

साधारणपणे एखाद्या तज्ज्ञाच्या विचारांवर अभ्यासपूर्ण लेख लिहिताना प्रथम त्या व्यक्तीच्या वैयक्तिक परिचयात्मक बाबी, त्यांच्या व्यावसायिक कारकिर्दीतील महत्त्वाचे टप्पे, त्यांचे विविध प्रकारचे वैचारिक लेखन आणि योगदान, त्याचे टीकात्मक विश्लेषण आणि त्यांच्या विचारांचे उपयोजन अशा प्रमुख मुद्द्यांना अनुसरणे योग्य ठरते.

अर्थशास्त्रासाठी नोबेलस्मृती पारितोषिक देण्याची सुरुवात १९६९ पासून झाली. आजवर या पुरस्काराच्या मानकऱ्यांमध्ये अमेरिकन आणि युरोपियन तज्ज्ञांचेच वर्चस्व राहिलेले आहे. (हाही एक वेगळ्या अभ्यासाचा विषय होऊ शकेल.) १९९८ मध्ये अमर्त्य सेन यांना मिळालेल्या नोबेल पुरस्कारानंतर २०१९ मधील अर्थशास्त्रातील नोबेलस्मृती पुरस्कार आणखी एका मूळ भारतीय वंशाचे अर्थतज्ज्ञ अभिजित बॅनर्जी, त्यांच्या सहकारी आणि पत्नी इस्थर दफ्लो आणि मायकेल क्रेमर यांना एकत्रितपणे दिला गेला आहे. अर्थातच, बॅनर्जी यांचे योगदान अभ्यासताना त्यांच्या सहकाऱ्यांचेही महत्त्व लक्षात घ्यावे लागेल.

**वैयक्तिक परिचय-** अभिजित बॅनर्जी यांची कौटुंबिक पार्श्वभूमी बंगाली-मराठी अशी संमिश्र आहे. त्यांचे पिता दीपक बॅनर्जी आणि आई निर्मला (पाटणकर) हे दोघेही कोलकाता येथील Centre for Studies in Social Science येथे अर्थशास्त्राचे प्राध्यापक होते. अभिजित बॅनर्जी यांचा जन्म २१ फेब्रुवारी, १९५९ रोजी झाला. कोलकाता येथील प्रेसिडेन्सी कॉलेज, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ, दिल्ली आणि अमेरिकेतील हार्वर्ड विद्यापीठ या ठिकाणी त्यांचे शिक्षण झाले. त्यांच्या पीएच.डी. प्रबंधाचा विषय होता 'Essays in Information Economics.' (1988). JNU येथे शिकत असताना विद्यार्थी आंदोलनातील सहभागामुळे त्यांना तिहार तुरुंगातही जावे लागले होते. नोबेल पुरस्कारापूर्वीच त्यांना प्रतिष्ठित Infosys prize in Social Sceince आणि

† अर्थशास्त्र विभागप्रमुख, नौरोसजी वाडिया महाविद्यालय, पुणे.
आजीव सभासद क्र. : ९३१, भ्रमणध्वनी : ९८८१३४०७२५, ई-मेल : manjushamusmade@gmail.com

इतर अनेक पुरस्कार मिळालेले आहेत. यापूर्वी त्यांनी हार्वर्ड आणि प्रिन्सटन विद्यापीठ आणि सध्या ते अमेरिकेतील एमआयटी विद्यापीठात अर्थशास्त्राचे अध्यापन करीत आहेत. २०१३ मध्ये UNO च्या 'सहस्रक विकास उद्दिष्ट्ये' (MDG) प्रकल्प तज्ज्ञगटांत त्यांचा समावेश होता. नोबेल पुरस्कारानंतर जानेवारी २०२० मध्ये त्यांना कोलकाता विद्यापीठाने मानद Doctor of Literature पदवी प्रदान केली आहे.

'जागतिक दारिद्र्याशी लढण्याच्या मानवीक्षमतेत वाढ करण्यासाठी अंगिकारलेल्या प्रायोगिक दृष्टिकोना'बद्दल त्यांना नोबेल स्मृती पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

**अभिजित बॅनर्जी यांचे वैचारिक योगदान**

अभिजित बॅनर्जी यांचे वैचारिक योगदान प्रामुख्याने 'विकासाचे अर्थशास्त्र' या अभ्यासशाखेत आहे. भारतासारख्या विकसनशील देशांमधील दारिद्र्य कमी करण्याच्या दृष्टीने त्यांनी प्रत्यक्ष स्थळ अभ्यासाद्वारे प्रयोगात्मक संशोधन केले आहे. अर्थशास्त्रात गेल्या अनेक दशकांपासून समग्रलक्षी आर्थिक प्रारूपांवर आधारित विकासाचे प्रतिमान मांडले जाते. बॅनर्जी यांनी या प्रचलित पद्धतीऐवजी आपल्या संशोधनात विकासाचे लक्ष्य असणाऱ्या गरीब लोकांनाच आपल्या विकासात सहभागी होण्याची संधी देण्याची आगळीवेगळी पद्धत अवलंबिली आहे. संपूर्ण किंवा मोठ्या घटकाचा एकदम अभ्यास न करता लहान गटांमध्ये प्रायोगिक अभ्यास करण्याची त्यांची पद्धत अतिशय प्रसिद्ध झाली आहे. त्यांचा विश्वास 'लहान' बाबींवर ('Thinking small') आहे. पत्नी इस्थर दफ्लो यांच्यासह ख्यातनाम अर्थतज्ज्ञ रघुराम राजन, गीता गोपीनाथ आणि इतर देशी-विदेशी अर्थतज्ज्ञांच्या जोडीने त्यांनी लेखन, संपादन आणि संशोधन केलेले आहे.

प्रस्तुत विषयावरील संशोधन लेख लिहिण्याच्या दृष्टीने ढोबळमानाने खालील विषय सुचविता येऊ शकतील.

**अ) लेखनसंपदा :** अभिजित बॅनर्जी यांची महत्त्वाची पुस्तके आणि अनेक लेख यांमधून त्यांचे वैचारिक योगदान स्पष्ट होते. यापैकी एखाद्या किंवा काही पुस्तकांवर आधारित विश्लेषणात्मक लेख लिहिता येऊ शकेल. उदाहरणादाखल काही ठळक पुस्तकांची संक्षिप्त माहिती दिली आहे.

१) Good Economics for Hard Times (2019) (सहलेखिका इस्थर दफ्लो) Public Affairs, New York, U.S. - या त्यांच्या सर्वात अलीकडच्या आणि लोकप्रिय झालेल्या पुस्तकात स्थलांतर, जागतिकीकरण, मंदवृद्धी आणि वातावरण बदल अशा सामाजिक राजकीय समस्यांमध्ये अर्थशास्त्र कशी मदत करू शकेल, याचा ऊहापोह केलेला आहे. त्यांच्या मते, या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी संसाधने उपलब्ध आहेत; परंतु आपल्याकडे कल्पनाशक्तीचा अभाव आहे.

२) Handbook of Field Experiments (Vol. 1 &2) (2017) सहलेखिका इस्थर दफ्लो North Holland, U.S. - आपली अनोख्या प्रायोगिक संशोधनपद्धतीबाबत पत्नीबरोबर लिहिलेले हे दोन्ही खंड प्रत्यक्ष कार्यावर आधारित आहेत. पहिल्या खंडात प्रायोगिक संशोधन कसे करावे, पूर्वी न धुंडाळलेल्या क्षेत्रातील संशोधनाच्या नव्या निष्कर्षाची जंत्री कशी तयार करावी, प्रत्यक्ष प्रयोगांच्या जोडीने सामाजिक प्रयोग करण्याची पद्धती, अर्थमितीचा वापर अशा एकूणच संशोधन समस्यांबाबत स्पष्टीकरण आहे. दुसऱ्या खंडात संशोधनाचे अद्ययावतीकरण, सामाजिक सुरक्षा

योजनेचा आराखडा कसा असावा, दारिद्र्यावर मात कशी करावी, अल्पउत्पन्न देशांमधील आरोग्य पातळीचे निर्धारक घटक इत्यादी बाबींवर प्रकाश टाकलेला आहे.

३) Poor Economics- A Radical Rethinking of the Way to Fight Global Poverty, (2011) Public Affairs, New York, U.S. - पत्नी इस्थर दफ्लो सहलेखिका असलेल्या या पुस्तकाला मानाचे Goldman Sach Business Book of the Year पारितोषिक मिळाले होते. यात लेखकद्वयाने असे म्हटले आहे की, आपण वास्तवाकडे पुरेसे लक्ष दिल्यास गरिबीची खरी कारणे समजतीलच, शिवाय ती कशी नष्ट करायची याचीही समज येईल. त्यांचे असे प्रतिपादन आहे की बहुतांश धर्मादाय संस्था गरिबांना मदत करू इच्छितात; परंतु त्यांची गृहीतके सामान्यीकरणावर आधारित असतात. गरीब लोक स्वतः आपल्या शिक्षण, बचत, आरोग्य, अन्न आणि इतर समस्यांबाबत कसा निर्णय घेतात हे महत्त्वाचे असते. (कोविड-१९ मुळे लागू झालेल्या टाळेबंदीमुळे स्थलांतरित मजुरांनी 'आरोग्य विरुद्ध उत्पन्न' हा तिढा आपल्यापरीने कसा सोडवला हे सर्वांनी अनुभवले आहेच.)

या पुस्तकांव्यतिरिक्त त्यांची विकास आणि दारिद्र्यनिर्मूलनाविषयीची खालील पुस्तकेही महत्त्वाची आहेत.

१) Making Aid work (2007). Cambridge, MIT Press, U.S.

२) Volatility and Growth (2005) - (सहलेखक Phillippe Aghion). OUP.U.S.

३) 'What the Economy needs Now' (2019) (सहसंपादित- Gita Gopinath, Raghuram Rajan, Mihir Sharma) Harper, U.S.

४) Understanding Poverty' (2006) (सहसंपादित - Benabou, Roland, Mookherjee, Dilip) OUP, New York, U.S.

५) A Short History of Poverty Measurement' (2019). Juggernaut Books, U.S.

**ब) अभिजित बॅनर्जी यांनी आपल्या प्रायोगिक संशोधनात वापर केलेल्या** Randomized Controlled Trial **(यादृच्छिक नियंत्रित प्रयोग-** RCT) **संशोधन पद्धतीचे टीकात्मक विश्लेषण** - बॅनर्जी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी ज्या प्रायोगिक संशोधन पद्धतीचा वापर केला आहे, त्यात समग्र पातळीचा विचार न करता लहान लहान गटांचा सूक्ष्म पातळीत अभ्यास केला जातो. या पद्धतीत ज्या घटकाचा अभ्यास करावयाचा असेल त्याला दोन गटात विभागले जाते आणि त्यापैकी केवळ एकाच गटात संभाव्य बदल केले जातात आणि त्यातील कारणात्मक संबंधांचा (Causal relationship) व परिणामांचा अभ्यास केला जातो. तर दुसरा गट कोणत्याही बदलाशिवाय तसाच ठेवला जातो. या दोन्ही गटातील गुणात्मक फरकाचा तपशीलवार अभ्यास केला जातो आणि अंतिम निष्कर्ष काढला जातो. दारिद्र्याच्या सापळ्यात अडकलेल्या गरीब लोकांची भौतिक संसाधनाअभावी आणि वित्तीय संसाधनांचा वापर करण्याची कुवत नसल्याने ते विकासाची फळे चाखू शकत नाहीत. त्यांना आपल्या विकासप्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळाल्यास त्यांचा विकास खऱ्या अर्थाने होऊ शकेल, हे यामागचे तत्त्व आहे.

उदा. ग्रामीण, मागास भागातील शाळांमधील शिक्षणाचा दर्जा वाढवण्याच्या दृष्टीने शासनाने केवळ मुलांच्या उपस्थितीत वाढ करण्यापेक्षा स्थानिक प्रशिक्षित तरुणाद्वारे विशेष मुलांना शिक्षण दिले तर

अपेक्षित सुधारणा होऊ शकेल का, हे मुलांचे दोन गट करून पाहता येईल. यात लाभार्थी गटाने सार्वजनिक सेवांच्या देखभालीत सहभाग घेणे, त्या योजनांच्या कार्यक्षमता वाढण्यासाठी कळीचा मुद्दा ठरते. परंतु, यातील अडचणीही बॅनर्जी यांनी विशद केल्या आहेत.

बॅनर्जी यांनी केनिया देशातील आपल्या प्रायोगिक संशोधनाच्या आधारे असे प्रतिपादन केले आहे की, शाळेत अधिक दिवस गेल्याने मुले अधिक शिकत नाहीत. तसेच, पाठ्यपुस्तकांवर खर्च केल्यामुळेही नाही. त्यांचे बडोदा शहरातील शालेय शिक्षणाचे संशोधनही प्रसिद्ध आहे. राजस्थानात पोलिओ लस मोफत असूनही पालक ती आपल्या बाळांना देत नसत. बॅनर्जी दाम्पत्याने लस देण्याऱ्या मातांना कडधान्य आणि डाळींचे मोफत वाटप केल्यावर लसीकरणाचा दर वाढला. उत्तरप्रदेशातील त्यांचे दारिद्र्यनिर्मूलनावरील प्रयोग अधिक प्रसिद्ध आहेत. अशा अनेक प्रत्यक्ष प्रयोगांतील त्यांचे योगदान अभ्यासता येईल.

बॅनर्जी आणि सहकारी यांनी अवलंबलेली RCT पद्धती अनेक तज्ज्ञांच्या टीकेला बळी पडलेली आहे. हार्वर्ड विद्यापीठाच्या Kennedy School of Government येथील लांट प्रिशेट (Lant Pritchett) या तज्ज्ञाने RCT वर कडाडून टीका केली आहे. त्यांच्या मते, या पद्धतीमुळे जागतिक दारिद्र्याच्या अभ्यासात अडथळे येऊ शकतात. त्यांच्या मते, ऐतिहासिक आणि वर्तमानातील पुरावे केवळ आर्थिक वृद्धीमुळेच दारिद्र्यात घट होते, हे स्पष्टपणे दर्शवितात. देतात. म्हणजे बॅनर्जी यांच्या 'लहान घटकाचा विचार' (Thinking Small) या संकल्पनेच्याविरुद्ध प्रिशेट यांची 'प्रचंड स्थित्यंतर वृद्धी' (Big Transformational Growth) ही संकल्पना आहे. जगभरच्या विकास अर्थशास्त्रज्ञांचे या दोन गटांत विभाजन झालेले आहे, असेही म्हणता येऊ शकेल. लांट यांच्या मतानुसार अर्थतज्ञांनी लहान आणि सोप्या गोष्टींकडे लक्ष देण्याऐवजी मोठ्या समस्यांवर लक्ष केंद्रित करावे, अन्यथा कालबाह्य व्हावे.

निबंध लेखकांना RCT पद्धतीच्या गुणदोषांचे टीकात्मक परीक्षण बॅनर्जी यांच्या आणि इतर उपलब्ध संशोधनाच्या आधारे मांडता येऊ शकेल.

**क) अलीकडील काळातील इतर घडामोडींवर आधारित** - नोबेल मिळवण्यापूर्वी आणि त्यानंतरही बॅनर्जी विशेषकरून भारतात सतत चर्चेत आणि प्रसिद्धीच्या झोतात राहिलेले आहेत. अगदी अलीकडच्या काळातील त्यांच्या संदर्भातील काही घडामोडींचे विश्लेषण करणे, हा विषय निबंधासाठी घेता येईल. ठळक घडामोडी पुढीलप्रमाणे-

**न्याय** (NYAY) **योजना**- २०१४मधील लोकसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान काँग्रेस पक्षाने दारिद्र्यनिर्मूलनासाठी ही योजना जाहीर केली होती. या योजनेचा आराखडा बॅनर्जी यांच्या सहकार्याने तयार केला गेला होता. या योजनेचे विश्लेषण करणे हा निबंधाचा विषय असू शकेल.

**मोदी शासनावरील धोरणात्मक टीका** - बॅनर्जी यांनी मोदी सरकारच्या धोरणांवर सातत्याने टीका केलेली आहे. विशेषकरून नोटाबंदी आणि राष्ट्रीय उत्पन्न आकडेवारीतील घोळासंबंधी त्यांच्या मतांचे विश्लेषण करता येतील.

**कोविड संदेश** - मार्च २०२० पासून भारतात सर्वत्र कोविड-१९ संसर्गाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर पश्चिम बंगाल शासनाने लोकांमध्ये संसर्गाबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी बॅनर्जी यांचे व्हिडिओ संदेश प्रसारित केले होते. हे संदेश प्रायोगिक पद्धतीने प्रसृत केले गेले. लोकांचे दोन गट केले गेले आणि

एकाच गटात सामाजिक माध्यमांच्याद्वारे हे व्हिडिओ पोचवले गेले आणि असा निष्कर्ष काढला गेला की, ज्यांच्यापर्यंत संदेश पोचला त्या गटातील संसर्गाविषयीची जागरुकता दुसऱ्या गटापेक्षा अधिक होती आणि तेथे रोगाचा प्रादुर्भाव कमी झाला. शासकीय पातळीवरील प्रचारापेक्षा असे संदेश अधिक प्रभावी ठरतात असे म्हटले गेले. याबाबतही अधिक संशोधन होणे गरजेचे आहे. रिचर्ड थेलर या गतवर्षीच्या नोबेल विजेत्या अर्थतज्ज्ञाने मांडलेल्या वर्तनात्मक अर्थशास्त्रातील कोपरखळी (Nudge) सिद्धांताशी निगडित हा प्रयोग आहे. आरोग्य आणीबाणीच्या परिस्थितीत असे वर्तनात्मक प्रयोग करण्याची उचितताही तपासून पाहता येईल.

**मे २०२० मधील राहुल गांधी यांना दिलेली मुलाखत** - सामाजिक माध्यमांवर प्रसृत झालेली बॅनर्जी यांची ही मुलाखत समर्थक आणि टीकाकार या दोन्ही बाजूंमध्ये गाजली. त्यातील मुद्द्यांचे चिकित्सक आणि तटस्थ विश्लेषण करता येऊ शकेल. **अब्दुल लतीफ जमील Poverty Action Lab या संस्थेच्या कार्याविषयी**- बॅनर्जी दाम्पत्य आणि सेन्धील मुलाई नाथन यांनी दारिद्र्य निर्मूलनासाठी अमेरिकेत स्थापन केलेल्या दारिद्र्य कृती प्रयोगशाळा या संस्थेच्या कार्याविषयी विश्लेषणात्मक निबंध होऊ शकेल.

वरीलपैकी एखाद्या किंवा संमिश्र विषयांवर चिकित्सक निबंध लिहिता येईल.

**ड) इतर नोबेलविजेत्या विकास अर्थतज्ज्ञांच्या विचारांशी तुलनात्मक विश्लेषण**- अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथपासून सुरू झालेली विकासाच्या अर्थशास्त्रज्ञांची देदीप्यमान परंपरा अभिजित बॅनर्जी यांच्यापर्यंत वैचारिकदृष्ट्या एका साखळीत बांधता येईल का, हा शोध घेणे अतिशय रोचक ठरू शकेल. विशेषतः बॅनर्जी यांच्याप्रमाणेच विकासाच्या अर्थशास्त्राच्या क्षेत्रातील भरीव कामगिरीमुळे नोबेल पुरस्कार प्राप्त अमर्त्य सेन, एंगस डिटन, पॉल रोमर, जोसेफ स्तीग्लीत्झ या अलीकडच्या काळातील आणि आर्थर लेविस, गुन्नार मिर्दाल, सायमन कुझनेत्स अशा अगोदरच्या काळातील काही अर्थतज्ज्ञांच्या विचारांशी तुलनात्मक विश्लेषण हाही निबंधाचा विषय होऊ शकेल. मोहम्मद युनुस यांना जरी शांततेचे नोबेल पारितोषिक मिळालेले असले तरी त्यांचा गरिबी निर्मूलनाचा विचार अर्थशास्त्राशी संबंधित असल्याने त्यांचाही तुलनात्मक विचार करता येईल.

**समारोप**

एकंदरीत, 'अभिजित बॅनर्जी यांचे योगदान' हे विकासाचे अर्थशास्त्र, माहितीचे अर्थशास्त्र, प्रायोगिक अर्थशास्त्र, वर्तनात्मक अर्थशास्त्र अशा विविध नव्या आणि जुन्या अभ्यासशाखांना स्पर्श करणारे असल्याने या विषयावर संशोधनपर लेख लिहिण्यासाठी अर्थशास्त्रीय सैद्धान्तिक अभ्यासाव्यतिरिक्त सार्वकालिन जागतिक आणि राष्ट्रीय पातळीवरील सामाजिक-आर्थिक घडामोडींचा तपशील आणि विश्लेषण अभ्यासणे आवश्यक ठरते.

**संदर्भ**


१) अभिजित बॅनर्जी यांची लेखात उल्लेखिलेली सर्व पुस्तके.

२) ऑक्टोबर २०१९ ते डिसेंबर २०१९ दरम्यान विविध वृत्तपत्रात अभिजित बॅनर्जी यांच्यावर आलेले लेख व माहिती.

३) उपलब्ध आणि विश्वासार्ह online संकेतस्थळे.


◆

# भारतातील वर्तमान दशकातील आर्थिक स्थित्यंतरे - एक टिप्पण

**विनोद म. गावंडे** †

**उपोद्घात**

भारतीय अर्थव्यवस्थेचा स्वातंत्र्योत्तर काळापासूनचा प्रवास पाहता वर्तमान दशक (२०१० ते २०२०) अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने मूलभूत संरचनेला बदलविणारे आणि धक्कादायक ठरलेले आहे. वर्तमान दशकांमध्ये भारतीय अर्थव्यवस्था अनेक आर्थिक बदलांना सामोरी गेलेली आहे. प्रामुख्याने केंद्र स्थानी झालेल्या राजकीय बदलानंतरचे हे प्रमुख बदल आहेत.

वर्तमान दशक (२०१० ते २०२०) हे भारतीय अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने अनेक प्रकारच्या मूलगामी आणि संरचनात्मक आर्थिक बदलांचे म्हणून चिरकाळ आठवणीमध्ये राहणारे आहे. या दशकातील आर्थिक स्थित्यंतरांचा कळस म्हणजे कोरोना महामारी होय. भारतीय अर्थव्यवस्थेलाच नव्हे तर संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेला बंद पाडणारी घटनासुद्धा याच दशकाच्या नावावरती कोरली गेली. ज्याबाबत केवळ भारताच्याच नव्हे तर जगाच्या आर्थिक इतिहासामध्ये अशा कोणत्याही घटनेची नोंद पाहावयास मिळत नाही. त्यामुळे गेलेले हे दशक ग्राहक, उत्पादक, शासन अशा अर्थव्यवस्थेच्या प्रत्येक घटकाला प्रभावित करणारे म्हणून कायमस्वरूपी आठवणीमध्ये राहणारे आहे. मराठी अर्थशास्त्र परिषद नेहमीच अर्थशास्त्रामध्ये आणि अर्थव्यवस्थेमध्ये घडणाऱ्या घटनांचा मागोवा घेऊन त्यावरच परिषदेच्या वार्षिक संमेलनामध्ये अशा विषयांवर अथवा घटनांवर सांगोपांग चर्चा घडवून आणत असते. या बाबीला अनुसरून 'भारतातील वर्तमान दशकातील आर्थिक स्थित्यंतरे' हा विषय येणाऱ्या ४४ व्या वार्षिक संमेलनासाठी राष्ट्रीय स्तरावरील विषय म्हणून निवडण्यात आला.

'भारतातील वर्तमान दशकातील आर्थिक स्थित्यंतरे' या विषयाला अनुसरून संशोधनपर लेख लिहिण्याच्या अनुषंगाने पुढील विषय सुचविता येतील.

**१. प्रथम आर्थिक स्थित्यंतर - नीती आयोगाची स्थापना :** (NITI Aayog)

या दशकातील भारतीय अर्थव्यवस्थेतील प्रथम स्थित्यंतर म्हणजे नीती आयोग (The National Institution for Transforming India - NITI) होय. या घटनेने ६५ वर्ष जुना नियोजन आयोग संपुष्टात येऊन दिनांक ०१ जानेवारी २०१५ पासून त्याची जागा नीती आयोगाने घेतली. त्या माध्यमातून

† अध्यक्ष, विदर्भ अर्थशास्त्र परिषद तथा विभागप्रमुख पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती.
आजीव सभासद क्र. : १४६१, भ्रमणध्वनी : ९४२३१३०१६७, ई-मेल : drvinodgawande123@gmail.com

या नंतरच्या काळातील देश विकासाच्या नियोजित योजना नीती आयोगाच्या माध्यमातून योजिल्या जाण्याचे निर्धारित करण्यात आले. ही बाब म्हणजे या दशकांमधील प्रमुख आर्थिक बदलापैकी प्रथम आणि प्रमुख आधारभूत बदल घडविणारी विशेष घटना आहे. या अनुषंगाने नीती आयोगाबाबत पुढील अंगाने विश्लेषणात्मक लेख लिहिता येऊ शकतील.

- नीती आयोग आणि नियोजन आयोगाच्या आधारभूत संरचनेची तुलना करून नीती आयोगाच्या स्थापनेची आवश्यकता पडताळून पाहणे.
- नीती आयोगाच्या स्थापनेनंतर भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये झालेल्या मूलभूत आर्थिक बदलांचा आढावा घेणे.
- नियोजन आयोगाची जागा नीती आयोग घेतल्यामुळे आर्थिक आयोजनामध्ये झालेल्या बदलांचा आढावा घेणे.
- या बदलाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर सकारात्मक आणि नकारात्मक दृष्टीने कशाप्रकारे बदल झालेला आहे ही बाब विचारात घेणे आवश्यक आहे.
- नीती आयोग स्थापण्यामागे काही प्रमुख उद्दिष्ट्ये होती, ज्यामध्ये राष्ट्रीय विकासामध्ये राज्यांची सक्रिय भूमिका विचारात घेऊन सशक्त राज्य, सशक्त राष्ट्र निर्माण करणे. केंद्र आणि राज्य सरकारच्या दरम्यान सहकार्याची भावना वृद्धिंगत करणे. ग्रामीण स्तर उंचावण्यासाठी विश्वसनीय अशा योजना तयार करून प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत या योजनांचा लाभ पुरविणे, समाजातील दुर्लक्षित घटकांकडे विशेष लक्ष देऊन दीर्घकालीन योजनांची आखणी रणनीती तयार करणे. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील तज्ज्ञ आणि भागीदारांच्या सहयोगातून नवीन विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा वापर करून विकासाच्या नवीन संधी निर्माण करणे. विकासकार्याला गती देणे. योजनांच्या कार्यान्वयनासाठी अद्ययावत तंत्रज्ञान आणि क्षमतांची निर्मिती यावर भर देणे. राष्ट्रीय विकासाचे उत्तरदायित्व घेणे. अत्याधुनिक संसाधनांच्या माध्यमातून कार्यक्रम आणि योजनांचे सक्रिय मूल्यांकन करणे आणि सुशासन निर्माण करणे यांसारखे अनेक महत्त्वपूर्ण उद्देश समोर ठेवून नीती आयोगाची स्थापना करण्यात आली होती. या सर्व उद्देशांचा स्वतंत्र आढावा घेता येऊ शकतो. संशोधकांना गेल्या पाच वर्षाच्या कालखंडामध्ये या दृष्टीने शासनाच्या कार्यकर्तृत्वाचा समग्र आढावा घेता येऊ शकतो.
- नीती आयोगाच्या व्यवस्थापनविषयक बाबी भारतीय अर्थव्यवस्थेच्या समोरील आव्हाने पेलण्यास कितपत उपयुक्त ठरणाऱ्या आहेत याचेही विश्लेषण करता येऊ शकते.

### २. द्वितीय आर्थिक स्थित्यंतर - नोटबंदी : (Demonetisation)

उपरोक्त दशकातील भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये झालेले दुसरे आर्थिक स्थित्यंतर म्हणजे नोटबंदी होय. दि.८ नोव्हेंबर २०१६ रोजी अचानक जाहीर करण्यात आलेला ५०० आणि १००० च्या चलनातील नोटा बंद करण्याचा निर्णय म्हणजे एक आर्थिक स्थित्यंतर होय. ज्याला नोटबंदी म्हणून ख्याती प्राप्त झाली. नोटबंदी आणि त्याचे परिणाम यावर सखोल चर्चा करण्यासाठी एक संपूर्ण सत्र अपेक्षित आहे; परंतु तरीदेखील दशकातील या आर्थिक स्थित्यंतराचा आढावा घेत असताना ही एक भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्वाची घडामोड मानली जाते.

- या बहुआयामी आणि समाजातील सर्वच

घटकांना प्रत्यक्ष प्रभावित करणाऱ्या घटनेचे विश्लेषण आवश्यक आहे. या निर्णयाचे यशापयश तपासण्याच्या दृष्टीने लिखाण करणे आवश्यक आहे.

- ज्या उद्देशाने नोटबंदीचा निर्णय घेऊन एका रात्रीमधून देशामध्ये चलनात असलेल्या ५०० आणि १००० च्या नोटा बंद करण्यात आल्या त्याचा मागोवा घेता येऊ शकतो.
- तद्नंतर चलनामध्ये नव्याने प्रस्तापित केलेल्या २००० आणि २०० ह्या नवीन नोटांचा अंतर्भाव केल्याने चलन व्यवस्थेमध्ये झालेला बदल विचारात घेणे आवश्यक आहे.
- भारतीय चलन व्यवस्थेमध्ये आणण्यात आलेल्या संपूर्ण प्रकारच्या नवीन नोटांच्या आकार आणि स्वरूपातील बदलाचा परिणाम विचारात घेणे आवश्यक आहे. कारण एवढ्या मोठ्या प्रमाणात देशातील चलनाचे स्वरूप बदलविण्याची ही स्वातंत्रोत्तर काळातील पहिलीच वेळ होती.
- देशामध्ये चलनाची नवनिर्मिती करून चलनाचे स्वरूप बदलणे आणि नवीन असे चलन जे आजपर्यंत अस्तित्वात नव्हते (उदा. दोनशे आणि दोन हजाराच्या नोटा) ते अस्तित्वात येणे. ही कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण घटना मानली जाते. देशातील सामान्यातील सामान्य व्यक्तीपासून ते विशेषातील विशेष व्यक्तीपर्यंत या घटनेचा परिणाम झाल्याचे दिसून येते. त्यामुळे गेल्या दशकातील ही एक मोठी आर्थिक घटना अथवा स्थित्यंतर मानले जाते. या स्थित्यंतराचे विविधांगाने आर्थिक आणि सामाजिक परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर पडलेले आहेत, याची या निमित्ताने मीमांसा करणे शक्य आहे.
- ज्या अनेक उद्देशाने प्रेरित होऊन नोटबंदीचा निर्णय घेण्यात आला त्या उद्देशांची कितपत पूर्तता झालेली आहे, याचाही मागोवा घेणे आवश्यक आहे.
- नोटबंदीचे आर्थिक परिणाम तपासत असताना त्यांच्या गुणदोषांची चाचणी होणे अपेक्षित आहे. तद्वतच नोटबंदी आर्थिक दृष्टीने असलेली आवश्यकता तपासता येऊ शकते.
- भारतीय अर्थव्यवस्थेवरील नोटबंदीच्या सामाजिक-आर्थिक परिणामांची कारणमीमांसा करणे, घटनेचा आवाका पाहता आवश्यक आहे.

**३. तृतीयआर्थिक स्थित्यंतर - वस्तू व सेवा कर :**
(Goods Service Tax - GST)

अर्थव्यवस्थेचा किंबहुना सरकारच्या उत्पन्नाचा प्रमुख स्रोत म्हणजे कर असतो. जेव्हा देशाच्या करसंरचनेमध्ये बदल होतो तेव्हा त्या घटनेचा प्रभाव देशातील ग्राहकांपासून ते उत्पादकांपर्यंत प्रत्येक घटकावर पडत असतो. 'एक देश एक कर' या संकल्पनेमधून अस्तित्वात आलेल्या वस्तू व सेवा कराची प्रतीक्षा अनेक वर्षांपासून होती. परंतु या संकल्पनेला मूर्तरूप याच दशकामध्येच प्राप्त झाले. हे या दशकातील भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये झालेले तिसरे प्रमुख आर्थिक स्थित्यंतर होय. दि.१ जुलै, २०१७ पासून संपूर्ण देशामध्ये जीएसटी करप्रणाली लागू करण्यात आली. परिणामतः यापूर्वी अस्तित्वात असलेली करप्रणाली संपुष्टात येऊन संपूर्ण देशामध्ये जीएसटी हा कर प्रकार लागू करण्यात आला. ज्यामध्ये केंद्र आणि राज्य आणि एकात्मिक जीएसटी असे तीन कर प्रकार निर्माण करण्यात आले. ज्या अंतर्गत कर आकारणीचे विविध टप्पे निर्धारित करण्यात आले. देशातील बहुतांश वस्तू आणि सेवा त्या-त्या टप्प्यामध्ये निर्धारित करण्यात आल्या आणि त्यानुसार प्रत्येक वस्तू व सेवेवर हा कर आकारण्यात येऊ लागला.

● संपूर्ण देशामध्ये एकच करप्रणाली लागू करण्यासंदर्भातील हे एक महत्त्वाचे पाऊल होते. ही करप्रणाली लागू करण्यामागे अनेक उद्देश होते. ज्यामध्ये कराचा विस्तारणारा परिणाम (Cascading Effect) कमी करणे, एकस्वरूप कर संरचना निर्माण करणे, सरकारी राजस्व वृद्धी, उपभोगाधारित करसंरचना, करचोरी भ्रष्टाचारास आळा घालणे इत्यादीपैकी किती उद्देशांची पूर्तता झालेली आहे, हा एक सर्वांच्या दृष्टीने उत्सुकतेचा विषय आहे. ज्यावर प्रकाश टाकणे आवश्यक आहे.

● ग्राहक या नात्याने जीएसटी या नवीन करप्रणालीतून ज्या अनेक अपेक्षा होत्या त्यापैकी सरकार, उत्पादक आणि ग्राहक यांच्या अपेक्षा किती प्रमाणात पूर्ण झाल्या याची मीमांसा करता येऊ शकते.

● जीएसटी करप्रणालीचा भारतीय अर्थ-व्यवस्थेवर सकारात्मक आणि नकारात्मक असा दोन्ही अंगाने काय परिणाम झालेला आहे याचा आढावा घेता येऊ शकतो.

● करप्रणालीतील गुंतागुंत जीएसटी या नवीन कर प्रकाराने कितपत दूर केली आहे आणि कर देयता आणि कराचा परतावा घेण्याच्या दृष्टीने ह्या कराची सुलभता तपासता येईल.

● या कराचा ग्राहक म्हणून सामान्य जनतेने किती स्वीकार केला आणि जनतेला या करापासून किती दिलासा मिळाला या बाबीचा सविस्तर विचार करणे क्रमप्राप्त ठरते.

● जीएसटी हा कर लागू करण्यापूर्वी सर्वसामान्य ग्राहक आणि उत्पादक यांच्यामध्ये शासनाद्वारे ज्या बाबींचा उल्लेख करण्यात आला होता, त्यामध्ये ही करप्रणाली कितपत यशस्वी झालेली आहे, याचा विचार यानिमित्ताने होणे अपेक्षित आहे.

● शासनाने जीएसटी कराचे विविध टप्प्यांमध्ये वर्गीकरण केलेले आहे. त्यानुसार वस्तू आणि सेवा यांची विभागणी विविध गटांमध्ये केलेली आहे. असे असले तरी अजूनही काही वस्तू आणि सेवा ह्या जीएसटी करसंरचनेच्या कक्षेपासून दूर ठेवलेल्या आहेत, त्याबाबत शासन आणि ग्राहकाच्या भूमिकेचा आढावा घेता येऊ शकतो.

● जीएसटी लागू झाल्यापासून शासनाच्या राजस्व मध्ये कोणते बदल घडून आलेत याविषयीची सविस्तर चर्चा अपेक्षित आहे.

● संपूर्ण देशामध्ये एकच करप्रणाली जीएसटीच्या माध्यमातून लागू झाल्यानंतर अनेक वस्तू आणि सेवांच्या किमतीमध्ये घट होऊन सामान्य ग्राहकांना त्याचा लाभ होणार ही एक माफक अपेक्षा अनेकांची होती. या अपेक्षेमध्ये जीएसटी ही करप्रणाली कितपत यशस्वी ठरली ही बाब सुद्धा तपासून पाहणे अगत्याचे आहे.

● कररचनेमधील क्लिष्टता आणि गुंतागुंत दूर करण्यास जीएसटी करप्रणाली कितपत यशस्वी ठरली आहे, याचाही आढावा घेणे जीएसटी करप्रणालीचे परीक्षण करण्याच्या हेतूने महत्त्वाचे आहे.

● या कराच्या माध्यमातून होणारे कर संकलन आणि त्याचे केंद्र आणि राज्यांमधील वितरण यामध्ये असलेल्या विसंगती, अडचणी किंवा मर्यादांचा अभ्यास या निमित्ताने करता येऊ शकतो.

**समारोप**

उपरोक्त घटनांचा समग्र अभ्यास किंवा त्यामधील आंतरसंबंधाच्या एकूण परिणामाचे विश्लेषणसुद्धा या निमित्ताने करता येऊ शकेल. येणाऱ्या दशकामध्ये या स्थित्यंतरांविषयी अधिक अधिकृत असे निष्कर्ष अनुभवयास मिळतील आणि या बदलांच्या परिणामांची सविस्तर कारणमीमांसा करता येईल. तद्वतच या बदलांचा भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेला दीर्घकालीन परिणाम अभ्यासता येईल.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४३ व्या अधिवेशनामध्ये जेव्हा याविषयाची निवड करण्यात

आली तेव्हा २०१०-२० या दशकातील आर्थिक स्थित्यंतराचा शेवट कोरोना महामारी (Covid-19) सारख्या संपूर्ण जागतिक अर्थव्यवस्थेला हादरा देणाऱ्या घटनेने होईल याचा कोणी अंदाजसुद्धा बांधला नव्हता. या दशकातील आर्थिक स्थित्यंतरांचा कळस म्हणजे दशकाच्या अंतिम टप्प्यामध्ये भारतासह संपूर्ण जगामध्ये कोरोना महामारीच्या माध्यमातून निर्माण झालेले आर्थिक संकट होय. ज्यामुळे जगातील जवळपास दोनशेपेक्षा अधिक अर्थव्यवस्था लॉकडाऊन करण्यात आल्या. त्यामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेचा समावेश प्रामुख्याने आहे. कोरोना महामारीच्या माध्यमातून निर्माण झालेले आर्थिक संकट समाजातील संपूर्ण घटकांना प्रभावित करणारे आहे. मानवी इतिहासातील संपूर्ण जग बंद पाडणारी ही एक महत्त्वपूर्ण घटना आहे. या आर्थिक स्थित्यंतरामुळे निर्माण झालेल्या संकटाच्या पाऊलखुणा कदाचित पुढील मानवीविकासाच्या टप्प्यांना एक वेगळे वळण देणारे ठरू शकतील. या दशकातील आर्थिक स्थित्यंतरांचा शेवट अशा संपूर्ण जग प्रभावित करणाऱ्या आणि प्रचंड व्यापक आर्थिक संकट निर्माण करणाऱ्या घटनेने व्हावा ही बाब या दशकाला दीर्घकाळ स्मरणात ठेवणारी आहे. हे संकट येणाऱ्या कालावधीमध्ये विविधांगी आर्थिक मीमांसा करणारे आहे. या संकटाचा परीघ प्रचंड मोठा असल्यामुळे हा एक वेगळा आणि सर्वच विद्याशाखांसाठी चर्चेचा विषय राहणार आहे. त्यामुळे याविषयीचे विचारमंथन याठिकाणी करणे सयुक्तिक ठरणार नाही. तरीदेखील मराठी अर्थशास्त्र परिषदेने निवडलेल्या 'भारतातील वर्तमान दशकातील आर्थिक स्थित्यंतरे' या विषयाचा शेवट कोविड-१९ यांसारख्या प्रचंड व्यापक अशा आर्थिक स्थित्यंतराने व्हावा ही एक विशेष उल्लेखनीय बाब आहे.

**संदर्भ**


१. नीती आयोग : या संदर्भाने लिहिलेली विविध पुस्तके, संशोधनपर लेख आणि आयोगाची अधिकृत संकेत स्थळे.

२. नोटबंदी : प्रकाशित विविध अभ्यासकांचे संशोधनपर लेख आणि अधिकृत संकेतस्थळे.

३. वस्तू व सेवा कर : प्रकाशित विविध पुस्तके, अधिकृत संकेत स्थळे आणि सर्वेक्षण अहवाल.


◆

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक**

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने मराठी भाषेत प्रकाशित झालेल्या अर्थशास्त्रीय ग्रंथास ₹ १०००/- चे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ ग्रंथ पारितोषिक प्रतिवर्षी देण्यात येते. १ जानेवारी २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९ या कालावधीतील मराठीतील अर्थशास्त्रीय ग्रंथाच्या लेखकांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे ३० सप्टेंबर २०१६ पर्यंत पाठवाव्यात.

**- मारोती वि. तेगमपुरे**

कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद

# अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक विचार

**मारोती तेगमपुरे** †

अण्णा भाऊ साठे यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४४ व्या अधिवेशनासाठी, चर्चासत्रासाठी अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक विचार हा विषय निश्चित करण्यात आला आहे. या विषयावर शोधनिबंध सादर करू इच्छिणाऱ्यांसाठी हे टिप्पण आहे. टिपणात नमूद करण्यात आलेल्या बाबींवरच नव्हे तर याव्यतिरिक्त आपणास अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यात, लढ्यात, शाहिरीत इतरत्र जाणवणाऱ्या आर्थिक, व्यवस्थात्मक घटकावरही यानिमित्ताने प्रकाश टाकता येईल. हे टिप्पण मार्ग आखून देणारे आहे, चौकट नव्हे.

**जीवनपरिचय व विचारधारेचा प्रभाव**

अण्णा भाऊ साठे यांचे मूळ नाव तुकाराम भाऊराव साठे. अण्णा भाऊ साठे यांचा जन्म १ ऑगस्ट १९२० रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव या छोट्याश्या खेड्यात झाला. साठे कुटुंबीयांकडे फक्त उदरनिर्वाह होऊ शकेल इतकीच शेतजमीन होती; परंतु त्या जमिनीवर एका जमीनदार सावकाराने नियंत्रण मिळवल्यामुळे व गावाकडे उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन शिल्लक नसल्यामुळे साठे कुटुंबीयांनी कामाच्या शोधात मुंबई जवळ केली. कोणतीही अक्षर ओळख नसताना रस्त्यावरील फलक वाचत, एकेक अक्षर जुळवत अण्णा भाऊ लिहायला, वाचायला शिकले. १९३६ मध्ये मुंबई येथील गिरणी कामगारांच्या संपात सक्रिय सहभाग नोंदवून अण्णा भाऊ यांनी कामगार एकजुटीची हाक दिली. १९३८मध्ये जर्मनीच्या हिटलरच्या सैन्याने रशियावर आक्रमण केले तेव्हा अण्णा भाऊंनी १९४१ मध्ये स्टॅलिनगार्डचा पोवाडा लिहून भारतीय स्वातंत्र्य चळवळीस २ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला. १९३६ ते १८ जुलै, १९६९ पर्यंत जागतिक कीर्तीचे अर्थशास्त्रज्ञ कार्ल मार्क्स यांच्या विचारधारेचा प्रभाव अण्णा भाऊ साठे यांच्या विचारपद्धतीवर होता याविषयीची स्पष्टता आपणास त्यांनी निर्माण केलेल्या समग्र साहित्य आणि त्यांनी निर्माण केलेले लढे यावरून येते. २०१९ मध्ये महाराष्ट्रातील पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर यांनी अण्णा भाऊ साठे यांचे साहित्यातील तत्त्वज्ञान / योगदान लक्षात घेऊन त्यांना डॉक्टरेट ही पदवी देण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेमध्ये संमत करण्यात आला आहे.

† अर्थशास्त्र विभागप्रमुख, गोदावरी कला महाविद्यालय, अंबड, जि. जालना.
आजीव सभासद क्र. : १२९५, भ्रमणध्वनी : ९४२३९९३१३७, ईमेल : maruti3137@gmail.com

**वैचारिक योगदान**

अण्णा भाऊ साठे यांचे वैचारिक योगदान प्रामुख्याने साम्यवादी/ समाजवादी आर्थिक विकास आणि नियोजन, सार्वजनिक अर्थशास्त्र, स्थूल अर्थशास्त्रीय विश्लेषण आणि कल्याणकारी अर्थशास्त्र या अभ्यास शाखेमध्ये असल्याचे दिसून येते. अण्णा भाऊ साठे यांच्या मते भारताला मिळालेले स्वातंत्र्य हे सामाजिक आणि आर्थिक स्वातंत्र्य नाही; कारण स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये भारतातील उत्पन्न आणि संपत्तीचे असमान वितरण झालेले आहे. उद्योग, शेती आणि सेवा क्षेत्र यावर मोजक्याच गटाची मक्तेदारी प्रस्थापित झालेली असून, भारतात आर्थिक विषमतेची दरी कमी करावयाची असेल तर उत्पन्न आणि संपत्तीचे समान वितरण होणे आवश्यक असल्याचे अण्णा भाऊ प्रतिपादन करतात. त्याकरिता उद्योग, शेती आणि सेवा क्षेत्राचे संपूर्ण राष्ट्रीयकरण करणे आवश्यक आहे, अशी भूमिका ते घेतात. अण्णा भाऊ साठे यांच्या मते, भारत आणि जगातील शोषणाचे मूळ म्हणजेच भांडवलशाही अर्थव्यवस्था होय. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत अतिरिक्त नफा मिळवण्यासाठी भांडवलदार वर्ग कामगारांचे शोषण करतो आणि वरकड खिशात घालतो. त्यामुळे या वर्गाकडून होणाऱ्या शोषणाविरुद्ध संघर्ष करण्यासाठी कामगार वर्गाने लोकशाही मार्गाने एकजुटीने संघर्ष करणे गरजेचे आहे. देशातील उत्पन्न आणि संपत्तीचे समान वितरण हे निसर्गवादी अर्थशास्त्रज्ञांच्या मतानुसार आपोआप होईल यावर अण्णा भाऊ साठे यांचा अजिबात विश्वास नव्हता. दारिद्र्य आणि बेरोजगारी निर्मूलन, दुष्काळ निवारण व रोगराईवर मात करण्यासाठी सरकारने पुढाकार घेणे अत्यावश्यक आहे, तसेच सामाजिक आणि आर्थिक कल्याणासाठी सरकारने हस्तक्षेप केला पाहिजे, अशी भूमिका अण्णा भाऊ यांची होती. भारतीय अर्थव्यवस्था ही शेतीप्रधान अर्थव्यवस्था असल्यामुळे देशातील एकूण लोकसंख्येपैकी शेती क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या श्रमिकांचे प्रमाण जास्त आहे. परंतु बहुसंख्यक श्रमिकांचा प्रत्यक्ष मालकी हक्क शेतीवर नाही. ब्रिटिशकालीन परंपरेपासून भारतात जमीनदारी व्यवस्था अस्तित्वात असल्यामुळे भूमिहीन शेतमजूर, अल्पभूधारक, लहान कारागीर यांना स्वतःच्या मालकी हक्काची जमीन मिळणे गरजेचे आहे, यासाठी जमिनीचे फेरवाटप करणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन अण्णा भाऊ करतात. अण्णा भाऊ यांनी 'ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसून दलित, कष्टकऱ्यांच्या तळहातावर तरलेली आहे', असे म्हटले आहे. त्यामुळे या जगाचा पोशिंदा हा श्रमिक असल्यामुळे श्रमिकांचे शोषण थांबवणे व त्यांना त्यांच्या श्रमाचा पूर्ण मोबदला मिळणे आवश्यक असल्याचे विचारही त्यांच्या साहित्यातून प्रकट होतात. कोट्यवधी दलितांच्या, कष्टकऱ्यांच्या दारिद्र्य, बेकारी, निरक्षरता, रोगराई यांसारख्या अति महत्त्वाच्या समस्या सोडवण्याऐवजी त्यावर अधिकचा खर्च करण्याऐवजी अनावश्यक किंवा कमी महत्त्वाच्या घटकांवर मोठ्या प्रमाणात खर्च केला जात आहे, हा संदर्भ पकडून अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील अशा प्रकारच्या जाणिवांचा ऊहापोह करता येऊ शकतो आणि या अनुषंगाने आजच्या परिस्थितीवरही दोन्ही बाजूंनी मांडणी करता येऊ शकेल.

**लेखनसंपदा**

अण्णा भाऊ साठे यांनी अतिशय कमी कालावधीमध्ये विपुल साहित्यनिर्मिती केली आहे. ज्यामध्ये ३२ कादंबऱ्या, १६ कथासंग्रह, १४ लोकनाट्य, ११ पोवाडे, २ नाटकं आणि एक प्रवास वर्णन यांचा समावेश आहे. अण्णा भाऊ यांनी त्यांच्या साहित्यामध्ये सामाजिक आणि आर्थिक संघर्ष उभा

केलेला आहे. अभ्यासाच्या/संशोधकांच्या सोयीसाठी म्हणून खालील मोजक्याच साहित्याचा उल्लेख करत आहे.

**फकिरा**

अण्णा भाऊ साठे यांची गाजलेली कादंबरी म्हणजे 'फकिरा' होय. या कादंबरीस महाराष्ट्र शासनाच्या वतीने पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. 'फकिरा' ही कादंबरी ब्रिटिशकालीन व्यवस्थेमध्ये भारतीय स्वातंत्र्य चळवळीचं बंड उभी करणारी आहे. याशिवाय भारतामध्ये असलेले प्रचंड दारिद्र्य, बेरोजगारी, उत्पन्न आणि संपत्तीचे झालेले असमान वाटप, सांगली व सातारा परिसरातील महाभयंकर दुष्काळ, दुष्काळामुळे निर्माण झालेली रोगराई या सर्व आर्थिक प्रश्नांच्या बाबतीत सरकारची उदासीनता आणि आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करण्यास सरकार म्हणून हस्तक्षेप होणे किती आवश्यक आहे, याविषयीचे विश्लेषण अण्णा भाऊ साठे यांनी 'फकिरा' मध्ये केले आहे. यातील एखाद्या घटकावर किंवा निवडक घटकांचा समावेश करून मांडणी करता येईल.

**वारणेच्या खोऱ्यात**

या कादंबरीमध्ये ब्रिटिशकालीन व्यवस्थेतील जमीनदार व सावकार श्रमिकांचे कशाप्रकारे शोषण करतात आणि संघटित झालेले श्रमिक भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये सुद्धा बंडाची भूमिका घेऊन त्याचवेळी भारतातील जमीनदारी व्यवस्था आणि सावकारशाही यांच्याविरुद्ध बंड पुकारतात. याविषयीचे मूलगामी विश्लेषण अण्णा भाऊंनी या कादंबरीत मांडले आहे. त्या काळातील शेतीप्रश्न आणि जमीनदार, सावकार यांच्याकडून शेतकऱ्यांची होत असलेली लूट, शोषण, दमन या विषयीची संशोधनात्मक मांडणी आणि त्याचे अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील प्रतिबिंब यावर चिकित्सक मांडणी करता येऊ शकेल.

**चित्रा**

'चित्रा' या कादंबरीत अण्णा भाऊ साठे यांनी भारतातील प्रचंड दारिद्र्य, बेरोजगारी, उपासमार, वेश्याव्यवसाय व आर्थिक प्रश्न यांविषयीचे विश्लेषण केले आहे. भारतीय स्त्रीप्रश्न आणि आर्थिक प्रश्न या अनुषंगाने विचार करून या कादंबरीत आलेल्या आर्थिक जाणिवांचे विश्लेषण करता येईल.

**चंदन**

'चंदन' या कादंबरीमध्ये भारतातील आर्थिक विषमता, उत्पन्न आणि संपत्तीचे असमान वाटप त्यामुळे निर्माण झालेले दारिद्र्य, बेरोजगारी आणि उपासमार, कुटुंबव्यवस्थेची जबाबदारी सांभाळत असताना स्त्री कामगारांचे होणारे शोषण, या शोषणाविरुद्ध उभे टाकणारे बंड याचे विश्लेषण करण्यात आले आहे. याविषयी बारकाव्यानिशी अभ्यास करून यातील साखळी समजून घेऊन मांडणी करता येईल.

**स्मशानातील सोनं**

'स्मशानातील सोनं' ही कथा अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील अतिशय महत्त्वाची कथा आहे. या कथेत भारतातील बेरोजगारीचे चित्र प्रतिनिधिक स्वरूपात परंतु अतिशय परखडपणे विश्लेषण करणारी कथा आहे. कथेत खाणीचे काम बंद पडल्यामुळे शरीराने अतिशय धिप्पाड असणारा भीमा स्मशानातील मृतदेहाच्या तोंडातील सोनं काढून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालवतो. त्यात भीमा म्हणतो, 'मरावे तर श्रीमंतांने आणि जगावे तर गरिबाने.' व्यक्ती म्हणून हे विधान अंतर्मुख होऊन विचार करायला भाग पडणारे आहे. या कथेच्या अनुषंगाने रोजगार निर्मितीसाठी सरकारची भूमिका किती महत्त्वाची आहे याविषयीचे विश्लेषण करण्यात आले आहे. या कथेवर किंवा अण्णा भाऊ यांच्या अनेक कथांमधून येणाऱ्या दारिद्र्य, बेरोजगारी, असमानता, सावकारी पिळवणूक, उपासमार, लूट

यांविषयीची सुद्धा आपणास चर्चा घडवून आणता येऊ शकेल.

**शिवारी चला**

पद्यरचनेत अण्णा भाऊंनी भारतातील जमीनदारी व्यवस्था आणि सावकारशाही व्यवस्था खूप मजबूत असून ती अगदी शेतातील कुंद्याप्रमाणे आहे. जमीनदारी व सावकारशाही व्यवस्थेला मुळासकट उपटून टाकण्यासाठी कामगारांची एकजूट महत्त्वाची असून कामगारांना शेतीचा मालकीहक्क मिळाला पाहिजे, अशी मांडणी केली आहे.

**मुंबईची लावणी**

मुंबईच्या लावणीमध्ये अण्णा भाऊ साठे यांनी एका बाजूने मुंबईसह महाराष्ट्र झाला पाहिजे असा महत्त्वाचा संदेश देतात, तर त्याच वेळी मुंबईमध्ये श्रीमंत आणि गरीब यांच्यामध्ये प्रचंड मोठी दरी कशी निर्माण झालेली आहे, श्रीमंतांकडे सर्व भौतिक सुखसुविधा आहेत; परंतु गरिबांकडे निवाऱ्याची व्यवस्थासुद्धा नाही. गरिबांना रोजगाराची साधने नाहीत, प्रचंड दारिद्र्य आहे अशा प्रकारची आर्थिक विषमता असलेली समाजव्यवस्था निर्माण झालेली आहे. या पार्श्वभूमीवर आपणास आजच्या वाढत जात असलेल्या आर्थिक विषमतेवर सुद्धा भाष्य करता येईल.

**मरीआईचा गाडा**

या कथेमध्ये अण्णा भाऊ साठे यांनी जेव्हा देशात रोगराई आणि महामारी येते अशावेळी अंधश्रद्धेला मोठ्या प्रमाणात खत-पाणी घातले जाते, अशा वेळी या भूलथापांना बळी न पडता आरोग्यसेवेचा लाभ लोकांना मिळाला पाहिजे. लोकांनी अज्ञान व अंधश्रद्धा सोडून वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून आरोग्यसेवेवर विश्वास टाकला पाहिजे, अशी स्पष्ट भूमिका अण्णा भाऊ घेतात. सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित करून वैज्ञानिक उपाय करणारी ही कथा आहे. आज कोव्हिड-१९ च्या महामारी काळात या कथेचे महत्त्व अधिक पटीने वाढले आहे. या कथेच्या संदर्भात आजचे समाजवास्तव मांडता येऊ शकेल.

उपरोक्त काही कथा, कादंबरी व लावणीच्या माध्यमातून हे टिप्पण आपणांसमोर ठेवले असले, तरी अण्णा भाऊ यांच्या समग्र साहित्यातून ही जाणीव प्रकट झाल्याचे स्पष्ट होते. अभ्यासकांना या व्यतिरिक्त त्यांचा अन्य साहित्यिक कलाकृतीचा आधार घेऊनही आपला शोधनिबंध विकसित करता येऊ शकेल. अण्णा भाऊ यांचे स्वतःचे व त्यांच्यावर इतर अभ्यासकांनी/ संशोधकांनी केलेल्या मांडणीचे / संशोधनाचे साहित्य आज सर्वत्र उपलब्ध आहे. संशोधनासाठी आपणास खालील संदर्भ वापरता येतील.

कादंबरीत चित्रा, माकडीचा माळ, संघर्ष, फकिरा, वैजयंता, आघात, अहंकार, वारणेच्या खोऱ्यात, कुरूप, रत्ना, गुलाम, ठसलेल्या बंदुका, जिवंत काडतूस यांबरोबरच कथा म्हणून आपणास काडीमोड, अमृत, जोगीण, रानगा, डोळे, लाडी, उपकाराची फेड, इरेनं गाढव खाल्लं, रक्ताचा टिळा, मरीआईचा गाडा, निळू मांग, स्मशानातील सोनं, सापळा, बरबाद्या कंजारी, भोमक्या, प्रायश्चित इत्यादी कथेचा आणि इतरही कथा आपणास संदर्भ म्हणून वापरता येतील. 'माझा रशियाचा प्रवास' या प्रवास वर्णनात प्रस्तुत विषयाच्या दृष्टीने अनेक संदर्भ उपलब्ध होतील. २ मार्च १९५८ रोजी पार पडलेल्या 'पहिल्या दलित साहित्य संमेलनाचे' उद्घाटक म्हणून अण्णा भाऊ साठे यांनी केलेले भाषण अत्यंत महत्त्वाचे असून, हे भाषण शोधनिबंध लिहिणाऱ्यांसाठी महत्त्वाचे ठरणार आहे. त्यांच्या लोकनाट्यातील मूक मिरवणूक, दुष्काळात तेरावा, बिलंदर बुडवे, पुढारी मिळाला, अकलेची गोष्ट, शेटजींचे इलेक्शन, माझी मुंबई अर्थात मुंबई

कोणाची या संदर्भाचाही उपयोग करता येईल. पोवाडा व लावणीच्या बाबतीत 'मुंबईची लावणी', 'माझी मैना गावावर राहिली', 'दुनियेची दौलत सारी', 'शिवारी चला', 'महाराष्ट्राची परंपरा', 'गण', 'एकजुटीचा नेता', 'मुंबईचा गिरणी कामगार', 'बंगालची हाक', 'स्टॅलिनग्राडचा पोवाडा', 'पंजाब-दिल्लीचा दंगा' या साहित्य कलाकृतीचाही संदर्भासाठी वापर करता येऊ शकेल. याबरोबरच आपणास खालील काही संदर्भ ग्रंथाचाही उपयोग करता येईल.

**अन्य उपलब्ध संदर्भ ग्रंथ**


१. भुयारे सदाशिव, अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक विचार, सूर्या प्रकाशन, लातूर, २०१९.

२. डांगळे अर्जुन, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे : निवडक वाङ्मय, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००६.

३. गारोडे प्रमोद, अण्णा भाऊंचे कांदबरीविश्व, कमल प्रकाशन, अंबरनाथ, ठाणे,२००६.

४. गुरव बाबुराव, अण्णा भाऊ साठे : समाज विचार आणि साहित्य विवेचन, मुंबई, १९९९.

५. गुरव बाबुराव, अण्णा भाऊ साठे, लोकवाङ्मय गृह, मुंबई, २००५.

६. कऱ्हाडे सदा, अण्णा भाऊ साठे : व्यक्तिमत्त्व आणि कर्तृत्व, लोकसाहित्य प्रकाशन, औरंगाबाद, २००९.

७. कठाळे नानासाहेब, अण्णा भाऊ साठे : जीवन आणि साहित्य, समता प्रकाशन, नागपूर, २०१३.

८. किरवले कृष्णा, दलित चळवळ आणि साहित्य, मॅजिक प्रकाशन, पुणे.

९. कोरडे बजरंग, भारतीय साहित्याचे निर्माते : अण्णा भाऊ साठे, साहित्य अकादमी दिल्ली, २००३.

१०. कुंभार नागोराव, शाहीर अण्णा भाऊ साठे, प्रबोधन प्रकाशन, लातूर, १९९३.

११. थोरात सुभाष, कामगारवर्गाचा प्राणसखा, वर्तमानाची बखर, सम्यक पब्लिकेशन, सांगली, २०१५.

१२. वानखेडे चंद्रकांत (संपा.), अण्णा भाऊ साठे साहित्य दर्शन, संकेत प्रकाशन नागपूर,२००७.


◆

## मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने महिला लेखिकेने लिहिलेल्या सर्वोत्कृष्ट अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथास ₹११०००/- , प्रमाणपत्र व मानचिन्ह देण्यात येते. १ जानेवारी, २०१९ ते ३१ डिसेंबर २०१९ या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या मराठीतील अर्थशास्त्रीय संदर्भग्रंथांच्या महिला लेखिका यांना स्पर्धेत सहभागी होता येईल. नमुन्यातील अर्ज, संबंधित ग्रंथाच्या चार प्रती कार्यवाहांकडे ३० सप्टेंबर २०२० पोहचतील या बेताने पाठवावे.

**- मारोती वि. तेगमपुरे**

कार्यवाह-खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद

## महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ
(स्थापना : १९ नोव्हेंबर, १९६०)
**रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई – ४०० ०२५**
दूरध्वनी : ०२२-२४३२५९२९/३१ फॅक्स : ०२२-२४३२ ५९३१ ई-मेल : secretary.sblc-mh@gov.in
संकेतस्तळ : https://msblc.maharashtra.gov.in


**मंडळाच्या योजना**

१. पुस्तक प्रकाशन योजना-विविध विषयांवरील बृहद्ग्रंथ प्रकाशित करणे
२. महाराष्ट्राचे शिल्पकार चरित्रमाला योजना
३. उत्कृष्ट ग्रंथांची भाषांतरे योजना
४. ललित व ललितेतर वाङ्मयाच्या प्रकाशनार्थ अनुदान योजना
५. नवलेखक पुस्तक प्रकाशनासाठी उत्तेजनार्थ अनुदान योजना
६. नवलेखक कार्यशाळा अनुदान योजना
७. नियतकालिकांना अनुदान योजना
८. स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना, विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार योजना, श्री.पु. भागवत पुरस्कार योजना
९. अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान योजना.

**मंडळाची निवडक प्रकाशने**

१. मृगपक्षिशास्त्र (मूळ संस्कृतासह) हंसदेव विरचित-संपा. मारुती चित्तमपल्ली. पं. नरसिंशास्त्री भातखंडे
२. खगोलशास्त्राचे विश्व – डॉ. जयंत विष्णू नारळीकर
३. कलेची मूलतत्त्वे (R.G.Collingwood यांच्या The Principles of Art या पुस्तकाचे भाषांतर) – स.गं. मालशे, डॉ. मिलिंद मालशे
४. मराठी चित्रपटसृष्टीचा समग्र इतिहास-रेखा देशपांडे.
५. महाराष्ट्राचा खाद्यसंस्कृतीकोश – संपा. डॉ. अनुपमा उजगरे
६. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला- के.के. चौधरी
७. श्री. चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणासहित) – स्वामी नित्यबोधानंदतीर्थ
८. आधुनिक संत आणि समाज – श्री. रवींद्र गोळे

**मंडळाची निवडक ४४४ पुस्तके ई-बुक स्वरुपात मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.**

**मंडळाच्या पुस्तकांचे जिल्हानिहाय वितरक**

१. मॅजेस्टिक बुक स्टॉल, गिरगाव, मुंबई
२. आयडियल पुस्तक, दादर, मुंबई
३. लोकवाङ्मयगृह, प्रभादेवी, मुंबई.
४. लक्ष्मी बुक डेपो, शिवाजी पेठ, ठाणे.
५. अक्षर साहित्य , चिपळूण, जि. रत्नागिरी.
६. अशोक एजन्सीज्, कणकवली, जि. सिंधुदुर्ग
७. ज्योती स्टोअर्स बुकसेलर, नाशिक.
८. अक्षय लॉ बुक सेलर्स, देवपूर, धुळे.
९. मे. शारदा प्रकाशन आणि बुक डेपो, जळगाव
१०. शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, जि. अहमदनगर
११. मॅजेस्टिक बुक स्टॉल, पुणे.
१२. बलशेटवार बुक सेलर्स, सातारा.
१३. गजानन बुक स्टोअर्स, सोलापूर.
१४. मे. अजब पुस्तकालय, कोल्हापूर.
१५. मेहता बुक सेलर्स, कोल्हापूर.
१६. मे. धारा (साकेत) प्रकाशन, औरंगाबाद
१७. दीपाली बुक एजेन्सी, जालना.
१८. देबडबाड पुस्तक भांडार, नांदेड.
१९. शारदा बुक डेपो, अकोला.
२०. भारतीय पुस्तकालय, लातूर.
२१. मेसर्स प्रकाश बुक डेपो, अकोला.
२२. सरस्वती बुक्स अँड स्टेशनर्स, अमरावती.
२३. स्वराज्य भांडार महिला सेवा मंडळ, वर्धा
२४. मे. साहित्य प्रसार केंद्र, चंद्रपूर
२५. साहित्य वितरण केंद्र, चंद्रपूर
२६. मुद्रा बुक डेपो, पालघर
२७. मावळे बुक डेबो, कर्जत, जि. रायगड
२८. सुशांत बुक डेपो, नंदूरबार
२९. रत्नाकर बुक सेलर्स, मिरज, सांगली
३०. पूजा ग्रंथ वितरण, परभणी
३१. गोपाल बुक सेलर, हिंगोली
३२. अनुराग पुस्तकालय, अंबाजोगाई, बीड.
३३. टिकार बुक एम्पोरिअम, जि. बुलढाणा
३४. बालाजी बुक डेपो, वाशिम.
३५. गणेश पुस्तकालय, यवतमाळ.
३६. व्हीजन बुक शॉप, भंडारा.
३७. सनी स्टोअर्स, गोदिंया.
३८. राहुल ट्रेडिंग कंपनी ॲन्ड बुक डेपो, गडचिरोली

**शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**
**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची पुस्तके मिळणाऱ्या शासकीय ग्रंथागारांचे पत्ते**

१. संचालक, शासन मुद्रण, लेखनसामग्री व प्रकाशन संचालनालय, नेताजी सुभाष मार्ग, चर्नीरोड, मुंबई ४०० ००४.
दूरध्वनी : (०२२) २३६३२६९३ २३६३०६९५, २३६३११४८, २३६३४०४९

२. व्यवस्थापक, शासकीय फोटोझिंको मुद्रणालय व ग्रंथागार, फोटोझिंको मुद्रणालय आवार, जी.पी.ओ. नजीक, पुणे ४११ ००१.
दूरध्वनी : (०२०) २६१२५०८०८

३. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व ग्रंथागार, सिव्हिल लाईन्स, नागपूर – ४४० ००१.
दूरध्वनी : (०७१२) २५६२६१५

४. सहायक संचालक, शासकीय लेखनसामग्री भांडार व ग्रंथागार, शहागंज, गांधी चौकाजवळ, औरंगाबाद ४३१००१.
दूरध्वनी : (०२४०) २३३१०९७

५. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय व लेखनसामग्री भांडार, ताराबाई पार्क, कोल्हापूर – ४१६ ००३.
दूरध्वनी : (०२३१) २६५०३९५ २६५०४०२

**मंडळाकडून प्रकाशित ५२४ ग्रंथांवर २५२ अधिकृत वितरकांना ४० टक्के सूट मिळेल. जास्तीत जास्त पुस्तक वितरकांनी अधिकृत वितरणासाठी सहभागी व्हावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी मंडळाच्या https://msblc.maharashtra.gov.in संकेतस्थळाला भेट द्या.**

Reg.No. 31918/77 / ISSN 0973-8452

# मराठी अर्थशास्त्र परिषद

# कोविड-१९


## घाबरु नका... पण जागरुक रहा

## हे करा....स्वत:ला व इतरांना सुरक्षित ठेवा

### कोविड-१९ संसर्गाची लक्षणे

खोकला । ताप । श्वासोच्छसाला अडथळा निर्माण होणे

साबण व पाणी वापरून आपले
हात स्वच्छ धुवा.





शिंकताना व खोकताना आपल्या
नाकावर व तोंडावर रुमाल धरा.


सर्दी किंवा फ्ल्यू सदृश्य लक्षणे असलेल्या
लोकांशी नजीकचा संपर्क टाळा.





मांस आ ण अंडी पूर्णपणे शिजवून व उकडून घ्या.

जंगली अथवा पाळीव प्राण्यांशी
निकट संपर्क टाळा.



## गर्दीच्या ठिकाणी शक्यतो जाणे टाळावे.

**अधिक माहितीसाठी आपल्या जवळील शासकीय रुग्णालयाशी संपर्क साधा.**

| राष्ट्रीय कॉल सेंटर क्र. | राज्यस्तरीय नियंत्रण कक्ष क्र. | टोल फ्री हेल्पलाईन क्र. |
|---|---|---|
| +91-11-23978046 | 020-26127394 | 104 |

| अध्यक्ष | कार्याध्यक्ष | कार्यवाह | प्रमुख संपादक |
|---|---|---|---|
| अनिल बा. सुर्यवंशी | कैलास के. पाटील | मारोती वि. तेगमपुरे | राहुल शं. म्होपरे |
| (सोलापूर) | (परभणी) | (अंबड) | (कोल्हापूर) |

सर्व कार्यकारिणी सदस्य - मराठी अर्थशास्त्र परिषद

जनहितार्थ प्रकाशित

मूल्य : रु. १०/– ( सभासदांकरिता विनामूल्य)